**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**लक्षवेधी सूचनांबाबत**

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी लक्षवेधी सूचना क्रमांक-१ नंतर चर्चेला घ्यावी अशी विनंती केलेली असल्यामुळे सदरहू लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

लक्षवेधी सूचना क्रमांक-२ सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे व इतर सन्माननीय सदस्यांची आहे. परंतु, सभागृहात माननीय आदिवासी विकास मंत्री उपस्थित नसल्यामुळे सदरहू लक्षवेधी सूचना नंतर चर्चेला घेण्यात येईल.

लक्षवेधी सूचना क्रमांक-३ सन्माननीय सदस्य श्री. किशोर दराडे यांची आहे. परंतु, सभागृहात माननीय मंत्री उपस्थित नसल्यामुळे सदरहू लक्षवेधी सूचना नंतर चर्चेला घेण्यात येईल.

लक्षवेधी सूचना क्रमांक-५ सन्माननीय सदस्य श्री. बाळाराम पाटील व सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांची आहे. परंतु, सभागृहात सन्माननीय सदस्य श्री. बाळाराम पाटील उपस्थित नाहीत. परंतु, माननीय नगर विकास मंत्री उपस्थित असल्यामुळे सदरहू लक्षवेधी सूचना नंतर चर्चेला घेण्यात येईल.

लक्षवेधी सूचना क्रमांक-७ सन्माननीय सदस्य डॉ. मनिषा कायंदे यांची आहे. परंतु, सभागृहात माननीय महिला व बालविकास मंत्री उपस्थित नसल्यामुळे सदरहू लक्षवेधी सूचना नंतर चर्चेला घेण्यात येईल.

सभागृहात सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत. पण संबंधित विभागाचे माननीय मंत्री महोदय उपस्थित नाहीत आणि संबंधित विभागाचे माननीय मंत्री महोदय उपस्थित आहेत पण संबंधित सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे मी सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी १०.०२ ते १०.१२ वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी.** : आदिवासी विभागाच्या अनुदानित आश्रमशाळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्याची आवश्यकता

**मु.शी.** : आदिवासी विभागाच्या अनुदानित आश्रमशाळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्याची आवश्यकता, यासंबंधी डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री जयंत आसगावकर, अभिजीत वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, सर्वश्री राजेश राठोड, अमरनाथ राजूरकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.मोहनराव कदम, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील आदिवासी विभागाच्या अनुदानातील आश्रमशाळांना गेल्या दोन वर्षांपासून शासनाच्या आदिवासी व वित्त विभागांकडून विद्यार्थ्यांच्या भोजनापोटी देय परिरक्षण मिळण्यास वारंवार होणारी दिरंगाई व अडवणूक, यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व इतर सोयी सवलतीवर होणारे परिणाम, त्यामुळे शासनाबाबत निर्माण झालेला असंतोष, नाशिक संच अप्पर आयुक्त क्षेत्रातील आश्रमशाळांचे गेल्या दोन वर्षांपासून परिरक्षण अनुदान निर्धारण करण्यास झालेली दिरंगाई, त्यामुळे परिपोषण अनुदान मिळण्यास येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाची उपाययोजना, आश्रमशाळा संहितेप्रमाणे मान्यतेबाबत शासनाने निर्णय न घेणे, आदिवासी आश्रमशाळांच्या उच्च माध्यमिक आश्रमशाळेत

डॉ.सुधीर तांबे....

गणित/भौतिकशास्त्र या विषयासाठीच्या एका पदास मंत्रीमंडळाच्या मान्यतेचे शासनाचे आदेश निघालेले असताना ते पद भरण्यास मान्यता न दिल्याने आदिवासी विद्यार्थ्यांना फक्त एकाच म्हणजे मेडिकल किंवा इंजिनियरींगला जाता येत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान, महागाईच्या काळात पहारेकरी पदास २४ तासासाठी फक्त दरमहा फक्त ५००० हे तुटपुंजे मानधन मिळत असल्यामुळे कोणीही व्यक्ती या पदावर काम करण्यास तयार नसणे, मानधन वाढविण्याबाबत आदिवासी विभागाने कोणताही निर्णय न घेणे, कोरोना काळात आश्रमशाळांमधील मृत्यूमुखी पडलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या रिक्त जागावर व सेवानिवृत्तीमुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची रिक्त झालेली पदे न भरल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असणे, ही पदे तात्काळ भरण्यास मान्यता देण्याबाबत निर्णय अपेक्षित असणे, आश्रमशाळांतील लहान मुलांसाठी सफाईदाराचे पद नसल्यामुळे मुलांच्या आरोग्यावर होणारे परिणाम लक्षात घेता मानधन तत्वावर महिला व पुरुष सफाईदार पदास तात्काळ मान्यता मिळण्याची आवश्यकता, विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेता व आरोग्याच्या दृष्टीने सहाय्यक अधिक्षक व सहायक अधिक्षिका हे पद भरतीस प्राधान्याने मान्यता मिळण्याची आवश्यकता इ. अनेक मागण्यांवर वारंवार शासनाकडे निवेदने दिली असता त्याकडे शासनाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व करावयाची कार्यवाही."

ॲड.के.सी.पाडवी (आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, राज्यातील अनुदानित आश्रमशाळांच्या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना आहे. या शाळांमध्ये पहारेकरी पद भरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु त्यांना केवळ ५ हजार रुपये इतके तुटपुंजे मानधन दिले जात आहे. त्यामुळे इतक्या कमी मानधनामुळे या पदावर काम करण्यास कोणी तयार होत नाही. परंतु दुसऱ्या बाजूला शासकीय आश्रमशाळांतील पहारेकऱ्यांना ३५ हजार रुपये वेतन दिले जाते. शासकीय आश्रमशाळेतील आणि अनुदानित आश्रमशाळेतील पहारेकऱ्यांच्या वेतनातील तफावत हा एकप्रकारे त्यांच्यावर सामाजिकदृष्ट्या अन्याय आहे. अनुदानित आश्रमशाळांतील पहारेकऱ्यांना सुद्धा पुरेशा प्रमाणात मानधन देणे आवश्यक आहे. तसेच पहारेकरी हे पद पूर्णवेळ कार्यरत असण्याची आवश्यकता आहे. मोठ्या पदांना नियमित पगार दिला जातो. परंतु अनुदानित आश्रमशाळांमध्ये वर्ग-४ ची पदे अनुदान तत्त्वावर किंवा कंत्राटी पद्धतीवर भरण्यात येतात. हा एकप्रकारे सामाजिक अन्याय आहे. त्यामुळे हा सामाजिक अन्याय य दूर करण्याच्या दृष्टीने मंत्री महोदय निर्णय घेतील काय ? आश्रमशाळांमध्ये सफाईगार हे पद सुद्धा महत्त्वाचे असून, त्यांच्या माध्यमातून आश्रमशाळांमध्ये सफाई करणे गरजेचे असते. त्यामुळे अनुदानित आश्रमशाळांमध्ये सफाईगार हे पद निर्माण करण्यात येईल काय ? मंत्री महोदयांनी विद्यार्थ्यांना भोजनापोटी देय असलेला आहार भत्ता वितरित केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. सभापती महोदय, अनुदानित आश्रमशाळांमध्ये कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्यात आले आहे. परंतु त्या ठिकाणी शिक्षकांची पदे रिक्त आहेत. हे खरे आहे की, राज्य सरकारची शिक्षक भरतीवर बंदी आहे. वास्तविक पाहता शिक्षण हे विशेष समजले पाहिजे, त्यातल्या त्यात आदिवासी समाजासाठी देण्यात येणारे शिक्षण हे अतिविशेष समजले पाहिजे. मी स्पेसिफिक विचारतो की, ४ मे रोजीचा शासन निर्णय रद्द करुन आकृतिबंधानुसार किंवा त्या त्या अनुदानित आश्रमशाळांतील गरजेनुसार गणित, विज्ञान यासारख्या विषयांचे शिक्षक भरण्यात येतील काय ?

असुधारित प्रत

ॲड.के.सी.पाडवी : सभापती महोदय, आहार भत्ता अदा केल्याबद्दल सन्माननीय सदस्यांनी माझे आभार मानले आहेत. मी सांगू इच्छितो की, आहार भत्त्यापोटी १८५ कोटी रुपये वितरित केले असून त्यातील जवळजवळ १२६ कोटी रुपये खर्च झाले आहेत.

सभापती महोदय, हे खरे आहे की, शासकीय आश्रमशाळेत पहारेकरी हे पद मंजूर असून त्यास जवळजवळ ३०-३५ हजार रुपये पगार असतो. परंतु आदिवासी अनुदानित आश्रमशाळेतील पहारेकरी हे ५ हजार रुपये मानधनावर काम करीत आहेत. सन्माननीय सदस्यांची पहारेकऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबतची मागणी रास्त आहे. आमच्या विभागाने सामान्य प्रशासन विभागाकडे पदांचा आकृतिबंध सादर केलेला आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून सदरहू प्रस्तावावर प्रगतीपथावर कार्यवाही सुरु आहे. तद्नंतर सदरहू प्रस्ताव उप समितीकडे, त्यानंतर उच्चाधिकार समितीकडे मान्यतेसाठी जाईल. सर्वात शेवटी मंत्रिमंडळापुढे सदरहू प्रस्ताव मान्यतेसाठी येईल. मी सांगू इच्छितो की, निश्चितपणे पहारेकऱ्यांच्या मानधनात बदल केला जाईल. तसेच गरज पडली तर पहारेकरी हे पद बाह्यस्त्रोताद्वारे भरण्यात येतील. तसेच एका आश्रमशाळेत कमीत कमी दोन पहारेकरी ठेवणे आवश्यक आहे. कारण एक पहारेकरी २४ तास काम करु शकत नाही. सफाई कामगारांच्या बाबतीत आकृतिबंधाला मान्यता मिळाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल. सभापती महोदय, पद भरतीच्या बाबतीत सांगू इच्छितो की, शासन निर्णय दि.२०/०९/२०१९ रोजी त्यांचे एक पद मान्य केले आहे. परंतु ४ मे रोजीच्या शासन निर्णयान्वये त्याला स्थगिती आहे. सदरहू पद भरण्याबाबत आदिवासी विभागाला परवानगी देण्याबाबत वित्त विभागाला विनंती करण्यात येईल. हे खरे आहे की, इंजिनियरींग, एमबीबीएस शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना विज्ञान विषय शिकविण्यासाठी सदरहू विषय शिक्षकांची गरज आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचा संविधानावर विश्वास आहे काय, असल्यास, संविधानातील कलम-१४ हे समानतेच्या तत्त्वाबाबतचे आहे. संविधानाने आदिवासी समाजाला विशेष संरक्षण दिलेले आहे. या दोन बाबी लक्षात घेता, पद भरती न करणे आणि चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना किमान वेतन देखील न देणे, या दोन्ही बाबी अन्यायकारक आहेत. मी विचारु इच्छितो की, आदिवासी विकास विभागाचे मंत्री म्हणून आपण या बाबींना संमती कशी देता ? मी स्पेसिफिक विचारतो की, पहारेकऱ्यांच्या वेतनातील तफावत ताबडतोब दूर करण्यात येईल काय ? रिक्त पदे भरण्याबाबत मंत्री महोदयांनी सांगितले आहे. ही पदे भरण्याचा आपला अधिकार आहे. आदिवासींना विशेष संरक्षण असल्यामुळे पुन्हा वेगळ्या परवानगी आवश्यकता नाही. मी स्पेसिफिक विचारतो की, जी पदे मंजूर आहेत ती तातडीने भरण्यात येतील काय ?

ॲड.के.सी.पाडवी : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी राज्यघटना या विषयातून पी.जी. झालेलो आहे. हे मान्य आहे की, शासकीय आश्रमशाळेत पहारेकऱ्याला ३०-३५ हजार रुपये पगार आहे आणि अनुदानित आश्रमशाळेतील पहारेकऱ्यांना ५ हजार रुपये मानधन आहे, ही बाब अन्यायकारक आहे. परंतु आकृतिबंधाला मान्यता मिळाल्यानंतर यामध्ये बदल करण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय.....

**सभापती** : माननीय मंत्र्यांनी सांगितले की, या संदर्भातील प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे सादर केलेला आहे. याचाच अर्थ आदिवासी विकास विभागाची शिफारस असल्याशिवाय ते या संदर्भातील प्रस्ताव सामान्य प्रशाससन विभागाकडे पाठवू शकत नाहीत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मत्री महोदयांनी पद भरण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. मंत्री महोदय हे सांविधानिक पदावर काम करीत आहेत. ते कोणत्या कॉलेजमध्ये संविधान शिकले हा मुद्दा नाही. मंत्री महोदय, हे संविधानाची शपथ घेऊन काम करीत आहेत. आदिवासी समाजाला असलेल्या विशेष संरक्षणाबाबत कोणालाही हस्तक्षेप करता येत नाही. तो मंत्री महोदयांचा अधिकार

असुधारित प्रत

श्री.कपिल पाटील....

आहे. मी स्पेसिफिक विचारतो की, पहारेकऱ्यांच्या वेतनातील तफावत ताबडतोब दूर करण्याबाबतची घोषणा मंत्री महोदय करतील काय, तसेच रिक्त पदे ताबडतोब भरण्यात येतील काय ?

ॲड.के.सी.पाडवी : सभापती महोदय, केवळ पहारेकऱ्यांपुरता विषय मर्यादित नसून आकृतिबंधामध्ये १४,४०४ पदे मंजूर करण्यासाठी आमचा विभाग प्रयत्नशील आहे. हा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडून प्रगतीपथावर आहे. सामान्य प्रशासन विभागाने मान्यता दिल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**सभापती** : मंत्री महोदय, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, पहारेकऱ्यांच्या वेतनातील तफावत आपण सादर केलेल्या प्रस्तावामुळे दूर होईल काय ?

ॲड.के.सी.पाडवी : सभापती महोदय, राज्यघटनेचे कलम १४ हे समानतेच्या तत्त्वाबाबतचे आहे. या कलमानुसार पहारेकऱ्यांच्या मानधनातील तफावत ही चुकीचीच आहे. या संदर्भातील शासन निर्णय बदलण्यासाठी योग्य ती पावले उचलली जातील.

श्री.किरण सरनाईक : सभापती महोदय, दिनांक ३० जून, २०१९ रोजी हा प्रश्न सभागृहात उपस्थित झाला होता. शासनाने ३० जून, २०१९ रोजी आश्रमशाळा संहिता करण्याचे मान्य केले होते. आश्रमशाळा संहितेमध्ये पहारेकरी हे पद श्रेणी पदावर घेण्याचे ठरलेले आहे. आश्रमशाळा संहितेची अंमलबजावणी आजपर्यंत का करण्यात आली नाही, हा खरा प्रश्न आहे. जर वेळीच आश्रमशाळा संहितेची अंमलबजावणी करण्यात आली असती तर या सर्व अडचणी सुटल्या असत्या. मी स्पेसिफिक विचारतो की, आश्रमशाळा संहितेची अंमलबजावणी ताबडतोब करण्यात येईल काय, तसेच पहारेकरी पदांना श्रेणी पदांवर घेण्यात येईल काय ?

ॲड.के.सी.पाडवी : सभापती महोदय, आश्रमशाळा संहितेला फक्त आदिवासी विकास विभागाने मान्यता दिलेली आहे. या संहितेला मंत्रिमंडळाची सुद्धा मंजुरी आवश्यक आहे. आम्ही आश्रमशाळा संहितेची अंमलबजावणी निश्चितपणे करीत आहोत. परंतु काही बाबींना मंत्रिमंडळाची मान्यता लागते. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी या बाबीचा आग्रह न धरता, सन्माननीय सदस्यांनी पद भरतीबाबत विचारावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी किती बजेट असावे या बाबत घटनेत तरतूद आहे. त्यानुसार अनुसूचित जातीसाठी १५ टक्के आणि अनुसूचित जमातीसाठी ९ टक्के बजेट राखीव ठेवावयास पाहिजे. मी विचारु इच्छितो की, गेल्या दोन वर्षात आदिवासी विकास विभागाला प्राप्त झालेल्या निधीपैकी किती निधी खर्च न झाल्यामुळे परत गेला आहे ? आदिवासी आश्रमशाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना भोजन दिले पाहिजे. मी विचारु इच्छितो की, आदिवासी आश्रमशाळांचा कार्यक्रम ठरवित असताना आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी आणि वसतिगृहांसाठी आवश्यक असलेल्या संपूर्ण निधीची तरतूद करण्यात आलेली आहे काय ?

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत

श्री. जयंत प्र. पाटील ....

तुम्हाला अर्थसंकल्पामध्ये ३-५ हजार कोटी रुपये दिले आहेत. त्यामध्ये रस्ते करु नका. मुले शिकली, जेवली तरच कामे होणार आहेत. शासन त्या दृष्टीकोनातून या संदर्भातील निर्णय घेईल का ? निर्णय घेण्याची गरज नाही. तुम्ही वकील आहात. तुम्हाला सर्व गोष्टींचे ज्ञान आहे. तुम्ही आदिवासी समाजाचे असून आदिवासी विभागातील आहात. नंदुरबार जिल्हा क्रमांक एकचा आदिवासी जिल्हा आहे. ....(अडथळा).... माननीय मंत्र्यांना जाणीव करुन दिली पाहिजे. ते विसरलेले आहेत. अर्थसंकल्पातील पैसे तुम्ही खर्च करायचे आहेत. अर्थ खात्याने दिलेल्या अर्थसंकल्पातील तरतुदीतून कोणते कार्यक्रम क्रमाने घ्यायचे आहेत हे पाहण्याचा तुमच्या खात्याचा अधिकार आहे आणि तो आपण वापरला पाहिजे. येत्या ३ वर्षांत तुम्हाला दिलेले किती पैसे अर्थ खात्याकडे परत गेले आहेत ?

**सभापती** : माननीय मंत्र्यांनी अखर्चित रक्कम किती आहे याबाबत सांगावे.

ॲड के.सी.पाडवी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची कळकळ मला माहीत आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेला अर्थ खात्याकडून किती टक्के तरतूद मिळाली हा प्रश्न लक्षवेधी सूचनेशी संबंधित नसला तरी मी सांगू इच्छितो की, आम्हाला अर्थसंकल्पात जितका निधी मिळाला पाहिजे, त्यातून शिक्षण खात्याला जे दिले पाहिजे ते दिलेले आहे. कोरोना काळात आश्रमशाळा, शिक्षण व्यवस्था येथे मुलेच आली नसल्यामुळे हा पैसा शिल्लक राहिला आहे हे तेवढेच खरे आहे. परंतु असलेल्या अर्थसंकल्पात निश्चितपणे शिक्षणासाठी पैसा कमी पडत नाही. टक्केवारी किती हा विषय येथील नाही. पण माझे शिक्षणासंदर्भात निश्चितपणे लक्ष आहे. शिक्षण नसेल तर आदिवासी विकासाला काही अर्थ नाही याची मला जाणीव आहे. त्यामुळे मी या गोष्टीकडे लक्ष वेधत आहे.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी आताच काही बाबी सांगितल्या आहेत. आदिवासी आश्रमशाळा शासकीय व अनुदानित देखील आहेत. आपण त्यांना खाण्यापिण्याचा भत्ता देतो. अनुदानित व शासकीय आश्रमशाळांना तो

डॉ. रणजित पाटील ....

भत्ता सारखा देतो का ? देत नसाल तर तो सारखा दिला पाहिजे. शालेय शिक्षण विभाग व आदिवासी विकास विभाग यांच्याकडून चालविल्या जाणाऱ्या आश्रमशाळा आहेत. शालेय शिक्षण विभागाकडून जेव्हा एखादा शासन निर्णय निघतो तेव्हा तो आपसूकच आदिवासी आश्रमशाळांना लागू झाला पाहिजे. पण असे लक्षात येते की, ६-८ महिने, वर्षभर त्याची अंमलबजावणी होण्यास कनिष्ठ पातळीवर .... शालेय शिक्षण विभागाच्या आश्रमशाळा किंवा सामाजिक न्याय विभागाच्या आश्रमशाळा यांना तो लागू होत नाही, त्याला वर्ष लागते. कधी-कधी शिक्षकांचे पगार ६-८ महिने होत नाहीत, ही वास्तविकता आहे. शालेय शिक्षण विभागाचे काम चालते. आपण शिक्षकांचे पगार, विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असणारी स्कॉलरशिप, शैक्षणिक शुल्क या सर्व गोष्टी शालेय शिक्षण विभागासारख्या पॅरेलल करणार का ?

ॲड के.सी.पाडवी : सभापती महोदय, स्वयंसेवी संस्थांना पूर्वी एका विद्यार्थ्यामागे ९०० रुपये खर्च होता. आता तो १५०० रुपये केला आहे. शासकीय आश्रमशाळेमध्ये २२०० रुपये आहे. ९०० रुपयांच्या ठिकाणी १५०० रुपये केले आहेत. आपण २२०० रुपये देऊ शकत नाही. कारण त्या स्वयंसेवी संस्था आहेत. स्वयंसेवी संस्थांचा स्वत:चा काही भाग असतो. त्यामुळेच आपण त्यांना देतो.

**सभापती** : माननीय मंत्र्यांनी शासनाचा निर्णय नसेल तर नाही सांगावे. होणार नाही असे सांगावे.

ॲड के.सी.पाडवी : सभापती महोदय, तसे होणार नाही. आपण वाढ केली आहे. आपण १५०० रुपयांपर्यंत वाढविले आहेत.

**सभापती** : माझे त्या अनुषंगाने एक निरीक्षण आहे. माननीय मंत्री श्री. उदय सामंत सभागृहात उपस्थित असल्यामुळे ते माझ्या लक्षात आले आहे. खरे म्हणजे मानीय मंत्री असल्यामुळे मी हे विचारीत आहे. शैक्षणिक क्षेत्रातील पहारेकरी, सफाई कामगार, शिपाई, क्लार्क या सर्वांना किमान वेतन देण्याचे काय धोरण आहे आणि तसे नसेल तर किमान वेतन देण्याचा शासनाने विचार करावा असे मी निर्देश देत आहे.

असुधारित प्रत

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, विद्यापीठे स्वतंत्र निर्णय घेतात. परंतु अपेक्षित असे आहे की, जेथे तात्पुरत्या स्वरुपाचे हे लोक लागले आहेत त्यांना किमान वेतन दिले गेलेच पाहिजे अशा पध्दत संपूर्ण राज्यात असणे गरजेचे आहे. फक्त यामध्ये एकच गोष्ट राहिली आहे की, कामगार विभाग शैक्षणिक विभाग सोडून अन्य सर्व विभागांना किमान वेतन किती व काय द्यायचे याबाबत शासन निर्णय काढतो, त्यांच्या भत्त्याचा देखील ६ महिन्यानंतरचा शासन निर्णय काढतो. माझी आपल्यामार्फत एवढीच विनंती आहे की, कामगार विभागाने जर शैक्षणिक विभागाला देखील अंतर्भूत केले तर या सर्वांना किमान वेतन आपण देऊ शकतो.

**सभापती** : ठीक आहे. मी शासनाला निर्देश देत आहे की, माननीय मंत्री जर सकारात्मक असतील तर कामगार विभागाने त्यांच्याशी सहकार्य करुन काम करावे.

----

असुधारित प्रत

**पृ.शी.**: सन २०१८ ते सन २०२० या काळात सरकारकडून हाती घेण्यात आलेल्या ३३ कोटी वृक्ष लागवडीत कोट्यवधी रुपयांचा अपहार होणे.

**मु.शी.**: सन २०१८ ते सन २०२० या काळात सरकारकडून हाती घेण्यात आलेल्या ३३ कोटी वृक्ष लागवडीत कोट्यवधी रुपयांचा अपहार होणे यासंबंधी श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. किशोर दराडे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात सन २०१८ ते सन २०२० या कालावधीत सरकारकडून ३३ कोटी व १३ कोटी वृक्ष लागवड योजना हाती घेण्यात आलेली असणे, या योजनेअंतर्गत पंढरपूर तालुक्यातील सिद्धेवाडी, गादेगाव, भंडीशेगाव, करकंब, धोंडेवाडी, गादेगाव कासेगाव, कोसेवाडी, नेमतवाडी, गोपाळपूर, एकलासपूर, सुस्ते, फुलचिंचोली, पंढरपूर, खर्डी, पटवर्धन कुरोली, भाळवणी या गावांमध्ये वृक्ष लागवड करण्यात आलेली असणे, ही वृक्ष लागवड करत असताना संबंधित वनक्षेत्रपाल व कायम वनमजूर या दोघांकडून मोठ्या प्रमाणात हेराफेरी करण्यात आल्याच्या व या वृक्ष लागवडीमध्ये मोठा भ्रष्टाचार झाल्याच्या बातम्या तसेच तक्रारी शासनापर्यंत सादर झालेले असणे, सदर प्रकार घडलेल्या गावांमध्ये संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी लोकांना वन खात्यात कायम कर्मचारी म्हणून घेतो या अमिषाने लोकांच्या नातेवाईकाच्या नावे मोठ्या रकमेचे चेक काढून व त्या रक्कमा परत फोन पे, गुगल पे च्या माध्यमातून स्वतःकडे घेतलेल्या असणे, वृक्ष लागवड करत असताना ज्या वन मजुरांच्या नावे चेक काढले आहेत त्या वन मजुरांनीही शासनाकडे तक्रारी केलेल्या असणे, जे मजूर कधीही कामावर आले नाहीत अशाही वन मजुरांच्या नावे

असुधारित प्रत

श्री. किशोर दराडे ....

या अधिकाऱ्यांनी बोगस चेक काढून लाख रुपयांचा अपहार केलेला असणे, कॉलेज विद्यार्थी, विशेष म्हणजे ज्या व्यक्तीला दोन्ही हात नाहीत अशा व्यक्तींच्या नावेही बोगस चेक काढलेले असणे, घडलेल्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी विभागीय वन अधिकारी सोलापूर यांच्याकडे तक्रार केली असता संबंधितावर केलेले भ्रष्टाचाराचे आरोप तत्कालीन वनाधिकारी यांनी फेटाळून लावून त्यांना निर्दोष मुक्त केलेले असणे, पंढरपूर तालुक्यात सन २०१८ ते सन २०२० या कालावधीत तालुका वनरक्षक व त्याच्या इतर साथीदारांनी शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या रकमेचा अपहार केलेला असणे, या कृत्यांसाठी संबंधित अधिकाऱ्याला बडतर्फ करण्याऐवजी त्याची बदली गारगोटी कोल्हापूर येथे केलेली असणे, या सर्व बाबींचा विचार करून संबंधित अधिकारी व याप्रकरणी सामील अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषी असणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून या अधिकाऱ्यांच्या संपत्तीची चौकशी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. दत्तात्रय भरणे (वने राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. किशोर दराडे : सभापती महोदय, निवेदनात म्हटले आहे की, श्री. लक्ष्मण सवळी यांनी पुरावे सादर केले नाहीत. श्री. जेऊरे यांना फोन पेद्वारे पैसे पाठविल्याचे सबळ पुरावे वेळोवेळी सादर केले आहेत. माझ्याकडे देखील ते आहेत. ४०-५० हजार रुपये, १ लाख रुपये असे फोन पेद्वारे पैसे दिल्याचे सबळ पुरावे अधिकाऱ्यांकडे दिले आहेत. निवेदनात दुसरे असे म्हटले आहे की, तक्रारदार हजर नव्हते. प्रत्येक वेळी, नेहमी तक्रारदार हजर होते. सीसीटीव्ही कॅमेरे पाहिले तर तुम्हाला तो उपस्थित दिसेल. चौकशी करणारे अधिकारी त्यात सामील आहेत. त्यामुळे त्या योजनेत अतिशय मोठा भ्रष्टाचार झाला आहे. हात-पाय नाहीत अशा मुलांना देखील चेक दिले आहेत. ज्याला हात नाही, असा माणूस काय काम करु शकतो ? अशा लोकांना चेक दिले आहेत आणि यामध्ये करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. माझी माननीय मंत्र्यांना मागणी आहे की, आपण संबंधित अधिकाऱ्यांचे निलंबन कराल का, असत्य माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई कराल, संबंधित अधिकाऱ्यांची सीबीआय किंवा एलसीबीमार्फत चौकशी होणार का ?

श्री. दत्तात्रय भरणे : सभापती महोदय, या विषयाच्या अनुषंगाने पूर्वी देखील सन २०२१ च्या हिवाळी अधिवेशनात सन्माननीय सदस्यांनी अनेक मुद्दे लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित केले होते. मुद्दे उपस्थित केल्यानंतर सहायक वनरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती देखील नेमलेली होती. मी आश्वासित करतो की, सहायक वनरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली जी चौकशी समिती नेमली आहे, त्यांच्या अहवाल, वस्तुस्थितीदर्शक माहिती अजुनही काही गोष्टींमध्ये न आल्यामुळे त्याची वरिष्ठांमार्फत अजुनही फेरचौकशी करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत सांगतो की, तत्कालीन वनक्षेत्रपाल श्री. अहिरे यांची मनासे नियम, १९७९ मधील नियम क्रमांक ८ अंतर्गत विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. परंतु तरीही सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचे गांभीर्य लक्षात घेता त्यांना तातडीने निलंबित करण्यात येईल.

श्री. किशोर दराडे : सभापती महोदय, धन्यवाद.

श्री. अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी त्यांना निलंबित केले आहे. मागच्या सरकारमध्ये गाजावाजा करुन ३३ कोटी झाडे लावण्याचा निर्णय झाला होता, त्यापैकी किती झाडे जीवंत आहेत याची माहिती मिळेल का ?

**सभापती** : माहिती घेऊन पटलावर ठेवावी.

श्री. दत्तात्रय भरणे : सभापती महोदय, या संदर्भात चौकशी समितीच नेमली आहे. आपण त्याबाबतीत लवकरच कार्यवाही करीत आहोत.

डॉ. मनिषा कायंदे : सभापती महोदय, ३३ कोटी वृक्ष लागवड असे म्हटले आहे. हा आकडा ३३ कोटी का ठरविला हा संशोधनाचा विषय आहे. ३ वर्षे सतत याबाबत बातम्या येत आहेत. हे किती असत्य होते, दिखावा होता, नुसती इव्हेंटबाजी होती याबाबत सर्वच वर्तमानपत्रांनी बातम्या दिल्या. त्याबाबतीत अनेक चौकशी, भरपूर चर्चा झाली आहे. परंतु त्यामध्ये ठोस असे काही नाही. सन्माननीय सदस्यांनी एका तालुक्यातील मुद्दा उपस्थित केल आहे. पण हे तर फक्त टिप ऑफ दी आईसबर्ग आहे. संपूर्ण राज्यात काय घडले असेल, फोन पे, गुगल पे द्वारे ४० हजार रुपये नोकऱ्यांचे अमिष दाखवून, वन खात्यामध्ये कायमस्वरुपी नोकरी देतो म्हणून ट्रान्सफर केले असतील तर संपूर्ण राज्यात काय घडले असेल ? माझी मागणी आहे की, आपण या संदर्भात एसआयटी स्थापन करणार का ?

श्री. दत्तात्रय भरणे : सभापती महोदय, ३३ कोटी वृक्ष लागवड प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने राज्यात ३३ कोटी वृक्ष लागवडीच्या राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेबाबत या विषयावर माझ्या अध्यक्षतेखाली विधानसभेच्या सन्माननीय सदस्याची एक चौकशी समिती नेमली आहे. आमच्या दोन बैठका झालेल्या आहेत. निश्चितपणे याबाबतीत अहवाल येईल. त्यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

**सभापती** : समितीची बैठक झाली आहे. तुम्ही तुमची समिती नेमली आहे, त्यामध्ये विधानपरिषदेच्या ज्या सन्माननीय सदस्यांना रस आहे त्यांना घ्यावे.

श्री. दत्तात्रय भरणे : सभापती महोदय, ठीक आहे, काही अडचण नाही.

नंतर श्री. खर्चे ....

श्री.संजय दौंड : सभापती महोदय, सन २०१८ ते २०२० या कालावधीमध्ये ३३ कोटी वृक्ष लागवड करण्यात आली होती. आंबेजोगाई तालुक्यातील साकूड या गावी मुलतानी समाज राहतो. बीड जिल्ह्यापासून आष्टी तालुका जवळपास १५० किलोमीटर आहे. पूर्ण जिल्ह्यात साकूड गावातील मजूर कामावर असतात. या शिवाय कोणतेही मजूर कामासाठी मिळत नाहीत. ३३ कोटी वृक्ष लागवडीबाबत चौकशी करण्यात येईल काय ? वृक्षलागवडीमध्ये ज्या अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केला त्यांना निलंबित करण्यात येईल काय ?

श्री.दत्तात्रय भरणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी स्कोपच्या बाहेरील प्रश्न विचारला आहे, त्याबाबत माहिती घेऊन योग्य ती कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात येईल.

---------

**लक्षवेधी सूचना क्रमांक ४ बाबत**

**सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक ४ बाबत मी असे सांगू इच्छितो की, माननीय मंत्री महोदयांची याच विषयावर विधानसभेत लक्षवेधी सूचना असल्यामुळे तेथील चर्चा झाल्यावर ते सभागृहात येतील. त्या नंतर ही लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येईल.

--------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना मालमत्ता करधारकांना कोणतीही शास्ती,दंड व व्याजाची आकारणी न करणे

**मु.शी.** : पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना मालमत्ता करधारकांना कोणतीही शास्ती,दंड व व्याजाची आकारणी न करणे यासंबंधी सर्वश्री बाळाराम पाटील, जयंत प्र.पाटील,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. बाळाराम पाटील (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय नगर विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पनवेल महानगरपालिका प्रशासनाने वृत्तपत्रात जाहिरातीत दिलेल्या माहितीनुसार नागरिकांना दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंतच्या मुदतीत कर भरण्याचे आव्हान केलेले असणे, दिनांक १ एप्रिल २०२२ पासून २ टक्के दरमहा शास्ती कर आकारून व्याज घेणार असल्याचे नमूद केलेले असणे, पनवेल महानगरपालिकेने दिनांक १२ मे, २०२१ रोजी कार्यालय जा. क्र. ३१२१ / प्र.क्र. १/१५५५/२१ सुधारित आदेश पान क्र. ५/६ वर च्या दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत सदर कालावधीमध्ये कोणतीही शास्ती /दंड / व्याज आकारण्यात येऊ नये असे आदेश तत्कालीन आयुक्त यांनी काढलेले असणे, त्यानंतर नवनियुक्त आयुक्त यांनी पदग्रहण केल्यानंतर शुध्दीपत्रकाद्वारे सदर मुदत ही कमी करून दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत करणे, पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कराबाबत नागरीकांच्या मनात प्रचंड रोष असणे, मुळातच लावलेला कर हा इतर महानगरपालिक◌ा◌ंच्या तुलनेत ख◌ूप जास्त असणे, सदर बाबतीत कर कमी करण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करत असताना अनेक बैठका मंत्री महोदया◌ंबरोबर झालेल्या

असुधारित प्रत

श्री.बाळाराम पाटील.....

असणे, पनवेलवासियांना मार्च अखेर पर्यंत मालमत्ता कराबाबत ठोस निर्णय देण्याचे आश्वासित असणे, निर्णय होईपर्यंत पनवेलच्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी सद्यपरिस्थितीत शास्ती न लावण्यासाठी दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंतची मुदतवाढ देण्यासंबधित नागरिकांद्वारे विविध आंदोलना्द्वारे मागणी होत असणे, पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना मालमत्ता कर धारकांना कोणतीही शास्ती / दंड / व्याज आकारणी करण्यात येऊ नये, यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.प्राजक्त तनपुरे (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत

श्री.बाळाराम पाटील : सभापती महोदय, पनवेल महानगरपालिकेने कराची आकारणी केली आहे. कोविडच्या आर्थिक संकटात महानगरपालिकेकडून हा कर जबरदस्तीने वसूल करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. सुरुवातीच्या पहिल्या पाच वर्षात ज्या पध्दतीने या कराची आकारणी केली तसा प्रकार दुसऱ्या कोणत्याही महानगरपालिकेत असे घडलेले नाही. अतिशय मोठ्या प्रमाणात हेवी स्लॅब येथे लावण्यात आले आहेत. हे करीत असताना कोविड महामारीला सर्व देश सामोरे जात होता. या पार्श्वभूमीवर मुंबई, ठाणे, नवी मुंबई या महानगरपालिकांना ५०० स्क्वेअर फूटाच्या घरांना करमाफी देण्याचा निर्णय घेतला असून लोकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. पनवेल महानगरपालिकेच्या नागरिकांना मात्र मागील पाच वर्षाचा म्हणजे सन २०१६ ते २०२१ या कालावधीतील कर पूर्वलक्षी प्रभावाने भरण्याचा अमानवी निर्णय घेण्यात येत आहे. हा कर भरण्यास विलंब केला तर दोन टक्के प्रतिमहा व्याज लावण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. उप मुख्यमंत्री व नगर विकास मंत्री महोदयांच्या समवेत चर्चा सुरु आहे. त्या अनुषंगाने पनवेलच्या नागरिकांना या करापासून काही दिलासा देणार काय ? तो दिलासा मिळेपर्यंत ३१ मार्च २०२२ पासून जी शास्ती सुरु केली आहे ती शास्ती न लावण्याबाबत पूर्वीप्रमाणे ३१ मार्च २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात येईल काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन तीन मुद्दे उपस्थित केले आहेत. कराची वसुली जबदरदस्ती होते असे त्यांचे म्हणणे आहे. इतर महानगरपालिकांची तुलना केली तर मला असे सांगायचे आहे की, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी शास्ती माफ करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न विचारला की, पूर्वी जाहीर केल्याप्रमाणे मार्च २०२३ पर्यंत शास्ती माफ करण्यात येईल काय ? पूर्वी असे जाहीर करण्यात आले होते हे खरे आहे. वसुलीची परिस्थिती पाहिल्यानंतर रक्कम अतिशय कमी होत असल्यामुळे दोन वर्षाची माफी काढून या आर्थिक वर्षापर्यंत शास्ती माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुढील काळाबाबत आता काही सांगण्यात येत नसले तरी कायद्यात अशी तरतूद आहे की, त्यावेळच्या वसुलीची परिस्थिती पाहून आयुक्त त्याबाबत निर्णय घेऊ शकतील.

श्री.अनिकेत तटकरे : सभापती महोदय, पनवेल महानगरपालिका नव्याने स्थापन झाली आहे. त्या अगोदर पनवेल ही नगरपरिषद होती. त्यानंतर २३ गावांचा समावेश केला त्या अगोदर त्या गावांना सिडकोकडून पूर्ण सुविधा मिळत होत्या. अजूनही या सर्व सेवा सिडकोकडून देण्यात येतात. फक्त घनकचरा व्यवस्थापन महानगरपालिकेने त्यांच्याकडे घेतले आहे. असे असताना सर्व सेवा शुल्क सिकडकोकडे ग्रामस्थ भरीत आहेत. सिडकोला व महानगरपालिका अशा दोन्ही ठिकाणी पैसे भरायचे असतील तर एकाच सेवेसाठी दोन वेळा कराची आकारणी होत आहे. तशा प्रकारची सेवा महानगरपालिकेकडून दिली जात नाही. आता जो सर्व्हे झाला त्यानुसार पनवेल महानगरपालिका शेवटून दुसरी आली आहे. नवी मुंबई महानगरपालिकेचा विचार केला तर २७ पैसे प्रति स्क्वेअर फूट कराची आकारणी करण्यात येते. आता ७० पैसे स्क्वेअर फूट प्रमाणे पनवेल महानगरपालिका कराची अकारणी करीत आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे नमूद केले आहे की, पनवेल महानगरपालिकेचा कर तुलनेने कमी आहे. हे खरे नसून त्याबाबत सिडको किंवा पनवेल महानगरपालिका अशा एकाच संस्थेला कर आकारण्याचे निर्देश मंत्री महोदय देतील काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, सर्व सेवा सिडकोमार्फत दिल्या जातात, परंतु वस्तुस्थिती तशी नाही. सन २०१८ पासून घनकचरा व्यवस्थापन पनवेल महानगरपालिका करीत आहे. रस्ते,पावसाळी गटारे, फूटपाथ या सेवा २०२१ व २०२२ पासून महानगरपालिकेकडे हस्तांतरित झाल्या आहेत. एसटीपीच्या प्लँटची दुरुस्ती बाकी आहे, ती करण्यात येत आहे. त्यामुळे जवळपास सर्व सेवा महानगरपालिकेकडे हस्तांतरित झाल्या आहेत. सन २०१८ पासून घनकचरा व्यवस्थापन महानगरपालिका करीत आहे. पनवेल महानगरपालिकेने कोविडची परिस्थिती हाताळली आहे. अर्बन पब्लीक हेल्थ सेंटर, आरोग्य सेवा, वैद्यकीय सेवा महानगरपालिका देत आहे. इतर महानगरपालिकांच्या तुलनेत जास्त कर आकारणाी करण्यात येते असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. एमएमआरमधील इतर महानगरपालिकांच्या तुलनेत सर्वात कमी कर पनेवल महानगरपालिकेचा आहे. माझ्याकडे जो तक्ता आहे तो मी सन्माननीय सदस्यांना देतो.

असुधारित प्रत

श्री.प्राजक्त तनपुरे....

ग्रामपंचायत व सिडको करांची आकारणी करते असे नसून सिडको हे सर्व्हीस चार्जेस घेते करांची आकारणी करीत नाही. ग्रामंपचायत मालमत्ता कराची आकारणी करते. त्याबाबत काही लोक न्यायालयात गेले होते. कोर्टाने असे स्पष्ट निदेश दिले आहेत की, ग्रामपंचायतीचा मालमत्ता कर वेगळा व सिडकोचे सेवा शुल्क हे वेगळे आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, पनवेल महानगरपालिका ही ड वर्ग महानगरपालिका आहे. नगरपालिकेचे रुपांतर महानगरपालिकेत होते तेव्हा ती सुरुवातीला ड वर्गात असते. मालमत्ता कर ठरविताना नगरपालिकेचे उत्पन्न व आजूबाजूच्या नगरपालिकांच्या कराचा ॲव्हरेज काढून ठरवायचा असतो. पनवेलच्या आजूबाजूला क, ब व अ वर्ग नगरपालिका आहेत. जेव्हा नगरपरिषदेचे रुपांतर महानगरपालिकेत होते तेव्हा कोणते कर घ्यावेत हे नगरपालिका ॲक्टमध्ये अंतर्भूत आहेत. ग्रामीण भागातील ३६ गावांचा समावेश महानगरपालिकेत करण्यात आला त्यांना सहा पट कराची आकारणी करण्यात आली आहे. यामध्ये कोठेही सुसूत्रता दिसून येत नाही ही बाब खरी आहे काय ? पनवेल नगरपालिका असताना सर्व्हीस चार्ज होता. तो दोन पट वाढविण्यात आला आहे. ही नगरपालिका १०० वर्षापूर्वी स्थापन झाली आहे. शताब्दी महोत्सव आम्ही साजरा केला आहे. याबाबत लोक न्यायालयात गेल्याचे अधिकाऱ्यांनी मंत्री महोदयांना सांगायला पाहिजे. न्यायालयाने टॅक्स कमी करा असे सांगितले नाही. टॅक्स वाढवू नका असे न्यायालय सांगू शकते. मागील आठवड्यात या विषयावर मी बोललो होतो. पनवेल महानगरपालिकेत ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींचा समावेश करण्यात आला ते लोक अतिशय गरीब आहेत, झोपडपट्टीतून लोक येऊन एमएमआर रिजनमध्ये राहतात. ते मोलमजूरी करतात, त्यांना तेथील पैसा फेडता येत नाही.

या नंतर श्री.बोरले....

श्री.जयंत प्र.पाटील.......

सदर महानगरपालिकेला एमएमआरडीएकडून, सिडकोकडून निधी मिळतो. नवी मुंबई विमानतळाच्या आजुबाजूच्या क्षेत्रातून कर रुपाने निधी मिळतो. मग असे असताना महानगरपालिका स्वत:चा अट्टाहास का करीत आहे ? जनतेचा विरोध असताना, सोसायट्यांच्या फोरमचा विरोध असताना महानगरपालिका भरमसाठ कर वाढविण्याचे काम करीत आहे त्याला राज्य शासन ताबडतोब स्थगिती देणार आहे काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन-तीन मुद्दे उपस्थित केलेले आहेत. महानगरपालिका क्षेत्रात ज्या ग्रामीण भागाचा समावेश झालेला आहे त्यांच्याकडून सहापट कर आकारण्यात आलेला आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. परंतु ॲक्टमधील तरतुदीनुसार ज्या ग्रामपंचायतींचा समावेश महानगरपालिकेत झालेला आहे त्यांच्याकडून सुरुवातीची दोन वर्षे संबंधित ग्रामपंचायतीचा जो टॅक्स होता त्याच पद्धतीने टॅक्स आकारणी केलेली आहे. त्यानंतर महागनरपालिकेचा जो टॅक्स असेल त्याच्या २० टक्के किंवा ग्रामपंचायतीचा टॅक्स यापैकी जो जास्त असेल तो आणि त्यानंतर ४० टक्के, ६० टक्के अशा प्रकारे टप्प्याटप्प्याने वाढ करण्यात आलेली आहे. पहिल्या वर्षापासून पुर्वलक्षप्रभावाने शंभर टक्के टॅक्स आकारण्यात आलेला नाही. ॲक्टमधील तरतुदीनुसार कर आकारणी करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे नवीन महानगरपालिका स्थापन झालेली असल्यामुळे तेथे बरीच कामे होणे बाकी आहेत. तेथे अर्बन पब्लिक हेल्थ सेंटर, वॉर्ड ऑफिसेस, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह इमारत उभारावयाची आहे. महागनरपालिका क्षेत्रात ज्या ग्रामपंचायतींचा समावेश झालेला आहे तेथे पाणी पुरवठ्याचे नेटवर्क निर्माण करावयाचे आहे. अमृत योजनेतून पाणी पुरवठा योजना तयार केली तरी त्यामध्ये महानगरपालिकेचा देखील हिस्सा असतो. तेथे स्ट्रीट लाईट उभारावयाचे आहेत. अशा प्रकारच्या बऱ्याच गोष्टी करावयाच्या

श्री.प्राजक्त तनपुरे........

आहेत. महागनरपालिकेच्या एकूण उत्पन्नापैकी जवळपास ७६ टक्के उत्पन्न प्रॉपर्टी टॅक्सच्या माध्यमातून मिळणार आहे. त्यामुळे ही बाजू लक्षात घेता कर आकारणी करणे गरजेचे आहे.

श्री.बाळाराम पाटील : सभापती महोदय, राज्य शासनाने सन २०१७ मधील निर्णयानुसार महानगरपालिकेच्या एलबीटीच्या १२० कोटी रुपयांची माफी काही कारखानदार व लोखंड पोलाद बाजाराला दिलेली आहे हे खरे आहे काय ? कोरोना महामारीचे संकट असताना जुलै २०२१ मध्ये नागरिकांवर कराचा बोजा टाकून महानगरपालिका उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करीत असेल तर ते चुकीचे आहे. खरे तर कोरोना महामारीच्या काळात नागरिकांना दिलासा देणे गरजेचे असताना त्या काळात शास्ती लावण्याचा निर्णय घेतला असेल तर राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करुन एलबीटीचे उत्पन्न महानगरपालिकेला पुन्हा मिळवून देण्याच्या दृष्टिकोनातून निर्णय घेण्यात येणार आहे काय ? तसेच, कोरोना काळात राज्याच्या दरडोई उत्पन्नात घट झालेली आहे. महानगरपालिकेने अशा कालावधीत नागरिकांवर दंड व्याज व शास्ती लावण्याचा निर्णय घेतलेला आहे त्यांच्यावर पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांचे भवितव्य सोपविण्यापेक्षा शासन दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत सदर शास्तीसाठी मुदतवाढ देण्याचा निर्देश देणार काय ?

**सभापती :** मंत्री महोदयांनी याबाबत उत्तर दिलेले आहे.

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे आपण यावर्षी शास्तीसाठी माफी दिलेली आहे. त्यानंतर महानगरपालिकेच्या कराच्या वसुलीची आकडेवारी देखील वाढलेली आहे. या व्यतिरिक्त महानगरपालिकेने लवकर कर भरला तर जास्तीत जास्त १७ टक्क्यापर्यंत सूट दिलेली आहे. पहिल्या ६ महिन्यात कर भरला तर १० टक्के, पुढील ६ महिन्यात कर भरला तर ५ टक्के आणि ऑन लाईन कराचा भरणा केला तर २ टक्के सूट दिलेली आहे. आयुक्तांना अधिकार असल्यामुळे ते पुढील वर्षाची परिस्थिती बघून कर देखील माफ करु शकतात.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आयुक्त सभागृहापेक्षा मोठे आहेत काय ? सभागृहाने निर्देश दिल्यानंतर ते करावे लागेल. आयुक्तांना अधिकार आहेत असे मंत्री महोदयांनी सांगितले. आम्हाला अधिकार नाहीत काय, सभागृहाला अधिकार नाहीत काय ? मुंबईतील ५०० स्क्वेअर फुटाच्या घरांसाठी घरपट्टी माफ करण्यात आलेली आहे. जेथे करोडो रुपयांचे उत्पन्न आहे तेथील ५०० स्क्वेअर फुटाच्या घरांसाठी घरपट्टी माफ केली जाते परंतु नव्याने स्थापन झालेल्या पनवेल महानगरपालिका क्षेत्रात घरपट्टटी माफ केली जात नाही हे अन्यायकारक आहे. आपण हायकोर्टाच्या निर्णयाचा दाखला देत आहात. आपण अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे उत्तर देऊ नये. आपण नवीन मंत्री आहात. आपण अशा प्रकारे उत्तर देऊ नये. आमच्या सारखे जागरुक सदस्य सभागृहात आहेत. मुंबई महागनरपालिका क्षेत्रासाठी वेगळा न्याय आणि नव्याने स्थापन झालेल्या महागनरपालिकेसाठी वेगळा न्याय हे बरोबर नाही. आपण नव्याने स्थापन झालेल्या महानगरपालिकेत जी घरपट्टी वसूल करीत आहात ते अन्यायकारक आहे. राज्य शासन या संदर्भात सुधारणा करुन तसे निर्देश महानगरपालिका आयुक्तांना देणार आहे काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेने ५०० स्क्वेअर फुटाबाबत निर्णय घेतलेला आहे. मी परवा विधेयकावरील चर्चेला उत्तर देताना सांगितले की, मुंबई महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती वेगळी आहे. पनवेल महानगरपालिका नव्याने स्थापन झालेली आहे. आपण मुंबई व पनवेल महानगरपालिकेची तुलना करु शकत नाही. मी आयुक्तांच्या अधिकाराबाबत उल्लेख केला. कायद्यात तशी तरतूद आहे. मी कायद्याच्या बाहेर जाऊ शकत नाही. आयुक्तांना जे अधिकार आहेत त्या अधिकाराचा ते वापर करतील अशी कायद्यात तरतूद आहे. सभागृहात डबल टॅक्सेशनचा मुद्दा उपस्थित केला जात आहे त्या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार साहेब व नगरविकास मंत्री महोदयांनी वेगवेगळ्या बैठका घेतलेल्या आहेत. आपण विधी व न्याय विभागाकडून खुलासा मागविलेला आहे. त्यांच्याकडून कोणते अभिप्राय प्राप्त होतात हे बघून निर्णय घेता येईल.

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या संदर्भात आपल्या दालनात बैठक आयोजित करण्यात यावी.

**सभापती :** ठीक आहे. मी स्वत: नगरपालिकेचा कारभार चालविलेला आहे. मी महागनरपालिकेचा कारभार चालविलेला नाही. घरपट्टी, डेव्हलपमेंट टॅक्स हे विषय संवेदनशील असतात. आपल्या सूचनेप्रमाणे या प्रकरणी माझ्या दालनात बैठक आयोजित करण्यात येईल. ज्या सन्माननीय सदस्यांनी या लक्षवेधी सूचनेत सहभाग घेतला आणि ज्यांना हा विषय महत्वाचा वाटतो त्यांना बैठकीसाठी निमंत्रित करण्यात येईल. एकूण तीन-चार प्रश्न आहेत. आपण मंत्री महोदयांकडे अजेंडा तयार करुन द्यावा.

--------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : एम.फिल. पात्र अध्यापकांना नियुक्ती, पदोन्नती तसेच वेतनवाढीचे लाभ देण्याबाबत

**मु.शी.** : एम.फिल. पात्र अध्यापकांना नियुक्ती, पदोन्नती तसेच वेतनवाढीचे लाभ देण्याबाबत सर्वश्री राजेश राठोड, कपिल पाटील, सतीश चव्हाण, विक्रम काळे, डॉ.मनिषा कायंदे, श्री.अनिकेत तटकरे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय उच्च व तंत्र शिक्ष्ण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शासन निर्णयानुसार एम. फील. पात्र अध्यापकांना नियुक्ती, पदोन्नती व वेतन वाढीचे लाभ देण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाचे व मा.उच्च न्यायालयाचे ४८ प्रकरणा ंचे निकाल असताना शासनाने सदर अध्यापकांविरुध्द अन्यायकारक धोरण अवलंबिले असल्याने, तत्कालीन अवर सचिव यांनी दिनांक २७ जानेवारी, २०२१ ला व सहसंचालक, कोकण विभाग यांनी दिनांक २१ जानेवारी, २०२२ ला निर्गमित केलेले परिपत्रक न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान करणारे असल्यामुळे तात्काळ स्थगित करावे अशी एम.फील. अध्यापकांनी केलेली मागणी, याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या व उच्च न्यायालयाच्या निकालाच्या (माधुरी देशमुख) प्रकरणातील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारावर एम. फील. या अध्यापकांना नियुक्ती, पदोन्नती, (CAS) तसेच वेतन वाढीचे लाभ देण्याबाबतचे धोरण घोषित करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ जानेवारी, २०२२ रोजी, मा.मुख्यमंत्री महोदय व प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांना देण्यात आलेले निवेदन, परंत ु अद्यापही सदरील निवदेनावर कोणतीही कार्यवाही होत नसल्याने एम.फील. अध्यापकांमध्ये निर्माण झालेला असंतोष व संतापाची भावना,

असुधारित प्रत

श्री.विक्रम काळे........

त्यामुळे राज्य शासनाने एम.फील. पात्र अध्यापकांना नियुक्ती, पदोन्नती तसेच वेतन वाढीचे लाभ देण्याबाबत, तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया."

श्री.उदय सामंत (उच्च तंत्र शिक्षणमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो/ठेवते.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना शिक्षक होण्यासाठी सुरुवातीच्या काळात एम.फील. पात्रता होती. त्या अनुषंगाने संपूर्ण राज्यात एम.फील. केलेल्या प्राध्यापकांना नियुक्त्या देण्यात आल्या, संबंधित विभागाच्या सह संचालकांनी त्यासाठी मान्यता देखील दिली. विद्यापीठाने सुद्धा त्यांना मान्यता दिली आणि त्यांचे नियमित वेतन सुद्धा झालेले आहे. आज त्यांची २०-२२ वर्षे सेवा झालेली आहे. पदोन्नती, कॅस इत्यादी लाभ देताना त्यांची पूर्वीची सेवा ग्राह्य धरण्याचा निर्णय त्या त्यावेळी झालेला आहे. संपूर्ण देशात युजीसी ॲपेक्स बॉडी आहे. त्यांनी सुद्धा त्या कालावधीत एम.फील. झालेल्या अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियमित करण्याचा निर्णय घेतलेला आहे. परंतु मध्यंतरी एक न्यायालयीन प्रकरण.....

**सभापती :** आपण कृपया स्पेसिफिक प्रश्न विचारा, आपण कृपया निबंध सांगू नये.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्री महोदय अत्यंत अभ्यासू आहेत. हा विषय त्यांच्या लक्षात आलेला आहे. या संदर्भात सकारात्मक निर्णय घेण्याची त्यांची तीव्र इच्छा आहे. माझा मुद्देसूद प्रश्न असा आहे की, २०-२२ वर्षे सेवा झालेल्या अध्यापकांच्या वेतनातून वसुली करावी असा पनवेल येथील सह संचालकांनी आदेश दिलेला आहे. तो आदेश चुकीचा आहे. आपण तो आदेश मागे घेणार आहात काय ? एम.फील.धारक प्राध्यापकांच्या बाबतीत दिनांक २० मे २०२० रोजी काढण्यात आलेले परिपत्रक रद्द करण्यात यावे अशी राज्यातील प्राध्यापकांची मागणी आहे. ते परिपत्रक हे अधिवेशन संपण्यापूर्वी रद्द करण्यात येणार आहे काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी जी भूमिका मांडली किंवा त्यांचे जे मत आहे तेच मत महाविकास आघाडी सरकारचे आहे. परंतु आमच्यावर काही बंधने आहेत. ती सर्व प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

यानंतर श्री.सांगळे.......

श्री.उदय सामंत.....

दिनांक १४ जून २००० शासन निर्णयामध्ये सेटनेट अनिवार्य असल्याबाबत स्पष्टपणे नमूद केलेले आहे. परंतु ज्यांनी एम.फील. किंवा पीएचडी केलेली आहे त्यांनी सेट नेट केली नाही तरी चालेल, त्यांना तेथे स्थान द्यावे अशा प्रकारे सदर शासन निर्णय आहे. युजीसीने देखील याबाबत सांगितले आहे. परंतु नंतर सदर बाब न्यायप्रविष्ट झाल्यानंतर एम.फील. किंवा पीएचडी झालेल्या प्राध्यापकांना सन २००६ ते २००९ पुरतेच संरक्षित करावे अशा प्रकारे न्यायालयाने म्हटलेले आहे. तरी देखील माधुरी देशमुख यांनी दाखल केलेल्या केसमध्ये न्यायालयाने याबाबतचा बेनफिट दिलेला आहे. ही सर्व बाब सर्वोच्च न्यायालयामध्ये गेलेली आहे. सर्वोच्च न्यायालय या बाबतीत जो निर्णय घेईन तो आम्हाला बंधनकारक राहील. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार आम्ही कार्यवाही करु.

डॉ.मनिषा कायंदे : सभापती महोदय, नेटसेट व एम.फील. संबंधी मला असे सांगायचे आहे की, मी यापूर्वी स्वत: प्राध्यापक पदावर काम केलेले आहे. मी या सर्व परिस्थितीतून गेलेली आहे. मी स्वत: तीन वेळा अर्ज करुन सुद्धा एम.फील. चे कोर्स सुरु झालेले नाहीत. ही त्यावेळची समस्या होती. त्यानंतर पीएचडीचा देखील विषय आला होता. मे महिन्यामधील परिपत्रक मागे घेण्यासंबंधी मंत्री महोदयांनी आताच उत्तर दिलेले आहे. परंतु हा प्रश्न मोठा आहे. नेटसेटचा विषय कोर्टात प्रलंबित आहे. आपण २५-२५ वर्षे विषय प्रलंबित ठेवत असल्यामुळे अनेक लोक कोर्टात जातात. त्यानंतर प्रशासन व सरकारला निमित्त होते की, सदर प्रकरण कोर्टात आहे. परिणामी सदर प्रश्न रखडत जातो. आता टीचिंग व नॉन टीचिंगच्या नियुक्त्या थांबलेल्या आहेत. सर्व प्राध्यापक मंडळी तसेच टीचिंग व नॉन टीचिंगमधील लोक पुन्हा संपाच्या तयारीत आहेत. त्यांनी यापूर्वी संप पुकारला होता. परंतु माननीय मंत्री तसेच आम्ही विनंती केल्यानंतर त्यांनी तो संप स्थगित केला होता. अशा प्रकारे नेहमी संप होत राहिल्यास आपण उच्च शिक्षणाचा गाडा कसा चालवायचा ? नेटसेट परीक्षा, पीएचडी तसेच सीएचबी झालेले प्राध्यापक आहेत. त्यांची जवळपास १८ हजार एवढी संख्या आहे. आपल्या नियमितपणे नियुक्त्या होण्यासंबंधी ते मोठया अपेक्षेने

असुधारित प्रत

डॉ.मनिषा कायंदे .....
सरकारकडे बघत आहेत. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, संवर्गनिहाय नियुक्त्यांचा शासन निर्णय कधी निघणार आहे ? टीचिंग व नॉन टीचिंगची भरती प्रक्रिया कधी सुरु होणार आहे ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्री यांनी देखील बैठक बोलाविली होती. त्या बैठकीस सन्माननीय सदस्या उपस्थित होत्या. आमच्यासमोर अशी अडचण आहे की, सर्वोच्च न्यायालयामध्ये सदर प्रकरण प्रलंबित आहे.

**सभापती** : न्यायालयाने सदर प्रकरणामध्ये स्टे दिलेला आहे का ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, सदर प्रकरणामध्ये न्यायालयाने स्टे दिलेला नाही. आम्ही माधुरी देशमुखच्या केससंबंधी माहिती घेतली आहे. सर्वोच्च न्यायालयाने सदर केस वैयक्तिक म्हणून ट्रिट केलेली आहे. सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाकडे जी काही विचारणा केली होती त्याबाबत शासनाने न्यायालयामध्ये सविस्तर उत्तर दिलेले आहे. सदर प्रकरणी न्यायालयाने स्टे दिलेला नसला तरी यापूर्वी असलेला शासन निर्णय कोठेही नाकारलेला नाही. त्यामुळे सदर शासन निर्णयानुसारच कार्यवाही सुरु आहे. सदनाच्या भावना लक्षात घेता मी सदनाला सांगू इच्छितो की, सदर प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचा निकाल होईपर्यंत प्राध्यापकांकडून कोणतेही ड्यूज वसूल केले जाणार नाहीत.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदय, मागील २०-२२ वर्षांपासून प्रशासनाच्या माध्यमातून सातत्याने भिजत घोंगडे पडलेले आहे. माधुरी देशमुख यांनी केलेली पिटीशन ही self explanatory आहे. त्यानुसार शासनाने कार्यवाही करावयास पाहिजे होती. आज पुन्हा काही लोकांनी नव्याने कोर्टात पिटीशन दाखल केलेल्या आहेत. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे इतर लोकांना कॅसचे बेनेफिट लागू होत नाहीत. हे म्हणणे चुकीचे आहे. *** यांनी सन २००९ मध्ये कोर्टात पिटीशन दाखल केली होती. सन २०१७ मध्ये उच्च न्यायालयाने स्पष्टपणे

*** आदेशानुसार विलोपित मजकूर.

असुधारित प्रत

श्री.अभिजीत वंजारी....

नमूद केलेले आहे की, "Äs per guidelines issued by UGC in 2008." त्यांनी सन २००९ पर्यंत नेटसेट परीक्षा व एम.फील. झालेल्या प्राध्यापकांना सुट दिलेली आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या प्रश्नामध्ये *** असा उल्लेख केला आहे. आपण सदरहू उल्लेख रेकॉर्डवरुन काढून टाकावा.

**सभापती** : ठीक आहे.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदय, मी माधुरी देशमुख असाच उल्लेख केला आहे. सदर प्रकरणी कोर्टाने कोणताही स्टे दिलेला नाही. त्यामुळे सर्व प्राध्यापकांना कॅशचे बेनेफिट लवकरात लवकर दिले गेले पाहिजेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, कॅस व दंडवसुली संदर्भात माननीय मंत्री यांनी चांगले उत्तर दिलेले आहे. न्यायप्रविष्ट प्रकरण आहे त्यामुळे ते पुढे ढकलत राहणे हे उचित होणार नाही. माधुरी देशमुख प्रकरणामध्ये न्यायालयाने दिलेला निवाडा गृहीत धरुन त्यानुसार शासन आपली भूमिका बदलणार आहे का ? तसेच सन २००९ पूर्वी दिलेली सवलत सर्वांना लागू करण्यासंबंधी शासन भूमिका स्वीकारणार आहे का व तशी भूमिका सर्वोच्च न्यायालयात मांडणार आहे का ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.मनिषा कायंदे यांनी भरतीसंबंधी प्रश्न विचारला आहे. त्यात जाणीवपूर्वक अनेक गैरसमज पसरवले जात आहेत. पूर्वीची भरती बदलून ती संवर्गनिहाय करण्यासंबंधी शासनाने निर्णय घेतलेला आहे. संवर्गनिहाय भरती करीत असताना ती फक्त उच्च व तंत्रशिक्षण विभागातच नव्हे तर शालेय शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग असो, सर्व विभागांमध्ये संवर्गनिहाय भरती करण्यासंबंधी शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला होता. त्यानंतर ही बाब सामान्य प्रशासन विभागाकडे गेल्यानंतर त्यांनी कालच आम्हाला असे कळविले आहे की, २ दिवसांमध्ये याबाबतचे अभिप्राय कळविले जातील. येत्या ८

---

**** आदेशानुसार विलोपित मजकूर.

असुधारित प्रत

श्री.उदय सामंत....

दिवसांमध्ये शासनाकडून संवर्गनिहाय भरतीसंबंधी निश्चितपणे शासन निर्णय काढला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी माधुरी देशमुख यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या पिटीशनबाबत सदनामध्ये जी माहिती दिलेली आहे त्याबाबत विधी व न्याय विभागाकडून अभ्यास केला जाईल. तसेच त्यासंबंधी आवश्यकता वाटल्यास आपल्या सर्वांसमावेत एक बैठक घेतली जाईल. यातून सकारात्मक भूमिका घेऊन महाराष्ट्र शासन पुढे जाईल.

श्री.राजेश राठोड : सभापती महोदय, मी एक बाब सदनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, विद्यापीठ अनुदान आयोगाकडून शैक्षणिक पात्रता व वेतनाबाबत ठरविले जाते. ते ५० टक्के रक्कम केंद्र शासनाकडून देत असतात. त्यांच्या इतिवृत्त आणि गाईड लाईन्समध्ये स्पष्टपणे नमूद केलेले असताना राज्यात हा विषय वारंवार उपस्थित होत आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, श्रीमती माधुरी देशमुख यांच्या नियुक्तीसंबंधी न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे तोच निर्णय सर्व प्राध्यापकांच्या बाबतीत एक समान लागू केला जाणार आहे का ? ६० पेक्षा जास्त प्रकरणांमध्ये न्यायालयाने त्यांच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. अशा परिस्थितीत अधिव्याख्यात्यांना कोर्टात जाण्यासाठी शासन मजबूर करणार आहे का ? तसेच दिनांक २० मे रोजीचे शासन परिपत्रक अधिवेशनापूर्वी रद्द केले जाणार आहे का ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सदनामध्ये सांगितले होते की, ही न्यायालयीन बाब आहे. त्यासंबंधी विधी व न्यायविभागासमवेत चर्चा केली जाईल. तसेच शासनाला तशा प्रकारची कार्यवाही करावी लागल्यास या संदर्भात ज्या सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेले आहेत अशा सर्व सन्माननीय सदस्यांसमवेत एक बैठक आयोजित केली जाईल व त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल.

असुधारित प्रत

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अतिशय सकारात्मक उत्तर दिलेले आहे. हा प्रश्न २० ते २५ वर्षांपासूनचा आहे. आपण त्यांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतन देत आहोत. परंतु त्यांना स्थान निश्चिती दिली जात नाही. सुरक्षिततेसाठी कॅशच्या ॲडव्हान्समेंट स्कीम त्यांच्यापर्यंत पोहोचविणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक कॉलेजेसमध्ये प्राध्यापकांची पदे मोठया प्रमाणावर रिक्त आहेत. यापूर्वीच्या काळात सदर पदांसाठी जॉईंट डायरेक्टर यांच्या स्तरावर परवानगी व एनओसी मिळत होती. परंतु दीड दोन वर्षांपासून सदर पदांकरिता असलेले प्रस्ताव जॉईंट डायरेक्टर यांच्याकडे पाठविल्यानंतर ते डायरेक्टर यांच्याकडे पाठविले जातात व त्यानंतर ते शासनाकडे पाठविले जाते. या सर्व प्रक्रियेत जवळपास वर्षाचा कालावधी उलटून जातो. ही प्रकिया सुलभ होण्याच्या शासनाने सकारात्मक विचार करण्याची गरज आहे. सीएचबी प्राध्यापकांकरिता शासनाने मानधन वाढवून दिलेले आहे. मी याबाबत शासनाचे समर्थन करतो. परंतु शासनाने त्यांना एकाच कॉलेजमध्ये सर्व पिरीएड घेण्याची अट टाकली आहे. शासनाने ती अट शिथिल केल्यास त्यांना जास्त फायदा होईल. शासन सदर अट शिथिल केली जाणार आहे का ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी २-३ मुद्दे मांडलेले आहेत. त्यापैकी २ मुद्दे मला महत्त्वाचे वाटतात. सीएचबी प्राध्यापकांच्या बाबतीत पैसे वाढवून देत असताना शासनाने असा निर्णय घेतला होता की, तासिका आणि तास यातील जो फरक आहे. शासनाने त्यांना पैसे देत असताना तास म्हणून दिलेले आहे. आपल्या सर्वांची भावना लक्षात घेऊन तासाकरिता जे पैसे दिलेले आहेत तेवढेच पैसे तासिकेला दिले जातील. त्यामुळे सीएचबी प्राध्यापकांचे १० मिनिटे, २० मिनिटांचे पैसे कमी केले जाणार नाहीत. दुसऱ्या कॉलेजसंबंधी यापूर्वी काही निर्णय झालेले आहेत. त्या निर्णयांचा अभ्यास करुन याबाबत देखील चांगला निर्णय घेतला जाईल. तसेच शासनाने १०० टक्के प्राचार्य भरती करण्यासाठी अनुमती दिलेली आहे. याबाबत शासनाकडे कोणत्याही स्तरावर काही प्रलंबित राहणार नाही याची शासनाकडून दक्षता घेतली जाईल.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

श्री.सतिश चव्हाण : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अत्यंत चांगले उत्तर दिलेले आहे. त्यांनी वसूली स्थगित केली आहे. माझा प्रश्न आहे की, दिनांक २० मे चे परिपत्रक आपण रद्द करणार का, हे रद्द केले तर सर्वच प्रश्न सुटतील. युजीसीने यामध्ये इतका घोळ घालून ठेवला आहे हे आपणासही मान्य आहे. त्यामुळे हे सर्व प्रश्न निर्माण झालेले आहेत. ते परिपत्रक रद्द केल्यावर सर्वोच्च न्यायालयात काय निकाल लागायचा तो लागेल. एक प्राध्यापिका सर्वोच्च न्यायालयात गेली व जिंकली आहे. मग तोच निकाल सर्वच प्राध्यापकांना आपोआप लागू होणार. मग महाराष्ट्र शासन तसेच विधी व न्याय विभागाचा त्या केसचा परत परत अभ्यास करण्यासाठी अट्टाहास का. सर्वोच्च न्यायालयात अशा प्रकरणी दुसरा निकाल लागणार आहे का.

सभापती महोदय, सीएचबी बाबत मंत्री महोदयांनी सांगितले. सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी चांगला प्रश्न विचारला आहे. सीएचबी उमेदवारांना १०-१५ हजार रुपये मिळतात. अजून एखाद्या महाविद्यालयात त्या उमेदवारास शिकविण्याची संधी मिळाली तर अजून १०-१५ हजार मिळतील, त्यामुळे याकरीता आपण परवानगी देणार का. प्राचार्यांच्या नियुक्तीला आधी सह संचालक परवानगी देत होते, आता त्याकरीता मंत्रालयात यावे लागते, सहा ते आठ महिने या परवानगीकरीता लागतात त्यामुळे हे अधिकार सह संचालकांना देणार का ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, परिपत्रकाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या भूमिकेबद्दल मी सांगू इच्छितो की, विधी व न्याय विभागाचा सल्ला घेतला जाईल, तसेच आपल्या समवेत एक बैठक आयोजित केली जाईल, प्राध्यापकांच्या भल्यासाठी परिपत्रक मागे घ्यावे लागले तरी ते मागे घेण्याची महाराष्ट्र शासनाची तयारी आहे. परंतु त्यासाठी विधी व न्याय विभागाचा सल्ला घेतला जाईल. तसेच प्राचार्यांची भरती लवकरात लवकर केली जाईल.

-----------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : राज्य महिला आयोगाकडून प्रज्ज्वला योजनेत निधीचा झालेला गैरवापर

**मु.शी.** : राज्य महिला आयोगाकडून प्रज्ज्वला योजनेत निधीचा झालेला गैरवापर यासंबंधी डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.मनिषा कायंदे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महिला व बालविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्य महिला आयोगामार्फत राबविण्यात आलेल्या "प्रज्ज्वला" योजनेमध्ये निधीचा गैरवापर होत असल्याचे निदर्शनास आलेले असणे, "प्रज्ज्वला" योजनेतंर्गत राज्य महिला आयोगाद्वारे राज्यातील महिला बचत गटातील महिलांना प्रशिक्षण देण्याकरिता महिला आयोगाच्या नियमित कार्यक्रम निधीचा वापर केला जात असणे, प्रज्ज्वला योजनेतील कामांकरिता निधी वापरण्याबाबत शासन निर्णय किंवा सदर योजनेचा समावेश नसतांनाही तसेच महिला आयोगाच्या कार्यकक्षेत नसतानाही राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षांनी प्रज्ज्वला योजनेअंतर्गत राज्यातील महिला बचत गटांना प्रशिक्षण दिल्याचे उघडकीस आलेले असणे, राज्यातील महिला बचत गटांना राज्य शासनाचे महिला आर्थिक विकास महामंडळ निधी /आर्थिक मदत करत असतानाही "प्रज्ज्वला" योजनेतील निधी खर्च करण्यात आला असणे, सदरहू निधी खर्च करण्याबाबतचा शासन निर्णय पारित करण्यात आला आहे का तसेच प्रज्ज्वला योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र लेखा शाखेकडून पारित करण्यात आले आहे का, आदिबाबत सखोल चौकशी होणे अत्यंत गरजेचे असणे महिला आयोगाने निधीचा वापर केल्याप्रकरणी सखोल चौकशी करुन दोषींविरुध्द तात्काळ कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका ."

असुधारित प्रत

ॲड यशोमती ठाकूर (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

डॉ.मनिषा कायंदे : सभापती महोदय, अत्यंत गंभीर अशा विषयाकडे मी आपले व सभागृहाचे लक्ष वेधू इच्छिते. आपणास माहिती आहे की, महिला आयोगाला अर्ध न्यायीक दर्जा आहे. पिडित महिलांना न्याय, पुनर्वसन, मार्गदर्शन येथे केले जाते, इतर मार्गाने न्याय मिळत नसेल तर महिला आयोगाकडे मोठया अपेक्षेने महिला येत असतात. असे असताना या आयोगामार्फत चालविण्यात येणाऱ्या कार्यक्रमातील प्रज्ज्वला योजना चालवली गेली आहे. या योजनेत अपेक्षीत नसलेले कार्यक्रम महिला आयोगाने घेतलेले आहेत. कॅगचा अहवाल देखील माझ्याकडे प्राप्त झालेला आहे. माहितीच्या अधिकारामध्ये या प्रकरणी बरीच माहिती माझ्याकडे प्राप्त आहे. खर्च केलेल्या रकमेची हाताने लिहिलेली बिले आहेत, हे अतिशय अस्वीकार्य आहे. एवढया मोठया रकमेची कच्ची बिले तयार केलेली आहे. हा निधी आयोगाला सरकारने कोणत्या कलमाखाली दिलेले आहेत, त्याचा काही शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता का. यामध्ये "The above expenditure was spent largely on information dissemination of Government Schemes and imparting casual training on mobile app., use of Whatsapp, use of Namo app, Bhim app..." असे असताना आयोगाच्या कार्यकक्षा ओलांडल्या आहेत, तेथील अधिकाऱ्यांनी खर्च केला आहे, त्यामध्ये समिती देखील गठीत केली असल्याचे समजले आहे, पण ती समिती अंतर्गत होती. कॅगच्या अहवालानुसार सांगू इच्छिते की, सर्व २८८ मतदारसंघात कार्यक्रम हाती घ्यायला हवा होता. पण २८८ न करता फक्त ९८ मतदारसंघात प्रज्ज्वला योजना राबविण्यात आली हे खरे आहे का. या कार्यक्रमावर खर्च करताना कच्च्या पावत्यांवर पैसे देण्यात आले हे खरे आहे का. तेव्हाच्या सदस्य सचिवांनी त्यांच्या अधिकारात पैशाचा गैरव्यवहार केला असेल तर त्यांच्यावर कारवाई होणार का ?

सभापती महोदय, प्रज्ज्वला योजनेचे झालेल्या कार्यक्रमाच्या व्हिडीओ क्लिप्स तपासल्या गेल्या पाहिजेत. झालेली भाषणे, सरकारच्या योजना व त्यांचा प्रचार व प्रसार त्यामध्ये झाला आहे का. कॅगचा अहवाल मंत्री महोदयांपर्यंत पोहचला आहे की नाही हा विषय महत्वाचे आहे. या प्रश्नांची उत्तरे मिळाल्यावर मी पुढील प्रश्न विचारणार आहे.

असुधारित प्रत

ॲड यशोमती ठाकूर : सभापती महोदय, कॅगचा अहवाल आमच्यापर्यंत पोहचला आहे. २०१९-२० च्या अर्थसंकल्पीय भाषणात "In order to create awareness regarding legal matters, social and financial knowledge among the members of women SHGs, it is provided to implement the scheme via Maharashtra Women's Commission." असे प्रज्ज्वला योजनेबाबत सांगण्यात आले होते. त्याकरीता ५ कोटी रुपये देण्यात येतील अशी घोषणा देखील २०१९ च्या अर्थसंकल्पात झाली होती. पण याकरीता फॉलो करावयाची प्रोसेस फॉलो करण्यात आलेली नाही. अनुदानाची रक्कम वापरण्यात आलेली आहे ही वस्तुस्थिती आहे. महिला आयोगाला दिवाणी न्यायालयासारखे अधिकार असतात. महिलांच्या उत्थानासाठी त्यांच्या संरक्षणासाठी २००४-२००५ चा कायद्याच्या अनुषंगाने सर्व कार्यक्रम राबविणे अपेक्षीत असते. पण झालेली घोषणा व ज्या प्रकारे शासन निर्णय काढला पाहिजे होता, मंत्रिमंडळासमोर जाणे अपेक्षीत होते, या सर्व बाबी अजिबात पाळल्या गेलेल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे. पण महिला आयोगाच्या ॲक्टमध्ये तरतूद आहे की, त्यानुसार अंतर्गत मंडळाची परवानगी या अनुदानासाठी घेण्यात आलेली होती, तशी त्यावेळी त्यांनी परवानगी घेतलेली होती.

डॉ.मनिषा कायंदे : सभापती महोदय, आयोगाचा उपयोग पूर्णपणे राजकीय प्रचारासाठी करण्यात आला आहे. याची अनेक उदाहरणे आहेत, तशी वर्तमानपत्राची कात्रणेही आहेत. ॲसीड व्हिक्टिमला नोकरी देण्यासाठी देखील एक इव्हेंट केलेला होता तो कार्यक्रम झाल्याचे माझ्या कोठेही वाचनात आलेले नाही. प्रोसीजर फॉलो न करता चुकीच्या मार्गाने निधी खर्च झालेला आहे, त्यात पुढे कशा सुधारणा करणार आहात. महिला आयोगाचे सहा विभागीय कार्यालये स्थापन करण्याचीही घोषणा झाली होती, त्याचे काय झाले. महिला आयोगाच्या सहा विभाग व बालहक्क आयोगाची सहा विभागात स्थापन करणार का. झालेल्या प्रकाराची जबाबदारी आपण कोणावर निश्चित करणार आहात. महिला आयोगाच्या तेव्हाच्या अध्यक्षांना देखील या चौकशीमध्ये सहभागी केले पाहिजे. त्यांना देखील चौकशीला बोलावणार का ?

ॲड यशोमती ठाकूर : सभापती महोदय, प्रज्ज्वला योजनेमध्ये घडलेला प्रकाराबद्दल नक्की चौकशी समिती नक्की स्थापन केली जाईल व चौकशी केली जाईल. ॲसीड व्हिक्टीमला नोकरी देण्याची बाब चौकशीत येईल व महिला व बालकल्याण विभाग तो निर्णय घेईन.

सभापती महोदय, सहा महसूली विभागीय कार्यालयामध्ये महिला आयोगाच्या स्थापनेबाबत सांगू इच्छिते की, दिवाणी न्यायालयाचे अधिकार आहेत, मुख्य कार्यालय मुंबईत आहे, दिवाणी न्यायालयाचे अधिकार जेवढया प्रभावीपणे आपणास राबवायचे असतात, ते राबविले जात नाहीत. म्हणून महाविकास आघाडीच्या पहिल्या अर्थसंकल्पीय भाषणात घोषणा केली होती की, सहा विभागीय आयुक्तालयात महिला आयोगाचे ऑफीस राहिल. मागील काळात कोविडमुळे प्रभावीपणे हे काम झाले नाही याची मी कबुली देते. कोविड प्रार्दुभाव कमी झालेला आहे, येत्या वर्षभरात महिला आयोग व बालहक्क आयोग अशा दोघांनाही बळकटी देण्यात येईल.

यानंतर श्रीमती नाफडे .....

अमुद्रित

**सभापती :** सन्माननीय सदस्या आता आपण पुढे जाऊ, यावर आता आणखी किती प्रश्न विचारताय !

डॉ.मनिषा कायंदे : सभापती महोदय, तत्कालीन सदस्य सचिव आणि आयुक्त यांच्या काळात हे सर्व घडलेले आहे. म्हणून याबाबत त्यांची देखील वेगळी चौकशी व्हावी, तशी चौकशी होणार का ? झाल्यास त्यांच्याविरुध्द शासनाच्या माध्यमातून कोणती कारवाई होईल ?

**सभापती :** सबंधित समितीची कार्यकक्षा वाढविण्यात यावी.

ॲड यशोमती ठाकूर : सभापती महोदय, यासंदर्भात निश्चितपणे चौकशी होईल. या संदर्भात समिती स्थापन करुन त्या योगे चौकशी केली जाईल.

---------------------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : नाशिक महानगरपालिका हद्दीतील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या सदनिकांच्या घोटाळयाबाबत

**मु.शी.** : नाशिक महानगरपालिका हद्दीतील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या सदनिकांच्या घोटाळयाबाबत यासंबंधी सर्वश्री प्रवीण दरेकर, कपिल पाटील, अमोल मिटकरी,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.प्रवीण दरेकर ( विरोधी पक्ष नेते ) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नाशिक येथील विकासकांकडून सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेंतर्गत भूमि-अभिन्यास व इमारत नकाशे विकसित करतांना द्यावयाचे २० टक्के भूखंड/सदनिका आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक/अल्प उत्पन्न गट प्रवर्गासाठी उपलब्ध करुन देणे बंधनकारक असताना आतापर्यंत सुमारे ७००० सदनिका व २०० भूखंड म्हाडाकडे हस्तांतरित केलेले नसल्याची धक्कादायक माहिती दिनांक २५ फेब्रुवारी, २०२२ रोजी उघडकीस आलेली असणे, सदर योजनेअंतर्गत हजारो सदनिका आणि शेकडो भूखंड विकासकांकडून शासनाकडे हस्तांतरीत होणे अपेक्षित असताना या सर्व मालमत्तांची परस्पर विक्री करून सुमारे ७०० कोटी रुपयांचे शासनाचे नुकसान करण्यात आलेले असणे, त्याचबरोबर हजारो कुटूंबांना त्यांच्या हक्काच्या सदनिका/जमिनीपासून वंचित रहावे लागलेले असणे, महापालिका हद्दीत ४००० चौ.मी. वरील जागेवर मंजूर भूमि-अभिन्यास व इमारत नकाशे यांचा सविस्तर तपशिल महापालिका प्रशासनाकडे उपलब्ध नसल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, नकाशा मंजूरी पत्रात संबंधित अट नमूद करुनही जमीनमालक, विकासक यांचेकडून भूखंड व सदनिका उपलब्ध करून देण्यात आलेल्या नसणे, अशा सदनिका उपलब्ध न करताच

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर......

आराखडयातील ऊर्वरीत ८० टक्के सदनिकांना अंशत: किंवा संपूर्ण भोगवटा प्रमाणपत्र प्रदान करणे, मंजूरी पत्रातील अटींचे अनुपालन झालेले नसणे, नियमांचे उल्लंघन करून परवानग्या देणाऱ्या व प्राप्त करणाऱ्या अधिकारी/कर्मऱ्यांबरोबरच सुमारे १००० कोटी रुपये हडपणाऱ्या विकासावर कोणतीही कारवाई केलेली नसणे, गोरगरिबांची घरे लुटून विकासकांनी नफेखोरी केलेली असणे, अत्यल्प/अल्प उत्पन्न गटासाठीच्या सदनिका/भूखंड उपलब्ध न झाल्याने मंजूर अभिन्यास रद्द करून सदनिका व भूखंड शासनाकडे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करण्यास महापालिका प्रशासनाकडून चालढकल केली जात असणे, म्हाडा प्रशासनाने अनेकदा मागणी करुनही नाशिक महापालिका प्रशासनाकडून सदरच्या सदनिका/ भूखंड म्हाडाकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या नसणे, महापालिका अधिकारी/कर्मचारी, विकासक व सर्व सबंधितांच्या संगनमताने झालेल्या हजारो कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराची उच्चस्तरीय सखोल चौकशी करून कडक कारवाई करण्याची लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी मा. मुख्यमंत्री, मा. गृहनिर्माण मंत्री तसेच आयुक्त, नाशिक महापालिका यांचेकडे दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागण्या केलेल्या असणे, सदर मागण्यांवर निर्णय घेण्यात होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ याकडे शासनाचे होते असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, संबंधित विकासकांनी प्रशासनाच्या संगनमताने केलेल्या हजारो कोटी रुपयांच्या गैरव्यवहारासंदर्भात कार्यवाही करण्यास टाळाटाळ केली जात असणे, त्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मिळत असलेले गैरवाजवी संरक्षण, सदरच्या सदनिका त्वरेने उपलब्ध झाल्यास म्हाडाच्या माध्यमातून दुर्बल घटकांना हक्काची घरे मिळणार असणे, सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेंतर्गत मिळणाऱ्या हक्काच्या घरांपासून नाशिक महापालिका परिसरातील नागरिकांना वंचित रहावे लागले असल्याने त्यांचेमध्ये अन्याय तथा संतापाचे वातावरण पसरलेले असणे, याबाबत अधिवेशन काळात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेला असणे, याकडे प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.जितेंद्र आव्हाड ( गृहनिर्माण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, "नाशिक येथील विकासकांकडून सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेंतर्गत भूमि-अभिन्यास व इमारत नकाशे विकसित करतांना द्यावयाचे २० टक्के भूखंड/सदनिका आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक/अल्प उत्पन्न गट प्रवर्गासाठी उपलब्ध करुन देणे बंधनकारक असताना आतापर्यंत सुमारे हजारो सदनिका व भूखंड म्हाडाकडे हस्तांतरित करण्यात आलेले नाहीत. म्हणजे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी बिल्डरने २० टक्के हाऊसिंग स्टॉक किंवा प्लॉट हे म्हाडाला देणे बंधनकारक आहे. अशी अट देखील बांधकाम परवानगी देत असताना घालण्यात आली होती. नाशिक येथे विकासक आणि अधिकारी यांच्या संगनमताने ७००० सदनिका आणि २०० प्लॉट्स हे म्हाडाला दिलेले नसल्याची बाब स्पष्ट झालेली आहे. हा घोटाळा ७०० कोटी रुपयांच्या आसपासचा आहे. जी घरे या योगे वंचित व गरिबांना मिळणार होती, त्यांना त्या घरांपासून वंचित ठेवण्यात आलेले आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे माननीय मुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे याबाबत वारंवार तक्रारी केलेल्या आहेत. परंतु काही लोक हा घोटाळा दडपण्याचा प्रयत्न करीत आहेत. याबाबत माझे तीनच स्पेसिफिक प्रश्न आहेत. घोटाळयाचे स्वरुप व्यापक असताना याकरिता शासनाने चौकशी नेमावी. महापालिका व म्हाडातील जे अधिकारी त्या कार्यकाळात कार्यरत होते, त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ? महाविकास आघाडी सरकारच्या किमान समान कार्यक्रमांतर्गत बेघरांना घर देणे व गोर-गरिबांची निवास-व्यवस्था करणे मुख्य ध्येय असताना हे सरकार विकासकांच्या उन्मादाला कसा आवर घालण्यात येणार आहे ?

डॉ.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, युडीसीपीआरमधील तरतुदीनुसार इन्क्ल्यूजिव्ह हाऊसिंग स्कीमअंतर्गत राज्यातील १० लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या महापालिका हद्दीत ४००० स्क्वे.मी.वरील जमिनीचा विकास करताना अल्प उत्पन्न गटासाठी २० टक्के सदनिका राखीव ठेवण्याची तरतूद आहे. माझ्या लक्षात असे येत आहे की, नाशिक महापालिकेने पार्ट ओसी याकरिता दिलेली आहे. खरेतर म्हाडाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारची ओसी देण्याचे अधिकारच नाही. नाशिक महानगरपालिकेने अशी पार्ट ओसी दिल्यामुळे बिल्डरांचे फावलेले दिसत आहे, असे मला एकंदर लक्षवेधी सूचनेवरुन आणि यासंबंधी मी जी माहिती

असुधारित प्रत

डॉ.जितेंद्र आव्हाड......

घेतलेली आहे, त्यावरुन माझ्या लक्षात आलेले आहे. खरेतर ठाणे,पुणे, नवी मुंबई, मुंबई येथे एवढया मोठया प्रमाणात घरे मिळत असताना नाशिकमध्ये मात्र का कमी घरे मिळत आहेत ? याकरिता मी एक बैठक लावली होती. सदर बैठकीत मला समाधान वाटेल, अशी उत्तरे मिळाली नाहीत. एवढी घरे उपलब्ध आहेत, असे सांगणे मला शक्य नाही. मी महानगरपालिका आयुक्तांना विचारले की, आतापर्यंत किती ओ.सी. दिलेल्या आहेत. यावर आयुक्त म्हणाले की, २०१३ पासून आजपर्यंत एकूण केवळ ०७ ओ.सी. दिलेल्या आहेत. हे माझ्या ज्ञानानुसार अशक्य आहे, असेच मला वाटत आहे. यामुळे नाशिक महापालिका क्षेत्रात म्हाडाला ज्या ताकदीने गरीब, मध्यमवर्गीयांना देण्याकरिता घरे मिळाली असती, ती उपलब्धच झाली नाहीत, हे लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून माननीय विरोधी पक्ष नेते जे म्हणत आहात, ते खरे आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय गृहनिर्माण मंत्री महोदयांच्या उत्तराने हा प्रश्न अधिक गंभीर बनलेला आहे. महापालिकेच्या संगनमताने नाशिकमधील गरिबांच्या घरावर अक्षरश: दरोडा घातला गेलेला आहे. मंत्रीमहोदयांकडून आमची अधिक अपेक्षा आहे. कारण की पत्रा चाळ, बीडीडी चाळीला आपण न्याय दिलेला आहे. नाशिक शहरात देखील याबाबत आपल्याकडून न्यायच मिळेल, ही आमची अपेक्षा आहे. सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी गेल्यावर्षी नोव्हेंबर महिन्यामध्ये आयुक्तांना पत्र दिले होते. आता अधिवेशन सुरु असताना आयुक्त म्हणतात की, घोटाळा झालेला नसून माहिती उशिरा पाठविलेली आहे.

सभापती महोदय, या युडीसीपीआरच्या योजनेनुसार पिंपरी-चिंचवडमध्ये २४,००० घरे उपलब्ध झालेली आहेत. नवी मुंबईत १९,००० घरे उपलब्ध झालेली आहेत. ठाणे येथे १६,००० घरे उपलब्ध झालेली आहेत. नाशिकमध्ये केवळ १५७ घरे उपलब्ध झालेली आहेत. यामध्ये उघड उघड घोटाळा झालेला आहे. हा ७०० कोटींचा घोटाळा सांगितला जातो, परंतु हा घोटाळा त्याहून मोठा असेल.

श्री.कपिल पाटील......

सभापती महोदय, नाशिक येथे अक्षरश: ७००० घरे अपेक्षित होती. ही ७००० घरे कोणी, कोणासाठी आणि का खाल्ली ? आयुक्त कोणाला वाचवू पाहत आहेत ? या सर्व प्रकरणाची अत्यंत गंभीर चौकशी झाली पाहिजे. ही चौकशी करण्यात येणार आहे का ? म्हाडाच्या परवानगीशिवाय पार्ट ओसी देखील देता येत नाही. याबाबत संबंधितांनी म्हाडाला ले-आऊट मधील प्लॉट तर दिलेच नाहीत. तरीही फायनल ले-आऊट देखील मंजूर केलेले आहेत. अनेक फायनल ले-आऊट मंजूर करताना चुकीच्या पध्दतीने केलेले आहेत. लक्षवेधी सूचनेकरिता जी माहिती सरकारला आयुक्तांकडून देण्यात आलेली आहे, त्यामध्ये अक्षरश: अनेक माहिती लपविली गेलेली आहे. जे यांनी बिल्डरांच्या संगनमताने देऊन टाकलेले आहे, गरिबांची घरे हडपलेली आहेत, त्याबाबतची माहिती या सभागृहापुढे येऊ नये, असा संबंधितांचा प्रयत्न आहे. अधिकारी कितीही वरिष्ठ असला तरीही त्यांना हे शासन जाब विचारुन योग्य ती चौकशी करण्यात येणार का ? ही घरे कशी वसूल करणार ?

डॉ.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. म्हाडाच्या हक्काची घरे ठाण्यामध्ये एका बिल्डरने विकल्यानंतर सरकारने त्याच्याविरुध्द पोलीस कारवाई केली, त्यानंतर त्याचे दोन पार्टनर चौदा दिवस जेलमध्ये होते. आपल्याला फुकटात मिळत आहे, म्हटल्यावर मानवी संस्कृतीप्रमाणे लोक ते घेतातच, येथे बिल्डरांनी तेच केलेले दिसत आहे. कोणी लक्षच देत नाही म्हटल्यानंतर.....काय.....त्यामुळे अगदी स्पेसिफिक उत्तर देत असताना मी स्पष्टपणाने सांगतो की, सन २०१३ नंतर जेवढया ओसी दिलेल्या आहेत, जेवढे अभिन्यास मंजूर करण्यात आलेले आहेत, त्याचा संपूर्ण तपास केला जाईल. किती घरे मिळायला पाहिजे होती आणि किती घरे प्रत्यक्ष मिळाली, याचा देखील तपास केला जाईल. सभापती महोदय, खरे तर आपणच यामध्ये लक्ष घालावे , कारण की, या दोन डिपार्टमेंटमध्ये....अडथळा..

**सभापती :** या प्रश्नाचे गांभीर्य माननीय मंत्रीमहोदयांच्या उत्तरातून स्पष्ट होत आहे. विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हे आपल्या सदनाचे ज्येष्ठ सदस्य असून त्यांनी हा प्रश्न मांडलेला आहे. इकॉनॉमिक विकर्स सेक्शन्सची घरे काढून बिल्डरच्या घशात घालणे, हे महाराष्ट्राच्या परंपरेला न शोभणारे आहे, ही दुर्दैवाची बाब आहे. पुणे,नवी मुंबई,ठाणे या शहरांच्या तुलनेत या घरांच्या बाबतीतील चित्र अतिशय स्पष्ट आहे. मी या चेअरवरुन तसे कधीही आदेश देत नसतो. परंतु या वेळी मात्र मला असे वाटत आहे की, मला जे अधिकार प्राप्त झालेले आहेत, त्यानुसार माझे शासनाला स्पष्ट आदेश आहेत की, याबाबत जी काही चौकशी शासनाला करायची ती करा... एसआयटी दाखल केली तरी.....(अडथळा).... परंतु कोणत्याही परिस्थिती संबंधित महापालिका आयुक्तांना तेथून त्वरित कार्यमुक्त करावे. त्या जागी कोणाला सरकारला नेमायचे आहे,त्यांना नेमावे. परंतु तो कमिशनर तेथे आहे....(अडथळा) तो..... He cannot be judge of his own cause or mistakes. त्यामुळे तेथून त्यांना हलवावे, असे स्पष्ट निर्देश मी सरकारला देत आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मी आपल्याला धन्यवाद देत आहे. आपण या लक्षवेधी सूचनेला न्याय देत आहात. माननीय मंत्रीमहोदय आपलेही मी आभार मानत आहे. या सर्व प्रकरणासंदर्भातील ओ.सी. आणि ले-आऊट मंजूर केलेली आहे, याची देखील शासन चौकशी लावणार आहात. याबाबत माझी विनंती आहे की, शासनाने या प्रकरणाच्या चौकशीकरिता एसआयटी नेमावी. मंत्रीमहोदय नेहमी गरीब आणि उपेक्षितांच्या घरांसाठी काम करीत आहेत. याबाबतचे उत्तर मला आलेले नाही. त्या दरम्यान जे महापालिकेचे अधिकारी होते, आणि म्हाडाचे अधिकारी होते. कारण शेवटी म्हाडाची जबाबदारी आहे.

यानंतर श्री.सोनावणे.......

श्री. प्रवीण दरेकर.........

त्यांनी ओसी किंवा एनओसी दिलेली आहे काय किंवा ती परस्पर दिलेली असेल तर चुकीची आहे. त्या काळातील म्हाडा, महानगरपालिकेतील आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या विरोधात कारवाई करावी, अशी माझी माननीय मंत्री महोदयांकडून अपेक्षा आहे. अशा संबंधितांविरोधात कोणती कारवाई करणार असा माझा प्रश्न आहे.

श्री. प्रसाद लाड : सभापती महोदय, या प्रकरणी महानगरपालिकेतील आयुक्त जबाबदार आहेत. विभागीय आयुक्त.....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. प्रसाद लाड यांना सांगू इच्छितो की, मी स्वत: तसे म्हणालो आहे.

डॉ. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर असे म्हणाले आहेत की, म्हाडा आणि महानगरपालिकेतील संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती एकत्रित केली असता त्यामध्ये तफावत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण दिले जाणार नाही. म्हाडा किंवा महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांनी व विकासकांनी या प्रकरणी गरीब लोकांची घरे व भूखंड बळकावली असतील तर ते दोषी आहेत. त्यामुळे अशा दोषी अधिकाऱ्यांना व विकासकांना मोकळे सोडले जाणार नाही. माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर यांनी एसआयटीमार्फत चौकशी करण्याची मागणी केलेली आहे. माननीय सभापती महोदयांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात एसआयटी निश्चित करावी...

**सभापती** : मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, एसआयटी असा शब्दप्रयोग नको. सदनाची इच्छा असेल....मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, माननीय मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड हे माननीय विरोधी पक्षनेते आणि इतर सन्माननीय सदस्यांनी केलेल्या मागणीनुसार फेव्हरमध्ये आहेत. याबाबत कोणताही विषय नाही. त्यांना ते मान्य आहे. फक्त त्यांच्या विभागाशी संबधित असल्यामुळे त्यांच्याकडे तो विषय आहे. असे असले तरी मी सदरहू लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने

असुधारित प्रत

**सभापती....**

माझ्या दालनात आणि माझ्या अध्यक्षतेखाली लवकरच निर्णय घेईन. त्यामुळे माननीय विरोधी पक्षनेते, इतर संबंधित सन्माननीय सदस्य आणि माननीय मंत्री महोदयांनी वेळ काढून बैठीकीस उपस्थित राहून योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, संबंधित महानगरपालिकेतील आयुक्तांना आपण दूर करण्याचे आदेश दिलेले आहेत.

डॉ. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, हे माझ्या अखत्यारित येत नाही.

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी या विषयी त्यांना कळविण्याची गरज आहे. आपली कलेक्टिव्ह रिसस्पॉन्सिबीलीटी आहे. निर्देश ते.....

डॉ. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ज्या अधिकारात चेअर आहे. The words of the Chair are to be respected and honoured. त्यामुळे त्यांनी दिलेले आदेश मान्य करुन शासनातर्फे कारवाई केली जाईल. सामान्य प्रशासन व नगरविकास विभागास याबाबत त्वरित कळविले जाईल.

**सभापती** : ठीक आहे.

श्री. किशोर दराडे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एक महत्वपूर्ण लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित केलेली आहे. माननीय मंत्री महोदय या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने बैठक आयोजित करुन चौकशी करतील. पण संबंधित अधिकाऱ्यांना किती कालावधीसाठी सस्पेंड केले जाणार आहे असा माझा प्रश्न आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. किशोर दराडे यांना सांगू इच्छितो की, चौकशी झाल्यावर संबंधित अधिकाऱ्यांना सस्पेंड केले जाणार आहे.

श्री. अमोल मिटकरी : सभापती महोदय, ठाण्याच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी निर्णय घेतलेला आहे. याच धर्तीवर फसवणूक करणाऱ्या विकासकांच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल काय आणि ज्यांनी एनओसी किंवा

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी.........

पार्ट एनओसी दिलेली आहे, अशा अधिकाऱ्यांच्या विरोधात कारवाई केली जाईल काय ?

डॉ. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, संबंधित विकासक हा माझा जवळचा मित्र असून, मी त्याला जेलमध्ये पाठविले आहे. त्यामुळे मी त्यांना माफ करेल अशी अपेक्षा कोणीही माझ्याकडून करु नये. ठाण्यातील विकासकाने गरीबांची घरे व भूखंड बळकावली आहेत. तसेच या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांचा समावेश असल्यामुळे अशा सर्व अधिकाऱ्यांच्या व विकासकांच्या विरोधात माझ्या विभागाकडून चौकशी करुन कारवाई केली जाईल आणि ज्या विकासकाने घरे विकलेली असून, त्यांच्या विरोधात देखील कारवाई केली जाणार आहे.

**सभापती** : ठीक आहे. सदरहू लक्षवेधी सूचनेवरील चर्चा संपलेली असल्यामुळे आता लक्षवेधी सूचना क्रमांक-४ चर्चेला घेण्यात येईल.

--------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात सन १९७९ ला रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून टेंभापूरी मध्यम प्रकल्प उभारणीसाठी गोदावरीतील बॅक वॉटर मधून पाणी लिफ्ट करुन सौरऊर्जा प्रकल्पाद्वारे मध्यम प्रकल्पात पाणी आणल्यास धरण पूर्ण क्षमतेने भरुन सिंचन क्षेत्रात वाढ होण्यास मदत होणे

**मु. शी. :** गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात सन १९७९ ला रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून टेंभापूरी मध्यम प्रकल्प उभारणीसाठी गोदावरीतील बॅक वॉटर मधून पाणी लिफ्ट करुन सौरऊर्जा प्रकल्पाद्वारे मध्यम प्रकल्पात पाणी आणल्यास धरण पूर्ण क्षमतेने भरुन सिंचन क्षेत्रात वाढ होण्यास मदत होणे या संबंधी सर्वश्री सतिश चव्हाण, विक्रम काळे, अमरनाथ राजूरकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात सन १९७९ ला रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून टेंभापूरी मध्यम प्रकल्प उभारणीसाठी दिनांक २३ मार्च, १९७९ रोजी ३२०.०० लक्ष रुपयांची प्रशासकीय मान्यता दिली असून सुधारित प्रशासकीय मान्यता दिनांक ०७ सप्टेंबर, १९९४ रोजी १७३०.०० लक्ष रुपयांची दिली असणे, सदर मध्यम प्रकल्पाचे काम सन १९७९ मध्ये सुरु होऊन सन १९९५ मध्ये पूर्ण झाले असणे, टेंभापूरी मध्यम प्रकल्पाची साठवण क्षमता २१.२७ द.ल.घ.मी असणे, सन २००६ पासून धरणात काही प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध होत असणे, परंतु पुरेशा

श्री. सतीश चव्हाण....

पावसाअभावी धरणात पूर्ण क्षमतेने पाणीसाठा उपलब्ध झाला नसणे, सदर प्रकल्पात बाधित गावाची संख्या ९ असून बाधित क्षेत्र ७८५ हेक्टर असणे, तर बाधित शेतकऱ्यांची संख्या ४०० असणे, शिवाय २५ टक्के धरणग्रस्तांना अद्याप रहिवाशी प्लॉट मिळाला नसणे, पुनर्वसित गावात अद्याप सोयी सुविधा नसणे, लाभक्षेत्राच्या गावाची संख्या २३ असून ४७९ हे सिंचन क्षेत्र प्रस्तावित असणे, सदर धरणावर २५ गावांच्या पाणी पुरवठा योजना असणे, धरण पूर्ण क्षमतेने भरत नसल्याने, २५ गावांना पिण्यासाठी पाणी व सिंचनासाठी पाणी उपलब्ध होत नसणे, कॅनॉल खराब झाले असल्याने उपचाऱ्यांना पाणी उपलब्ध होत नसणे, टेंभापूरी मध्यम प्रकल्पात पाणीसाठा उपलब्ध करुन देण्यासाठी उपाय योजना करणेस्तव शासनाने गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ यांना दिनांक ६ जानेवारी, २०२१ रोजी कार्यवाही करण्यास सूचित केले असणे, परंतू त्यावर अद्याप कार्यवाही झालेली नसणे, कायगांव, येथून गोदावरीतील बॅक वॉटर मधून पाणी लिफ्ट करुन सौरऊर्जा प्रकल्पाद्वारे मध्यम प्रकल्पात पाणी आणल्यास धरण पूर्ण क्षमतेने भरुन सिंचन क्षेत्रात वाढ होण्यास मदत होणार असणे, धरणग्रस्त शेतकऱ्यांना अद्याप पर्यायी जमीन व धरणग्रस्त प्रमाणपत्र मिळाले नसणे, या बाबतीत शासनाने गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळास दिनांक २७ जुलै, २०२० रोजी पत्र देऊन कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असणे, परंतू त्यावर अद्याप कार्यवाही झालेली नसणे, धरणात पुरेसा पाणीसाठा उपलब्ध होण्यासाठी प्रस्तावित असलेल्या ठिकाणाहून पाणी लिफ्ट करणे, धरणग्रस्तांना पर्यायी जमिन देणे, रहिवाशी प्लॉट देणे व धरणग्रस्त प्रमाणपत्र देण्यासाठी होत असलेली मागणी यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री. जयंत पाटील (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, हा प्रकल्प दुष्काळग्रस्त भागातील आहे. मागील २५ वर्षाच्या काळात तो प्रकल्प दोन वेळा भरलेला आहे. त्या प्रकल्पातील पाण्यावर वाळूची औद्योगिक वसाहत अवलंबून आहे. या प्रकल्पावर २५ गावातील पाणी पुरवठा योजना अवलंबून आहे. दिनांक ६ जानेवारी, २०२१ रोजी शासनाने जेएमआरडीसीला गोदावरी महामंडळाला अशी सूचना दिली होती की, या विषयाच्या संदर्भातील प्रकल्प अहवाल त्वरित देण्यात यावा. परंतु, तो अहवाल आजतागायत दिलेला नाही. माननीय जलसंपदा मंत्री महोदयांनी राज्यातील महत्वाकांक्षी योजना हाती घेतलेल्या आहेत. माननीय जलसंपदा मंत्री आणि इतरांनी असे मान्य केलेले आहे की, जायकवाडी हे तुटीचे खोरे आहे. या तुटीच्या खोऱ्यात पाणी आणण्यासाठी मागील आठवड्यात चर्चा झाली होती. त्यावेळी माननीय जलसंपदा मंत्री श्री. जयंत पाटील यांनी सकारात्मक उत्तर दिले होते. फक्त १ टीएमसी पाण्याचा प्रश्न आहे. जायकवाडी १०० टीएमसीचा प्रकल्प आहे. मागील ५ वर्षात जायकवाडीमधून ५०० टीएमसी पाणी किमान सहा वेळा वाहून गेलेले आहे. माननीय जलसंपदा मंत्री महोदयांनी "पाणी उपलब्ध नाही असे दिसते" असे उत्तर दिलेले आहे. या संदर्भात माननीय जलसंपदा मंत्री महोदयांनी एक योजना आणण्याची गरज आहे. ज्यावेळी भरपुर पाऊस होईल त्यावेळी लिफ्ट करावी. फक्त २३ ते ५० कि.मी.ची लिफ्ट आहे.

सभापती महोदय, माननीय जलसंपदा मंत्री महोदय हे १ टीएमएसी पाण्यासकट लिफ्ट मंजुर करतील काय असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, जायकवाडीच्या फेरनियोजनामध्ये १ टीएमसीच्या पाण्याला मंजुरी देतील काय ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी जायकवाडी हे तुटीचे क्षेत्र आणि गोदावरी खोऱ्यात किती पाण्याची तुट आहे याबाबतची माहिती दिलेली आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, जवळपास ४० टीएमसी पाण्याची तुट आहे. त्यामुळे आपल्याला कोणत्याही अतिरिक्त पाण्याला कमिटमेंट देणे शक्य होत नाही. त्यांनी २३ ते ५० कि.मी.ची पाईपलाईन टाकण्यासाठी विनंती केलेली आहे. परंतु, त्या कामासाठी फक्त ६०० कोटी रुपयांचा खर्च येणार

असुधारित प्रत

श्री. जयंत पाटील....

आहे. त्यांची मागणी योग्य आहे. त्या धरणात पाणी सोडल्यामुळे १५ ते १६ गावांना पिण्याच्या पाण्याची सोय होणार आहे. मागील वर्षी चांगला पाऊस पडल्यामुळे तलावांमध्ये पाणी होते. सर्वांना मुबलक पाणी मिळते. ज्यावेळी पाणी कमी मिळते त्यावेळी तुटीची चर्चा केली जाते. सन्माननीय सदस्यांनी ५०० टीएमसी पाणी खाली वाहून जाते असा उल्लेख केलेला आहे. ज्यावेळी हे पाणी वाहून जाते त्यावेळी तलाव आणि पाईपलाईनमध्ये पाणी जाते. जोपर्यंत जायकवाडीचे फेरनियोजन होत नाही, तोपर्यंत शासनाला १ टीएमसी पाणी देण्याचे कमिटमेंट देता येणे आज तरी शक्य होणार नाही.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, परवाच्या दिवशी माननीय जलसंपदा मंत्री महोदय हे मराठवाड्यातील वैजापूर येथील एक कार्यक्रमासाठी आले होते. त्यावेळी माननीय जलसंपदा मंत्री महोदयांनी मराठवाड्यातील जनतेला असे आश्वासन दिले होते की, जेवढे पाणी मराठवाड्यासाठी उपलब्ध होऊ शेकते तेवढे थेंब न थेंब पाणी देण्यास मी कटिबध्द आहे. त्यावेळी आम्ही सर्वांनी डबल टाळया वाजविल्या होत्या. त्यावेळी मी आणि सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण व्यासपीठावर होतो.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांना विचारु इच्छितो की, डबल टाळया म्हणजे काय ?

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, एकदा आनंद झाला तर एकच टाळी आणि फार मोठा आंनद झाला तर डबल टाळी दिली जाते असे मराठवाड्यात म्हटले जाते. सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी महत्वपूर्ण लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित केलेली आहे. माझ्याही मतदारसंघात ते गाव येत आहे. २३ गावांना पिण्याचे पाणी मिळणार आहे. जायकवाडी प्रकल्पातून आंध्रप्रदेशमध्ये पाणी वाहून जाते. ज्यावेळी पाऊस पडत नाही त्यावेळी विषय उपस्थित होतच नाही. परंतु, ज्यावेळी पाऊस पडतो त्यावेळी तेथील गावांना पिण्याचे पाणी मिळावे म्हणून.....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांना विचारु इच्छितो की, पुरामुळे वाहून जाणाऱ्या पाण्याची मागणी केली जात आहे काय ?

असुधारित प्रत

श्री. विक्रम काळे : होय सभापती महोदय. माननीय जलसंपदा मंत्री महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक आयोजित करुन सदरहू प्रश्न मार्गी लावावा अशी माझी विनंती आणि तशी सकारात्मक पावले उचलली जातील काय असा माझा प्रश्न आहे. कालच माननीय जलसंपदा मंत्री महोदयांनी भाषण केलेले आहे आणि आजच या लक्षवेधी सूचनेला "नाही" असे म्हणणे थोडेसे संयुक्तिक वाटत नाही. त्यामुळे आम्हाला आशावादी राहता येईल किंवा कसे याबाबत माननीय जलसंपदा मंत्री महोदय निर्णय घेतील काय असा माझा प्रश्न आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांना सांगू इच्छितो की, आता उलट्या डबल टाळ्या वाजवा.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मराठवाड्यातील तुट भरुन काढण्यासाठी आणि तेथील प्रकल्पाला चालना दिली जाईल असा उल्लेख मी माझ्या भाषणात केला होता. सन्माननीय सदस्यांनी टेंभापुरी प्रकल्पासाठी टाळी वाजवली नाही आणि मी त्याबाबतीत कोणतीही घोषणा केलेली नाही. सन्माननीय सदस्यांनी दोन किंवा दहा टाळ्या या वळण बंधाऱ्यासाठी मारल्या होत्या आणि शासन वळण बंधाऱ्याला तुटीचे खोरे असल्यामुळे चालना देत आहे. शासनाने अनेक निर्णय जलदगतीने घेतलेले आहेत. तसेच वन विभागातील प्रलंबित असलेल्या प्रकल्पांना चालना देण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे हे चित्र पुढील काळात बदलल्याचे दिसून येईल आणि ज्यावेळी अतिरिक्त पाणी येईल त्यावेळी फेरनियोजनाच्या बाबतीत.... सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण आणि सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांना सोडून मराठवाड्यात दुसरे काहीच होऊ शकत नाही.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

श्री.जयंत पाटील.....

त्या भागात पाण्याचा एक थेंब जरी वितरित करायचा असेल तर सन्माननीय सदस्य सर्वश्री सतीश चव्हाण व विक्रम काळे यांच्याशी चर्चा करुनच वितरित करण्यात येईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्यानुसार या विषयी बैठक आयोजित करण्यात येईल.

श्री.अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, या प्रकल्पासाठी ज्यांनी जमीन दिली त्या प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनी देण्यात येतील काय, त्यांना रहिवाशी भूखंड देण्यात येतील काय, तसेच उर्वरित प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पग्रस्त असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्वरित देण्यात येतील काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, हा प्रकल्प बराच जुना आहे. १९७९ साली रोजगार हमी योजनेतून या प्रकल्पाला ३२० लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली होती. लिंबे जळगाव आणि शिवराई या दोन गावांत ९०.५० टक्के वाटप झालेले आहे. तसेच लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद आहे की, १७ अर्जांपैकी १४ अर्ज निकाली काढण्यात आले असून ३ अर्जांवर कार्यवाही होणे बाकी आहे. या ३ अर्जांवर पुढील दोन महिन्यात कार्यवाही पूर्ण करुन सन्माननीय सदस्यांनी केलेल्या मागणीनुसार त्यावर कार्यवाही करण्यात येईल.

श्री.अंबादास दानवे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी टेंभापुरी आणि लिंबे जळगावबाबत म्हणणे मांडले. परंतु या सोबतच धामोरी, गंगापूर, शेंदूरवाडा, आणि औरंगपूर या गावांच्या पुनर्वसनाचे प्रश्न प्रलंबित आहेत. पुनर्वसनाचे प्रश्न सोडविण्यासाठी वारंवार आंदोलन होत आहे. मी स्पेसिफक विचारु इच्छितो की, या गावांतील पुनर्वसनाचे प्रश्न लवकरात लवकर निकाली काढण्यात येतील काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, हे सर्व जुने प्रकल्प आहेत. हे खरे आहे की, या प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम किंवा पर्यायी जमीन देण्याचे काम पूर्ण करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्यांनी कोणत्या गावातील प्रश्न प्रलंबित आहेत या बाबत पत्र दिले तर त्या बाबत गतीने कार्यवाही करुन बैठकीच्या वेळी त्यांना त्या संदर्भातील अहवाल देता येईल.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : बीड नगरपालिकेच्या माध्यमातून सुरु असलेला गैरप्रकार

**मु.शी.** : बीड नगरपालिकेच्या माध्यमातून सुरु असलेला गैरप्रकार, यासंबंधी श्री.विनायक मेटे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगर विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"बीड नगरपालिका हद्दीतील नागरिकांना पिण्याचे पाणी १५-१५ दिवसांनी मिळणे, माजलगाव बॅकवॉटर व बिंधुसरा धरणांमधून बीड शहराकरिता येणारे पाणी गढूळ आणि पिण्यायोग्य नसणे, फिल्टर प्लांटची अत्यंत वाईट अवस्था झालेली असणे, ब्लिचिंग पावडर पूर्ण विरघळत नसणे, शुध्दीकरण व्यवस्थित न केल्यामुळे नागरीकांच्या आरोग्याशी नगरपालिकेने खेळ करणे, त्याबाबत कोणतीही काळजी न घेणे, याचबरोबर बीड नगरपालिका हद्दीमध्ये अनेक वसाहतींमध्ये वीज नसणे, वेळेवर वीज न मिळणे, अनेक ठिकाणी बेकायदेशीर कनेक्शन्स निदर्शनास येणे, पथदिवे महिनो महिने बंद असणे, त्यामुळे मोठ्या प्रमाणात चोऱ्यांचे प्रमाण व अवैध धंद्यांचे, गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले असणे, याबाबत नगरपालिकेने व महावितरण कंपनीने पूर्ण दुर्लक्ष करणे, बीड नगरपालिकेने कोरोना काळातील मयतांच्या अंत्यविधीमध्ये मोठ्याप्रमाणात भ्रष्टाचार करणे, त्यामध्ये अधिकारी-पदाधिकारी सामील असणे, नगररचनाकार व ट्रेसर्स यांनी अवैध बांधकामांना भ्रष्टाचार करून मोठ्या प्रमाणात अभय देणे, पैसे घेतल्याशिवाय कोणतेही बांधकाम परवान्याचे काम न करणे, बीड शहरातील मुख्य रस्त्याच्या कामामध्ये प्रचंड भ्रष्टाचार करून निविदेनुसार गुणवत्तेची कामे न करणे, अनेक रस्त्यांची योग्य कामे न झाल्यामुळे मोठ्याप्रमाणात धुळीची वादळे तयार होऊन सर्व दुकानदार, नागरिक यांना मोठ्या प्रमाणात त्रास होणे, धुळीमुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होणे, डोकेदुखी, कॅन्सरचे प्रमाण वाढणे,

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे....

त्यामुळे नागरिकांना मोठ्या संकटांचा सामना करावा लागणे, या सर्व बाबींकडे नगरपालिकेचे होणारे दुर्लक्ष, नगरपालिकेने अनेक योजनांची अंमलबजावणी न करणे, त्यामुळे नागरीक सुविधांपासून व योजनांपासून वंचित राहणे, या सर्वांबाबत नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांनी दुर्लक्ष करणे, त्यांचे कार्यालयात सतत गैरहजर राहणे, DPDC बैठकीमध्ये त्यांच्या गैरकृत्यांबाबत त्यांच्यावर कारवाई करण्याचा घेतलेला निर्णय, जिल्हाधिकारी यांनी त्यांना अनेक वेळा ताकीद देऊनही त्यांच्या वर्तणुकीमध्ये सुधारणा न होणे, त्यांनी भ्रष्टाचारामध्ये सतत कार्यरत राहून काम करणे, यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री.प्राजक्त तनपुरे (नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, ही बीड नगरपालिकेसंदर्भातील लक्षवेधी सूचना आहे. या लक्षवेधी सूचनेत उपस्थित केलेल्या बाबी आणि या लक्षवेधी सूचनेला दिलेले लेखी उत्तर यामध्ये काहीही ताळमेळ नाही. एकप्रकारे हे लेखी निवेदन पूर्णत: असत्य आणि धूळफेक करणारे आहे.

सभापती महोदय, बीड नगरपालिकेंतर्गत राहणाऱ्या रहिवाशांना आपल्या माध्यमातून न्याय मिळावा अशी माझी अपेक्षा आहे. बीड नगरपालिकेमध्ये २२५ कोटी रुपयांची अमृत पाणी पुरवठा योजना राबविण्यात येत आहे. परंतु निविदेतील अटी व शर्तीनुसार कोणतेही काम होत नाही. अनेक ठिकाणी कामे सुद्धा करण्यात आलेली नाहीत. जी कामे करण्यात आलेली आहेत त्यामध्ये प्रचंड प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. तसेच भुयारी गटार योजना ११० कोटी रुपयांची असून, त्या योजनेत सुद्धा अशाच प्रकारचा कारभार सुरु आहे. या योजनेचे सुद्धा निविदेनुसार कोणतेही काम झालेले नाही. बीड शहरात पावसाळ्यात १५-१५ दिवसांत सुद्धा पिण्याचे पाणी मिळत नव्हते. जे पाणी मिळत होते ते अशुद्ध व गढूळ होते. बीड नगरपालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्रावर कर्मचारी नाहीत. जलशुद्धीकरण केंद्राचे काम वॉचमन पाहतात. पाण्यामध्ये ब्लिचिंग पावडर किती व कशी टाकावी याची त्यांना काहीही माहिती नाही. परिणामी, बीड नगरपालिकेंतर्गत राहणाऱ्या लोकांना अशुद्ध पाणी प्यावे लागते. मागच्या आणि या शासनाने बीड नगपालिकेला रस्त्यांसाठी मोठ्या प्रमाणात निधी दिला. परंतु रस्त्याचे काम सुद्धा निकृष्ट दर्जाचे झाले. एबीपी न्यूज चॅनेलपासून सर्वच चॅनेल्सनी या संदर्भातील बातम्या दाखविल्या. धुळीमुळे अनेक लोकांना डोकेदुखी, कॅन्सर यासारखे आजार झाले. त्या भागात सर्वत्र धूळ पसरली होती. अशाप्रकारे त्या भागात चुकीची, वाईट पद्धतीची तसेच गुणवत्ता नसलेली कामे झाली आहेत. बीड नगरपालिका क्षेत्रात कोरोना काळात जवळपास ८००-१०० लोक मृत्यू पावले. परंतु बीड नगरपालिकेने यामध्ये सुद्धा पैसे खाल्ले आहेत. महिलांसाठी शौचालये बांधण्यात आली, परंतु एकही शौचालय अस्तित्वात नाही. मी स्पेसिफिक विचारतो की, बीड नगरपालिकेने केलेल्या या सर्व कामांची चौकशी करण्यात येईल काय, तसेच भ्रष्टाचार, अनियमितता, चुकीची कामे, वाईट कामे आणि गुणवत्ता नसलेली कामे करण्यास जे मुख्याधिकारी, रचनाकार,कंट्रेसर वा

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे....

इतर अधिकारी आहेत त्या सर्वांना तत्काळ निलंबित करण्यात येईल काय ? सभापती महोदय, यापूर्वी अशाच शेकडो कोटी रुपयांच्या कामाची खुली चौकशी सुरु करण्यात आली होती. परंतु नंतर ती चौकशी दाबून ठेवण्यात आली. मी स्पेसिफिक विचारतो की, मागे सुरु करण्यात आलेली खुली चौकशी पुन्हा सुरु करण्यात येईल काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, बीड नगरपालिकेची लक्षवेधी सूचना लागल्यानंतर विभागाने बीड नगरपालिकेकडून माहिती मागविण्याचा प्रयत्न केला. काल बीड नगरपालिकेचे काही अधिकारी ब्रिफींगसाठी आले होते. परंतु दुर्दैव असे आहे की, काल सांगून सुद्धा आज माहिती देण्यासाठी बीड नगरपालिकेचे कोणतेही अधिकारी उपस्थित राहिले नाहीत. विधानमंडळामध्ये एखादा प्रश्न किंवा लक्षवेधी सूचना येते त्यावेळी जर संबंधित अधिकारी त्याची दखल घेणार नसतील तर ती गंभीर बाब आहे. बीड येथील जिल्हा प्रशासन अधिकाऱ्यांकडून शासनाने वेळोवेळी माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्याकडून माहिती देण्याबाबत म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही.

सभापती महोदय, काल बीड नगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते. आज ही लक्षवेधी सूचना असल्यामुळे त्यांना आज पुन्हा सकाळी उपस्थित राहण्याबाबत सूचना केली होती. परंतु ते कोणीही उपस्थित राहिले नाहीत. तसेच त्यांना फोनवरुन संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, परंतु कोणाचाही फोन लागत नाही. त्यामुळे या विषयाशी संबंधित असलेल्या राहुल टाकले, अभियंता (पाणी पुरवठा), योगेश हांडे, अभियंता (बांधकाम), सुधीर जाधव (कर अधीक्षक) आणि सलीम सय्यद याकूब (कनिष्ठ रचना सहाय्यक) या चार अधिकाऱ्यांना तातडीने निलंबित करण्यात येईल. बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी हे काल ब्रिफींगच्या वेळी उपस्थित होते. परंतु त्यांच्या नातेवाईकांचे निधन झाल्यामुळे ते परवानगी घेऊन गेले आहेत. परंतु अन्य

असुधारित प्रत

श्री.प्राजक्त तनपुरे....

कोणत्याही अधिकाऱ्यांनी साधी विचारण्याची सुद्धा तसदी घेतली नाही. विधानमंडळाला गंभीरतेने घेतले नसल्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, अमृत पाणी पुरवठा योजनेतून त्या ठिकाणी काम सुरु आहे. तसेच काही भूमिगत गटारे आणि रस्त्यांची सुद्धा कामे सुरु आहेत. या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने जर बीड नगरपालिकेकडून विभागाला माहितीच मिळत नसेल तर निश्चितपणे या सर्व कामांची चौकशी करण्यात येईल. चौकशीमध्ये जे दोषी आढळतील त्यांच्यावर उचित ती कारवाई करण्यात येईल.

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, बीड नगरपालिकेचे मुजोर अधिकारी कसे वागतात याचा अनुभव खुद्द मंत्री महोदयांना आलेला आहे. त्या मुजोर अधिकाऱ्यांना निलंबित केल्याबद्दल मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, बीड नगरपालिकेत पिण्याचे पाणी आणि वरणाच्या पाण्यात तफावत आहे. मी स्पेसिफिक विचारतो की, बीड नगरपालिकेची पाईपलाईन खराब झाल्यामुळे या कामासाठी त्यांना अतिरिक्त निधी देण्यात येईल काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, बीड नगरपालिकेमध्ये पाणी पुरवठा योजनेतून नवीन काम सुरु आहे. ते काम जवळपास पूर्ण होत आलेले आहे. जर ते काम समाधानकारक झाले नसेल तर त्या कामाची चौकशी करण्यात येईल.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी एक गंभीर विषय सभागृहाच्या निदर्शनास आणून दिला आहे. विधिमंडळात उपस्थित होणाऱ्या विषयाच्या बाबतीत मंत्री महोदयांना ब्रिफींग करण्यासाठी अधिकारी येत नसतील तर ती बाब योग्य नाही. उपस्थित न राहणाऱ्या अधिकाऱ्यांना मंत्री महोदयांनी निलंबित केलेले आहे. मी स्पेसिफिक विचारतो की, अशा अधिकाऱ्यांना निलंबित करण्याऐवजी त्यांना थेट बडतर्फ करण्यात येईल काय ? तसेच संबंधित विभागाच्या प्रधान सचिवांकडे या संदर्भातील तक्रार करुन या अधिकाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई

श्री.शशिकांत शिंदे....

करणे गरजेचे आहे. अशा प्रकारची कडक कारवाई करुन या सर्व अधिकाऱ्यांची ताबडतोब चौकशी करण्यात येईल काय ?

**सभापती** : मला वाटते संबंधितांना म्हणणे मांडण्याची संधी दिली नाही तर बडतर्फीची कारवाई टिकणार नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी ही बाब लक्षात घेऊन बडतर्फीबाबतची मागणी करावी. मला वाटते कोणतीही कारवाई ही कायद्याने होणे आवश्यक आहे.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, असाच एक प्रकार मागे घडला होता. महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री माननीय श्री.अजितदादा पवार हे बीड येथे आले होतो. त्या कार्यक्रमाच्या वेळी आम्ही सर्वजण व्यासपीठावर उपस्थित होतो.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत

श्री. सतीश चव्हाण ....

सर्व महत्त्वाचे अधिकारी उपस्थित होते. मात्र ते मुख्याधिकारी आलेच नाहीत. ३ वेळा विचारले, त्यांना निरोप पाठविला. दादांनी एवढा निरोप दिला की, मी दुपारी २ वाजेपर्यंत बीडमध्ये आहे, केव्हाही येऊन भेटावे. मुद्दाम येत नाहीत का ? ते कार्यालयात बसून होते. माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या बैठकीला येत नाहीत. ही मुजोरी, एवढी मस्ती या अधिकाऱ्यांची जर असेल तर काय म्हणायचे ? माननीय मंत्र्यांनी आताच सांगितले की, काल नुसते येऊन भेटून गेले आणि आज ब्रिफिंकगला आलेच नाहीत. मला असे वाटते की, माननीय मंत्र्यांचा अपमान आहे, या सदनाचा अपमान आहे. कारण ते आम्हाला उत्तर देणार होते. आपण मुख्याधिकारी, बीड नगरपालिका यांना आजच्या आज निलंबित करणार का ?

श्री. प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, मुख्याधिकारी काल आले होते. ते काल ब्रिफिंगला होते. कोणी तरी नातेवाईक वारले म्हणून ते विचारुन, परवानगी घेऊन गेले. ते म्हणाले की, बाकीची मंडळी येथे आहेत. बाकीच्या मंडळींकडून काल थोडे ब्रिफिंग घेऊन आज पुन्हा या म्हणून सांगितले होते. पण आज मात्र कोणाचेच फोन लागत नाहीत, कोणीही हजर नाहीत, असे निष्पन्न झाले आहे.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, त्यांना मुख्याधिकाऱ्यांनी आत येऊ दिले नाही.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, माननीय मंत्री मुख्याधिकाऱ्यांना का पाठीशी घालत आहेत हे मला माहीत नाही. सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी सांगितले की, माननीय उप मुख्यमंत्री आल्यावर देखील अशाप्रकारे जर त्यांची मुजोरी असेल तर यावरुन ते किती प्रभावशाली आहेत हे लक्षात येते. माननीय मंत्र्यांनी पाठीशी घालण्याचे काही कारण नाही. आमची सभागृहाच्या माध्यमातून मागणी आहे. तुम्ही कनिष्ठ अधिकाऱ्यांना थातुरमातुर निलंबित करणार. येथे मुख्याधिकाऱ्यांवर कारवाई झाली तर मेसेज जाईल. माझी मागणी आहे. आपण आमचे रक्षण करावे. मुख्याधिकारी निलंबित झाले पाहिजेत. आपण तशाप्रकारची घोषणा आज करावी नाही तर आम्ही आणखी हा विषय पुढे चालवू.

असुधारित प्रत

श्री. प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे आजच्या ब्रिफिंगचा विषय आहे. आजच्या विषयाच्या संदर्भात काल मुख्याधिकारी होते. आजच्या ब्रिफिंगसाठी ते काल आले होते. ते काल परवानगी घेऊन गेले. त्यामुळे आजच्या विषयाबाबत त्यांना दोषी धरणे योग्य नाही. परंतु माननीय उप मुख्यमंत्र्यांचा जर दौरा असेल, त्यांना कळविले गेले असेल आणि तरीही ते, माहिती असून देखील तेथे जागेवर हजर नसतील तर याबाबतची व्यवस्थित माहिती घेऊन त्यांच्यावर यथोचित कारवाई केली जाईल.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, तेथे उपस्थित राहिले एवढ्यापुरता विषय सीमित नाही. त्यावरुन त्यांची मुजोरी दिसून येते. परंतु या संपूर्ण नगरपालिकेचा अनागोंदी कारभार त्यांच्या आश्रयाखाली चालला आहे, त्यांच्या मार्गदर्शनाखाली चालला आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांच्या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून आज बीड शहरात लोक वाट पाहत आहेत की, तुम्ही त्यांना पाठीशी घालणार की त्यांच्यावर कारवाई करणार. माझी आपल्याकडे मागणी आहे की, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. संपूर्ण सभागृहाची मागणी आहे.

**सभापती** : मी माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, मी लक्षवेधी सूचना वाचली आहे. त्यामध्ये भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. मुख्याधिकाऱ्यांना तुमच्या सर्वंकष चौकशीत घेऊन इतरांना जसे निलंबित केले तसे त्यांना निलंबित करावे.

श्री. प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, ठीक आहे. आपल्या आदेशाप्रमाणे त्यांची विभागीय चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री. संजय दौंड : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेत नगररचनाकार व ट्रेसर्स यांनी अवैध बांधकामांच्या संदर्भात भ्रष्टाचार करुन मोठ्या प्रमाणात अभय देणे हा विषय आहे आणि त्या संदर्भात माझे दोन प्रश्न आहेत. भूमी अभिलेख अधिकारी, नगररचनाकार अधिकारी, महसूल अधिकारी आणि काही भूमाफिया जमिनीची मोजणी करुन घेतात, त्यांचे लेआऊट मंजूर करुन घेतात, परंतु डिमार्केशन केल्याशिवाय तेथे बांधकाम करता येत नाही, अशा ठिकाणी ते बांधकाम करुन

असुधारित प्रत

श्री. संजय दौंड ....

शासनाचा महसूल बुडवितात. त्यामुळे या अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करणार का ? दुसरा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, जोगाईवाडी नावाचे छोटेसे गाव आंबेजोगाई शहरालगत आहे. ते आज शहरामध्ये आले आहे. जवळपास ३० वर्षांपूर्वी जोगाईवाडीला जोगाईवाडी लघुसिंचन तलाव झाला आहे. त्या तलावामध्ये शेतकऱ्यांच्या ज्या जमिनी संपादित केल्या आहेत त्यांचे लॅण्ड पेमेंट पूर्ण झाले आहे. लॅण्ड पेमेंट झाले असताना, अशा जमिनीवर, ज्या जमिनीत पाणी साठत नाही अशा जमिनीवर, डबल मोजणी करुन, तेथे लेआऊट मंजूर करुन अनधिकृतपणे प्लॉट विक्री केली आहेत आणि घरे बांधली आहेत. आपण त्यावर कारवाई करणार का ? आपण या संदर्भात एसआयटी नेमून ज्यांनी हे काम केले आहे त्यांना निलंबित करावे अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

श्री. प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी २ मुद्दे सांगितले आहेत. पहिला मुद्दा बीड शहरातील असून तो आजच्या लक्षवेधी सूचनेच्या स्कोपमधील आहे. मी सांगितले आहे की, आपण वेगवेगळ्या कामांची चौकशी करणार. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, नगररचना विभागाच्या काही लोकांनी काही अवैध गोष्टी केल्यामुळे नगरपालिकेचा अथवा शासनाचा महसूल बुडाला. या सर्व चौकशीध्ये जर काही निष्पन्न झाले तर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

**सभापती** : आपण एक काम करावे. या नगरपालिकेची निवडणूक कधी आहे हे मला माहीत नाही. परंतु जर सकृतदर्शनी तुमच्या सर्व चौकशीमध्ये दिसत असेल तर सरळ प्रशासकच नेमावा. तुम्हाला अधिकार आहेत अशी माझी समजूत आहे.

श्री. प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, आधी एकदा चौकशी होऊ द्यावी.

**सभापती** : ठीक आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मी आपले व आपल्या माध्यमातून माननीय मंत्र्यांचे सर्वप्रथम आभार व्यक्त करतो. आपण खऱ्या अर्थाने लक्षवेधी सूचनेला न्याय दिला आहे.आपल्याला एक विनंती आहे. नगरपालिकेची अगोदरची

असुधारित प्रत

श्री. विनायक मेटे ....

ओपन एन्क्वॉयरी सुरु आहे, ती आता थांबलेली आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री. विक्रम काळे, सतीश चव्हाण यांना याबाबतीत माहीत आहे. आपण ती परत सुरु करणार का, सर्व भ्रष्टाचाराबाबत, कारभाराबाबत आपल्याकडे बैठक लावणार का ?

**सभापती** : माझ्याकडे बैठक नको. माननीय मंत्र्यांनी त्याबाबत पहावे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, ठीक आहे. ओपन एन्क्वॉयरी परत सुरु करणार का ? तुम्ही चांगले उत्तर दिले असल्यामुळे मी आता बैठकीबाबत बोलत नाही.

**सभापती** : ठीक आहे. आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता सुरु होईल.

(सभागृहाची विशेष बैठक दुपारी ११.४५ ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

## कृषी उद्योग महामंडळात शेतकऱ्यांसाठीच्या अवजारे खरेदीत गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत

(१) * ११९७८ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अरुण लाड, श्री.संजय दौंड, श्री.शशिकांत शिंदे : सन्माननीय कृषी मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी उद्योग महामंडळामार्फत राज्यातील शेतकऱ्यांना अवजारे वाटप करण्यासाठी महामंडळाकडून केलेल्या अवजारे खरेदीत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी दिनांक ३० डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहारामध्ये महामंडळाच्या सेवेतून निवृत्त झालेल्या १० वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असल्याचे तसेच अन्य १८ अधिकाऱ्यांना याप्रकरणी माहे डिसेंबर, २०२१ मध्ये नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहाराच्या चौकशी प्रक्रियेस काही निवृत्त अधिकाऱ्यांनी हरकत घेतली असून, निवृत्त अधिकाऱ्यांची चौकशी करण्याऐवजी कार्यरत अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांचेवर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कृषी उद्योग महामंडळातील अवजारे खरेदीत गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

असुधारित प्रत

ता.प्र.क्र ११९७८...

श्री.दादाजी भुसे : (१) हे खरे नाही. तथापि, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे विभागीय कार्यालय, अहमदनगर येथे कार्यरत असलेले अधिकारी/ कर्मचारी यांचेकडून वितरक व लाभार्थी ग्राहकांकडून येणाऱ्या रकमेची अफरातफर होऊन अपहार झालेला आहे.

(२) अपहार प्रकरणी २१ अधिकारी/ कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

(३) हे खरे आहे. अपहार प्रकरणी निवृत्त अधिकारी यांनी त्यांचेवर कारवाई न करण्याची मागणी केली आहे. परंतु शासकीय नियमांमध्ये असलेल्या तरतूदीच्या अनुषंगाने महामंडळ स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) सदर प्रकरणी २१ अधिकारी/ कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. तसेच ३ अधिकारी/ कर्मचारी यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले आहे. वरील २१ पैकी दोन अधिकाऱ्यांचे निधन झाले आहे. मृत अधिकारी वगळून एकूण १९ अधिकारी/ कर्मचारी यांची डिसेंबर २०२१ मध्ये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.अमोल मिटकरी : सभापती महोदय, महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळ हे कधी काळी विविध उपक्रमामुळे राज्यातील कृषी क्षेत्रात मानाचे स्थान मिळवित होते. हा प्रश्न अतिशय महत्वाचा व गंभीर आहे. माझे चार उप प्रश्न आहेत. महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे विभागीय कार्यालय अहमदनगर येथे कार्यरत असलेले अधिकारी,कर्मचारी यांचेकडून वितरक व लाभार्थी ग्राहकांकडून येणाऱ्या रकमेची अफरातफर होऊन अपहार झालेला आहे असे लेखी उत्तरात नमूद केले आहे. सदर प्रकरणी किती रकमेचा अपहार झाला तो आकडा मंत्री महोदय सांगतील काय ? अपहार प्रकरणी २१ अधिकारी/कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. या नोटीसा केव्हा देण्यात आल्या ? त्या अनुषंगाने पुढे कोणती कारवाई करण्यात आली. त्याचप्रमाणे सेवानिवृत्त झालेल्या किती अधिकारी व कर्मचारी यांना नोटीसा देण्यात आल्या आहेत. विभागीय चौकशी पूर्ण करण्यात आली आहे काय ? त्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे. याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र ११९७८...

श्री.दादाजी भुसे : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. अहमदनगर येथील प्रकरणात साधारणपणे सन २०१२ ते २०१७ या कालावधीत झालेल्या अपहाराची ही प्रकरणे आहेत. यामध्ये १ कोटी २० लक्ष ९८ हजार रुपयांचा अपहार झाला आहे. अपहार करणारे प्रत्यक्ष व सहभागी अधिकारी कर्मचारी होते त्यांच्यावर दिनांक २३/११/२०१७ अन्वये आर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग, अहमदनगर येथे एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. अहवालानुसार तीन अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्यात आले आहे. अप्रत्यक्ष जबाबदार असलेले २१ अधिकारी कर्मचारी आहेत. यामध्ये आता ८ कार्यरत आहेत, सेवानिवृत्त ९ झाले आहेत, दोन मयत झाले आहेत. राजीनामा दिलेले दोन कर्मचारी आहेत. अशी ही एकूण २१ अधिकारी कर्मचाऱ्यांची संख्या आहे. यासंदर्भातील चौकशी अहवाल ७ मार्च रोजी प्राप्त झाला आहे त्याची छाननी सुरु आहे. या प्रकरणात जे दोषी असतील त्यांना पाठीशी घातले जाणार नाही. निरपराध लोकांवर अन्याय होता कामा नये याबाबत विभाग काळजी घेईल.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी अतिशय गंभीर प्रकरण शोधून काढले आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही अमुक करु तमुक करु. माझा प्रश्न असा आहे की,किती लोकांवर गुन्हे दाखल केल आहेत. हा प्रश्न विभागीय चौकशीने सुटणार आहे काय ? विधानसभा सदस्य किंवा जिल्हा परिषद सदस्यांनी थोडी अनियमितता केली तर त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येतात व त्यांना जेलमध्ये टाकण्यात येते. येथे अनेक अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केला, अफरातफर केली, गैरव्यवहार केला ही बाब मंत्री महोदयांनी मान्य केली आहे. पोलीस कारवाई झाली आहे काय ? फक्त विभागीय चौकशी करुन या प्रकरणाला न्याय मिळणार नाही. यातील दोषी लोकांवर काय कडक कारवाई करण्यात येणार आहे व यानंतर असे प्रकार होऊ नये याबाबत शासन कोणती काळजी घेणार आहे ?

श्री.दादाजी भुसे : सभापती महोदय, सभागृहाच्या माध्यमातून मी वस्तुस्थिती समोर ठेवली आहे. यामध्ये प्रत्यक्ष अपहार करणाऱ्या तिघांना बडतर्फ करण्यात आले असून त्यांच्यावर एफआयआर दाखल करण्यात आला आहे. वरिष्ठ पातळीवरील कार्यालयांनी दरवर्षी ऑडीट करणे ही त्यांची जबाबदारी आहे. त्यांनी हलगर्जीपणा केला. अशा २१ लोकांची चौकशी करण्यात आली आहे. त्या चौकशीचा अहवाल

ता.प्र.क्र ११९७८...

श्री.दादाजी भुसे....

मार्च महिन्यात आलेला आहे. त्या अहवालाची तपासणी करुन त्यामध्ये कोणी दोषी लोकांना पाठीशी घालत असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. कृषी उद्योग महामंडळाकडून शेतकऱ्यांना काही साहित्य पुरविण्यात येते. शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने धनादेश देण्यात आला होता. या तीन कर्मचारी तो धनादेश खाजगी लोकांनी दिला असे दाखवून त्यांच्याकडून रोखीने पैसे घेतले व या धनादेशाच्या अगेन्स त्यांना साहित्याचा पुरवठा केला होता. १ कोटी २० लक्ष रुपयांचा यामध्ये अपहार झालेला आहे. त्यापैकी काही रक्कम वसूल करण्यात आली आहे. त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये वरिष्ठ कार्यालये आहेत, नाशिक, मुंबई या कार्यालयाची जबाबदारी होती की, दरवर्षी त्याचे ऑडीट करायला पाहिजे होते. सन २०१२-२०१७ या पाच वर्षात जे प्रकार सुरु होते ते दरवर्षी केलेल्या ऑडीटमध्ये समोर आले असते तर पुढील घटना झाल्या नसता. आता संपूर्ण महाराष्ट्र पातळीवर टॅली प्रणालीचा वापर करुन दरवर्षी ऑडिट करण्यात येते.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, अधिवेशनात प्रश्नाच्या माध्यमातून उत्तर येणे अपेक्षित असते. यासंदर्भातील अहवाल ७ मार्चला प्राप्त झाला असून आता दोन आठवडे झाले आहेत. अधिवेशन आहे त्यासंदर्भातील प्रश्न विचारण्यात आले आहेत त्यामुळे सभागृहात ठाम उत्तर दिले पाहिजे. चौकशी अहवाल येऊन मंत्री महोदयांनी माहिती घेतली आहे. त्यानुसार काय कारवाई करण्यात येईल ते सांगितले पाहिजे. नाही तर पुन्हा पुढील अधिवेशन येईल त्यामध्ये हा प्रश्न विचारण्यात येईल. त्यामुळे मंत्री महोदयांनी अहवालाच्या अनुषंगाने उत्तर द्यावे.

श्री.दादाजी भुसे : सभापती महोदय, १५ दिवसाच्या आत आयुक्त कृषी यांच्या स्तरावरुन अहवालाची छाननी केली जाईल. दोषी असणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई केली जाईल. काही कर्मचारी अधिकारी सेवानिवृत्त झाले आहेत. कदाचित वेळेवर कारवाई सुरु झाली असती तर सेवानिवृत्तीपूर्वी त्यांच्यावर कारवाई करता आली असती. यांना काही अधिकारी पाठीशी घालत असतील तर त्यांच्यावर देखील कारवाई केली जाईल. त्यांना सहआरोपी करण्यात येईल आवश्यकता पडल्यास फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील. यामध्ये असे दिसून येते की, काही कर्मचाऱ्यांना या पाच वर्षात १५ दिवसाची ड्यूटी होती. दोषी असणाऱ्या व्यक्तींवर

असुधारित प्रत

ता.प्र.क्र ११९७८...

श्री.दादाजी भुसे.....

कठोर कारवाई करीत असताना निरपराधांचा बळी जाऊ नये याची काळजी घेण्यात येईल.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील असे उत्तर दिले आहे. सरकारी निधीचा एक कोटी रुपयांवर भ्रष्टाचार झालेला आहे. त्या निधीची वसुली कशी करण्यात येणार आहे. जे सेवानिवृत्त झाले व कामावरुन बडतर्फे झाले त्यांचे पेन्शन थांबवून त्या रकमेतून वसुली करण्यात येईल काय ?

श्री.दादाजी भुसे : सभापती महोदय, १ कोटी २० लक्ष रुपयापैकी १५ लक्ष ३० हजार रुपये बडतर्फे लिपिकाकडून वसूल करण्यात आले आहेत. जे जबाबदार अधिकारी कर्मचारी आहेत त्यांचे उपदान व रजा रोखीकरणाची रक्कम विभागाकडे जमा आहे. याबाबत दोन कर्मचारी उच्च न्यायालयात गेले आहेत. विभागाच्या वतीने न्यायालयात प्रभावी बाजू मांडून माननीय न्यायालयाच्या निदर्शनास या बाबी आणून देण्यात येतील व जी स्थगित मिळविली आहे ती उठविण्यात येईल. अपहाराची रक्कम वसूल करण्यात येईल.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदय, अनेक पुरवठादारांनी या महामंडळाच्या विरोधात न्यायालयात केसेस दाखल केलेल्या आहेत काय ? शासनाच्या कृषी विभागाकडून कृषी अवजारांचे जे पेमेंट करायचे आहे ते वळते केल्यानंतर कृषी उद्योग महामंडळाकडून ते पेमेंट लोकांना देण्यासाठी किती कालावधी लागतो. एमसीटीने या महामंडळास लिक्वीडेशनसाठी नोटीस दिली होती काय ?

श्री.दादाजी भुसे : सभापती महोदय, हा प्रश्न वेगळा आहे, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेली बाब तपासून घेण्यात येईल व त्याची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

या नंतर श्री.बोरले....

अस्सुधारित प्रत

## राज्यातील महसूल अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचे बनावट आदेश निर्गमित केल्याबाबत

**(२) * १२७०८ श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महसूल अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचे बनावट आदेश दिनांक ६ जानेवारी, २०२२ रोजी निर्गमित करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बनावट आदेशान्वये मा.महसूल मंत्री यांच्या खाजगी सचिवांसह अन्य पाच ते सहा अधिकाऱ्यांना भारतीय प्रशासकीय सेवेत समायोजित करुन पदोन्नती व पदस्थापना देण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले आहे, तदनुषंगाने याप्रकरणी महसूल विभागाने पोलिसात गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) अपर जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांना भारतीय प्रशासकीय सेवेत पदोन्नती देऊन त्यांना अन्य पदावर पदस्थापना देण्याबाबत नमूद करुन बोगस आदेश निर्गमित करण्यात आले असल्याची बाब दिनांक ०७/०१/२०२२ रोजी या विभागाच्या निदर्शनास आणण्यात आली होती. तथापि, सदर आदेश हे पूर्णपणे बोगस व खोट्या स्वाक्षरीने काढण्यात आले असून अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही महसूल व वन विभागाकडून झालेली नाही. सदर बाब सामान्य प्रशासन विभाग व शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२७०८.......

श्री.बाळासाहेब थोरात......

अशा प्रकारचे खोटे शासन आदेश निर्गमित झाल्यामुळे शासनाची प्रतिमा मलिन होत असल्याने व या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याच्या अनुषंगाने मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा क्रमांक २/२०२२, भा.दं.वि. कलम ४२०, ४६४, ४६५, ४६६ व ४६७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत गुन्हयामध्ये एका आरोपीस अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, राज्यातील महसूल अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचे बनावट आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत, ही अत्यंत गंभीर बाब आहे. आयएएस कॅडरमध्ये पदोन्नतीसाठी महसूल अधिकाऱ्यांना ८५ टक्के व इतर विभागांना १५ टक्के सरळसेवेत कोटा आहे. महसूल अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचे हुबेहुब बोगस शासकीय आदेश निर्गमित करणे आणि त्याचा प्रसार करणे यामुळे शासनाची प्रतिमा मलीन झालेली आहे. महसूल विभागातील जे वरिष्ठ अधिकारी झारीतील शुक्राचार्य आहेत ते महत्वाचे आहेत. कारण क्लेरिकलच्या माणसाला वाटले म्हणून तो असे करु शकत नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मदतीशिवाय हे शक्य नाही. म्हणून असे अधिकारी कोण आहेत आणि त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, मागील काही वर्षात सामान्य प्रशासन विभागाच्या १६ (ब) कार्यासनाच्या शासन निर्णयात अनुसूचित जमाती ऐवजी अनुसूचित जातीचा गैर प्रकारे उल्लेख करुन त्या बोगस शासन निर्णयावर माननीय उच्च न्यायालयात रिट पिटीशन देखील दाखल करण्यात आली होती. शासन असे प्रकार पुन्हा घडू नये यासाठी स्वतंत्र कायदा, नियमावली तयार करणार आहे काय आणि संबंधित दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.बाळासोब थोरात : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एकूण तीन प्रश्न विचारलेले आहेत. त्यांनी विचारलेला तिसरा प्रश्न तारांकित प्रश्नाच्या स्कोपच्या बाहेरचा आहे. मी त्या संदर्भात माहिती घेतलेली नाही. मी सांगू इच्छितो

ता.प्र.क्र.१२७०८.......

श्री.बाळासाहेब थोरात......

की, आयएएस केडरमध्ये एकूण ४१५ जागा आहेत. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रश्न विचारल्यामुळे मी या संदर्भात माहिती देत आहे. त्यापैकी ७० टक्के जागा सरळसेवेने भरल्या जातात. त्यामध्ये एकूण २८९ पदे आहेत. तहसीलदार व उप जिल्हाधिकारी संवर्गातून पदोन्नतीने २६ टक्के पदे भरली जातात आणि ती १०८ पदे आहेत. हा महसूल विभागाचा विषय आहे. राज्य स्तरीय इतर संवर्गातून प्रशासकीय सेवेत प्रवेशासाठी ४ टक्के म्हणजे एकूण १८ जागा आहेत. अशा प्रकारे ४१५ जागांची विगतवारी आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे ६ जानेवारी रोजी व्हॉट्ॲपवर पदोन्नतीच्या नेमणुकीच्या ठिकाणासह यादी प्रसारीत झाली. सदर बाब ६ जानेवारी रोजी निदर्शनास आल्यानंतर ७ जानेवारी रोजी मरिन ड्राईव्ह पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला. पोलिसांनी तपास करुन श्री.संदेश चव्हाण यांना अटक केली. तसेच, श्री.उमेश सौदे हा त्याचा साथीदार आहे. तो सेवेत नसताना त्याने अतिरिक्त आयुक्त ठाणे असे नाव नमूद करुन फोटो आयडी देखील तयार केली. लाल दिव्याच्या शेजारी उभे राहून गाडी काढणे, नोकरी देतो, बदली करतो अशा प्रकारे तो लोकांची फसवणूक करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याला अटक करण्यात आली असून तो सध्या तुरुंगात आहे. यापूर्वी दोन घटना आढळून आलेल्या आहेत. सन २०१८ मध्ये भरारी पथकाचा सदस्य म्हणून एसएससी बोर्डाच्या परीक्षेच्या वेळी तो शाळांची तपासणी करण्यासाठी गेला होता. सन २०२० मध्ये त्याने नाशिक मधील अंबड येथे पोलीस असल्याचे सांगून काही लोकांची फसवणूक केली होती. हॅबिच्युअल, विकृत असे त्याचे व्यक्तिमत्व आहे. आणखी काही गोष्टी उघडकीस येतील. पोलीस त्या संदर्भात तपास करीत आहेत. त्याला कडक शिक्षा होईल याची काळजी घेण्यात येत आहे.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, अशा प्रकारे ज्यांना नोकरी किंवा पदोन्नती मिळालेली आहे त्याला स्थगिती देण्यात आलेली आहे काय ?

ता.प्र.क्र.१२७०८.......

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, तो आदेश बनावट होता. त्यामुळे स्थगिती देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्याने संगणकाच्या सहाय्याने बदल करुन स्वत:चे व इतरांचे नाव समाविष्ट केले होते. तो आदेश बनावट होता. तो आदेश चुकीचा असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

ॲड.निलय नाईक : सभापती महोदय, मी या निमित्ताने मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, आयएएस संवर्गात जी पदोन्नती होते ती महसूल विभागाव्यतिरिक्त इतर विभागातून म्हणजे सेल्स टॅक्स, वित्त विभागातून जी पदोन्नती होते त्यावेळी महसूल विभागासाठी जास्त प्राधान्य दिले जाते. शासन याबाबत इक्वल टर्मस ठेवणार आहे काय आणि असल्यास त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाने अभ्यासाअंती हे निर्णय घेतलेले आहेत.

----------

असुधारित प्रत

**अंबरनाथ, बदलापूर आणि उल्हासनगर शहरांमध्ये अंमली पदार्थाची विक्री आणि सेवन होत असल्याबाबत**

**(३) * १२४२२ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील आनंदनगर एमआयडीसी परिसरात एमडी पावडर या अंमली पदार्थाची विक्री करण्यासाठी आलेल्या एका आरोपीला अंमली पदार्थ विरोधी विशेष पथकाने सापळा रचून अटक केल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिसांनी आरोपीकडून एक लाख २० हजार रुपये किंमतीची १० ग्रॅम एमडी पावडर जप्त केली असून अंबरनाथ, बदलापूर भागात गेल्या काही दिवसांतील अंमली पदार्थांवरील कारवाई पाहता, या भागात अंमली पदार्थांचा मोठ्या प्रमाणावर पुरवठा होत असल्याचे निदर्शनास येत असून, स्थानिक तरुण अंमली पदार्थांकरीता नायजेरियन पेडलरच्या जाळ्यात अडकत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने परिमंडळ चार अंतर्गत येणाऱ्या अंबरनाथ, बदलापूर आणि उल्हासनगर शहरातील पोलीस स्टेशनच्या हद्दीत अंमली पदार्थाची विक्री आणि सेवन रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभुराज देसाई, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) ठाणे पोलीस आयुक्तालयांतर्गत परिमंडळ-४, उल्हासनगरमधील शिवाजीनगर पोलीस स्टेशन हद्दीत आनंदनगर एम.आय.डी.सी. परिसरात दिनांक २९/११/२०२१ रोजी एका इसमाकडून १० ग्रॅम वजनाच्या रुपये ५०,०००/- किंमतीच्या एम.डी.(मेफेड्रॉन) या अंमली पदार्थासह एकूण रुपये १,२०,२६०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपिताविरूध्द

ता.प्र.क्र.१२४२२.......

श्री.शंभुराज देसाई......

गु.र.क्र.३७१/२०२१ एन.डी.पी.एस. कायदा, १९८५ च्या कलम ८(क), २२(ब) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर आरोपितास अटक करण्यात आली असून त्याच्याविरूध्द दिनांक २८/०१/२०२२ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले असून सदर गुन्हा मा.न्यायालयात प्रलंबित आहे. स्थानिक तरूण नायजेरीयन पेडलरच्या जाळयात अडकत असल्याचे अद्याप आढळून आलेले नाही.

अंबरनाथ, बदलापूर व उल्हासनगर शहरातील पोलीस स्टेशनच्या हद्दीत नियमितपणे लावण्यात येत असलेल्या पेट्रोलिंगदरम्यान तसेच गुप्त बातमीदारांमार्फत अंमली पदार्थांचे सेवन व विक्री होत असल्याबाबत माहिती मिळवून तसेच छापे घालून संबंधितांवर कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.रवींद्र फाटक : सभापती महोदय, अंबरनाथ, बदलापूर, उल्हासनगर एकंदरीतच ठाणे जिल्ह्यात नायजेरीयन व्यक्तींचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढलेला आहे. हे लोक शिक्षण किंवा टुरिस्ट व्हिजा काढून येथे येतात आणि गरजू, गरीब लोकांना पैशांचे आमिष दाखवून जाळयात अडकवितात. तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात स्थानिक तरुण नायजेरीयन पेडलरच्या जाळयात अडकत असल्याचे अद्याप आढळून आलेले आहे असे नमूद केले आहे. अंबरनाथ येथे ज्या व्यक्तीला अटक करण्यात आली त्याने नवी मुंबई येथील स्वामी नावाच्या नायजेरीयन व्यक्तीकडून ड्रग्ज विक्री करण्यासाठी आणल्याचे पोलीस तपासात सांगितले हे खरे आहे काय ? अंबरनाथ, बदलापूर, उल्हासनगर येथे नियमित पोलीस पेट्रोलिंग दरम्यान अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या लोकांवर कारवाई करण्यात आलेली आहे काय ? अंबरनाथ, बदलापूर, उल्हासनगर येथे किती नायजेरीयन व्यक्ती राहतात याबाबतची

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४२२.......

श्री.रवींद्र फाटक........

माहिती संबंधित पोलीस स्टेशनकडे आहे काय, असल्यास ती माहिती सभागृहाला मिळू शकेल काय ?

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रवींद्र पाटक यांनी स्थानिक तरुण नायजेरीयन पेडलरच्या जाळयात अडकत असल्याचे अद्याप आढळून आलेले आहे असे लेखी उत्तरात नमूद केल्याचे म्हटले आहे. परंतु लेखी उत्तरात स्थानिक तरुण नायजेरीयन पेडलरच्या जाळयात अडकत असल्याचे अद्याप आढळून आलेले नाही असे नमूद केलेले आहे. पहिला गुन्हा दिनांक २९.११.२०२१ रोजी दाखल झालेला आहे. त्यावेळी १० ग्रॅम मेफेड्रॉन व इतर साहित्य असा एकूण १ लाख २० हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आलेला आहे. या प्रकरणातील नायजेरीयन व्यक्तीवर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली होती. या प्रकरणी न्यायालयात चार्जशिट सुद्धा दाखल झालेली आहे. दुसऱ्या गुन्ह्यात दिनांक २९.१०.२०२१ रोजी ८ ग्रॅम मेफेड्रॉन आढळून आले होते आणि त्यामध्ये ३ आरोपींचा समावेश आहे. त्यांना अटक करुन त्यांच्यावर कारवाई करुन न्यायालयात आरोपपत्र दाखल केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.रवींद्र फाटक यांनी स्थानिक मुले अंमली पदार्थाच्या आहारी जातात व ड्रग्जमध्ये नायजेरीयन तरुणांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग असल्याचे म्हटले आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मी सांगितले होते की, जॉईंट सीसी यांना सूचना देऊन सर्व उपनगरांमध्ये या संदर्भात ड्राईव्ह घेण्याबाबत सूचना देण्यात येतील. हे अधिवेशन संपण्यापूर्वी मी या संदर्भात उच्च स्तरीय बैठक आयोजित करतो. सन्माननीय सदस्य श्री.रवींद्र फाटक यांनी शासनाने कोणती विशेष माहीम राबविली असा प्रश्न विचारलेला आहे. मी सांगू इच्छितो की, दिनांक २८.१०.२०२१ ते २०.१२.२०२१ या कालावधीत त्या विभागातील डीसीपी यांनी स्पेशल ड्राईव्ह घेऊन त्या दरम्यान ड्रग्ज माफियांच्या संदर्भात ७ केसेस दाखल केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४२२.......

श्री.शंभुराज देसाई......

सांगितल्याप्रमाणे आपण त्या विभागात ड्रेसमधील व सिव्हिल ड्रेसमधील पोलिसांचे पेट्रोलिंग वाढविलेले आहे. मी यापूर्वी सांगितल्याप्रमाणे शाळा, कॉलेजच्या परिसरातील दुकानांच्या संदर्भात जॉईंट डीसीपी यांनी सिव्हिल ड्रेसमधील पोलिसांच्या माध्यमातून माहीम राबविलेली आहे.

यानंतर श्री.सांगळे.......

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४२२....

श्री.शंभुराज देसाई....

सन्माननीय सदस्य श्री.रवींद्र फाटक यांनी उल्लेख केला होता की, अशाप्रकारे घटना घडणे योग्य नाही. त्यांचे म्हणणे योग्य आहे. उपनगरांमधील ड्रग्जच्या संदर्भात मी एक उच्चस्तरीय बैठक घेतो व तेथील डीसीपींना याबाबत सूचना दिल्या जातील. एवढेच नव्हेतर ज्या पोलीस ठाण्याच्या एरियामध्ये अशाप्रकारे काही आढळून आल्यास तेथील ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना देखील सदर बैठकीत दिल्या जातील.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, हा विषय गंभीर आहे. मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात सांगितले होते की, मागील आठवडयात सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी याविषयी प्रश्न उपस्थित केला होता. त्यात ठाण्याच्या भागासंबंधी उल्लेख करण्यात आला होता. सर्व भागांमध्ये ड्रग्जच्या घटना वाढत आहेत. त्यामुळे याबाबत एखादे रॅकेट आहे अशा दृष्टीकोनातून त्याकडे बघणे गरजेचे आहे. हा ऑर्गेनाईज क्राईम असून त्यात विविध स्तरावर लोक सहभागी आहेत. अशा प्रकरणांमध्ये नायजेरीयन लोकांना पडकतो, त्यांच्यावर कारवाई केली जाते व हा विषय संपला असे आपण गृहीत धरतो. परंतु यात सविस्तरपणे कोम्बींग ऑपरेशन राबविणार आहात का ? संबंधितांवर एनसीओसी कायद्यान्वये गुन्हे दाखल केले जाणार आहेत का ? अलिबाग येथे या संदर्भातील कारखाना आहे का, असल्यास त्याबाबतची माहिती आपल्याकडे प्राप्त झाली आहे का ? असल्यास त्या संदर्भात पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी २ प्रश्न विचारलेले आहेत. पहिल्या प्रश्नासंबंधीचे उत्तर "होय" असे आहे. सदर बाबतीत स्पेशल ड्राईव्ह घेतला जाईल. त्या अनुषंगाने अधिवेशन संपण्यापूर्वी वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत एक बैठक घेतली जाईल. मी याबाबत मघाशी सांगितलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी अलिबागसंबंधी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याबाबत विभागाकडे अद्याप कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. सन्माननीय सदस्यांकडे

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४२२....

श्री.शंभुराज देसाई....

त्याबाबत काही माहिती असल्यास त्यांनी ती माहिती आमच्याकडे द्यावी. तसेच त्या परिसरात अशा प्रकारचा काही कारखाना आहे का ? याबाबत त्या परिसरातील लोकल क्राईम व गोपनीय विभाग असो, अशा सर्व यंत्रणांना सूचना दिल्या जातील.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, हा विषय अंबरनाथ परिसरामधील असला तरी मिरा भाईंदर, वसईपासून मुंबईपर्यंत मोठया प्रमाणात अंमली पदार्थाचे सेवन व विक्री केली जात आहे. मंत्री महोदयांनी या संदर्भात डीसीपींसमवेत बैठका घेणार असल्यासंबंधी सकारात्मक उत्तर दिलेले आहे. मुंबईतील कॉलेजबाहेर असलेल्या पानपटट्या तसेच काही नाके आहेत. त्या ठिकाणी सदर लोक सायकलवर येत असतात. अशा प्रकारे गुन्हा करण्याची त्यांची पद्धत ठरलेली असते. उपनगरांमधील ठाकूर व्हीलेज, अशोक वन किंवा बोरिवली पश्चिमेकडील भाग असो, त्या ठिकाणी निर्जन वस्त्या आहेत. तेथे काळोख असतो, विद्युत प्रकाश नसतो. तेथे मोठया प्रमाणात असे रॅकेट चालतात. मंत्री महोदयांनी या बाबतीत सकारात्मक उत्तर दिले आहे की, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करु. मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर चांगले आहे. परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. आपण या बाबतीत कशा प्रकारचा कार्यक्रम तयार करणार आहात ? हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. मंत्री महोदय, आपण अतिशय प्रामाणिक व धाडसी आहात. कमिशनरेट एरियाचे गृह राज्य मंत्री उत्तर देण्यासाठी सदनामध्ये नाहीत. उद्या असा विषय उपस्थित व्हावयास नको की, हा विषय कमिशनरेट एरियामधील आहे आणि सरकार म्हणून आपण सदनात उत्तर दिलेले आहे. शहरांमध्ये मोठया प्रमाणावर अंमली पदार्थाचे सेवन व विक्री होत असल्यामुळे त्यांचे सोर्स काय आहेत, ते कोठून येतात, त्यांचे अड्डे कोठे आहेत, त्यांचा साठा कोठे केला जातो ? याकरिता आपल्याला ठोस कृती कार्यक्रम घ्यावा लागेल. ही कीड मोठी आहे. त्यामुळे आपण येथे वरवर बोलून काही होणार नाही. अंमली पदार्थाच्या सेवनामुळे मोठया प्रमाणावर तरुण पिढी व्यसनाधीन होत आहे,

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४२२....

श्री.प्रवीण दरेकर....

त्याच्या आहारी जात आहे. त्यामुळे आपण यासंबंधीचा ठोस कृती कार्यक्रम कसा व कधी करणार आहात ?

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या संदर्भात अतिशय चांगल्या सूचना केलेल्या आहेत. तसेच मी ग्रामीण विभागाचा राज्यमंत्री असलो तरी आम्ही सरकार म्हणून सदनामध्ये उत्तर देत असतो. माझी या बाबतीत माननीय गृहमंत्री यांच्यासमवेत चर्चा झालेली आहे. अधिवेशन संपण्यापूर्वी मी याबाबत माझ्या विभागासमवेत बैठक घेतो त्यात पोलीस आयुक्त, सह पोलीस आयुक्तांना बोलविले जाईल. सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्याची आम्ही निश्चितपणे गंभीर दखल घेऊन तशा प्रकारे आमच्या अधिकाऱ्यांना सक्त सूचना दिल्या जातील. तसेच सदनामध्ये मी ज्याप्रमाणे सांगितलेले आहे त्याची निश्चितपणे १०० टक्के अंमलबजावणी केली जाईल.

श्री.प्रवीण दटके : सभापती महोदय, नागपूर शहर व जिल्हयामध्ये महिलांवर अत्याचार होत आहेत, आरोपी पकडले जात आहेत. त्यात मोठया प्रमाणावर अंमली पदार्थ सेवन केलेले आरोपी आहेत. त्यांची वयोमर्यादा १८ ते २५ वर्षे इतकी आहे. या बाबतीत पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक यांच्याकडे वारंवार तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. माननीय विरोधी पक्षनेते यांनी सांगितल्याप्रमाणे कॉलेजचे कट्टे, पानपट्टया, चहाच्या टपऱ्या असो, नागपूर येथील फुटा, सोनेगाव तसेच गांधी सागर तलावाच्या काठावर मोठया प्रमाणात अंमली पदार्थ विकत मिळतात. मंत्री महोदय, मुंबईच्या संदर्भात एक बैठक घेणार आहेत. मंत्री महोदयांनी त्याप्रमाणे नागपूर शहरामध्ये येऊन नागपूर जिल्हयामधील सर्व लोकप्रतिनिधींसमवेत बैठक घेतल्यास मोठया प्रमाणात आरोपी पकडण्यास मदत होईल. नागपूर येथे अशा घटनांमध्ये नायजेरीयन नव्हेतर सर्व आपलेच लोक कामे करीत आहेत. या संदर्भात १०० रुपयांना एम.डी. नावाची एक पुडी विकत मिळते. त्यात मोठया प्रमाणावर तरुण पिढी वाया जात आहे. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, सदर प्रकरणी काही कारवाई

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४२२....

श्री.प्रवीण दटके....

करणार आहात का व आपण नागपूरमध्ये नागपूर जिल्हयामधील सर्व लोकप्रतिनिधींसमवेत बैठक घेणार आहात का ?

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदय, मुंबई व उपनगरासंबंधी जे धोरण ठरविले जाईल त्याच धोरणाची अंमलबजावणी करुन सर्व महानगरांमध्ये आणि ग्रामीणच्या पोलीस अधीक्षकांना तशा सूचना दिल्या जातील.

----------

असुधारित प्रत

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांच्या तुकडेबंदीसंदर्भातील परिपत्रकामुळे जमीन खरेदी-विक्री व्यवहारात अडचणी येत असल्याबाबत**

**(४) * १२३५२ श्री.जयंत प्र.पाटील, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सदाभाऊ खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांनी दिनांक १२ जुलै, २०२१ रोजी तुकडेबंदी तुकडे जोड सुधारणा अधिनियमाच्या कलम ब ला अनुसरुन तुकडेबंदीबाबत परिपत्रक जारी करुन त्याची अंमलबजावणी करण्याबाबत राज्यातील सर्व दुय्यम निबंधकांना कळविण्यात आले असल्याचे दिनांक ४ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिपत्रकातील तरतुदीनुसार एखादया सर्वे नंबरचे क्षेत्र २ एकर असल्यास, त्यापैकी एक, दोन व तीन गुंठे जागा विकत घेण्याकरीता सदर क्षेत्राचे दस्त नोंदणी होणार नसून, त्याकरीता सदर क्षेत्राचे ले-आऊट करणे बंधनकारक करण्यात आल्यामुळे ज्या खातेदारांचे मिळकत क्षेत्र हे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा म्हणजेच २ एकर पेक्षा कमी असेल असे खातेदार आपले संपूर्ण क्षेत्र विक्री करत असतील तर अशा खातेदारांपुढे खरेदी-विक्री व्यवहाराच्या अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयांसह कोकण प्रदेशातील अन्य ठिकाणच्या शेतकऱ्यांच्या मिळकतीचे क्षेत्र हे प्रमाणभूत क्षेत्राच्या मर्यादेपेक्षा कमी असल्याने व ७/१२ च्या उताऱ्यात तुकडा अशी नोंद असल्याने मिळकतीच्या खरेदी-विक्री करण्यास शेतकऱ्यांपुढे अडचणी निर्माण होत असल्याचे त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्या परिपत्रकातील कायदेविषयक तांत्रिक बाबी दूर करुन त्याऐवजी सुधारित परिपत्रक निर्गमित करण्याबाबत कोकण प्रदेशातील शेतकरी व मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.महसूल मंत्री महोदयांना निवेदन सादर करुन तशी मागणी केली असल्याचेही माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२३५२....

श्री.जयंत प्र.पाटील....

(५) असल्यास, सदर मागणीनुसार सुधारित परिपत्रक निर्गमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे अथवा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ च्या तरतुदीनूसार एखादया सर्व्हे नंबरचे क्षेत्र प्रमाणभूत क्षेत्राप्रमाणे असल्यास अशा जमिनीच्या व्यवहाराची दस्त नोंदणी होऊ शकते.

तसेच एखादया सर्व्हे नंबरमधील क्षेत्र प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी असेल व अशा क्षेत्रातील एक, दोन अथवा तीन गुंठे जागा विकत घ्यायची असेल तर त्या सर्व्हे नंबरचा 'ले-आऊट' करुन त्यामध्ये एक, दोन गुंठ्यांचे तुकडे पाडून त्यास जिल्हाधिकारी किंवा सक्षम प्राधिकरणाची मंजुरी घेतल्यास, अशा मान्य 'ले-आउट' मधील एक, दोन गुंठे जमिनीच्या व्यवहाराची दस्त नोंदणी होऊ शकते.
(३) व (४) होय, हे खरे आहे.

कोकण विभागातील मिळकतीच्या दस्तांची नोंदणी करताना येणाऱ्या अडचणीसंदर्भात शासनास निवेदने प्राप्त झालेली आहेत.
(५) व (६) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्गमित केलेल्या दिनांक १२/०७/२०२१ रोजीच्या परिपत्रकाच्या संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठ येथे याचिका दाखल झालेल्या आहेत.

प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे अंतिम न्यायनिवाड्यानंतर शासनस्तरावर यथायोग्य कार्यवाही करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, पुणे जिल्हयातील गुंठेवारीसंबंधी मी सदरहू तारांकित प्रश्न विचारला आहे. पुणे जिल्हयात सिंहगडमधील काही ग्रामीण भाग पुणे महानगरपालिकेमध्ये आला आहे. माझे सहकारी श्री.राहुल पोफळे यांनी या संदर्भात अनेक वेळा पाठपुरावा केला आहे. महानगरपालिका क्षेत्रामध्ये पूर्वी करण्यात

ता.प्र.क्र.१२३५२....

श्री.जयंत प्र.पाटील....

आलेली बांधकामे आता अनधिकृत ठरविली जात आहेत. तेव्हा त्यांनी आर झोनमध्ये ती बांधकामे केली होती. तेव्हा राज्य शासनाने किंवा विभागाने त्याबाबत कोणतेही नियोजन केले नव्हते. परिणामी त्या लोकांना आता तीन पट कर भरावा लागत आहे. अशा प्रकारे अनधिकृत म्हणून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जात आहे. २५ ते ५० वर्षांपूर्वीच्या घरांना यात न्याय मिळाला पाहिजे हा मूळ उद्देश आहे. देशामध्ये रायगड व कोकणामध्ये कुळ कायद्याची सर्वप्रथम अंमलबजावणी करण्यात आली. स्वतंत्र कुळ कायदा आल्यानंतर २ एकर, ३ एकर, ५ एकर असे शेतीचे क्षेत्र होते. आता ते क्षेत्र गुठयांवर आले आहे. उदाहरण सांगायचे झाल्यास आम्ही ५ भावंडे आहोत. आमच्याकडे एक एकर शेती आहे. त्या शेतीची वाटणी झाल्यानंतर ती गुठयांमध्ये होते. परंतु आता कमीत कमी ११ गुंठे क्षेत्र असल्यास सातबारा तयार होतो. अशा प्रकारचा शासनाने कायदा केला आहे. कोल्हापूर, राधा नगरी येथे मोठया प्रमाणावर शेतकऱ्यांकडे गुंठयाने शेती राहिलेली आहे. त्यामुळे त्या शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. अशा क्षेत्रांमध्ये एखाद्या शेतकऱ्याला बांधकाम करणे किंवा विहीर बांधायची असल्यास त्यांना त्याबाबत पुढे कार्यवाही करता येत नाही. अशा परिस्थितीत सदर कायद्यामध्ये बदल करुन आपण शेतकऱ्यांना न्याय देणार आहात का ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पहिल्या प्रश्नासंबंधी जो उल्लेख केला आहे त्या संदर्भात आम्ही त्यांच्याकडून लेखी निवेदन घेऊ. तसेच त्याचे नेमके स्वरुप काय आहे व त्याबाबत आपल्याला कोणती कार्यवाही करता येईल, ही बाब तपासून घेऊ. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला प्रश्न हा फक्त कोकणापुरता मर्यादित नसून तो संपूर्ण महाराष्ट्रामधील आहे. अलीकडच्या काळात या संदर्भात सातत्याने चर्चा होत असते. महसूल विभागाने दिनांक १२ जुलै रोजी एक परिपत्रक काढल्यानंतर त्याबाबत जास्त चर्चा झाली. काही मुद्यांच्या

ता.प्र.क्र.१२३५२....

श्री.बाळासाहेब थोरात....

बाबतीत सन्माननीय सदस्य व जनतेमधील गैरसमज दूर व्हावेत तसेच काही प्रश्न असल्यास ते कशा प्रकारे सोडविता येतील याचा विचार व्हावा याकरिता मी काही मुद्दे स्पष्टपणे सदनासमोर मांडत आहे. महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ हा त्यातील मूळ कायदा आहे. तुकडे जोड व तुकडे बंदी कायदा अशी या कायद्याची ओळख आहे. शेती व्यवहार्य व्हावी व प्रमाणापेक्षा कमी क्षेत्राचे तुकडे होऊ नयेत हा उद्देश समोर ठेवून शासनाने त्यावेळी निर्णय घेतला होता. त्यानुसार कलम ४ नुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा समिती काही गोष्टी निश्चित करीत असते. तसेच महाराष्ट्रामध्ये जे क्षेत्र आहे त्यात सरासरी २ एकर जिरायत क्षेत्र आणि २० गुंठे बागायती क्षेत्र आहे. यात जिल्हाधिकारी व त्यांची समिती त्या जिल्हयाकरिता क्षेत्र निश्चित करीत असते.

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत

ता. प्र.क्र. १२३५२.....

श्री.बाळासाहेब थोरात .....

तसेच तालुक्याकरीतासुध्दा वेगळे आहे. त्यामुळे त्यामध्ये थोडे व्हेरीएशन आहे. सरासरी दोन एकर जिरायत निकष महाराष्ट्राकरीता आहे. कोकणात २० गुंठे जिरायत व ५-१० गुंठे बागायत असे त्याचे साधारणत: स्वरुप आहे.

सभापती महोदय, १९४७ च्या कायद्यानंतर १९६५ मध्ये काही सुधारणा होऊन मधल्या काळात तुकडयांचे हस्तांतरण झाले असेल ते नियमित करण्यात आले होते. यानंतर २०१६ मध्ये काही निर्णय करण्यात आले व महाराष्ट्र अधिनियम २०१६ प्रमाणे कलम ८ नंतर कलम ८ ब समाविष्ट करण्यात आले. कलम ८ ब समाविष्ट करणे महत्वाचा विषय आहे. त्यात आपल्याकडील लहान मोठी सर्व शहरे व त्याभोवती होत असलेल्या बेशिस्त वाढीला कशा प्रकारे कंट्रोल करता येईल, शिस्त कशी आणता येईल हा उद्देश आहे. आपणा सर्वांना अनुभव आहे की, तालुक्याच्या गावाशेजारी बेशीस्त वाढ होताना दिसत आहे, गुंठेवारी वाढलेली दिसते. एकाच्या रस्त्यामध्ये दुसरा घर बांधताना दिसतो, रस्ते, पाणी व गटाराची व्यवस्था करण्यामध्ये अडचणी येतात. ही वस्तुस्थिती आपणा सर्वांना मान्य करावी लागते. म्हणून दोन्ही सभागृहाने कायद्यातील दुरुस्ती मान्य केली व ८ ब चा समावेश केला. त्यामुळे महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती, रिजनल प्लॅनिंग, एमएमआरडीए, पीएमआरडीए सारखे विशेष नियोजन प्राधिकरण या सर्व ठिकाणी जेथे एखादा व्यवहार करायचा असेल त्यामध्ये जिल्हाधिकारी किंवा नियोजन प्राधिकरण यांची मान्यता घेऊन त्या तुकडयांची खरेदी करावी अशी तरतूद केलेली आहे. शहरे व शहराच्या भोवती काय झाले आहे हे आपण पाहत आहोत. पनवेल, नागपूर सारख्या शहराशेजारी आणखी एक नवे शहर उभे राहिले आहे पण यामध्ये कोणतेच नियोजन नाही. यामुळे सभागृहाने विचारपूर्वक निर्णय घेतला की, शहरांची वाढ शिस्तबध्द झाली पाहिजे, प्लॅनिंग चांगले असले पाहिजे म्हणून त्यात नियोजन करुन निर्णय करण्यात आला आहे. हे सर्व झाल्यावर हा निर्णय विभागाचे रजिस्ट्रार कार्यालये व सर्वांना कळविण्यात आला होता. परंतु त्यानंतर २०१६ मध्ये सुधारणा झाल्यावर

ता. प्र.क्र. १२३५२.....

श्री.बाळासाहेब थोरात .....

जनहित याचिका दाखल झाली. त्यात सांगितले की, दोन्ही सभागृहाने जो कायदा केला आहे त्याची खाली अंमलबजावणी होत नाही. या याचिकेत उच्च न्यायलयाने निर्णय दिला की, बदललेल्या कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. त्यावेळीसुध्दा दिनांक १२ जुलै, २०२१ रोजी हा बदल सर्वांना कळविला. यामुळे शहराभोवती चालू असलेले सर्व रजिस्ट्रेशन थांबले. ग्रामीण भागातही चुकीच्या पध्दतीने रजिस्ट्रेशन चालू होते, कोणालाही १०-१५ गुंठयाचा एखादा तुकडा विकायचा असेल तर सरळ त्यांनी प्राधिकरणाकडून मंजूरी घ्यावी व विक्री व्यवहार करावा. बंदी झालेली आहे असे नाही पण प्रोसीजर घालून दिलेली आहे. कारण शहराचे सुनियोजन झाले पाहिजे याकरीता हा बदल केलेला आहे. ही उपाययोजना आम्ही करीत आहोत. ग्रामीण भागातसुध्दा काळाच्या ओघात काही बदल झालेले आहेत. शेतकऱ्यांच्या वाटण्या झाल्या, छोटे शेतकरी तयार झाले, जिल्हाधिकाऱ्यांची एक समिती आहे, याप्रमाणे आम्ही सर्व जिल्हयांना कळविले आहे की, त्यांनी त्यांच्या जिल्हयात कोणते बदल करायचे आहेत. तो अधिकार जिल्हाधिकारी यांच्याकडील समितीचा आहे. तालुका पातळीपर्यत ते बदल करु शकतात. आम्ही त्यांना विचारले आहे की, तुम्हाला काय बदल अपेक्षीत आहेत. पूर्वी २ एकर व २० गुंठे बागायत असे होते, साधारणपणे जे प्रस्ताव आमच्याकडे सध्या येत आहे. बाकीच्या महाराष्ट्रात जिरायतमध्ये २० गुंठे आहे. पाच भाऊ व एक एकर शेती असे कोणाला पटणार नाही. साधारणपणे जिल्हाधिकारी यांचेकडून २० गुंठे व १० गुंठे बागायत असे प्रस्ताव येत आहेत. मात्र नागरी भागाकरीता केलेला बदल कायम ठेवावा या मताचे आम्ही आहोत. त्यामध्ये दोन प्रश्न निर्माण होत आहेत, नागरी भागात बिगरशेती करणे, आमचा विभाग योजना आणणार आहे. बिगरशेती करण्याकरीता महसूल कार्यालयात जावे लागते, पण जे एन.ए. पोटेंशिएल आहे त्यांना आम्ही पत्र देणार आहोत की, अमुक पैसे भरले की, तुम्हाला एनए ची सनद देण्यास आम्ही तयार आहोत. एवढे सोपे करण्याचा आमचा प्रयत्न सुरु आहे, साधारणपणे

असुधारित प्रत

ता. प्र.क्र. १२३५२.....

श्री.बाळासाहेब थोरात .....

कसे होऊ शकते याकरीता नाशिकमध्ये त्याचा प्रयोग आम्ही करीत आहोत. महाराष्ट्रात हे लागू करण्यासाठी आम्ही निर्णय घेत आहोत.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, तुकडाबंदीमुळे महाराष्ट्रात मोठा गोंधळ आहे, यामुळे लोकांना मोठया प्रमाणावर अडचणी निर्माण झालेल्या आहेत. आपण शहरापुरता नियम केला आहे, एकत्रिकरण केल्यामुळे किती गोंधळ झाला आहे हे मंत्री महोदयांनाही माहिती आहे. ग्रामीण भाग व शहरी भाग याचे विभाजन करणे गरजेचे होते, तुम्ही सरसकट एक नियम केला. तुकडाबंदीमध्ये शहरे वाढत आहेत त्याला टाऊन प्लॅनिंग जबाबदार आहे. आराखडा मंजूर करताना टाऊन प्लॅनिंगने रस्ते वगैरे बाबी करायला पाहिजेत. पण काहीही न बघता प्रस्ताव आला की, चिरीमिरी घेऊन प्रस्ताव मंजूर करुन टाकतात. रस्त्याच्या मध्येही घरे येतात. महानगरपालिका, नगरपालिका व टाऊन प्लॅनिंग यांची प्रमुख जबाबदारी याबाबत आहे. त्यांनी उचित आराखडा केल्याशिवाय त्यांना तुकडाबंदी मंजूरी देण्यात येऊ नये. ज्यांना आवश्यक आहे त्यांना नियम केला व तुकडाबंदी केली असेल तर चुकीचे आहे. प्रत्येक विभागावर जबाबदारी देऊन तुकडाबंदीचे बंधन दुरुस्त करणार आहात का. ग्रामीण भागात तुम्ही सरसकट द्यावे, शहरी भागातील एकही प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयातून मंजूर होत नाही, ते सांगतात की, तुकडाबंदीमुळे निर्णय घेता येत नाही. याकरीता सक्त आदेश पारीत करुन निर्णय घेणार आहात का ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, एकत्रिकरणामुळे गोंधळ झाला आहे. या १९७५ च्या कायद्यान्वये महाराष्ट्रात तुकडेबंदीचा कार्यक्रम मोठया प्रमाणावर राबविला आहे. त्यात काही गोष्टी घडल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे. बऱ्याचदा दुसऱ्याच्या नावावरील जमीन कसली जाते, कारण उचित बदल झालेले नाही. म्हणून ते एकत्रिकरणाकरीता सामाजिक सलोखा योजनेचा प्रस्ताव आणणार आहोत. नावावर जमीन करण्यामधील गुंता दूर करण्याकरीता ही योजना आणत आहोत, यामुळे जमिनीचा ताबा कोणाकडे असावा यातील गोंधळ दूर होईल.

ता. प्र.क्र. १२३५२.....

श्री.बाळासाहेब थोरात .....

सभापती महोदय, टाऊन प्लॅनिंगबाबत सांगू इच्छितो की, टाऊन प्लॅनिंगच्या मान्यतेशिवाय ग्रामपंचायतीच्या एनओसीवर शहराभोवती होणारी वाढ व बांधकामे झालेली आहेत. कोणताही एफएसआय दिलेला नाही, पण प्रचंड बांधकामे झालेली आहेत. या सर्व गोष्टींमध्ये शिस्त आणण्याकरीता आपण हा निर्णय घेत आहोत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, जिल्हाधिकारी कार्यालय याकरीता मान्यता देत नाही पण आता तशा प्रकारची यंत्रणा आम्हाला निर्माण करावी लागेल. आलेला प्रस्ताव तातडीने तपासून व त्रुटी दूर करुन त्यास मान्यता देण्याबाबत आम्ही निर्णय घेऊ, याला गतिमान करण्याचा आमचा प्रयत्न राहील.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. १२३५२............

श्री.सदाभाऊ खोत : सभापती महोदय, तुकडाबंदीचा कायदा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुळावर उठलेला कायदा आहे. मुळात दोन एकराच्या आतील जमिनीच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार करणारे शेतकरी छोटे असतात. समजा माझी एकूण जमीन २० गुंठे आहे, मला मुलीच्या लग्नाकरिता केवळ दोन गुंठेच विकायचे आहे. मी दोन गुंठयांकरिता २० गुंठयांचा ले-आऊट कसा करणार, त्याकरिता मला परवानगी मिळणार का ? तेवढयाकरिता मी सर्व कागद गोळा करायचे का ? याकरिता आमचे मत असे आहे की, शहरामध्ये नागरीकरण वाढत आहे, तेथे शासनाने तुकडा बंदीचा कायदा लागू ठेवावा. परंतु ग्रामीण भागामध्ये छोटे छोटे शेतकरी जे आहेत, त्यांना अचानक अडचण येते, त्यावेळी जर त्याला घर किंवा इतर कारणाकरिता दोन गुंठे जमीन विकायची असेल तर कशी परवानगी दिली जाईल, त्याला याकरिता परवानगी शासन देणार का ? हा महत्त्वाचा मुद्दा आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसमोर या मोठया अडचणी निर्माण झालेल्या आहेत. प्रांत अधिकारी, कलेक्टर याकरिता परवानगी देत नाहीत. ते असे म्हणतात की, तुम्हाला दोन-तीन गुंठे जमीन विकता येणार नाही. मला वाटते की, सन्माननीय मंत्री महोदय उत्तर देतांना गोल-गोल उत्तर देत आहेत. गाव पातळीवर शेतकऱ्यांसमोर अनेक अडचणी मोठया प्रमाणात आहेत. या अडचणी शासनापर्यंत आल्याही असतील. याबाबत एन.ए. करणे एवढे सोपे नाहीच आहे. हे सर्व होऊच शकत नाही. माझी २० गुंठे जमीन असेल आणि त्यापैकी मला २ गुंठेच जमीन विकायची असेल तर त्याकरिता मी सर्व ले-आऊट करायचा काय ? याबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, असे छोटे तुकडे पडू नये, याकरिता तर सर्वांच्या हिताच्या दृष्टीने हा निर्णय शासनाने घेतलेला आहे. यात गोल-गोल उत्तराचा प्रश्नच नाही. जे आहे ते, मी ठोसपणाने बोलत आहे. याबाबत जमिनीचे छोटे-छोटे तुकडे होऊ नये, याकरिता ही काळजी घेतली जात आहे. ...अडथळा...

श्री.सदाभाऊ खोत : सभापती महोदय, माझी हरकत आहे.

असुधारित

ता.प्र.क्र. १२३५२............

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत प्रश्नाच्या उत्तराला हरकत घेता येत नाही.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मुलीच्या लग्नाकरिता दोन गुंठे जमीन विकण्या ऐवजी अगदी साधे लग्न करावे. शेतकरी बांधवाला मी विनंती करेल की, लग्न साध्या पध्दतीने करावे, त्याकिता दोन गुंठे जमीन विकू नये.

श्री.सदाभाऊ खोत : सभापती महोदय, जमिनींचे छोटे-छोटे तुकडे होऊ नयेत, याकरिता शासनाने हा कायदा केलेला आहे. परंतु शेतकऱ्याची गरज कशी भागणार ? ती जमीन जर शेतकऱ्याला विकण्याकरिता परवानगी मिळाली नाही तर त्याची गरज तो कशातून भागविणार आहे, त्याला शासन मदत करणार आहे का ? हे महत्त्वाचे आहे.

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदय, काल एका वृत्तवाहिनीवर पुणे मुद्रांक शुल्काचा घोटाळा बाहेर काढण्यात आला होता. या स्टिंग ऑपरेशनमध्ये पुणे जिल्हयातील गावठाणातील जो विषय सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी मांडलेला आहे. गावठाणातील काही भाग आता शहरात आलेला आहे. त्या शहरात आलेल्या भागाच्या खोटया ओ.सी.तयार करुन मुद्रांक शुल्क भरले गेलेले आहेत. त्याची किंमत कमी दाखविलेली आहे. हा घोटाळा फार मोठा आहे. जवळ जवळ शंभर प्रॉपर्टीजचा हा घोटाळा आहे. माझी आज रोजी या प्रश्नाच्या माध्यमातून माननीय मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, यामध्ये सरकारचे करोडो रुपयांचे नुकसान झालेले आहे. हे रॅकेट चालविणारे पुण्याचे लोक आहेत. यासंदर्भात शासन तातडीने कारवाई करणार आहे का ? या घोटाळयावर शासन चौकशी बसविणार आहे का ? शासन सांगत आहे की, एन.ए.करिता सिस्टम आणण्याकरिता नाशिकमध्ये मॉडेल चालू आहे. दोन गुंठयाच्या जमिनीकरिता अधिकाऱ्यांकडे जाण्यास सांगितले जाते. महसूल विभागातील अधिकारी किती कोणाला दाद देतात, हे संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. एन.ए.सिस्टम जी शासन आणणार आहे, ती दोन ते पाच गुंठयांकरिता शासन आणणार आहे का ?

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. १२३५२............

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी वृत्तवाहिनीवरील घोटाळा रॅकेटबाबत जे उपस्थित केलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक असे काही म्हटलेले आहे. रेकॉर्डवर तर याबाबत काहीही आलेले नाही. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून अधिक माहिती घेऊन याची चौकशी निश्चितपणे करण्यात येईल. याबाबत जे कोणी चुकले असतील, त्यांना देखील निश्चितपणे शिक्षा करण्यात येईल.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, शासनाने सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांनी मांडलेला विषय गांभीर्याने घ्यावा. छोटया शेतकऱ्याच्या मुलांनी थाटामाटात लग्न करु नये, हा विषय जरी वेगळा असला तरीही इतर बाबतीत बोलायचे झाले तर छोटया शेतकऱ्यांकडे कोणत्याही इतर कारणांकरिता देखील आर्थिक अडचण असू शकते. एखादी अडचण आल्यानंतर आयत्या वेळी.....अडथळा... सन्माननीय सदस्यांचा प्रश्न असा आहे की, छोटया तुकडयाकरिता संपूर्ण ले-आऊटची आवश्यकता काय आहे ? मोठी शहरे वगळता तशा प्रकारचा निर्णय शासन घेणार आहे का ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, याबाबत अनेक सूचना आलेल्या आहेत. शासनाकडे जिल्हयांजिल्हयातून शिफारशी येत आहेत. याबाबत शासनाचाही अद्याप अभ्यासच चालू आहे. आपल्या सूचनांचा यामध्ये निश्चितपणे विचार करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सकारात्मक उत्तर दिलेले आहे. परंतु मूळ प्रश्न विचारला गेलेला आहे तो पुणे जिल्हयातील ग्रामीण भागातील नवीन महापालिका क्षेत्रातील सिंहगड,धायरी गावासंदर्भातील आहे. या संदर्भात संबंधित शेतकऱ्यांची बैठक आपल्या दालनात घेण्यात येईल का ? याबाबत माझे सहकारी श्री.राहुल पोकळे यांचा देखील हा मुद्दा आहे. त्यांच्या भागातील बऱ्याच शेतकऱ्यांवर अन्याय झालेला आहे. त्याबाबत बैठक घेण्याचे माननीय मंत्रीमहोदयांनी कबूल करावे. मूळ जो प्रश्न आहे की, तो अ वर्ग नगरपालिका जशी आहे, त्याचप्रमाणे अ वर्ग आणि ब वर्ग ग्रामपंचायतीच्या बाबत देखील शासनाने

ता.प्र.क्र. १२३५२............

श्री.जयंत प्र.पाटील.....

केलेले आहे. त्याच्या बाजूने दोन-तीन कि.मी.पर्यंत हे धोरण लागू होईल, असे केले तर पुन्हा याबाबत असा प्रॉब्लेम येणार नाही. हा प्रश्न टाऊन प्लानिंग योग्य काम करत नाही, म्हणून हे प्रश्न निर्माण होतात. टाऊन प्लानिंग धोरण सक्षम करण्याचे धोरण राज्य शासन घेईल का ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे काही नाव सांगितले की, त्याबाबत अधिक माहिती करिता सन्माननीय सदस्यांकडून पत्र घेऊन कारवाईच्या सूचना करतो. आवश्यकता भासल्यास, बैठकीकरिताही देखील मला अडचण नाही.

इतरही ज्या काही सूचना आहेत, त्यांचा समावेश करुन या संदर्भातील ड्राफ्टिंग केले जात आहे. यामध्ये आपल्या सर्वांच्या सूचनाचा विचार केला जाईल.

---------------

असुधारित प्रत

## नागभीड (जि.चंद्रपूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना शेततळ्यांचे अनुदान मिळण्याबाबत

(५) * १२४५४ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.रणजित पाटील : सन्माननीय रोजगार हमी मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागभीड (जि.चंद्रपूर) तालुक्यात कृषी विभागांतर्गत सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षात ३७ शेतकऱ्यांना शेततळे मंजूर करण्यात येवून, शेततळ्यांचे काम पूर्ण होऊनही शेतकऱ्यांना अनुदान मिळाले नसल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील शेतकऱ्यांना शेततळ्याचे काम पूर्ण होऊनही अनुदान न देण्याची कारणे काय आहेत,

(३) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागभीड तालुक्यातील शेतकऱ्यांना शेततळ्यांचे अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संदिपान भुमरे : (१) हे खरे नाही.

नागभीड तालुक्यातील ३४ बोडी व ३ शेततळ्यांचे अनुदान संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.रामदास आंबटकर : सभापती महोदय, सन २०१८-२०१९, २०१९-२०२० या कालावधीतील शेत-तळयाचे जे अनुदान आहे, या बाबतीतील हा प्रश्न आहे. या १७ बोळयांना म्हणजेच शेततळयांच्या शेतकऱ्यांना अनुदान दिले गेलेले नाही. हे ३१.१.२०२२ रोजी लक्षात आलेले आहे. तोपर्यंत हे पैसे दिले गेलेले नव्हते. याकरिता शेतकऱ्यांना दोन वर्षे झुलविले गेलेले होते. अशा काळात हे जे उत्तर दिले गेलेले होते, ते पूर्णत: दिशाभूल करणारे आहे. त्यामुळे खात्यामध्ये पैसा जमा होऊनही शेतकऱ्यांपर्यंत पैसा पोहोचला नाही. हे मात्र खरे आहे. हे दिनांक ३१.१.२०२२ रोजी लक्षात आले.

अमुद्रित प्रत

ता.प्र.क्र.१२४५४....

श्री.रामदास आंबटकर.......

संबंधित अधिकाऱ्यांकडे पैसा येऊनही शेतकऱ्यांपर्यंत पैसा गेला नाही. संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई होणार का ? श्री.मारुती वार्जुरकर, पुनगाडा यांना अजूनपर्यंत पैसा मिळालेला नाही. त्यामुळे हे उत्तर दिशाभूल करणारे नाही का ?

श्री.संदिपान भुमरे : सभापती महोदय, शेततळे आणि बोडी यांना वेळेवर पैसे मिळालले आहे का? असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. जसजशी मागणी आली, तसतशी शेतकऱ्याला शेततळयाचे व बोडीचे पैसे देण्यात आलेले आहेत. श्री.मारुती काशिनाथ वार्जुरकर या शेतकऱ्याला पैसे देणे बाकी आहे, ते देखील ३१ मार्च,२०२२ रोजीच्या आत दिले जातील.

श्री.रामदास आंबटकर : सभापती महोदय, पैसे केव्हा दिले गेले ? कारण सन २०१८-२०१९, २०१९-२०२० या दोन वर्षातील पैसे आहेत. जर खात्यात पैसा आला तर हा पैसा केव्हा वितरित झाला ?

श्री.संदिपान भुमरे : सभापती महोदय, मी काय सांगितले की, सन्माननीय सदस्यांनी जे विचारलेले आहे की, पैसे कधी दिले ? जसजशी मागणी आली तसतसे पैसे देण्यात आलेले आहेत. कोणाचेही पैसे शिल्लक नाहीत. केवळ एका शेतकऱ्याचे पैसे शिल्लक आहेत, ते देखील दिनांक ३१ मार्चच्या आत दिले जातील.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, माझ्याकडे या संदर्भातील संपूर्ण रेकॉर्ड आणि बातमी आहे. दिनांक ०३जानेवारी रोजी याबाबतची बातमी वृत्तपत्रात छापून आली त्यावेळी संबंधित कृषी अधिकाऱ्याने या शेतकऱ्यांच्या पैशांचे वाटप केलेले आहे. अडीच वर्षे शेतकरी पाय झिजवत होते. सरकारकडून पैसे गेले होते. यामध्ये सरकारचा दोष नाही. संबंधित कृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांकडे याकरिता विविध प्रकारच्या कागदपत्रांची मागणी केली होती. ३३,००० ते ५४,००० हजार रुपये शेतकऱ्यांना बोडी आणि शेततळयाचे मिळणार होते.

यानंतर श्री.सोनावणे......

ता.प्र.क्र.१२४५४........

श्री. चंद्रशेखर बावनकुळे....

बातमी प्रसिध्द झाल्यावर आणि विधानपरिषदेत प्रश्न आला म्हणून पैसे वाटप झालेले आहेत. माझ्याकडे डेटा आणि डॉक्युमेंट आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी अडीच वर्षे पैसे का अडवून ठेवले आणि सन २०१८-२०१९ सन २०१९-२०२० आणि सन २०२०-२०२१ या कालावधीत महाराष्ट्रात किती शेततळी आणि किती शेतीबोड्या झालेल्या आहेत आणि त्या सर्व शेततळी आणि शेतीबोड्यांचे अनुदान शेतकऱ्यांना दिले आहे काय ?

श्री. संदीपानराव भुमरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी विचारलेली माहिती पटलावर ठेवली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांना सांगू इच्छितो की, वर्तमानपत्रात जी बातमी प्रसिध्द झालेली आहे, ती तपासून घेण्यात येईल. वर्तमानपत्रातील बातम्यांमध्ये किती तथ्य असते याची माहिती सर्वांना आहे.

**सभापती** : ठीक आहे. मी या प्रश्नाच्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदयांना मदत करीत आहे. पुढील प्रश्न हा राज्याच्या दृष्टीकोनातून अतिशय महत्वाचा आहे. माझ्या दृष्टीने नाही. त्यामुळे सदरहू प्रश्नावरील चर्चा लवकरात लवकर संपवावी, अशी माझी विनंती आहे. सन्माननीय सदस्यांचा मुळ प्रश्न असा आहे की, यापूर्वीच्या शासनाने पैसे वर्ग केले होते. परंतु पैसे वर्ग केल्यानंतर जिल्हास्तरावर ते दाबले आहेत आणि ते पैसे न दिल्यामुळे लाचलुचपतीचा प्रश्न निर्माण झालेला होता. याची माननीय मंत्री महोदयांनी सखोल तपासणी करुन ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावी, अशी माझी सूचना आहे.

श्री. संदीपानराव भुमरे : सभापती महोदय, ठीक आहे.

**सभापती** : ठीक आहे. आता पुढील प्रश्न चर्चेला घेण्यात येईल.

-----

असुधारित प्रत

## राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दूधाला किमान आधारभूत किंमत (एफआरपी) लागू करण्याबाबत

**(६) * ११८८४ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक १०३८९ ला दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दूधाला स्थिर भाव प्राप्त होण्याच्या दृष्टीने ऊसासाठी देण्यात येणाऱ्या 'एफआरपी' च्या धर्तीवर दूधासाठी 'एफआरपी' देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबत दिनांक २५ जून, २०२१ रोजीच्या बैठकीमध्ये मा.मंत्री महोदयांनी आदेश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप आणि सद्य:स्थिती काय आहे, तसेच प्रस्तावास शासनाने मान्यता दिली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दूधाला किमान आधारभूत किंमत (एफआरपी) लागू करण्याबाबतची व्यवहार्यता तपासण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) Maharashtra Regulation of Sugarcane Price (Supplied to Factories) Act, २०१३ या अधिनियमाच्या धर्तीवर राज्यातील दुधाकरीता "Maharashtra Regulation of Milk Price (Supplied to Milk Projects/ Dairies) Act, २०२१ निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावित कायद्याची व्यवहार्यता तपासण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन करण्याचे प्रस्तावित केले आहे.

(३) मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन करणेबाबतची पुढील कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

अप्रकाशित प्रत

ता.प्र.क्र. ११८८४.........

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, राज्यातील दूध उत्पादक शेतकरी दुधाचे भाव वाढवावेत म्हणून प्रयत्नशील असतात. अनेक वेळा आंदोलने केली जातात आणि त्यावेळी माननीय सभाती महोदयांची भेट घेतली जाते. आज आपण जे पिशवीमधील दूध घेतो त्याचे ८० ते ९० रुपये लिटर भाव आहेत आणि शेतकऱ्याला २३ रुपयांचा भाव मिळतो. ही तफावत शासन दूर करणार आहे की नाही आणि शेतकऱ्याला न्याय देणार आहे की नाही असा माझा प्रश्न आहे. हे महाविकास आघाडीचे सरकार शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या भूमिकेत असते. दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाला भाव देण्यासंदर्भात अर्थसंकल्पीय अधिवेशन संपण्यापूर्वी शासनाकडून धोरणात्मक निर्णय घेतला जाईल काय ?

श्री. सुनील केदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी ग्रामीण भागातील दूध उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न उपस्थित केलेला आहे.

सभापती महोदय, दुधाच्या व्यवसायात ६० टक्के बिझनेस हा प्रायव्हेट लोक, ३५ टक्के बिझनेस हा को-ऑपरेटिव्ह सेक्टर आणि शासनाचा त्या व्यवसायात नगन्य सहभाग असतो.  हा विषय डिमांड आणि सप्लायवर अवलंबून आहे. महाविकास आघाडी सरकार आल्यानंतर कोरोना महामारीच्या काळात दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी बैठक घेऊन त्यांना वाऱ्यावर सोडता कामा नये, त्यांना मदत केली पाहिजे आणि शासनाने अधिकचे दूध घेऊन भुकटी तयार करुन दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा दिला होता. मार्केटमध्ये दुधाला ३५ रुपये लिटर इतका भाव आहे. शहरात ८० ते ९० रुपये लिटर या दराने दूध विकले जाते. त्यांचा ब्रॅन्ड त्यांनी किती रुपयांना विकावा हा त्यांचा प्रश्न आहे आणि त्यामध्ये शासनाला हस्तक्षेप करता येत नाही. राज्य शासनाने शेतकऱ्यांना भाव देण्यासाठी आतापर्यंत चांगली पावले उचलली आहेत. या विषयाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. सदाभाऊ खोत यांच्यासमवेत बैठक झाली होती. जशी ऊसाला एफआरपी लागू केली त्याच धर्तीवर दूध उत्पादक शेतकऱ्यांना मदत झाली पाहिजे या दृष्टीकोनातून योग्य ती कार्यवाही सुरु झालेली आहे. मी या विषयाच्या अनुषंगाने मंत्रिमंडळात तशा प्रकारचा प्रस्ताव

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ११८८४.........

श्री. सुनील केदार....

लवकरच आणणार आहे. ऊसाला ज्या पध्दतीनुसार एफआरपीचा कायदा लागू झाला त्याच धर्तीवर दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी प्रयत्न करणार आहोत. त्यामुळे हा प्रश्न कायमस्वरुपी निकाली निघण्यास मदत होणार आहे.

श्री. सदाभाऊ खोत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी दोन वेळा बैठका घेतल्या होत्या, ही गोष्ट खरी आहे. प्रायव्हेट लोकांचा दुधाच्या व्यवसायात ६० टक्के बिझनेस आहे.

**सभापती** : अनेक आमदार हे दुष्काळी भागाचे प्रतिनिधीत्व करीत आहेत. दूध उत्पादक शेतकऱ्यांनी शासनाला तारलेले आहे ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे हा धंदा कोण करते याच्याशी आपल्याला काय करायचे आहे. दूध उत्पादक शेतकऱ्याला एफआरपीनुसार भाव द्यावा एवढाच विषय आहे.

श्री. सदाभाऊ खोत : सभापती महोदय, टंचाईच्या काळात प्रायव्हेटवाले दुधाला चांगला दर देतात. ज्यावेळी दुधाचा व्यवसाय सुरु होतो, त्यावेळी दुधाचे भाव पडतात त्यावेळी शासनाचे दरपत्रक ते मानत नाहीत. सहकारी संस्थाला शासनाचे दरपत्रक लागू आहे. हे दरपत्रक खाजगी लोकांना देखील लागू झाले पाहिजे. ऊसाला एफआरपीच्या धर्तीवर शासन दूध उत्पादकांच्या संदर्भात निर्णय घेणार होते. परंतु, त्यासाठी एक वर्षाचा कालावधी उलटून गेलेला आहे. ऊसाच्या एफआरपीच्या धर्तीवर शासन दूधासंदर्भात किती दिवसांमध्ये निर्णय घेणार आहे, याचे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे, अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. सुनील केदार : सभापती महोदय, एफआरपीसंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. सभाभाऊ खोत यांच्यासमवेत बैठक झाली होती. त्यावेळी विभागाकडून माहिती मागविली होती. आता मंत्रिमंडळाची उप समिती स्थापन केली जाणार आहे. शासनाची दूध उत्पादक शेतकऱ्याला मदत करण्याची भूमिका आहे. हे सर्व सरकारला मान्य होते. छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे. दूध उत्पादकांचा व्यवसाय जीवंत राहिला पाहिजे आणि त्या दृष्टीकोनातून शासनाकडून तसे प्रयत्न सुरु आहेत.

ता.प्र.क्र. ११८८४.........

श्री. सुनील केदार....

मी या विभागाचा मंत्री या नात्याने असे सांगू इच्छितो की, दुधावर प्रोसेसिंग करण्याच्या प्रक्रियेसाठी जास्त व्यवस्था निर्माण केली... त्यावेळी आपल्याला डिमांड आणि सप्लायचा समतोल राखता येईल आणि त्यादृष्टीकोनातून राज्य शासनाकडून कार्यवाही केली जात आहे. सन्माननीय सदस्यांसमवेत एफआरपीच्या संदर्भात बैठक झालेली आहे. ही प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात आहे. मंत्रिमंडळापुढे हा प्रस्ताव नेऊन एक उप समिती निर्माण करणार आहोत. खुली अर्थव्यवस्थेत अमुक भावाने माल घ्यावा आणि तो विकावा.....एफआरपी आल्यानंतर तसे करता येईल. दुधावर प्रक्रिया करणारे उद्योग जास्त करावे लागतील आणि त्या माध्यमातून दूध उत्पादक शेतकऱ्यांना दोन पैसे जास्तीचे आणि कायमस्वरुपी मिळतील. डिमांड ॲण्ड सप्लाय बॅलन्स राखता येईल. मी माननीय सभापती महोदयांना विनंती करतो की, मला या संदर्भात काही दिवसांचा अवधी देण्यात यावा आणि मी आपल्याला विश्वास देऊ इच्छितो की, त्या दृष्टीकोनातून राज्य शासन निश्चितपणे काम करणार आहे.

श्री. महादेव जानकर : सभापती महोदय, “Maharashtra Regulation of Milk Price (Supplied to Milk Projects/ Dairies) Act, २०२१ या संदर्भातील शासन निर्णय कधीपर्यंत निर्गमित करणार असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, उप समितीची बैठक कधीपर्यंत घेतली जाणार असा माझा दुसरा प्रश्न आहे.

श्री. सुनील केदार : सभापती महोदय, एफआरपीसंदर्भात बैठक झालेली आहे. सदरहू बैठकीस सन्माननीय सदस्य श्री. सदाभाऊ खोत उपस्थित होते. सर्व विभागांकडून अभिप्राय आलेले आहेत. उप समितीपुढे अभिप्राय नेऊन त्यासंदर्भातील चर्चा केली जाणार आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, कार्यतत्पर मंत्री म्हणून आम्ही माननीय श्री. सुनील केदार यांच्याकडे पाहतो. एफआरपीसाठी कायदा करावयाचा आहे. ऊसाला जशी एफआरपी लागू झाली असून, त्यासाठी कायदा आहे. दूधाला कायदा

ता.प्र.क्र. ११८८४.........

श्री. विक्रम काळे....

नाही. माननीय मंत्री महोदय उप समिती नेमली जाणार आहे असे म्हणत आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशन संपण्यापूर्वी माननीय मंत्री महोदयांकडून उप समिती जाहीर करतील काय ? राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराकडे लागले आहे. आतापर्यंत मला १० दूध उत्पादक शेतकऱ्यांचे फोन आलेले आहेत.

श्री. सुनील केदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांच्या भावना समजू शकतो. तसेच मी त्यांना असे सांगू इच्छितो की, ज्यावेळी राज्यात लोकडाऊन सुरु झाले होते त्यावेळी राज्य शासनाने केंद्र शासनाकडून कोणतीही मदत मिळालेली नसताना सुध्दा दूध उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी....

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

-----------

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

**पृ.शी.** : लेखी उत्तरे.

**मु.शी.** : अतारांकित प्रश्नोत्तरांची सोळावी ते विसावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे

उप सचिव (श्री.तारवी) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तरांची सोळावी, सतरावी, अठरावी, एकोणीसावी व विसावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तरांची सोळावी, सतरावी, अठरावी, एकोणीसावी व विसावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

असुधारित प्रत

**पृ.शी.** : लेखी उत्तरे.

**मु.शी.** : तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे

ॲड.यशोमती ठाकूर (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "परळी (जि.बीड) येथील शिशुगृहातील बालके गायब झाल्याबाबत" या विषयावरील श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. व श्री.अमरसिंह पंडित, माजी वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५२२७ ला दिनांक ६ एप्रिल, २०१५ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवत‌े.

**सभापती** : अधिकची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे अधिकची माहिती छापावी.)

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

डॉ.विश्वजीत कदम (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र ग्राहक संरक्षण (राज्य व जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद) नियम, २०२२ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक ग्रासंनि-२०२० / प्र.क्र.३९ / ग्रासं-२, दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

----------

श्री.संजय बनसोडे (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

(क) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे.

(ख) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे (अंकेक्षण अहवालासह).

(ग) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे.

(घ) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे.

(ङ) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा दिनांक १ एप्रिल, २०२० ते ३१ मार्च, २०२१ या कालावधीचा वार्षिक अंकेक्षण अहवाल.

(च) महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, औरंगाबाद यांचे सन २०१७-२०१८, सन २०१८-२०१९, सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल.

असुधारित प्रत

श्री.संजय बनसोडे.....

(छ) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक लेखे आणि अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल.

**सभापती** : वार्षिक लेखे व अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----------

श्री.संजय बनसोडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : नियम ९३ अन्वये सूचना.

**सभापती** : माझ्याकडे आज सोमवार, दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना व त्यावरील माझे निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे मी घोषित करतो.

(प्रेस : येथे नियम ९३ च्या सूचना व त्यावरील निर्णय जोडावेत.)

----------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीने सुरु केलेले प्राणांतिक महाउपोषण, या बाबत श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स. यांनी नियम ९३ अन्वये दिलेली सूचना

श्री.जयंत पाटील (जलसंपदा मंत्री ) : सभापती महोदय, नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी आपल्या अनुमतीने सूचना क्रमांक-९ चे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी तारांकित प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेले आश्वासन पाळले आहे. त्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार त्यांनी या विषयी बैठक घेतली. त्या बैठकीला पालकमंत्री महोदया सुद्धा उपस्थित होत्या. त्या ठिकाणी शाळेतील लहानलहान मुले उपोषणास बसले होते. मंत्री महोदयांनी घेतलेल्या बैठकीनंतर प्रकल्पग्रस्तांना देय असलेले लाभ हे नियमानुसार द्यावयाचे आहेत. त्यांच्या जास्त मागण्या नाहीत. मी एवढेच जाणून घेऊ इच्छितो की, विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीच्या मागण्यांपैकी शासनाने कोणत्या मागण्या स्वीकारल्या आणि कोणत्या मागण्या नाकारल्या, तसेच ज्या मागण्या स्वीकारल्या आहेत त्याचा लाभ प्रकल्पग्रस्तांना कधीपर्यंत देऊन त्यांना न्याय देण्यात येणार आहे ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, प्रकल्पग्रस्तांना आताच काही लाभ देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. कारण निगोशीएट करुन जे निर्णय झाले त्यानुसार महसूल व वन विभागाने स्पष्ट कळविले आहे की, जमिनीच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार झाल्यानंतर त्या जमिनीसाठी वाढीव मोबदला मिळण्याची मागणी करणे ही बाब कायद्याच्या कसोटीवर टिकणारी नाही. तडजोडीने किंवा निगोशीएशनने जमिनी घेताना प्रकल्पग्रस्तांनी कागदपत्रांवर सही करुन त्यांना देण्यात आलेला परतावा मान्य केलेला आहे. त्यामुळे त्या जमिनी आता पुन्हा खुल्या करणे शक्य नाही. प्रकल्पग्रस्तांची मागणी आहे की, २०१३ नंतर ज्यांच्या जमिनी घेतल्या त्यांना २०१३ च्या कायद्यानुसार जास्त मोबदला मिळाला आहे, परिणामी आमच्यावर अन्याय झाला अशी त्यांची भावना आहे. महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे प्रकल्प आहेत की, ज्यामध्ये २०१३ पूर्वी आणि २०१३ नंतर जमीन संपादित करण्यात आली आहे. एकाच प्रकल्पाला दोन कायदे लागू झाले आहेत अशी किती प्रकरणे आहेत, त्यांना मोबदला अदा करावयाचा झाल्यास सरकारवर किती आर्थिक बोजा पडणार आहे याचाही अभ्यास करणे आवश्यक आहे. आम्ही आयोजित केलेल्या बैठकीला संघर्ष समितीचे सदस्य, अमरावती जिल्ह्याच्या माननीय पालकमंत्री ॲड.यशोमती ठाकूर सुद्धा उपस्थित होत्या. आम्ही त्या बैठकीत संघर्ष समितीच्या सदस्यांना समजावून सांगितले की, आपण केलेली मागणी पूर्ण करणे अशक्य आहे. कदाचित

असुधारित प्रत

श्री.जयंत पाटील....

चुकून उद्या विरोधी पक्षाचे सरकार आले तरी त्या सरकारला ही मागणी पूर्ण करता येणार नाही. अशी मागणी पूर्ण केल्यास हा प्रकार एवढा वाढेल की तो नियंत्रणात येणार नाही. २०१३ पूर्वी जमीन संपादित केलेल्या लोकांना नवीन कायद्यानुसार भूसंपादन मोबदला दिला तर त्या आधारावर जवळच्या भागातील लोक सुद्धा नवीन कायद्यानुसार भूसंपादन मोबदला मागण्यास सुरुवात करतील. मी त्या बैठकीत प्रकल्पग्रस्तांना समजावून सांगितले की. या विषयात सहानुभूतीपूर्वक काही करता आले तर केले जाईल. तसेच दोन्ही कायद्याच्या मोबदल्यामध्ये जो फरक आहे त्या बाबतीत काही वेगळे करता येते काय ते बघितले जाईल. कायद्यानुसार असे करता येत नाही असे उत्तर मी अगोदरच त्यांना दिलेले आहे. परंतु तरी सुद्धा यामध्ये सहानुभूतीने काही मार्ग काढायचा असेल तर किती आर्थिक बोजा येईल, महाराष्ट्रात असे किती प्रकल्प आहेत याचा अभ्यास करण्यासाठी काही वेळ द्यावा अशी मी विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीला विनंती केली आहे. दीड-दोन महिन्याच्या कालावधीत अभ्यास केल्यानंतर या बाबतचा अंदाज येईल. हा प्रश्न केवळ अमरावती विभागापुरता मर्यादित नसून नागपूर विभाग, खानदेश विभागामध्ये सुद्धा हा प्रश्न आहे. खानदेशमध्ये अगोदरचाच भूसंपादनाचा मोबदला द्यावयाचा बाकी आहे. तेथे जवळपास १२००-१३०० कोटी रुपये देणे बाकी आहेत. खानदेश येथील तापी खोरे विकास महामंडळाच्या अखात्यारितील प्रकल्पांचे पैसे देणे बाकी आहेत. त्यांच्या नियमित वाट्याचे पैसे देखील देणे बाकी आहेत. त्या ठिकाणी १५-२० वर्षांपूर्वीचे पैसे अजून दिलेले नाहीत, अशी परिस्थिती आहे. हा गंभीर आणि व्यापक असा प्रश्न आहे. यामध्ये फार फार तर दोन-तीन प्रकल्प असतील की ज्या प्रकल्पामध्ये २०१२ पूर्वी थोडीफार जमीन संपादित केली आणि २०१३ नंतर उर्वरित जमीन संपादित केली आहे. २०१२ पूर्वी संपादित केलेल्या जमिनीला २ लाख रुपये मोबदला मिळाला आणि २०१३ नंतर संपादित केलेल्या जमिनीला १३ लाख रुपये मोबदला देण्यात आला, अशी प्रकल्पग्रस्तांच्या मनात खंत आहे. असे किती प्रकल्प आहेत याचा अभ्यास करण्यासाठी मी संघर्ष समितीकडे वेळ देण्याबाबत विनंती

असुधारित प्रत

श्री.जयंत पाटील....

केली आहे. त्यांनी त्यास होकार दर्शविला आहे. परंतु त्यांची मागणी पूर्ण करणे राज्य सरकारला शक्य होणार नाही हे मी अगोदरच त्यांना सांगितले आहे. परंतु सहानुभूती म्हणून कमी रक्कम देय असेल किंवा ती रक्कम थोडक्यात असेल तर सभागृहाला विश्वासात घेऊन यासाठी मंत्रिमंडळासमोर जाईन. या प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याची आमची पूर्ण भावना आहे, परंतु सरकारचे हात थोडेसे बांधलेले आहेत. या विषयाचे 'नाही' असे उत्तर असले तरी, या प्रकल्पग्रस्तांसाठी खूप काही करण्याची आमच्या मनात भरपूर इच्छा आहे.

सभापती महोदय, विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीने साखळी उपोषण सुरु केलेले आहे. मला वाटते सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे आणि संघर्ष समितीचे संबंध फार चांगले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे साहेबांनी माझ्या वतीने अमरावती येथे जाऊन व तेथील उपोषणकर्त्यांना एक ग्लास ज्युस पाजून त्यांचे उपोषण सोडवावे. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे हे प्रकल्पग्रस्तांचे उपोषण व्हर्च्युअली सुद्धा उपोषण सोडवू शकतात. त्यानुसार त्यांनी उपोषणकर्त्यांचे उपोषण सोडवावे, अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी नियमानुसार काय करणे शक्य आहे किंवा काय करणे शक्य नाही या बाबत स्पष्ट उत्तर दिले आहे. त्यांनी या प्रश्नातून काही तरी मार्ग काढण्याबाबत भावना व्यक्त केली आहे. मी उपोषणकर्त्यांना निश्चितपणे समजाविण्याचा प्रयत्न करेन.

----------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : मुंबई महानगरपालिकेने प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाकरिता विकासकांच्या फायद्यासाठी खर्चिक पर्यायाची निवड करणे, या बाबत श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर व इतर वि.प.स. यांनी नियम ९३ अन्वये दिलेली सूचना

श्री.प्राजक्त तनपुरे ( नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी आपल्या अनुमतीने सूचना क्रमांक-१० चे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, सदरहू नियम ९३ च्या सूचनेच्या अनुषंगाने जे लेखी निवेदन सादर करण्यात आलेले आहे त्यावरुन माझे समाधान झालेले आहे. त्यामुळे मी उपप्रश्न विचारु इच्छित नाही.

-------------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : टाळेबंदीचा फटका बसल्यामुळे महाबळेश्वर येथील नागरिकांना घरपट्टीतून सूट मिळणे, या बाबत श्री.प्रवीण दरेकर व इतर वि.प.स. यांनी नियम ९३ अन्वये दिलेली सूचना

श्री.प्राजक्त तनपुरे (नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी आपल्या अनुमतीने सूचना क्रमां-११ चे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, महाबळेश्वर येथील ९० टक्के लोक पर्यटन व्यवसायावर अवलंबून आहेत. त्या भागात स्ट्रॉबेरी व इतर फळ उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे. ज्यावेळी अवकाळी पाऊस पडला त्यावेळी मी त्या भागात दौऱ्यावर गेलो होतो. त्यावेळी तेथील नागरिकांना कोविडच्या काळात घरपट्टीतून सूट मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबत महाबळेश्वर नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना विनंती केली होती. परंतु ८ महिने उलटून सुद्धा या संदर्भातील साधा प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही.

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर ....

आता दिनांक ११.३.२०२२ ला प्रस्ताव पाठविला आहे. माझी मागणी आहे की, अधिकाऱ्यांनी अशा प्रकारची दिरंगाई का केली या संदर्भात त्यांना विचारणा करावी. त्यांना मंजूर करायचे नव्हते, प्रस्ताव पाठवायचा होता. प्रस्ताव पाठविण्याची साधी सकारात्मक मानसिकता मुख्याधिकाऱ्यांची नसेल तर ते दुर्दैवी आहे. आपण त्या संदर्भात भाष्य करावे. महाबळेश्वर येथील पर्यटन उद्योग आणि फळबागायतदार यांना घरपट्टीतून सुट देण्यासाठी जो प्रस्ताव आला आहे, त्या अनुषंगाने शासन निर्णय घेणार का ?

श्री. प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी विचारले आहे की, हा प्रस्ताव का आला नाही ? मात्र हा प्रस्ताव आला होता. ही क वर्ग नगरपालिका आहे आणि हेही खरे आहे की, बरेचसे उत्पन्न पर्यटनावर अवलंबून आहे. बरेचसे पर्यटक येतात. बोटिंग असेल किंवा इतर गोष्टी असतील, पर्यटनावर अवलंबून असलेली ही नगरपालिका असून नगरपालिकेचे उत्पन्न बऱ्यापैकी पर्यटनावर आहे. कोविडमुळे हे उत्पन्न बऱ्यापैकी थांबल्यामुळे नगरपालिकेच्या उत्पन्नावर देखील निश्चितपणे परिणाम झालेला आहे. तेथील इकानॉमिला, व्यापाऱ्यांना देखील मोठा फटका बसला आहे. तेथील १३ सदस्यांनी ही मागणी केली होती आणि त्या अनुषंगाने नगरपालिकेने ठराव देखील केला, त्या ठरावाच्या अनुषंगाने मुख्याधिकाऱ्यांनी शासनाकडे प्रस्ताव देखील पाठविला. परंतु दुर्दैवाने कायद्यातील जे काही कलम आहे, त्या अनुसार तो प्रस्ताव बरोबर नव्हता. त्यांनी व्यवस्थितपणे कायद्याच्या तरतुदीनुसार प्रस्ताव पाठविला पाहिजे होता. २/३ तृतीयांश बहुमताचा आणि कोणत्या कारणामुळे अशाप्रकारे कायद्याला धरुन तो प्रस्ताव नव्हता. त्यामुळे त्याबाबतीत आपण असे केले. पुन्हा जर प्रस्ताव आला तर मेरिटवर शासन निश्चितपणे विचार करेल.

**सभापती** : ठीक आहे.

----

## नियम ९३ अन्वयेची सूचना क्रमांक ८ बाबत

**सभापती** : सन्माननीय सदस्य ॲड निरंजन डावखरे यांची नियम ९३ अन्वयेची सूचना क्रमांक ८ आहे.

ॲड निरंजन डावखरे : सभापती महोदय, माननीय मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत.

**सभापती** : शासनाने नियम ९३ अन्वयेची सूचना लक्षात घेऊन कार्यवाही करावी.

----

असुधारित प्रत

**संसदीय अभ्यासवर्गाच्या आयोजनाबाबत**

**सभापती** : मी पुन्हा एकदा नवनिर्वाचित सन्माननीय सदस्यांसाठी निवेदन करुन घोषणा करीत आहे की, नवनिर्वाचित सन्माननीय सदस्यांसाठी लोकसभा सचिवालयातील "पार्लमेंटरी रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट फॉर डेमॉक्रसिस" (PRIDE) या प्रशिक्षण संस्थेतर्फे संसद भवन, नवी दिल्ली येथे संसदीय अभ्यासवर्गाचे आयोजन दिनांक ५ व ६ एप्रिल, २०२२ रोजी करण्यात आले आहे. या अभ्यासवर्गासाठी समन्वयाची जबाबदारी राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा व वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र, विधान भवन, मुंबई यांच्याकडे आहे.

या संसदीय अभ्यासवर्गात सहभागी होण्यासाठी ज्या सन्माननीय सदस्यांनी आपली नावे कळविली आहेत त्यांनी दिनांक ५ व ६ एप्रिल, २०२२ रोजी लोकसभा सचिवालय, नवी दिल्ली येथे होणाऱ्या या अभ्यासवर्गाची नोंद घ्यावी व वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राशी संपर्क साधून अभ्यासवर्गास उपस्थित रहावे.

----

असुधारित प्रत

**सभागृहाच्या कामकाजाबाबत**

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेत लक्षवेधी सूचना रेग्युलरमध्ये दाखविल्या आहेत. सत्ताधारी पक्षाचा ठराव दाखविला आहे. नियम ९७ च्या २/३ सूचना आहेत आणि त्या महत्त्वाच्या आहेत. आपल्या भावना लक्षात घेऊन मला असे वाटत आहे की, आपण लक्षवेधी सूचना घेऊ. सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव वेळ पाहून घेऊ. नियम ९७ च्या सूचना घेऊ. काही गोष्टी उद्या येतील.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, आपण हे सर्व टाईमबाऊंड घ्यावे.

**सभापती** : होय. मी सर्व गोष्टी टाईमबाऊंड घेतो.

----

असुधारित प्रत

## रोजगार हमी योजनेवरील मजुरांच्या थकीत मजुरीच्या पाईंट ऑफ इन्फमेंशनबाबत

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून महत्त्वाचा विषय सरकारच्या निदर्शनास आणू इच्छित आहे. देशभर सर्वत्र होळी शिमग्याचा सण साजरा होत असताना रोजगार हमी योजनेवर काम केलेल्या राज्यातील ३४ जिल्ह्यातील हजारो मजुरांची १६६ कोटी रुपयांची मजुरी शासनाकडे मागील १७ ते ९० दिवस थकीत आहे. त्यामुळे या हातावर पोट असणाऱ्या मजुरांवर सणासुदीला उपासमारीची पाळी आली आहे. पालघर जिल्ह्यातील प्रलंबित मजुरी सर्वात जास्त असून त्याची रक्कम २४ कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे शासनाच्या अक्षम्य कृतीचा निषेध करण्यसाठी या आधी दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी श्रमजीवी संघटनेच्या नेतृत्वाखाली मजुरांनी जव्हार, मोखाडा तालुक्यातील तहसील कार्यालयावर होळी पेटवून शासनाच्या विरोधातील असंतोषाला वाट करुन दिली होती. रोजगार हमी योजनेवर काम करणारे बहुसंख्य मजूर आदिवासीबहुल जिल्ह्यातील तसेच मागास भागातील असून शासनाच्या विरोधात या मजुरांमध्ये असेतोषाची भावना निर्माण झाली आहे. ऐन सणाच्या वेळी मजुरांची मजुरी थकीत ठेवण्याच्या कारणाची उच्च स्तरावर चौकशी करुन दोषींवर योग्य ती कारवाई करण्यात यावी तसेच या गरीब मजुरांचर आतापर्यंत थकलेली मजुरी त्यांना तात्काळ अदा करण्यात यावी, या सर्व मजुरांना विलंब भत्ता देखील देण्यात यावा आणि पुन्हा अशा प्रकारची अक्षम्य चूक होणार नाही याची काळजी रोजगार हमी विभागाकडून घेण्यात यावी, ही बाब पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून मी उपस्थित करीत आहे. सदर बाबतीत वस्तुस्थिती काय आहे याची माहिती शासनाने सभागृहाला द्यावी अशी देखील मी विनंती करीत आहे.

**सभापती** : शासनाने हे अधिवेशन संपण्याआधी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना विचारलेल्या पॉईंट ऑफ इन्फर्मेशनची माहिती देण्यात यावी.

----

## एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाच्या

### पाईंट ऑफ इन्फर्मेशनबाबत

श्री. सदाभाऊ खोत : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधू इच्छितो की, एसटी महामंडळाच्या संपाला आता ५ महिने झाले ओहत. आजच गंगापूर आगाराच्या संतोष चाबूकस्वार यांनी फाशी घेतली आहे. आत्महत्याग्रस्त एसटी कर्मचाऱ्यांचा जवळपास १०० च्या वर आकडा झाला आहे. शासनाने एक समिती नेमून निर्णय घ्यावा, निवेदन करावे अशी आपण सूचना केली होती. परंतु सरकारकडून याबाबत कोणतेही निवेदन झालेले नाही. सरकारला एसटी प्रश्नाचे गांभीर्य आहे का की, हा प्रश्न सरकारला सोडवायचा नाही, एसटी कर्मचाऱ्यांचा गिरणी कामगार करायचा आहे का ? सरकारची या प्रश्नावर नेमकी कोणती भूमिका आहे हे स्पष्ट होणे आता अत्यंत गरजेचे आहे. रोज कर्मचारी आत्महत्या करीत आहेत. मात्र सरकार डोळ्यांवर पट्टी बांधून बसलले आहे. मी आपल्या माध्यमातून विनंती करतो की, आपण सरकारला निर्देश द्यावेत आणि उद्यापर्यंत सभागृहामध्ये सरकारने एसटी कर्मचाऱ्यांच्या बाबतीतील भूमिका स्पष्ट करावी.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, हा विषय अत्यंत गांभीर्याने घेण्याचा असल्यामुळे आपण स्वत: दखल घेतली. आपल्या अध्यक्षतेखाली सरकारबरोबर बैठक झाली. बैठकीला माननीय परिवहन मंत्री होते तसेच सर्व संबंधित विभागांचे सचिव होते. बैठकीत निर्णय झाला. १८ पैकी १६ मागण्या मान्य झाल्या. विलिनीकरण नको, परंतु सातवा वेतन आयोग व इतर मागण्या मान्य झाल्या. माननीय परिवहन मंत्री नंतर म्हणाले की, आम्ही माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांच्याशी बोलतो. परंतु नेमके घोडे अडले कुठे ? आपण या सर्वोच्च सभागृहात निर्देश दिले, आपण बैठक घेतली आणि निर्णय होत नसेल .... सन्माननीय सदस्य श्री. सदाभाऊ खोत यांनी सांगितल्याप्रमाणे आता दोघांनी फाशी घेऊन आत्महत्या केली. अजून किती बळी हवे आहेत ? माझी आपल्याला हात जोडून विनंती आहे की, तुम्ही काय द्यायचे ते द्या, कमी जास्त करा. परंतु हा विषय सोडविणार आहात की नाही ?

श्री. प्रवीण दरेकर ....

तुम्ही त्यांना काय व किती देणार हा वादाचा विषय होऊ शकतो. रोज बळी जात आहेत. माझी हात जोडून विनंती आहे की, पॉईंट ऑफ इन्फर्मेशनचा जरी विषय असला तरी तो अत्यंत गंभीर आहे. आपण स्वत: यामध्ये हस्तक्षेप करुन शासनाला मार्गदर्शन करावे.

**सभापती** : मला माननीय परिवहन मंत्र्यांचे मागचे निवेदन आठवत आहे. तेव्हा त्यांनी स्पष्ट सांगितले होते की, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय मुख्यमंत्री यांच्याबरोबर बोलून मी उत्तर देतो. मी चौकशी करतो.

आपले टाईमटेबल ठरले आहे. मघाशी सदनाने सांगितले आहे की, वेळ मर्यादा घालून पुढील कार्यक्रम करुन घ्यावा. त्यामुळे आता पॉईंट ऑफ इन्फर्मेशनवर जास्त वेळ जायला नको. मी माननीय परिवहन मंत्र्यांशी बैठक घेतो आणि माननीय परिवहन मंत्री काय म्हणत आहेत, त्याबाबतचे निवेदन आपल्याला सांगतो.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, आपल्या दालनात बैठक घ्यावी.

**सभापती** : ठीक आहे. मी माननीय परिवहन मंत्र्यांना बैठकीला बोलावितो.

----

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशनबाबत**

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, अंबरनाथ नगरपालिकेमार्फत बांधण्यात आलेल्या युपीएससी,एमपीएससी प्रशिक्षण केंद्रामध्ये तीन ते चार दिवसांपूर्वी अंबरनाथ नगरपालिकेचे सफाई कर्मचारी मद्यधुंद अवस्थेत सापडले आहे. नगरपालिकेचे या वास्तुकडे दुर्लक्ष होत आहे. अंबरनाथ येथील कोविड हॉस्पीटलमधील बेड व इतर साहित्य ओपन ग्राऊंडवर फेकल्याची घटना उघडकीस आली आहे. या बाबीकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की, अंबरनाथ नगरपालिकेकडून चुकीचा कारभार व शहराकडे दुर्लक्ष सुरु आहे त्याबाबत शासनामार्फत संबंधित अधिकारी कर्मचारी यांच्यावर योग्य ती कारवाई करावी अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : याबाबत शासनाचे उचित कार्यवाही करावी.

------

**सभापती** : एक आर्थिक बाबीचे छोटेसे विधेयक विधानसभेत पास झाले आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, हे विधेयक आपण पास करु या. विलंब शुल्क, व्याज, जीएसटी थकबाकी याबाबत तडजोड करणारे हे विधेयक आहे.

असुधारित प्रत

**पृ.शी.** : वस्तू व सेवा कर विधेयक

L.A. BILL NO. IX OF 2022

(A BILL TO PROVIDE FOR SETTLEMENT OF ARREARS OF TAX, INTEREST, PENALTY OR LATE FEE WHICH WERE LEVIED, PAYABLE OR IMPOSED, RESPECTIVELY, UNDER 5 VARIOUS ACTS ADMINISTERED BY THE GOODS AND SERVICE TAX DEPARTMENT AND FOR THE MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.शंभूराज देसाई (अर्थ राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ९ वस्तू व सेवा कर विभागाकडून अंमलबजावणी केल्या जाणाऱ्या विविध अधिनियमांखाली जो आकारण्यात आला होता, प्रदेय होता किंवा लादण्यात आला होता अशा अनुक्रमे कर,व्याज,शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.शंभूराज देसाई : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२० चे वि.स.वि.क्रमांक ९ वस्तू व सेवा कर विभागाकडून अंमलबजावणी केल्या जाणाऱ्या विविध अधिनियमांखाली जो आकारण्यात आला होता, प्रदेय होता किंवा लादण्यात आला होता अशा अनुक्रमे कर,व्याज,शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

श्री.शंभूराज देसाई...

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७, खंड (१) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड २ ते २० (दोन्ही सम्मिलित) खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, कोणत्याही शिफारशीशिवाय हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

-------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : राज्यातील जिल्हा परिषदा व महानगरपालिकांच्या शाळेत शिकत असलेल्या खुल्या, ओबीसी, एसटी, व्हीजेएनटी,एसबीसी व इतर समुदायातील मुलांना गणवेश दिला जात नसणे

**मु.शी.** : राज्यातील जिल्हा परिषदा व महानगरपालिकांच्या शाळेत शिकत असलेल्या खुल्या, ओबीसी, एसटी, व्हीजेएनटी,एसबीसी व इतर समुदायातील मुलांना गणवेश दिला जात नसणे यासंबंधी सर्वश्री अमरनाथ राजूरकर, विक्रम काळे, सतिश चव्हाण, अभिजीत वंजारी, वि.प.स., यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अमरनाथ राजूकर (नांदेड स्थानिक प्रा.संस्था) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील जिल्हा परिषदा तथा मनपांच्या शाळेत शिकत असलेल्या अनुसूचित जाती, जमातीच्या दारिद्र्यरेषेखालील मुलांना मोफत गणवेशाचे वाटप होत असणे, मात्र यात खुल्या, ओबीसी, एसटी, व्हिजेएनटी, एसबीसी आणि इतर समुदायातील मुलांना गणवेश दिला जात नसणे, यात दिव्यांग मुले असतील तरीही गणवेश दिला जात नसणे, यामुळे जातीय भेदभावाची भावना शालेय जीवनापासूनच मूळ धरत असणे, हे आतापर्यंत मोठ्या प्रमाणात चालू असणे, सध्या काळ बदलत चालला असून त्यानुसार ध्येयधोरणांमध्ये सामाजिक मानसिकता बदलत असल्याचा संदर्भ लक्षात घेता गरजेनुसार बदल होणे आवश्यक असल्याची अपेक्षा व्यक्त होणे, शाळेत भेदाचे नव्हे तर समतेचे शिक्षण दिले जात असणे, मात्र गणवेश वाटपातील भेदामुमळे असमानतेचे मूल्य रुजत असणे, शिक्षण हे विद्यार्थी व पालकांना संविधानिक दृष्टी देणारे माध्यम असणे, बालमनावर भेदभावाचे अमंगल संस्कार होऊ नयेत यासाठी शासनाने या नविन आर्थिक वर्षात राज्यातील जिल्हा परिषदा व

श्री.अमरनाथ राजूरकर

मनपा शाळांमधील सर्वच विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देण्यात यावा अशी आग्रही मागणी होत असणे, परंतु त्याबाबतच्या कार्यवाहीस शासनाकडून होत असलेला विलंब, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. प्रा.वर्षा गायकवाड (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत

**(सभापती स्थानी तालिका सभापती श्री.विक्रम काळे)**

श्री.अमरनाथ राजूकर : सभापती महोदय, राज्यातील जिल्हा परिषदा व महानगरपालिकांच्या शाळेत शिकत असलेल्या अनुसूचित जाती जमातीच्या व दारिद्र्य रेषेखालील मुलामुलींना व खुल्या प्रवर्गातील मुला मुलींना मोफत गणवेश वाटपाबाबत ही लक्षेवधी सूचना उपस्थित केली आहे. माझा प्रश्न असा आहे की, राज्यातील खुल्या प्रवर्गातील सर्व मुलींना गणवेश वाटप करण्यात येत आहे. आपल्या राज्यात महाराष्ट्र शासनामार्फत गणवेश वाटप करण्यात येतो. यामध्ये एस.सी., एस.टी. व दारिद्र्य रेषेखालील मुलांना गणवेश वाटप करण्यात येत आहे. परंतु यामध्ये ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी व खुल्या प्रवर्गातील मुलांना गणवेश दिला जात नाही. त्यामुळे मुलांमध्ये भेदभाव केल्यासारखे वाटते. त्यामुळे खुल्या प्रवर्गातील मुलांना गणवेश वाटप करण्यात येतील काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत मी सांगू इच्छिते की, गणवेश वाटपाची योजना १९७९-८० मध्ये सुरु झाली होती. सुरुवातीला ही योजना अनुसूचित जाती, जमाती व भटक्या विमुक्त जातीमधील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी होती. हळूहळू या योजनेचे स्वरुप बदलत गेले. स्त्री साक्षरता प्रमाण वाढावे म्हणून मुलींचा सहभाग वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या समग्र शिक्षणाच्या माध्यमातून शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पहिली ते आठवीच्या सर्व मुलींना तसेच अनुसूचित जाती,जमातीचे सर्व मुले व मुली तसेच दारिद्र्य रेषेखालील पालकांच्या मुलांना मोफत गणवेश देण्यात येतो. प्रत्येक विद्यार्थ्यांना दोन गणेवशासाठी ६०० रुपयात देण्यात येतात. स्थानिक पातळीवर शालेय शिक्षण समितीच्या माध्यमातून ते देण्यात येतात. सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न विचारला की, गणवेशाचे वाटप सर्व प्रवर्गातील मुले व मुलींना देण्यात यावा. ही बाब शासनाला मान्य आहे. शालेय जीवनापासून मुलांमध्ये वेगळे वातावरण नसावे. त्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. राज्यात ३६ लाख ०७ हजार २९२ विद्यार्थी या योजनेचा लाभ घेत आहेत. सर्व विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यास सुरुवात केली तर उर्वरित

प्रा.वर्षा गायकवाड...

विद्यार्थ्यांची संख्या १२ लाख ६० हजार ७४४ इतकी आहे. या मुलांसाठी एकूण ७५ कोटी ६४ लक्ष रुपये गणवेशासाठी लागणार आहेत. या रकमेचा प्रस्ताव वित्त विभागाकडे अगोदर सादर करण्यात आला आहे. वित्त मंत्री महोदयांशी याबाबत माझी चर्चा झाली आहे. शालेय जीवनापासून भेदभाव बंद झाला पाहिजे ही आपली सर्वांची एकच इच्छा आहे. या संदर्भात वित्त विभागाकडे शालेय शिक्षण विभागाकडून पाठपुरावा केला जात आहे.

--------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी असलेल्या शैक्षणिक सस्थांना मालमत्ता कर लागू नसणे

**मु.शी.** : धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी असलेल्या शैक्षणिक सस्थांना मालमत्ता कर लागू नसणे यासंबंधी सर्वश्री. कपिल पाटील, विक्रम काळे, सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय नगर विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ नुसार (In the 132 (1) (b) of Bombay Provincial Municipal Corporation Act प्रमाणे) धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणी असलेल्या शैक्षणिक संस्थांना मालमत्ता कर लागू नसणे, मा.सर्वोच्च न्यायालयानेही चॅरिटेबल शैक्षणिक संस्थांना हा कर लागू नसल्याचे स्पष्ट निर्णय दिलेले असणे, त्याप्रमाणे In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench, Nagpur यांनी सुध्दा यासंदर्भात महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थांना मालमत्ता कर लागू नाही असे निर्णय दिले असणे, या पार्श्वभूमिवर परभणी महानगरपालिका अंतर्गत खाजगी शिक्षण संस्थांना परभणी महापालिकेने मालमत्ता कराबद्दल कोर्टाचा मनाई हुकूम असताना देखील महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी शिक्षकांना तसेच विद्यार्थ्यांना हाकलवून बेकायदेशीररित्या शाळेला सिल करणे, कांचन त्रिंबक कात्रुवार कर्णबधीर विद्यालय, एम.आय.डी.सी. परिसर, परभणी या शाळेला दिनांक ४ फेब्रुवारी, २०२२ रोजी कोर्टाने स्टे दिलेला असताना, शाळा सुरु असताना व एम.पी.एस.सी. च्या परिक्षा सुरु असताना तसेच १० वी व १२ वीचे प्रॅक्टिकल सुरु असताना, हुकूमशाही पध्दतीने बेकायदेशीररित्या शाळेला सिल

श्री.कपिल पाटील....

लावणे, हा कोर्टाच्या आदेशांचा भंग असून त्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करुन कारवाई करण्याची मागणी संस्थांकडून, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांकडून करण्यात येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

श्री. प्राजक्त तनपुरे (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.विक्रम काळे)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न केवळ एका महानगरपालिकेचा नसून संपूर्ण राज्यातील मोठ्या शहरांचा आहे. प्रापर्टी टॅक्स मधून सर्व शाळा व शिक्षण संस्थांना वगळले पाहिजे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात या प्रश्नाला थोडी बगल दिलेली आहे. पुजा, अर्चा, सार्वजनिक धर्मादाय यासाठी वापरण्यात येत असलेल्या इमारती व जमिनीवर सामान्य कर भरणा करण्यापासून सूट देण्यात आली आहे. राज्यातील सर्व शिक्षण संस्थांना त्या अनुदानित असो की, विनाअनुदानित असो त्यांना या करातून वगळले पाहिजेत ते सरकार करणार आहे काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, अधिनियमात स्पष्ट तरतूद आहे की, महानगरपालिका अधिनियमातील कलम १३२ नुसार जेथे चॅरिटी होते त्या ठिकाणी सामान्य कर आकारु नये. हे करीत असताना या कलमात बरेच मुद्दे दिलेले आहेत. अशी संस्था इमारतीचे भाडे घेता काय हे तपासून पाहणे गरजेचे आहे. उदात्त हेतूने शासनाने ही तरतूद केली आहे. एखादी शिक्षण संस्था दुसऱ्या कामासाठी इमारतीचा उपयोग करते काय हे तपासून पाहण्याची गरज आहे. परभणी येथील ही शाळा अपंगासाठी चालविण्यात येत आहे. यामध्ये महानगरपालिकेचे असे म्हणणे होते की, बील आकारल्या नंतर त्या संस्थेनी सर्व कागदपत्रे दिली आणि त्यामध्ये ते सिध्द झाले तर महानगरपालिका कर आकारणी करणार नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, कायद्यात तरतूद आहे. ज्या धर्मादाय संस्था आहेत त्यांना कायद्यातून सूट देण्यात आली आहे. अशा सर्व शिक्षण संस्थांना राज्य शासन मालमत्ता करातून वगळेल काय ? ज्या संस्थेने व्यावसायिक काही सुरु केले असेल तर त्यासाठी वेगळा टॅक्स लागेल. शिक्षण संस्थांना यातून वगळले पाहिजे. वारंवार महानगरपालिका मालमत्ता कर वाढवित असते. त्याचा भुर्दंड संस्थांना पडतो. गेल्या अनेक वर्षापासून वेतनेत्तर अनुदान मिळालेले नाही. त्यामुळे शिक्षण संस्थांना देखभाल दुरुस्ती करणे कठीण होत आहे. अशा वेळी कायद्यातील तरतुदीनुसार शासनाकडून हा निर्णय सर्व ठिकाणी अंमलात आणला जाईल काय ?

असुधारित

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, कायद्यातील तरतूद स्वयंस्पष्ट आहे, हा निर्णय लागू आहे. संस्थेने असे सिध्द केले पाहिजे की, आमचा दुसरा कोणताही व्यवसाय नाही. महानगरपालिका कायद्यानुसार कार्यवाही करते. कलम १३२ (ब) बाबत आपणण सांगत आहात. परंतु १३२ (२) आहे. त्यामुळे इतर बाबी तपासून काही नसेल तर महानगरपालिका करातून माफी देईल. राज्यात सर्व ठिकाणी हा निर्णय लागू आहे.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी अत्यंत चांगल्या विषयावर लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. सदर लक्षवेधी सूचनेला जे उत्तर दिलेले आहे त्यामध्ये थोडी विसंगती आहे. राज्यात जी शिक्षण व्यवस्था आहे त्यामध्ये बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट आणि इंडियन सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट अंतर्गत ज्या संस्था रजिस्टर्ड आहेत ती एक सोय आहे. त्यामध्ये अनुदानित किंवा विनाअनुदानित महाविद्यालय असा प्रकार आहे. दुसरे म्हणजे लोकल सेल्फ गर्व्हमेंटच्या माध्यमातून जिल्हापरिषद, नगरपरिषद किंवा महानगरपालिकेची शाळा चालविण्याची वेगळी व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या शिक्षण संस्थांना हा नियम लागू आहे किंवा त्यांना टॅक्समध्ये एक्झम्पशन आहे काय असा सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांचा प्रश्न आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, ज्या धर्मदाय संस्था आहेत त्यांना हे लागू आहे. परंतु धर्मदाय संस्थांची व्याख्या खूप मोठी आहे. मी सांगितल्याप्रमाणे लोकल सेल्फ गर्व्हमेंट वगळता राज्यातील सर्व प्रकारच्या अनुदानित किंवा विनाअनुदानित शिक्षण संस्था बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट अंतर्गत रजिस्टर्ड आहेत. त्या सर्व संस्थांना ॲक्झम्पशन आहे काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, ॲक्टमध्ये सार्वजनिक धर्मदाय प्रयोजनासाठी असे म्हटले आहे. येथे दुसऱ्या कोणत्याही ॲक्टचा संदर्भ घेतलेला नाही. ज्या इमारतीला प्रॉपर्टी टॅक्स लावण्यात येणार आहे त्या इमारतीचे प्रयोजन काय आहे आणि ते पूर्णत: धर्मदाय प्रयोजनासाठी असेल तर उदाहरणार्थ एखादी शाळा विद्यार्थ्यांकडून फी आकारत असेल तर ते धर्मदाय प्रयोजन होऊ शकत नाही. त्यामुळे आमचे म्हणणे आहे की, पूर्णपणे धर्मदाय असेल तर निश्चितपणे ही सूट लागू होते.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सुरुवातीला जे उत्तर दिले ते बरोबर होते. आपण दुसऱ्या प्रश्नाला उत्तर देताना फी घेणार असे सांगितले. शिक्षण संस्था फी घेणारच आहेत. रायगड जिल्ह्यात ग्रामीण भागातील शाळांकडून टॅक्स आकारणी केली जात नाही. महाड, अलिबाग नगरपालिका टॅक्स आकारत नाही. मंत्री महोदयांनी या संदर्भात स्पष्टीकरण दिले पाहिजे. मुंबई महानगरपालिका

श्री.जयंत प्र.पाटील......

क्षेत्र वगळले तर ग्रामीण भागात चार गावांसाठी एक हायस्कूल असते. मग तो टॅक्स थांबला तर फारसा फरक पडत नाही. राज्य शासनाने या संदर्भात तीन परिपत्रके काढलेली आहेत. आपण फी बाबत सांगतले. शाळेने फी घेतली नाही तर शाळा चालणारच नाही. शासनाने परिपत्रक काढलेले आहे, कायदा केलेला आहे. परंतु त्या संदर्भात स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. चॅरिटी ॲक्ट अंतर्गत शाळा रजिस्टर होते, संस्था मान्यता घेते, खाजगीमध्ये मान्यता देण्याची पद्धती नाही. आपण या संदर्भात स्पष्टीकरण करणारे परिपत्रक निर्गमित करणार आहात काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, ॲक्टमध्ये स्वयंस्पष्ट तरतूद आहे. कलम १३२ (ब) चा आधार घेतला जातो. परंतु कलम १३२ मध्ये आणखी उप कलम आहेत. माझे असे म्हणणे आहे की, ॲक्ट स्वयंस्पष्ट आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, कायद्यात तरतूद आहे हे आम्हाला माहिती आहे. त्यामुळेच आम्ही प्रश्न विचारलेला आहे. आपण फी घेण्यास परवानगी देता. इयत्ता १ ली पासून इयत्ता १० वी पर्यंत ५ रुपये फी घेतली जाते. मग ती फी घेतल्यानंतर प्रॉपर्टी टॅक्स किती द्यावा लागणार आहे ? प्रॉपर्टी टॅक्स शंभरपट आहे. म्हणजे एका अर्थाने रुपया, दोन रुपये फी घेतली जाते आणि जास्त प्रमाणात टॅक्स द्यावा लागतो. त्यामुळे कायद्यातील तरतुदीची अंमलबजावणी झाली पाहिजे. राज्यातील कोणत्याही शिक्षण संस्थेला मालमत्ता कर लागणार नाही. (...अडथळा...) त्यासाठी महानगरपालिकेची १ रुपया, ५ रुपये फी आहे. माननीय राज्यमंत्री नवीन आहेत. आता सरकार सत्तेवर येऊन अडीच वर्षे झालेली आहेत. आपण कल्याणकारी राज्याचे प्रतिनिधी आहोत. आम्ही कायदा समजून घेण्यासाठी वकिलांकडे जाऊ. आपण कायद्यातील कलम वाचून दाखवू नये. आम्हाला कायदा माहिती आहे. कायद्याची अंमलबजावणी होत नाही म्हणून आम्ही प्रश्न विचारलेला आहे. आपण एका बाजूला कायद्यातील कलम वाचून दाखविता आणि दुसऱ्या बाजूला तुम्ही फी घेता म्हणून तुम्हाला प्रॉपर्टी टॅक्स लागेल असे सांगता. आपण हे विधान मागे घ्यावे.

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी कायद्यातील एका कलमाचा उल्लेख केला. त्यामुळे मी कायद्यातील कलम वाचून दाखविले. मी कायद्यातील उर्वरित तरतूद निदर्शनास आणून दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी अमूक कलमान्वये प्रॉपर्टी टॅक्स आकारता येत नाही असे सांगितले. त्यामुळे मी कायद्यातील कलम वाचून दाखविले. परंतु कायद्यात उप कलम देखील आहेत. प्रोसिजर कशी फॉलो केली पाहिजे हे मी सांगितले आहे. सदर लक्षवेधी सूचनेत महानगरपालिकेचा उल्लेख केलेला आहे. महानगरपालिकेचे ॲक्ट वेगळे आहेत आणि नगरपालिकेचे ॲक्ट वेगळे आहेत. महानगरपालिकेच्या ॲक्टमध्ये जर अनुदानित शाळा असेल, अनुदानित शाळेत फी घेतली नसेल तर निश्चितपणे तरतूद आहे.

**तालिका सभापती (श्री.विक्रम काळे) :** मी सभागृहाला सांगू इच्छितो की, यामध्ये थोडी संदिग्धता आहे. महानगरपालिका, नगरपालिकांचा विषय आहे. राज्य शासनाला या संदर्भात धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. सभापती महोदयांनी माननीय मंत्री, राज्यमंत्री, संबंधित अधिकारी व संबंधित सन्माननीय सदस्यांसमवेत त्यांच्या दालनात या प्रकरणी बैठक आयोजित करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : शेतकऱ्यांना कर्जमाफी तसेच प्रोत्साहनपर रक्कम विनाविलंब अदा करण्याबाबत

**मु.शी.** : शेतकऱ्यांना कर्जमाफी तसेच प्रोत्साहनपर रक्कम विनाविलंब अदा करण्याबाबत सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रवीण दटके, प्रविण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, सर्वश्री सुरेश धस, सदाशिव खोत, प्रसाद लाड, गोपिचंद पडळकर, डॉ.रणजित पाटील, ॲड.निलय नाईक, सर्वश्री रमेशदादा पाटील, चंदुभाई पटेल, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री रामदास आंबटकर, नागोराव गाणार, प्रविण पोटे-पाटील, रमेश कराड, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

राज्य सरकारने मंत्रीमंडळाच्या पहिल्याच बैठकीत शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय घेण्यात येऊन तद्नंतर दिनांक २८ डिसेंबर, २०१९ रोजी कर्जमाफीचा आदेशही निर्गमित करण्यात आलेला असताना आजमितीस दोन वर्षांचा कालावधी उलटून गेला तरीही राज्यातील ३५ हजार ६२९ शेतकऱ्यांना १५६ कोटी रुपयांची कर्जमाफी मिळालेली नसणे, थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत शासकीय निर्णय निर्गमित करण्यात येणे, मात्र नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर ५० हजार रुपये देण्याची घोषणा जाहिर केलेली असताना आजमितीस प्रोत्साहनपर रक्कम देण्याच्या संदर्भांत शासनाने निर्णय घेतलेला नसणे, शासनाच्या या बोगस घोषणेला कंटाळून मागील २ वर्षांत २००० हून अधिक

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे........

शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करुन आपले जीवन संपविल्याचे समोर येणे, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर ५० हजाराची रक्कम अदा करण्यास शासनाद्वारे जाणीवपूर्वक विलंब करण्यात येत असणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, शासनाने जाहीर केल्याप्रमाणे शेतकऱ्यांना कर्जमाफी तसेच प्रोत्साहनपर रक्कम विना विलंब अदा होण्याचे दृष्टीने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.बाळासाहेब पाटील (सहकार मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो/ठेवते.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत ३५ लाख १० हजार शेतकऱ्यांनी कर्जमाफीसाठी अर्ज केले होते. शासनाने ३२ लाख ८२ हजार शेतकऱ्यांना संगणकीय क्रमांक दिला. शासन उर्वरित २ लाख ८२ हजार शेतकऱ्यांविषयी कोणता निर्णय घेणार आहे ? आपण याबाबत कोणतेही उत्तर दिलेले नाही. एकूण २ लाख ८२ हजार शेतकऱ्यांचे संगणकीकरण न झाल्यामुळे त्यांना कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळालेला नाही. शासन या संदर्भात कोणता निर्णय घेणार आहे ? आपण ३२ लाख ८२ हजार शेतकऱ्यांचे संगणकीकरण केले. त्यापैकी ३१.६३ लाख शेतकऱ्यांच्या आधार क्रमांकाची नोंद करण्यात आली. त्यातील १ लाख १ हजार शेतकरी राहिलेले आहेत. ३ लाख ८३ हजार शेतकऱ्यांनी कर्जमुक्तीसाठी अर्ज करुन सुद्धा त्यांना कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळालेला नाही. त्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. ३ लाख ८३ हजार शेतकऱ्यांनी कर्जमुक्तीसाठी अर्ज केलेले आहेत. आपण त्यांना किती दिवसात कर्जमुक्तीचा लाभ देणार आहात ? दुसरे म्हणजे ऑनलाईन नोंदणी करताना काही शेतकरी सुटलेले आहेत. योजना तीच आहे. आपण ३ लाख ८३ हजार शेतकऱ्यांविषयी कोणता निर्णय घेणार आहात ? तसेच जे लोक यातून सुटलेले आहेत त्यांना ३ महिन्यांचा वेळ वाढवून देण्यात येणार आहे काय, त्यांना पुन्हा संधी देण्यात येणार आहे काय ? कारण त्यांना संधी न मिळाल्यामुळे ते अस्वस्थ झालेले आहेत. आपण तीन-चार वेळा संधी दिली. परंतु त्यांना लाभ मिळालेला नाही. आपण त्यांना तीन महिने वाढवून देणार आहात काय ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, शासनाने अर्थसंकल्पात ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्यासाठी तरतूद केलेली आहे. मी शासनाचे अभिनंदन करतो. २० लाख शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळणार आहे. त्यासाठी ३० जून, १५ ऑगस्ट अशी तारीख निश्चित करण्यात येणार आहे काय ? आपण अर्थसंकल्पीय भाषणात या संदर्भात उल्लेख केलेला आहे. आपण अर्थसंकल्प मंजूर झाल्यानंतर २० लाख शेतकऱ्यांचे ५० हजार रुपयांचे अनुदान किती दिवसात देणार आहात ?

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदय, महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आल्यानंतर सरकारने ज्या शेतकऱ्यांनी अल्प मुदतीचे पीक कर्ज घेतले होते त्यांच्यासाठी महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली. सदर योजनेसाठी ३२ लाख ८२ हजार पात्र खातेधारक आहेत, ही गोष्ट बरोबर आहे. बँकांनी पुढकार घेऊन ऑनलाईन मागणी करावी अशी योजना होती. त्यामध्ये काही खातेधारक अपात्र ठरले, ही गोष्ट बरोबर आहे. इन्कम टॅक्स भरणारे किंवा संचालक मंडळी असतील तर ते अपात्र ठरलेले आहेत.

यानंतर श्री.सांगळे......

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब पाटील.....

साधारणत: ३२ ते ३७ लाख खात्यांचे आधार प्रमाणिकरण झालेले आहे. अद्याप ४५ हजार लोकांचे आधार प्रमाणिकरण राहिलेले आहे. आधार प्रमाणिकरण झालेले आहे परंतु त्यांच्या खात्यात रक्कम न हस्तांतरित झालेले ५४ हजार लोक आहेत. शासनाने सदर योजना जाहीर केल्यानंतर राज्यात २-३ महिन्यांमध्ये करोनाचा प्रार्दुभाव सुरु झाला. परिणामी राज्यात महसुलामध्ये काही अंशी वाढ होऊ शकली नाही. त्यामुळे सदर योजनेमध्ये खंड निर्माण झाला ही बाब आपल्याला नाकारता येणार नाही. ज्याप्रमाणे तरतूद होत आहे त्यानुसार आपण ही योजना पूर्ण करीत आहोत. जे लोक नियमितपणे कर्ज फेडत आहात त्यांच्या संदर्भात माननीय वित्त मंत्र्यांनी अर्थसंकल्पामध्ये घोषणा केली आहे. या आर्थिक वर्षात ती सर्व रक्कम शेतकऱ्यांना देणार आहोत. त्यानंतर ही योजना पूर्ण होईल. ही योजना अतिशय चांगल्या प्रकारची आहे. सदर योजनेमध्ये काही प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यात काही जणांचे आधार प्रमाणिकरण झालेले आहेत, परंतु त्यातील अनेक जण परगावी किंवा परदेशामध्ये गेलेले आहेत. काही ठिकाणी आधार प्रमाणिकरण झाल्यानंतर लाभ हस्तांतर न झालेल्या शेतकऱ्यांची संख्या ५४ हजार इतकी आहे. त्यांच्याकरिता २०० कोटी रुपये वर्ग करण्यात आलेले आहेत. या महिन्याअखेर त्याबाबतची सर्व प्रक्रिया पूर्ण केली जाईल. मूळ योजनेमध्ये ज्यांचे आधार प्रमाणिकरण पूर्ण झालेले आहे. परंतु त्यांच्याकरिता देण्यात येणारी काही रक्कम अपूर्ण होती. त्यांच्याकरिता सदर कार्यवाही केलेली आहे. दुसरा प्रश्न असा उपस्थित करण्यात आला आहे की, सदर योजनेमध्ये पात्र असलेल्या मयत कर्जदाराच्या बाबतीत बँकांमध्ये ज्या वारस नोंदी करण्यात आलेल्या आहेत त्याचा तपशील घेऊन त्याबाबत त्यांना लाभ देण्याची प्रक्रिया निश्चितपणे लवकरात लवकर पूर्ण केली जाईल. तसेच बँकांमध्ये काही माहिती अपलोड करीत असताना त्यात काही चुका झालेल्या आहेत. काही बँकाचे राष्ट्रीयकृत बँकांमध्ये विलिनीकरण झाले. त्यामुळे काही रक्कम अपूर्ण राहिली. राज्य शासनाची ही महत्त्वाकांक्षी योजना आहे. ती योजना लवकरच पूर्ण करु.

असुधारित प्रत

श्री.अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, महाविकास आघाडी शासनाने कर्जमाफीच्या घेतलेल्या निर्णयाबद्दल तसेच शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान दिल्याबाबत मी शासनाचे अभिनंदन करतो. महाराष्ट्र किंवा नांदेड जिल्हा असो, ज्या शेतकऱ्यांना मूळ कर्जमाफी झाली आहे त्याबाबत आम्ही बैठक घेतली असता आम्हाला अशी माहिती मिळाली की, अनेक शेतकऱ्यांचे कर्ज अद्याप माफ झालेले नाही. मंत्री महोदय, आपण या संदर्भात आपल्या दालनात बैठक घेऊन सदर कर्जमाफी देण्यासंबंधी निर्णय घेणार आहात का ?

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले होते की, या संदर्भात बँकांकडे ऑनलाईन मागणी करायची होती. सदर योजनेमध्ये शेतकऱ्यांची आकडेवारी निश्चित झालेली आहे. त्यामुळे त्या आकडेवारीमध्ये आता वाढ होऊ शकत नाही. त्यामुळे ज्यांनी ऑनलाईन मागणी केली होती, त्यात आधार प्रमाणिकरण किंवा शेतकरी आढळून येत नसणे अशा प्रकारच्या काही अडचणी आल्या होत्या. तेवढयाच लोकांची कर्ज प्रकरणे राहिलेली आहेत. त्या व्यतिरिक्त त्यात दुसऱ्या कोणाचाही समावेश होऊ शकत नाही.

श्री.अंबादास दानवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरनाथ राजूरकर यांनी विचारलेल्या प्रश्नास जोडून माझा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमरनाथ राजूरकर यांनी विचारलेला प्रश्न बरोबर आहे. अद्याप काही शेतकऱ्यांचे कर्ज माफ झालेले नाही. आपण दिलेल्या आकडेवारीनुसार ९७ टक्के शेतकऱ्यांचे कर्ज माफ झालेले आहे. शासनाकडून बँकाकडे हळूहळू रक्कम जात असताना त्यातील फरकाच्या कालावधीची बँकाकडून व्याज आकारणी केली जाते. २ वर्षांपूर्वी कर्जमाफी झाली असली तरी बँका शेतकऱ्यांना २ वर्षांचे व्याज सोडणार नाही. याबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे ? मागील वेळी शासनाने दीड लाख रुपयाची कर्ज माफी केली होती. त्यात एखाद्या शेतकऱ्यावर १.७५ लाख रुपये किंवा २.२५ लाख रुपये कर्ज असल्यास संबंधित शेतकऱ्याने दीड लाखावरील उर्वरित रक्कम भरल्यानंतर त्यास कर्जमाफी दिली जात होती. त्याच धर्तीवर २ लाख रुपयांची कर्ज माफी होत असताना एखाद्या शेतकऱ्यावर अडीच लाख रुपये, पावणेतीन लाख

श्री.अंबादास दानवे....

रुपये किंवा सव्वातीन लाख रुपये कर्ज असल्यास सदर शेतकऱ्याने दोन लाख रुपयांवरील उर्वरित रक्कम भरल्यास अशा शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याबाबत शासन नियोजन करणार आहे का ?

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदय, सदर योजना जाहीर होत असताना दोन लाख रुपयांपर्यंतची मर्यादा होती. तसेच ज्या शेतकऱ्यांनी नियमितपणे कर्ज भरणा केला आहे अशा शेतकऱ्यांनाच ५० हजार रुपयांचे अनुदान देण्यासंबंधी शासनाने घोषणा केली होती. त्यानुसार सदर काम आता सुरु आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे उर्वरित कर्जाची राहिलेली रक्कम भरुन असे काही होऊ शकत नाही. आपल्या सर्वांना माहीत आहे की, करोना काळात शासनासमोर अनेक अडचणी आलेल्या असताना देखील सदर योजना पुढे नेण्याचा राज्य शासनाचा मानस आहे.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, मूळ प्रश्नाला मंत्री महोदयांकडून उत्तर मिळालेले नाही. सन्माननीय सदस्य श्री.अंबादास दानवे यांनी स्पष्टपणे प्रश्न विचारल्यानंतर देखील त्यांच्या प्रश्नाला उत्तर मिळालेले नाही. शासनाकडून बँकांकडे विलंबाने पैसे पाठविल्यामुळे शेतकऱ्यांच्या नावावर व्याजाची रक्कम शिल्लक राहिली आहे. त्यामुळे शेतकरी कर्जमुक्त होऊ शकत नाहीत शासनाने कर्जमाफी जाहीर केल्यानंतर करोना काळात शासनाकडून ६ महिने रक्कम भरण्यात आली नाही. त्यामुळे सदर ६ महिन्यांच्या व्याजाची रक्कम शासन भरणार आहे की, शेतकरी भरणार आहेत ? याबाबत स्पष्टपणे उल्लेख होण्याची गरज आहे. मागील कर्जमाफीप्रमाणे शासनाने २ लाख रुपयांची कर्जमाफी केल्यास त्यापेक्षा जास्त असलेल्या कर्जाची रक्कम शेतकरी भरतील. अशा प्रकारे शेतकऱ्यांना कर्जाच्या वरील रक्कम भरु द्यावी. याबाबत राज्य शासनाने स्पष्टता आली पाहिजे. तसेच अनेक शेतकरी सदर योजनेकरिता पात्र असताना बँकांच्या आडमुठे धोरण स्वीकारले व काही शेतकऱ्यांना ऑनलाईन मागणी करण्यासाठी कार्यालयात येऊ दिले नाही. तसेच काही बँकांनी सदर योजनेचा प्रचार केला नाही. परिणामी पात्र असलेले

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.....

लाभार्थी आत्महत्या करण्यापर्यंत पोहोचले आहेत. अशा शेतकऱ्यांकरिता आपण १ ते ३ महिन्यांची मुदत वाढवून देणार आहात का ? जेणेकरुन सदर शेतकरी योजनेचा लाभ मिळण्यासाठी नव्याने अर्ज करु शकतील. त्यामुळे ते आत्महत्या करण्यापासून परावृत्त होऊ शकतील व त्यांना पुन्हा नवीन संधी मिळू शकेल. राज्य शासनाने जाहीर केलेल्या अर्थसंकल्पातील किती गोष्टींची अंमलबजावणी झाली किंवा नाही, मी याच्या खोलात जाणार नाही. आपण किती तारखेपर्यंत २० लाख शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे अनुदान देणार आहात ?

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदय, माननीय वित्त मंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणामध्ये सांगितले आहे की, या आर्थिक वर्षामध्ये सदर शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचा आर्थिक लाभ देणार आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे एखाद्या बँकेने जाणुनबुजून अशा प्रकारे कार्यवाही केली असल्यास त्याबाबत निश्चितपणे चौकशी केली जाईल. करोना काळात आर्थिक अडचण असताना देखील सदर योजना पूर्ण करण्याचा शासनाचा मानस आहे. त्यामुळे या संदर्भात मुदतवाढ देणे योग्य होणार नाही. त्या काळात ज्यांनी ऑनलाईन अर्ज केलेले आहेत, त्या आकडेवारीच्या बाहेर आपल्याला जाता येणार नाही. आता अनेक लोक या संदर्भात मागणी करीत आहेत, मला अनेक जणांकडून फोन येतात, पत्रे येतात. परंतु सदर योजनेमध्ये कोणाचाही नव्याने समावेश होणे अवघड आहे.

**तालिका सभापती** : मंत्री महोदय, हा विषय महत्त्वाचा आहे. सदनामधील सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन आपल्या दालनात यासंबंधी बैठक घ्यावी. त्यात सर्व संबंधित सन्माननीय सदस्यांना बोलावून घ्यावे व त्यातून मार्ग काढावा.

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदय, ठीक आहे.

--------------

**पृ.शी.:** परभणी जिल्हयात गाळपाअभावी मोठया प्रमाणावर ऊस शिल्लक राहणे

**मु.शी.:** परभणी जिल्हयात गाळपाअभावी मोठया प्रमाणावर ऊस शिल्लक राहणे यासंबंधी **श्री**.अब्दुल्लाह खान दुर्राणी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.अब्दुल्लाह खान दुर्राणी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"परभणी जिल्ह्यात गाळपाअभावी मोठया प्रमाणावर ऊस उभा असणे, गोदावरी नदीवरील बंधारे तसेच जायकवाडी धरणात पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असल्याने जिल्ह्यात मोठया प्रमाणावर ऊसाची लागवड होणे, परभणी जिल्ह्यातील पाथरी, मानवत, सोनपेठ, परभणी, गंगाखेड, पूर्णा या तालुक्यात मोठया प्रमाणावर ऊसाची लागवड असणे, जिल्ह्यातील ६ साखर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात ३५ लक्ष मेट्रीक टन ऊस उत्पादन होणे परंतु केवळ २० लक्ष मेट्रीक टन ऊसाची गाळप क्षमता असणे, जिल्ह्यातील ३५ लक्ष मेट्रीक टन ऊसापैकी एकट्या पाथरी तालुक्यातच सुमारे १२ लक्ष मेट्रीक टन ऊस उत्पादन होणे, जिल्ह्यातील बहुतांशी साखर कारखाने कार्यक्षेत्राबाहेरील व इतर जिल्ह्यातून ऊस आणून त्याचे गाळप करीत असणे, परिणामी जिल्ह्यातील ऊस गाळपाअभावी उभाच असणे, साखर कारखान्यांना असणारा गाळप परवाना १६० दिवसांचाच असल्याने कारखाने पूर्ण गाळपापूर्वीच बंद होतील अशी भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होणे, कार्यक्षेत्रातीलच ऊस गाळपाबाबत साखर कारखान्यांना बंधन करणे, संपूर्ण ऊस गाळपापर्यंत साखर कारखान्यांना गाळप परवाना वाढवून देणे, तसेच जिल्हयात संपूर्ण ऊस गाळप झाल्याशिवाय साखर कारखान्यांचा गळीत हंगाम बंद न करणे या बाबी आवश्यक असणे, त्याअनुषंगाने समस्येबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब पाटील (सहकार मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

श्री.अब्दुल्लाह खान दुर्राणी : सभापती महोदय, परभणी जिल्हयातील ३६ लाख मेट्रीक टन ऊसापैकी १२ लाख मेट्रीक टन ऊस पाथरी तालुक्यातील आहे. पाथरी तालुक्यात १०० टक्के ओलिताखाली जमीन आहे. पाथरी तालुक्यात दोन कारखाने आहेत. तेथे १७०० ते १८०० मेट्रीक टन ऊसाचे गाळप केले जाते. परिणामी पाथरी तालुक्यातील सर्व ऊस गाळप करण्याची त्या दोन कारखान्यांची क्षमता नाही. लक्षवेधी सूचनेच्या लेखी निवेदनामध्ये असे नमूद केले आहे की, पाथरी तालुक्यातील ऊस श्रीलक्ष्मी नृसिंह शुगर एलएलपी अमडापूर, गंगाखेड शुगर ॲण्ड एनर्जी लिमिटेड, माखणी ता.गंगापूर तसेच ट्वेंन्टीवन शुगर लिमिटेड, उत्तमनगर, देवीनगर तांडा, सायखेडा, ता.सोनपेठ अशा ३ कारखान्यांमध्ये गाळप करण्यात येईल. परंतु सदर तीन कारखान्यांची वाहने अद्याप पाथरी तालुक्यामध्ये आलेली नाहीत. पाथरी तालुक्यात नोंदणीकृत असलेला १२ लाख मेट्रीक टन ऊस आहे. विना नोंदणी केलेला जवळपास ६ लाख मेट्रीक टन ऊस शिल्लक राहण्याची शेतकऱ्यांच्या मनात भीती आहे.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

श्री.अब्दुल्लाह खान दुर्राणी.....

मंत्री महोदयांनी याकरीता बैठक आयोजित करावी. कारण तीन कारखान्यांची वाहने तातडीने गावात पाठवली पाहिजेत. अजून काही गावात फडसुध्दा सुरु झालेले नाही. शेतकरी हवालदिल झालेला आहे. ऊस तोडण्याकरीता १० हजार रुपये एकर प्रमाणे शेतकऱ्यांकडून मागणी केली जाते. त्याकरीता शासन काय नियोजन करणार आहे ?

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदय, राज्यात अनेक ठिकाणी या वर्षी ऊसाचे उत्पन्न मोठया प्रमाणावर वाढलेले आहे. हेक्टरी उत्पन्न व ऊस क्षेत्रातही मोठया प्रमाणावर वाढ झालेली आहे. मराठवाडयातील जालना, परभणी, बीड जिल्हे, सांगली जिल्हयातील आटपाडी, खानापूर, साताऱ्यातील वाई तालुका ऊस उत्पादनात मोठया प्रमाणावर आहे.

सभापती महोदय, साखर आयुक्तालयाच्या माध्यमातून प्रत्येक वेळी नियोजन केले जाते की, साधारणपणे कोणता ऊस कोणी घ्यायचा आहे, तशी अलॉटमेंट केलेली आहे. लक्षवेधी सूचनेमध्ये १६० दिवसाच्या गाळप परवान्याबाबत आलेल्या उल्लेखाबाबत सांगू इच्छितो की, अशी परिस्थिती आली तर तो परवाना पुढे वाढविला जातो. १६० दिवसात कारखाने बंद करावेत असे कोणालाही सांगितले जाणार नाही. संपूर्ण उसाचे गाळप झाले पाहिजे याकरीता नियोजन केले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे पाथरी तालुक्यात ऊसाचे क्षेत्र मोठया प्रमाणावर वाढलेले आहे. तेथील कारखाने पूर्ण क्षमतेने चालू शकले नाहीत व बंद पडले, त्यामुळे त्यांची वारंवार मागणी आहे त्याप्रमाणे नियोजन करुन त्यांच्यापुढे मांडण्यात येईल.

सभापती महोदय, काही ठिकाणी पैसे मागितल्याच्या तक्रारी आहेत, त्याकरीता साखर आयुक्तांनी दूरध्वनी क्रमांक दिलेला आहे, क्रमांकावर संपर्क साधला तर निश्चित कारवाई केली जाईल. परभणी जिल्हयात ऊसाचे क्षेत्र जास्त आहे पण त्याचे नियोजन सरकारच्या वतीने केले जाईल.

असुधारित प्रत

**तालिका सभापती** : हा विषय केवळ परभणीचा नसून मराठवाडा व महाराष्ट्रातील इतर जिल्हयातही आहे. कारण उन्हाळा सुरु होत आहे. शेतकऱ्यांना वाटते की, ऊस राहतो की काय. उन्हाळयात पाणी व वीज मिळत नाही, कसे करायचे हा मोठा प्रश्न आहे. गुत्तेदार शेतकऱ्यांचे शोषण करीत आहेत. ऊस तोडायला आले तर ५ - ७ हजार रुपये मागितले जातात. त्यामुळे शिल्ल्क ऊस व त्यावर करावयाची उपाययोजना याबाबत मंत्री महोदयांनी आढावा घ्यावा, त्यांच्या दालनात बैठक आयोजित करुन हा प्रश्न मार्गी लावावा.

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदय, होय.

-------

असुधारित प्रत

**पृ. शी.** मच्छिमारांना डिझेलचा पूर्ण परतावा न मिळणे

**मु. शी. :** मच्छिमारांना डिझेलचा पूर्ण परतावा न मिळणे या संबंधी

श्री.रविंद्र फाटक, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री प्रविण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, सर्वश्री सुरेश धस, सदाशिव खोत, प्रसाद लाड, गोपिचंद पडळकर, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री निलय नाईक, प्रविण दटके, रमेशदादा पाटील, चंदुभाई पटेल, ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. रवींद्र फाटक (ठाणे तथा पालघर स्था.प्रा.संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ अंतर्गत सुधारित अध्यादेश दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी निर्गमित करूनही अंमलबजावणी होत नसल्याने योग्य ती कार्यवाही न होणे, शासनाने महाचक्रीवादळ व कोरोनामुळे गेल्या वर्षी कोट्यवधी रुपयांची नुकसान भरपाई देणे, त्यातील मच्छिमार महिलांना ६००० रू. सरसकट मदत जाहीर करून शितपेट्या खरेदीच्या GST च्या पावत्या मत्स्य विभागाकडे जमा करण्याचे आदेश रद्द करण्याची केलेली मागणी, प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अद्ययावत मासळी बाजार बांधण्याची होत असलेली मागणी, राज्यातील मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हजारो मच्छिमार यांनी मुंबई, कफपरेड येथे दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी त्यांच्या मागण्यांसाठी आंदोलन केलेले असणे, १२० हॉर्सपॉवरपेक्षा अधिक अश्वशक्ती असणाऱ्या हॉर्सपॉवरच्या नौकांना डिझेल कोटा व परतावा मिळावा म्हणून

असुधारित प्रत

श्री. रवींद्र फाटक.....

मच्छिमारांकडून होत असलेली मागणी, गेल्या चार ते पाच वर्षांपासून मच्छिमारांना डिझेलचा पूर्ण परतावा न मिळणे, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री.अस्लम शेख (मत्स्यव्यवसाय विकास मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

असुधारित प्रत

श्री.रवींद्र फाटक : सभापती महोदय, जीएसटीच्या पावत्या द्याव्यात अन्यथा गुन्हा दाखल केला जाईल, असे पत्र शासनाने मच्छिमार संस्थांना दिले आहे त्यामुळे शितपेटी ऐवजी सरसकट मदत जाहीर केल्यास जीएसटी पावत्याची अट राहणार नाही. त्यामुळे मी विचारु इच्छितो की, शासन सरसकट मदत जाहीर करणार का. महिलांना देण्यात येणारे सहा हजार रुपये देण्यास शासनाने स्थगिती दिलेली आहे. या नवीन प्रस्तावाला शासन कधीपर्यंत मान्यता देईल?

सभापती महोदय, महाराष्ट्रात ३०० कोटीचा डिझेल परतावा देणे प्रलंबित आहे. वित्त विभागाकडून तरतूद वाढवून मिळण्यासाठी मंत्री महोदय कोणते प्रयत्न करणार आहेत.

श्री.अस्लम शेख : सभापती महोदय, शितपेटयांसाठी जाहीर केलेले पॅकेजचे पैसे डायरेक्ट लाभार्थ्यांच्या खात्यात दिलेले आहेत. राज्याचा कायदा असा आहे की, शितपेटी खरेदी करताना जीएसटी भरावा लागतो. पण सभागृहाची व राज्यातील लोकभावना लक्षात घेऊन कॅबिनेटकडे जाऊ व जीएसटी काढण्यासंबंधी प्रयत्न करु.

सभापती महोदय, सबसिडीबाबत सांगू इच्छितो की, मागील काळात ८५ कोटी, ५४ कोटी, ९० कोटी एवढी थकबाकी होती. यावर्षी आतापर्यंत ६० कोटी रुपये वितरीत करण्यात आलेले आहेत, बाकीचे ३९ कोटी रुपये वितरीत करण्यात येतील.

श्री.रमेशदादा पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाचा सागरी मच्छिमारी नियम व व अधिनियम १९८१ अंतर्गत सुधारीत अध्यादेश दिनांक २३ नोव्हेंबर २०२१ रोजी निर्गमित करुनही अंमलबजावणी होत नाही. हा कायदा आपण २०२३ मध्ये निर्गमित केला आहे पण छोटया मच्छिमारांचे मोठया प्रमाणावर नुकसान होत आहे. ते एलईडी व सेसेमीक सर्व्हे करीत आहेत. आपण केलेल्या कायद्याची अंमलबजावणी होत नाही, ती अंमलबजावणी करावी असे मी मंत्री महोदयांना निवेदन करीत आहे. कारण पारंपारिक मच्छिमार अनेक वर्षापासून तेथे काम करीत आहे, मंत्री महोदय दोन वर्षापासून हेच सांगत आले आहेत की, आम्ही त्या कायद्यात सुधारणा करु व दंडात्मक धोरण आखू. पण अद्यापही त्यांना उचित शिक्षा ठोठावली

श्री.रमेशदादा पाटील .....

नाही. आमचे म्हणणे आहे की, त्यांच्या नौका जप्त कराव्यात. त्यांचे लायसन्स रद्द करावे तरच त्यांना शिक्षा होईल व या कायद्याची अंमलबजावणी होईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ६००० रुपये शितपेटयांसाठी सरसकट देत आहात. परंतु तुम्ही त्यांना पावती आणायला लावता, ती पावती ते कोठून आणणार. ते कोठून पावती प्रोडयुस करणार, यानंतर रक्कम दिली जाते. असे न करता सरसकट पेटयांसाठी ६ हजार रुपये देण्यात यावेत. पावतीचा निकष रद्द करण्यात यावा, पावतीचा क्लॉज टाकू नये कारण त्या भगिनी गरीब आहेत. १२० एचपी पेक्षा अधिक पॉवरच्या होडयांसाठी आपण अनुदानाची सवलत देणार आहात, बाकीच्यांना सवलत देणार आहात तशी यांना डिझेल परतावा सवलत देण्यात यावी अशी आमची मागणी आहे.

श्री.अनिकेत तटकरे : सभापती महोदय, सर्वच मच्छिमार बांधवांशी हा प्रश्न निगडीत आहे. उत्तरामध्ये मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, १६७ अनधिकृत नौकांवर कारवाई करण्यात आली आहे. या नौकांपैकी राज्यातील किती व परराज्यातील किती नौका आहेत हे स्पष्ट करावे. व्हीआरसी करीता कागदपत्रांची पुर्तता करुन देखील विलंब होतो. त्यामुळे विहीत वेळेत हे देण्याबाबत आपण निदेश देणार का. डिझेल परताव्याबाबत वारंवार सभागृहात चर्चा होते. २०१७-१८, २०१८-१९ मधील परतावे अजूनही मच्छिमार बांधवांना मिळालेले नाहीत. कोविडचे कारण सांगितले जाते. त्या त्या आर्थिक वर्षात परतावे देण्याबाबत आपण कारवाई करणार का. ६५ कोटी रुपये निधी क्वॅर, तौक्ते चक्रीवादळ ग्रस्तांना जाहीर केला आहे, त्याबद्दल विशेष आभार मानतो. आतापर्यंत फक्त यापैकी ४४ कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. वादळ येऊन दोन वर्षे झाली तरी अजून ३५ टक्के लोकांना नुकसान भरपाई पोहचू शकली नाही याची नेमकी कारणे काय आहेत. ३१ मार्चपर्यंत म्हणजे उर्वरित ८ दिवसात उर्वरित रक्कम लाभार्थ्यांना देणार का. लहान मच्छिमार माझ्या भगिनी आहेत.

यानंतर श्रीमती नाफडे .....

श्री.अनिकेत तटकरे.....

सभापती महोदय, लहान मच्छिमार भगिनी असतात, त्यांना ज्यावेळी अशा पध्दतीचे अनुदान देण्याचा येतो, त्यावेळी संबंधित जसा आता पावत्यांचा विषय झालेला आहे, त्यावेळी नगरपालिकेकडून विक्रीची पावती, ज्यावेळी कर वसूल केला जातो, त्यावेळी त्याची मागणी केली जाते. ज्यावेळी एखादे वादळ येते किंवा प्रलय येतो, त्यावेळी मच्छिमारांच्या घरातील सर्व गोष्टींचे नुकसान झालेले असते. अशा वेळी त्यांच्याकडून पावती मागितली असते. त्यावेळी नगरपालिका किंवा तहसीलदाराने एखादा दाखला दिला की, "हे लोक मत्स्यव्यवसाय करतात." असा दाखला ग्राहय धरला जात नाही. अशा वेळी महानगरपालिका किंवा तहसीलदाराने दिलेला दाखला ग्राहय धरला जाणार का ?

डॉ.मनिषा कायंदे : सभापती महोदय, मला दोनच प्रश्न विचारायचे आहेत. अंमलबजावणी कक्ष किती दिवसात स्थापन करण्यात येईल ? एलईडी पध्दतीने मासेमारी नौका आजी समुद्रात आहेत. मत्स्यव्यवसाय खात्याच्या कारवाईकरिता असलेल्या गस्ती नौकांचे टेंडर संपुष्टात आलेले आहे. आज एकही नौका समुद्रात गस्त घालताना दिसत नाही. त्यांचे टेंडरच संपुष्टात आलेले आहे, याबाबतची शासनाची पुढील उपाययोजना काय आहे ?

श्री.अस्लम शेख : सभापती महोदय, खरे म्हणजे सर्वप्रथम कायद्याच्या संदर्भात सभागृहाला माहिती देत आहे. संबंधित कायद्यानुसार दिनांक २३ नोव्हेंबर,२०२१ ते दिनांक ०३ जानेवारी,२०२२ या कालावधीत विभागातर्फे जबदरस्त कारवाई केलेली आहे. ११ एलईडी नौका, ८१ पर्ससीन नौका, ४३ ट्रॉलिंग नौकांवर, उर्वरित ३२ नौकांवर विभागाने कायद्यानुसार कारवाई केलेली आहे. अशी एकूण विभागाने १६७ नौकांवर कारवाई केलेली आहे. मागील काळात कायदा येण्याच्या आधी यासंदर्भातील कारवाईनुसार आकारण्यात आलेली दंडाची रक्कम ३० लाख रुपये इतकी होती. हा कायदा आल्यानंतर आतापर्यंत विभागाने ५२,७१,४०० रुपयांचा दंड आकारण्याचे काम सरकारने केलेले आहे. यासोबत सुधारित कायदा आल्यानंतर आधुनिक पर्ससीन नौकांवर कारवाई करुन त्यांचे

असुधारित प्रत

श्री.अस्लम शेख......

लायसन्स जप्त करण्याची कारवाई देखील चालू आहे. पर राज्याच्या संदर्भात देखील विचारले गेले की, पर राज्यातील किती नौका आणि त्यापैकी किती नौकांवर कारवाई केली ? ०७ पर राज्यातील नौकांवर शासनाने कारवाई केलेली आहे. जी.एस.टी. च्या संदर्भात मी आधीच सांगितले की, ज्यावेळी आपण पॅकेज जाहीर केले, ज्यावेळी कुठेही खरेदी करायला गेले तर जी.एस.टी.शिवाय वस्तू भेटतच नाही. ती अट ऑलरेडी पॅकेजमध्येच टाकली गेलेली होती. आता याबाबत सभागृहाची जी भावना आहे. विधानसभा सभागृहातील देखील बरेच मच्छिमार संघटनेचे प्रतिनिधी मला भेटलेले आहेत. ते म्हणाले की, ही अट जरा त्यांना भारी जात आहे. याबाबत दोन्ही सभागृहाच्या भावना लक्षात घेता याबाबत मी कॅबिनेटकडे मुव्ह करीत आहे. याबाबत याप्रमाणे आपण प्रयत्न करु. १२० एचपी बाबत सन्माननीय सदस्य बोलत होते. त्याबाबत बोलायचे झाले तर मी असे म्हणेन की, माननीय ऑडिटर जनरल यांनी यामध्ये हस्तक्षेप केलेला आहे, याबाबत आयुक्त कार्यालयाने अभिप्राय शासनाकडे पाठविलेला आहे. याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

सभापती महोदय, पॅकेज जाहीर केल्यानंतर जेवढी मागणी आपल्याकडे होती, ती शासनाने पूर्ण केलेली आहे. जसे आपण सांगितले की, काही मच्छिमार जे असतात, त्यांच्याकडे पुरावा नसतो, त्याबाबत सरकार प्रयत्न करत आहे की, यावर काय मार्ग काढावा. शासनाकडे जेवढे अर्ज आलेले आहेत, त्यांना पैसे दिलेले आहेत. ज्या ज्या पातळीवर म्हणजे दोन-चार-सहा सिलेंडरवाले, मोटराईज्ड, अनमोटराईज्ड असतील या सर्व पातळयांवरील जसजसे अर्ज आले, त्यांना पैसे दिलेले आहेत. उर्वरित बाबत शासन मार्ग काढत आहे. पैसे द्यायचे तर कोणाला द्यायचे, हा देखील एक प्रश्न असतो. असे सरसकट जो आला त्याला पैसे देता येत नाही. ज्यांच्याकडे पावत्या नसतील, त्याबाबत शासन असा विचार करत आहे की, सोसायटीतर्फे त्यांच्याकडे दाखला वगैरे काही असेल, त्यांना सोसायटीतर्फे ॲफिडेव्हिट करुन देता येईल का, यासंदर्भात शासन विचार करत आहे. उर्वरित पैसे देखील लोकांना देण्याचीच शासनाची मानसिकता आहे.

असुधारित प्रत

**तालिका सभापती ( श्री.विक्रम काळे ) :** लक्षवेधी सूचनेवरील चर्चा आता संपलेली आहे.

--------------

असुधारित प्रत

**विशेष उल्लेखाच्या सूचना**

**तालिका सभापती** : आज सोमवार,दिनांक २१ मार्च,२०२२ रोजी म.वि.प. नियम १०१ (अ) अन्वये मला प्राप्त झालेल्या विशेष उल्लेखाच्या सूचनांपैकी मी मान्य केलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सदनाच्या पटलावर ठेवत आहे.

------------------

**तालिका सभापती :** सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.

( दुपारी २.०४ ते २.४५ वाजेपर्यंत मध्यंतर)

---------------

असुधारित प्रत

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी**

ॲड. निरंजन डावखरे : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून एका गंभीर विषयाकडे सदनाचे लक्ष वेधणार आहे.

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था ढासळलेली आहे. ठाणे जिल्ह्यातील शिवसेनाचा पदाधिकारी श्री. मनोज नारकर यांनी त्यांच्या घरामध्ये एक चिठ्ठी पाठविलेली आहे. ती चिठ्ठी वाचून मी सदनाचा वेळ वाया घालविणार नाही. यामधील मजकुर काय आहे तो मी सदनाला सांगणार आहे. श्री. जे.व्ही.डेव्हीड नावाच्या व्यक्तीकडून श्री. मनोज नारकर यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना व मित्रांना धमक्या येत आहेत. श्री. जे.व्ही.डेव्हीड नावाच्या व्यक्तीकडून पैसा आणि सत्तेच्या माध्यमातून पोलीस यंत्रणा माझ्या खिशात आहे, असे तो वारंवार सांगत आहे. श्री. मनोज नारकर हा गेल्या अनेक दिवसांपासून गायब आहे. त्यांच्या जीवाला धोका असू शकतो. त्यामुळे तो हयात आहे किंवा कसे, त्यांच्या जीवाचे काही बरेवाईट झाले असल्यास या सदनाच्या माध्यमातून संबंधित अधिकाऱ्यांना ताबडतोब निर्देश देऊन कारवाई करावी, अशी मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

**सभापती :** शासनाने नोंद घ्यावी.

------------

असुधारित प्रत

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून एका गंभीर विषयाकडे सदनाचे लक्ष वेधणार आहे.

सभापती महोदय, नागपूर कराराप्रमाणे विदर्भ महाराष्ट्र राज्यात सामील झाला होता. त्यावेळी दोन अटी त्यामध्ये समाविष्ट केल्या होत्या. नागपूरला उप राजधानीचा दर्जा द्यायचा आणि वर्षातून एक अधिवेशन नागपूरला अधिवेशन घ्यायचे अशा दोन अटी टाकण्यात आल्या होत्या. सुरुवातीला पहिलेच अधिवेशन नागपूरला झालेले आहे. त्यानंतर गेल्या अडीच ते तीन वर्षापासून एकही अधिवेशन नागपूरमध्ये झालेले नाही. कोरोना महामारीमुळे नागपूर येथे अधिवेशन झालेली नाहीत. विदर्भातील जनतेला दिलेल्या करारामुळे अन्याय होत आहे. विदर्भ महाराष्ट्रात ठेवायचा असेल

तर शासनाला कोणत्याही परिस्थितीत नागपूरला एक तरी अधिवेशन घ्यावे लागेल. सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या भावनेचा विचार करता नागपूर पुढील पावसाळी अधिवेशन झालेच पाहिजे अशी आमची आग्रही मागणी आहे. तसेच त्याच्या पुढील अधिवेशन म्हणजे हिवाळी अधिवेशन नागपूरला आयोजित केले तर आमची काहीच हरकत नाही. आज अर्थसंकल्पीय अधिवेशनातील शेवटच्या आठवड्यातील पहिला दिवस आहे. माननीय राज्यपाल महोदयांकडे प्रस्ताव पाठविला जाणार आहे. त्यावेळी नागपूरचे अधिवेशन नागपूरलाच होईल असे त्यांना आवर्जून सांगण्याची गरज आहे. सभागृहाचे नेते आणि माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी स्वत: सांगितले होते आणि त्यावेळी मी स्वत: म्हणालो होतो की, नक्की का, नाहीतर आयत्यावेळी अधिवेशनाचे ठिकाण बदलाल. त्यावेळी ते हसले आणि पुढे काहीच म्हणाले नाही. त्याप्रमाणे सभागृहाचे नेते आणि माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी हसू नये आणि बोलू नये. त्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार पुढील अधिवेशन नागपूरलाच होईल असे आम्हाला आश्वासन देण्याची गरज आहे. मी उपस्थित केलेल्या पॉईंट ऑफ इन्फर्मेशनला सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील यांनी पाठींबा दर्शविलेला आहे. त्यानुसार माननीय सभापती महोदयांनी माननीय राज्यपाल आणि माननीय मुख्यमंत्री महोदयांना

असुधारित प्रत

सभागृहाच्या भावना कळवाव्यात आणि पुढील अधिवेशन कोणत्याही परिस्थितीत नागपूरला झाले पाहिजे त्यादृष्टीकोनातून मंत्रिमंडळामध्ये निर्णय घ्यावा.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांच्या भावना माननीय मुख्यमंत्री महोदयांपर्यंत निश्चितपणे पोहचवेल.

-----------

असुधारित प्रत

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून एका गंभीर विषयाकडे सदनाचे लक्ष वेधणार आहे.

सभापती महोदय, राज्यातील वीज कंत्राटी कामगारांचा कामगार आयुक्त कार्यालयापासून ते आझाद मैदानात मोर्चा आलेला आहे. माननीय ऊर्जा मंत्री महोदय आणि शासनाने त्यांच्या न्याय हक्कासंदर्भात दखल घेऊन सकारात्मक बैठक आयोजित केली तर वीज कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मोर्चाला न्याय मिळणार आहे. त्यानुसार शासनाने दखल घ्यावी अशी मी विनंती करीत आहे.

**सभापती** : शासनाने दखल घ्यावी.

------

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

**अल्पकालीन चर्चा क्रमांक-२ बाबत**

**सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, माननीय मंत्र्यांना आज शिवछत्रपतींच्या मिरवणुकीत जावयाचे असल्यामुळे त्यांनी सदरहू अल्पकालीन चर्चा पुढे ढकलण्याबाबत पत्राद्वारे विनंती केली आहे. त्यामुळे मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना सांगू इच्छितो की, अल्पकालीन सूचना क्रमांक-२ आपल्या सवडीने घेण्यात येईल.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न तातडीने सोडविण्याची आवश्यकता.

**मु.शी.** : महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न तातडीने सोडविण्याची आवश्यकता, या विषयावर सर्वश्री दिवाकर रावते, विलास पोतनीस, डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम ९७ अन्वये पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

"महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न १९६० पासून प्रलंबित असणे, १९६९ मध्ये शिवसेना प्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या सीमा प्रश्न आंदोलनात ६८ हुतात्मे होणे, बेळगांव, कारवार, बिदर, भालकी सह ८६५ सीमा भागातील गावांचा समावेश महाराष्ट्रात करावा व संयुक्त महाराष्ट्र व्हावा यासाठी हा लढा अनेक वर्षापासून सुरु असतांना हा भाग केंद्रशासित करावा या महाराष्ट्राच्या मागणीकडे सतत दुर्लक्ष हाणे, मराठी जनतेवर अन्य राज्यांकडून सतत अन्याय होत असणे, तेथील मराठी शाळा बंद करणे, मराठी भाषिकांवर कन्नड भाषेची सक्ती करणे, मराठी जनतेने जय महाराष्ट्र अशा घोषणा दिल्यास व सभा मेळावे आयोजित केल्यास गुन्हे दाखल करणे, हेतूपुरस्सर बेळगाव महानगरपालिका बरखास्त करणे, बेळगाव शहराला उपराजधानीचा दर्जा देऊन तेथे कर्नाटक विधीमंडळाचे अधिवेशन घेणे, सीमा भागात मराठी भाषेतील वर्तमानपत्रे बंद करणे, महाराष्ट्राच्या एसटी बसेसना अडविणे, दगडफेक करणे, कर्नाटक राज्याचे सहकार्य मिळत नसल्याने सदरहू सीमा प्रश्न सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असतांना सुध्दा

श्री.दिवाकर रावते....

मुद्दामपणे मराठी भाषिकांना हेतूपुरस्सर त्रास देण्याच्या बाबी लक्षात घेता आपल्या विधानपरिषदेकडून शासनाच्या माध्यमातून मा.सर्वोच्च न्यायालयाला सीमा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबतची विनंती करणे, यासाठी करावयाची योग्य ती उपाययोजना."

सभापती महोदय, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नी अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यापूर्वी या लढ्याचे अविरत सेनापती असलेले प्रा.एन.डी.पाटील हे नुकतेच कालवश झाल्यामुळे त्यांना सदरहू अल्पकालीन चर्चा समर्पित करुन मी त्यांना अभिवादन करतो.

सभापती महोदय, सदरहू अल्पकालीन चर्चा ही महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न माननीय सर्वोच्च न्यायालयात अनिर्णित राहिल्याबाबतची आहे. या अल्पकालीन चर्चेच्या विषयामध्ये पूर्वपीठीका नमूद करण्यात आलेली आहे. मराठी भाषिकांना हेतूपुरस्सर त्रास देण्याच्या बाबी लक्षात घेता आपल्या विधानपरिषदेकडून शासनाच्या माध्यमातून माननीय सर्वोच्च न्यायालयाला सीमा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबतची विनंती करण्यासाठी मी ही अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे. या अल्पकालीन चर्चेच्या माध्यमातून मी ज्या बाबी मांडणार आहे त्यांचा आणि महाविकास आघाडी सरकारचा, किंबहुना ठाकरे सरकारचा काही संबंध नाही. तसेच या सरकारचा या विलंबामध्ये कोणताच सहभाग नाही. कारण मागील दोन वर्षे कोरोनाच्या काळात गेली, टाळेबंदीमध्ये गेली. कोरोना काळात न्यायालयाचे कामकाज आभासी पद्धतीने केले जात होते. कोरोनाच्या काळात महत्त्वाची असलेली न्यायालयीन बाब सुद्धा विचारात घेणे शक्य नव्हते. गेल्या दोन-अडीच वर्षांच्या कालावधीत राज्य सरकारने मनात आणले असते तरी काही करता आले नसते. परंतु तरी सुद्धा या प्रकरणी शासनाने काय प्रयत्न केले या बाबत मला जी माहिती मिळाली आहे ती मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, सर्वप्रथम मी महाविकास आघाडी सरकारचे अभिनंदन करतो. कारण माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाचा उल्लेख सुरुवातीलाच आहे. पूर्वी आपल्याकडे वर्षानुवर्षे एक पद्धत होती की, सीमा प्रश्नाच्या मुद्याचा उल्लेख झाला की, समजले जात होते की, आता माननीय राज्यपालांचे अभिभाषण संपत आले आहे, त्यामुळे आपण उठण्याची तयारी करीत होतो. परंतु भाजपा-शिवसेना पक्षाचे सरकार असताना पूर्वीच्या पद्धतीत बदल केला गेला. योगायोगाने आमचे ज्येष्ठ नेते श्री.सुभाष देसाई सभागृहात आहेत. मागच्या सरकारच्या काळातील माननीय मंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे व डॉ.रणजित पाटील सुद्धा सभागृहात उपस्थित आहेत. भाजपा-शिवसेना युतीचे सरकारचे असताना आम्ही आग्रह धरत होतो की, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात पहिले आला पाहिजे. भाजपा-शिवसेना युती सरकारच्या काळापासून सीमा प्रश्नाचा मुद्दा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात पहिला यावयास लागला. या वर्षीच्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात महाराष्ट्रातील विविध महान व्यक्तींना वंदन केल्यानंतर जो मुद्दा आला तो सीमा प्रश्नाचाच आलेला आहे. सीमा प्रश्नाचा मुद्दा मांडत असताना कर्नाटक सरकारकडून कसा अत्याचार होत आहे हे नमूद केल्यामुळे तो मुद्दा लक्ष वेधणारा ठरला. या वर्षीच्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात सुरुवातीलाच ""माझ्या शासनाचा, महाराष्ट्राच्या सीमावर्ती क्षेत्रातील मराठी भाषिक जनतेच्या हक्कांसाठी उभे राहण्याचा निर्धार आहे. १६ डिसेंबर, २०२१ रोजी बेंगळूरूमध्ये झालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाच्या विटंबनेचा आणि बेळगावमधील मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीच्या अध्यक्षांवर शाई फेकल्याच्या कृत्याचा माझे शासन तीव्र निषेध करीत आहे." असे नमूद आहे. सभापती महोदय, आज शिवजयंतीच्या निमित्ताने कर्नाटक राज्यात छत्रपती शिवरायांचा सुद्धा अवमान होतो याची नोंद मी या सभागृहात करीत आहे. त्यामुळेच या विषयाची तातडी आहे, असे मी विनम्रपणे नमूद करीत आहे.

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, आजची अल्पकालीन चर्चा वेगळ्या संकल्पनेतून उपस्थित करण्यात आली आहे. १२ आमदारांच्या निलंबनासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय विधिमंडळाच्या स्वायत्ततेमध्ये हस्तक्षेप करणारा होता काय ? सभापती महोदय, मी या क्षेत्रातील तज्ज्ञ नसल्यामुळे मी त्यावर भाष्य करणार नाही. परंतु आपण सभापती या नात्याने घेतलेली नोंद आणि या विषयाच्या बाबतीत घेतलेल्या पत्रकार परिषदेतून आपण व्यक्त झाला. त्यातून आम्हाला या सभागृहाचे सदस्य म्हणून जाणवले की, सर्वोच्च न्यायालयाचे विधिमंडळाच्या स्वायत्ततेवर अतिक्रमण तर होत नाही ना ? परंतु हे जाणून घेण्यासाठी या प्रकरणासंदर्भातील संपूर्ण निर्णय प्रक्रिया मी वाचली. सर्वोच्च न्यायालयाने विधिमंडळाच्या अधिकारावर अतिक्रमण केले नाही, परंतु अधिकाराच्या निर्णयावर मत प्रदर्शन करुन तो विषय फिरविला. त्यास माझी हरकत नाही. विधिमंडळाने सुद्धा सर्वोच्च न्यायालयाचा सन्मान करण्यासाठी त्यांचा निर्णय स्वीकारला. परंतु.........त्यामध्ये 'परंतु' हा शब्द आलाच आहे. मी हा 'परंतु' शब्द घेऊनच बोलण्यासाठी उभा आहे. सर्वोच्च न्यायालयाला विधिमंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या बाबतीत व्यक्त होता येत असेल तर विधिमंडळाने सुद्धा व्यक्त का होऊ नये म्हणून मी हा मुद्दा मांडत आहे. मला वाटते आता विधिमंडळाला सुद्धा असे करावे लागेल. कारण प्रत्येक जण आपले अधिकार सांगत असेल तर विधिमंडळाला सुद्धा आपल्या अधिकाराच्या बाबतीत व्यक्त व्हावे लागेल, असे मला वाटते.

सभापती महोदय, हा खटला सर्वोच्च न्यायालयात का नोंदविला गेला ? या लढ्याच्या बाबतीत गेल्या १० वर्षात आपण साधी चर्चा सुद्धा करु शकलो नाही. गेल्या दोन वर्षात तर चर्चा करण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. कारण कोरोना परिस्थितीमुळे अधिवेशन मर्यादित काळासाठी घेतले होते. कोरोना काळात अनेक महत्त्वाचे विषय हे जनतेच्या सुरक्षिततेच्या बाबतीत चर्चिले जात होते. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाच्या बाबतीत १९५६ साली अहवाल आल्यानंतर हा लढा सुरु झाला. १९५६ साली भाषिक राज्य झाले. देशामध्ये एकमेव असे राज्य झाले की जे द्विभाषिक होते. उर्वरित सर्व राज्यांना आपापल्या भाषेनुसार राज्य मिळाले. १९५६

श्री.दिवाकर रावते....

साली मुंबई ही महाराष्ट्राची आहे यासाठी बेळगावकरांनी आंदोलन केले होते. या आंदोलनात चार बळी गेले होते. या लढ्याची सुरुवात तेथून झाली. मुंबई महाराष्ट्राला मिळावी म्हणून बेळगाव येथे दिनांक ९ मार्च, १९५६, १० मार्च, १९५६, १२ मार्च, १९५६ रोजी आंदोलने झाली. जर सत्याग्रह बेळगावात सुरु झाला आणि त्या दरम्यान काही दंगे-धोके झाले तर अत्यंत निष्ठूरपणाने झोडपून काढण्यात येईल, असे तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी लेखी पत्रक काढले होते. यावरुन आपल्या लक्षात येईल की, बेळगावची प्रवृत्ती १९५६ साली म्हणजेच ज्यावेळी बेळगाव-कारवार मागितला नव्हता तेव्हा व्यक्त झाली होती. १९५६ साली बेळगावातून चार बळी देण्यात आले. या सभागृहात चर्चा होण्यापूर्वी या विषयावर प्रदीर्घ चर्चा झाली. १९५६ सालानंतर सीमा प्रश्नावर सर्वात मोठे आंदोलन हे शिवसेनेने १९६९ साली उभे केले होते. त्या आंदोलनातील प्रथम अटक झालेला कार्यकर्ता आज तुमच्यापुढे उभा आहे. त्या आंदोलनातील सक्रीय कार्यकर्ता म्हणून मी आज तुमच्यासमोर उभा आहे. सलग चार दिवस जगाला धक्का देणारी मुंबई न भूतो न भविष्यती बंद झाली होती.

सभापती महोदय, त्यावेळी तत्कालीन गृह मंत्री श्री.मोरारजी देसाई मुंबईत आले होते. माननीय शिवसेना प्रमुखांनी त्यांची गाडी अडवून त्यांना निवेदन देण्याचा प्रश्न उपस्थित झाला होता. माहिम येथे काय प्रकार घडला ते सर्व काही मी सांगत नाही. त्या बाबतीत या सभागृहात चर्चा झालेली आहे. त्या संपूर्ण चर्चेचा बाढबिस्तारा माझ्यापुढे आहे. सर्व बाबींवर सांगावयास लागलो तर फार वेळ लागेल. परंतु या ठिकाणी नोंद झालेली असल्यामुळे मी प्रत्येक गोष्ट नोंदवावी असे नाही. परंतु त्यावेळी झालेली अटक, त्यावेळी झालेली बैठक, बंदी हुकूम मोडणे, दत्ताजी साळवींना अटक होणे, मनोहर जोशी आणि शिवसेना प्रमुखांना एकाच दिवशी पहाटेला अटक होणे, त्यातून आंदोलन उभे राहणे या सर्वांचा मी साक्षीदार आहे. त्यानंतर या सभागृहात चर्चा झाली आणि तद्नंतर तत्कालीन सरकारवर दंगलीच्या

श्री.दिवाकर रावते....

बाबतीत अविश्वासाचा प्रस्ताव आणण्यात आला. त्यावेळी सीमा प्रश्नाला 'दंगल' संबोधले गेले.

सभापती महोदय, सीमा प्रश्नी पहिले चार बळी बेळगाव येथून दिले गेले. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात १०५ हुतात्मे झाले. त्यातील चार बळी हे बेळगाव येथे १९५६ साली दिले गेले.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत

श्री. दिवाकर रावते ....

त्यानंतर या सीमाप्रश्नाचा लढा अधिक तीव्र झाला. आपल्या राज्याकरिता लढत असणारा, बळींची संख्या देणारा या देशामध्ये एकमेव असा पक्ष आहे. शिवसेना प्रमुख व शिवसेना त्यासाठी पुढे होती. बेळगावकरिता शिवसेनेचे ६९ शिवसैनिक हुतात्मे झाले. सन १९६९ मध्ये हे झाले आणि आता आपण सन २०२२ मध्ये उभे आहोत. मोठे आत्मदहन, आत्मार्पण झाले, अनेक जण तुरुंगात गेले. मी देखील त्यावेळी तुरुंगात होतो. लोकांनी लाठ्याकाठ्या अंगावर घेतल्या, अनेकांच्या नोकऱ्या गेल्या, अनेक संसार उद्ध्वस्त झाले. सन १९९५ ला शिवशाही आली. त्यावेळी यांना हुतात्मे मान्यता देण्यासही त्यावेळचे कोणते सरकार तयार नव्हते. हे दंगा करणारे होते असे ते सांगत होते. सीमाप्रश्नाकरिता ते लढले. आत्मबलिदान सीमेकरिता झाले.

सभापती महोदय, आमच्या महिला आघाडीच्या सोनाळकर आई आमच्या पुढ्यात आल्या नसत्या आणि त्यांनी जर माझ्या छातीवरील एसआरपीची बंदूक काढली नसती तर आज मी तुमच्या समोर उभा नसतो. आमच्या त्या सर्व आठवणी आहेत. त्यांना हुतात्मे म्हणण्याकरिता देखील शिवशाही यावी लागली. मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना त्यांना हुतात्म्यांचा दर्जा देण्यात आला. एवढी निष्ठुरता देखील त्यावेळी सीमाप्रश्नाबाबत महाराष्ट्रात दाखविण्यात आली हे अत्यंत विनम्रपणे व खेदाने, दु:खाने मी नमूद करीत आहे. मी हे टीका म्हणून नमूद करीत नाही. नमूद करण्याची आवश्यकता आहे म्हणून मी नमूद करीत आहे. हा लढा सन १९५६ ला सुरु झाला. सन १९६९ मध्ये सीमाप्रश्नाचा लढा प्रचंड पेटला आणि त्यानंतर हा लढा सातत्याने पुढे जावा याकरिता या सदनात प्रत्येक वेळी इकडील अनेक सन्माननीय सदस्यांनी, मग ते कोणत्याही पक्षाचे असोत, त्यांनी प्रयत्न केला. सीमालढा हा महाराष्ट्रातील आपल्या सर्वांचा लढा आहे. तो काही विशिष्ट पक्षाचा लढा नाही. मात्र तरीही मी येथे नमूद करतो की, शेवटी कुठे तरी याबाबत काय करायचे हे ठरविले पाहिजे. प्रत्येक वेळी लढायचे आणि तिकडील लोकांनी कर्नाटकी माणसांचे अत्याचार सहन करीत रहायचे का ?

असुधारित प्रत

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, दिनांक ४ नोव्हेंबर, १९९६ मध्ये शिवशाही आली, त्यावेळी या प्रश्नाला अतिशय मोठी मुसंडी देण्याचा प्रयत्न झाला. मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना दिनांक २४ एप्रिल, १९९७ मध्ये चंद्रचुड समिती नेमण्यात आली. या समितीमध्ये वालावलकर व भंडारे हे दोन सदस्य होते. ३ व्यक्तिंची समिती नेमली. समितीने दक्षतेने काम केले. दिनांक ४ नोव्हेंबर, १९९६ ला नेमलेल्या समितीने दिनांक २४ एप्रिल, १९९७ ला पहिल्या पाच महिन्यांमध्ये सर्व गोष्टींचा अहवाल दिला. आजपर्यंत एवढ्या तातडीने काम करणारी कोणती समिती आपल्या लक्षात नसेल. कारण समिती म्हटले की किचकटपणा असतो. पण या समितीने प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन, त्यावेळी सरकारची त्यातील आवश्यकता लक्षात घेऊन निर्णय दिला. निर्णयामध्ये असे म्हटले की, सर्वोच्च न्यायालयामध्ये आता हा प्रश्न नेला पाहिजे. एकमेकांच्या पध्दतीने हा सुटत नाही. त्याचे काय झाले याचा मी शेवटी उल्लेख करणारच आहे. मध्यस्थीचे नक्की काय चांगले होते आणि आपण त्यावेळी का केले नाही हा विषय त्यावेळचा असू शकतो. आम्ही कार्यकर्ते होतो. तो त्यावेळच्या नेतृत्वाचा विषय होता. समिती नेमून निर्णय केला. दिनांक २४ एप्रिल, १९९७ ला समितीचा निर्णय आला. आमचे युती शासनाचे सरकार साडे चार वर्षांत सन १९९९ ला गेले आणि पर्यायी सरकार आले. विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना यावर पुन्हा एकदा प्रचंड आंदोलन होत आहे हे लक्षात आल्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये दावा दाखल करण्याचे ठरविले. मी त्या दाव्याची क्लिष्टता पुढे मांडणार आहे. ती तात्विक आहे, तांत्रिक आहे.

सभापती महोदय, आपण किती दक्षतेने काम करतो, अधिकाऱ्यांवर विसंबल्यानंतर अधिकाऱ्यांमध्ये त्याविषयी आपुलकी नसेल तर काय घडते हे सुध्दा समजते. फक्त मंत्री होऊन चालत नसते. मंत्र्याची प्रशासनावर अत्यंत मोठी पकड असली तरच कामे होतात. आपल्याला देखील अनुभव आहे. आपण देखील मंत्री होता. सर्वच मंत्र्यांना तो अनुभव आहे. मंत्री कमकुवत असतात असा भाग नसतो. थोडे दुर्लक्ष झाले की, कधी तरी महिन्यांनी, वर्षांनी बाहेर समजते की त्यावेळी असा

असुधारित प्रत

श्री. दिवाकर रावते ....

घोटाळा झाला. सन २००४ मध्ये हा दावा दाखल झाला. आतापर्यंत याच्या ५-६ सुनावण्या झाल्या आहेत. मी त्यावर बोलणार आहे. हा दावा दाखल झाल्यानंतर सीमाप्रश्नाबात माननीय पंतप्रधान व कर्नाटकचे मुख्यमंत्री यांच्या समवेत होणाऱ्या बैठकीत समजुतीने तोडगा काढता आला नाही तर महाराष्ट्र शासनाचा अखेरचा निर्णय म्हणून सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला अशी घोषणा विलासराव देशमुख साहेबांनी केली.

सभापती महोदय, दिनांक १७ जुलै, २००० रोजी मुंबईत आझाद मैदान येथे साहित्य संमेलनाच्या वतीने पत्रकार परिषदेत धरणे धरण्यात आले होते, त्याला उद्देशून हा निर्णय घेण्यात आला. सन २००२ मध्ये पत्रकार परिषद झाली, त्यानंतर २ वर्षांनी निर्णय देण्यात आला.

सभापती महोदय, प्रा. एन.डी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. कालपर्यंत ती समिती होती. प्रा. एन.डी.पाटील साहेब असताना देखील ती होती. त्यांची ज्येष्ठता वगैरे सर्व लक्षात घेऊन पाहिले पाहिजे. आम्ही त्यांच्यापुढे तुलनात्मकदृष्ट्या फारच लहान होतो. चर्चा करण्याचा विषय नव्हता. समितीने याचिकेची प्राथमिक तयारी पूर्ण करुन अनुच्छेद १३१ ब प्रमाणे सर्वोच्च न्यायालयात हा दावा दाखल करण्यात आला. दावा दाखल केल्यानंतर मागणी एकच होती. मला आठवते की, त्यावेळी शिवसेनाप्रमुखांनी अशी विनंती वजा साद सरकारला घातली होती की, आता दावा दाखल केलेला आहे, दाव्याचा निर्णय लागेपर्यंत हा प्रदेश केंद्रशासित करावा. परंतु तशी बाब पुढे आली नाही. का आली नाही हे त्या वकिलांना माहीत होते. तेथे लढण्याचा भागच वेगळा असतो. दावा दाखल झाल्यानंतर मराठी प्रदेश महाराष्ट्रात येणार की बेळगावात राहणार याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयात लागेल. सर्वोच्च न्यायालयात जो निर्णय येईल तो येईल, पण तिकडील अत्याचार मात्र थांबले नाहीत.

असुधारित प्रत

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, दिनांक २८ नोव्हेंबर २००५ रोजी बेळगाव महापालिका बरखास्त करण्यात आली. त्यावेळी आमचे मोहन रावले खासदार होते. त्यांनी त्या संदर्भात शून्य प्रहरात लोकसभेत मोठ्या प्रमाणाज सीमा प्रश्नाबाबत आवाज उठविला होता. मी अत्यंत नम्रपणे ते नमूद करीत आहे. अत्याचार थांबले नाहीत. तुमचे प्रकरण पाहून घ्यावे. सन २००५ मध्ये हे झाल्यानंतर सन २००६ मध्ये कन्नड पोलिसांनी मराठी माणसांवर अमानूष लाठीमार केला. सन २००६ मध्ये सीमाप्रश्नाशी संबंधित आयेजित करण्यात आलेल्या युवकाच्या मेळाव्यामध्ये प्रचंड प्रतिसाद मिळाला म्हणून चिडलेल्या त्यावेळच्या कर्नाटक सरकारने त्या मेळाव्यात पोलीस घुसवून प्रचंड अत्याचार केला. अत्याचार चालूच राहिले. आपण हतबलतेने फक्त निषेधापलीकडे काहीही करु शकत नव्हतो. काहीही करु शकलो नाही. महाराष्ट्रातून जाणाऱ्या एसटी बसेस तोडून टाकण्यात आल्या. महाराष्ट्रात येणाऱ्या लोकांना अडविण्यात आले. त्यावेळी आमचे रामदासभाई विरोधी पक्षनेते होते. त्यांनी त्यावेळी बेळगावमध्ये घुसण्याचा प्रयत्न केला होता. पण शेवटी इतर राज्य आणि हे राज्य यामध्ये फरक आहे. ते आपल्याला सहन करावे लागत आहे. तिकडील मराठी माणसांना बराच अत्याचार सहन करावा लागत होता. हा अत्याचार थांबला का ?

सभापती महोदय, एवढा सर्व गोंगाट, घोष होऊन, राज्याने निषेध करुन काहीही नाही. सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायाधीश सर्व पाहत असतात. हल्ली तर भयानक पाहत असतात. प्रत्येक गोष्टीचा किस पाडायचा म्हटले तर न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या १०० घटना सांगता येतील. हे यामध्ये कशासाठी पडतात हा प्रश्न पडावा. परंतु तो त्यांचा विषय आहे. आपण त्याबाबतीत तज्ज्ञ नाही किंवा त्याबाबतीत बोलू शकत नाही. आपण ते योग्य आहे असे म्हणायचे आहे. आता सर्वोच्च न्यायालयात रात्री ९ वाजता देखील प्रकरणे दाखल होतात. न्यायाधीशांच्या जेवणाचा प्रश्न असतो. एरव्ही आवाज केला तरी खाट असा आवाज होतो. आपण न्यायालयात बसून शेजारच्या व्यक्तिशी बोललो तर तेथे खाटकन हातोडे आपटतात. एवढा त्यांना क्लेष होत असतो. रात्री ९ वाजता व्यवस्था करतात. सुनावणी रात्री दीड, दोन वाजता होते.

श्री. दिवाकर रावते ....

मग निर्णय होतो. हल्ली न्यायाधीशांचे असे काही तरी चालले आहे. मी नवीनच ऐकत आहे. पूर्वी संध्याकाळी ५ वाजता न्यायालय बंद झाले की बंद असायचे, दुसऱ्या दिवशी यावे लागायचे. मात्र आता असे चालू आहे. आपल्याला तांत्रिक काय असते ते माहीत नाही, पण त्यावरुन प्रश्न नको. हल्ली येथे सभागृहात काही बोललो आणि चुकून असेल तर न्यायालयाचा अवमान वगैरे काही सांगता येत नाही, कशाने अवमान होईल हेही सांगता येत नाही.

सभापती महोदय, सन २००९ मध्ये सीमाप्रश्नाची झळ प्रवाशांना बसू लागली. प्रवाशांना मारझोड होऊ लागली. कर्नाटक सरकारने मराठी भाषिकांच्या महामेळाव्याला उपस्थित असणाऱ्या लोकांवर लाठीमार केला. सन २००९ मध्ये ज्येष्ठ प्रा. एन.डी.पाटील यांच्यासारख्या अनेक नेत्यांना अटक झाली. सन २००५ बाबत सांगितले आहे. सन २००६ बाबत सांगितले आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राला इंचही जागा देणार नसल्याचे वक्तव्य कर्नाटकचे मुख्यमंत्री श्री. येडीयुरुप्पा यांनी केल्ल्याच्या निषेधार्ह येथे शिवसेनेने त्यांच्या पुतळयाचे दहन केले.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते....

मंगळवारी दुपारी शालीमार चौकात कार्यकर्त्यांनी पुतळा जाळला. प्रचंड घोषणा देत कर्नाटकचा निषेध केला. सातत्याने शिवसेना कधीही मागे राहिली नाही. प्रत्येक वेळी शिवसेनेने रस्त्यावर उतरुन कर्नाटक मधील लोकांनी हात वर केला तर तो थांबविण्याचा प्रयत्न शिवसेनेने केला. कर्नाटक पोलिसांनी दडपशाहीच्या मार्गाने बेळगावातील मराठी महामेळावा उधळल्याने सीमा भागात निर्माण झालेल्या तणावाचे वातावरण कायम आहे. बिदर जिल्ह्यात कन्नड कार्यकर्त्यांनी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे दहन करुन आम्हाला विरोध करण्याचा प्रयत्न केला. शिवसेनेचा उल्लेख मराठी जिहाद असा केल्याने संतापलेल्या शिवसैनिकांनी शिवसेनेच्या बेळगाव येथील कार्यालयात कन्नड प्रभा या दैनिकाची होळी केली. सन २००९ मध्ये असे प्रकरण घडले आहे. सर्वोच्च न्यायालयात केस दाखल झाल्यावर कर्नाटक सरकारने अत्याचार थांबविले नाहीत हा आमचा भाग आहे असे सांगून मराठी माणसांवरील अत्याचार थांबविले नाहीत.

सभापती महोदय, सन २०१० मध्ये महाराष्ट्रात सीमा भागावर अन्यायाची परिसीमा असा अग्रलेख वर्तमानपत्रात आला होता. दोन राज्यातील सीमा प्रश्न सोडविण्याची अंतिम सत्ता वा अधिकृत अधिकार केंद्र शासनाचे तसेच संसदेचे आहेत. या पातळीवर मराठी राजकीय पक्षनेते अपूरे ठरले म्हणून हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात नेणे भाग पडले. त्यासाठी आवश्यक तो पाठपुरावा करण्यासाठी राज्यातील प्रशासनाची सजगता व कार्यक्षमता देखील दुबळी ठरत असल्याची भावना मराठी जनमानसात निर्माण झाली असून त्यामुळे न्याय संस्थेवरील विश्वास उडण्याची वेळ आली आहे असे अग्रलेखात नमूद केले आहे. हे मी मांडत असताना मला विनम्रपणे सांगायचे आहे की, त्या कक्षाला मी पूर्वी भेट दिली होती परंतु आज हा विषय सभागृहात मांडण्यापूर्वी मी आज सकाळी त्या कक्षात जाऊन आलो त्याची सर्व छायाचित्रे माझ्याकडे आहेत. तेथे कशी परिस्थिती आहे, तेथे काय केले आहे. मला सांगतांना अत्यंत खेद होतो. माननीय मंत्री श्री.सुभाष देसाई याची तातडीने दखल घेतील याची मला खात्री आहे. या प्रश्नात माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव बाळासाहेब

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते....

ठाकरे यांनी लक्ष घातल्यानंतर त्यांनी यासंदर्भात काय म्हटले त्याचा उल्लेख माझ्या भाषणात पुढे येईल. याबाबत त्यांच्या भावना अत्यंत तीव्र आहेत. त्या कक्षात मी गेलो तर तेथे बसण्यासाठी जागा नाही. तेथे दोन खुर्च्या व एक जुने टेबल आहे. तेथील सामान अत्यंत जुने आहे. तेथे फक्त चार कर्मचारी आहेत. त्यामध्ये एक अधिकारी व दोन मुली आहेत. चर्चेसाठी तेथे बैठक व्यवस्था नाही. तेथील सर्व साहित्य धुळखात पडले आहे. त्या कक्षासाठी १७ कर्मचारी मंजूर असून आता फक्त ४ कर्मचारी तेथे आहेत. सर्व कारभार वाऱ्यावर सुरु आहे. मला सांगण्यास खेद होतो की, माननीय मंत्री श्री. सुभाष देसाई हे आपणासाठी महत्वाचे आहे. फेब्रुवारी २०२१ ते मार्च २०२२ या १३ महिन्यांच्या कालावधीत १३ सचिव बदलले आहेत. यामध्ये श्रीकांत देशपांडे, अशोक सिन्हा, आभा शुल्का, आनंद लिमये, लोकेश चंद्र, विकासचंद्र रस्तोगी, इंद्रा मालो, सुमंत भांगे व संजय चहांदे या प्रमाणे सचिवांच्या बदल्या झाल्या आहेत. आपणाला सीमा प्रश्न सोडवायचा आहे. १७ पैकी चार कर्मचारी आहेत, मी कायदेशीर बाबी सांगेल तेव्हा आणखी गंभीर विषय समोर येतील. इतके सचिव बदलतात ही आपल्या राज्याची परिस्थिती आहे. सर्वोच्च न्यायालयात सुनावणी असली की, स्वत: मुख्यमंत्री महोदय व गृह मंत्री महोदय वकीलांना भेटायला जात. हे सर्व वर्तमानपत्रात छापून येत होत व त्यांची छायाचित्रे येत होती की,हे सर्व लोक भेटायला गेले आहेत.

सभापती महोदय, या सर्व बाबी दुर्लक्षित आहेत. या काळातील हे नसेल तरी या काळात सचिव कसे बदलले ते मी आपणास सांगितले आहे. सन २०१० मध्ये मुंबईत पुन्हा आंदोलन झाले. सीमा भागातील व बेळगावातील मराठी जनतेवर कर्नाटक सरकार करीत असलेल्या अन्यायाविरोधात सनदशीर मार्गाने आंदोलन सुरु असताना मुंबईत बेळगांवकरांनी आझाद मैदान येथे आंदोलन केले. तिकडे मार खावा लागतो म्हणून ते आंदोलन करण्यासाठी इकडे आले. महाराष्ट्रात आपणाला सुरक्षितता आहे. सन २०१० मध्ये आंदोलन केले त्यामुळे सीमा भागातील मराठी माणसांच्या जखमेवर मीठ चोळण्याच्या दृष्टीने मध्यंतरी बेळगांव कर्नाटक

श्री.दिवाकर रावते....

विधानसभेची बैठक घेण्यात आली. कर्नाटकची उप राजधानी बेळगांव केली. बेळगाव कोणाचे महाराष्ट्राचे की, कर्नाटकचे याबाबत सर्वोच्च न्यायालयात खटला सुरु आहे. बेळगाव कसे घेऊन जातो ते आम्ही बघतो म्हणून त्यांनी बेळगांवला उपराजधानी करुन टाकले. याबाबत न्यायालयाने काहीही केले नाही. याबाबत त्यांना थांबविण्यात आले नाही. न्यायालय शांतपणे बघते, इतर कोणतेही शब्द मी वापरीत नाही. असेच बोलावे लागते. कर्नाटकातील भाजप सरकारने एकापाठोपाठ उचललेल्या पावलांवर राज्यातील भाजप पक्षाने मराठी माणसाच्या बाजूने निषेधाचा शब्द नोंदविला नाही. तुम्ही आमचे आहात, आपण एका रक्ता मासाचे आहोत, आपल्या रक्तामासाची माणसे तिथे आहेत. किमान आपल्या सरकारला सांगायला पाहिजे की, अरे असे करु नका. इतका अत्याचार करु नका. त्याबाबत कधी निषेध केल्याच्या नोंदी नाहीत.

सभापती महोदय, कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ अशी म्हण आपणाकडे आहे. सन २०१० मध्ये सर्वोच्च न्यायालयात केंद्र शासनाने शपथपत्र दाखल करण्याचा आग्रह धरला होता. केंद्र शासनाने शपथपत्र दाखल केले. अत्यंत खेदजनक ही बाब आहे. याबाबत माझ्या तोंडून असे शब्द येणे म्हणजे मलाच कधी तरी दु:ख होते. सीमाप्रश्नी केंद्र शासनाने कर्नाटकाची बाजू शपथपत्र देऊन अधिकृत रित्या घेतली आहे. महाराष्ट्राच्या पाठीत चक्क खंजीर खुपसला. त्यावर व्यंगचित्र आले होते. बेळगांव व गुलबर्गा हे भाग कर्नाटकाचे आहेत असे प्रतिज्ञापत्र देऊन केंद्र शासन नेहमी मराठी बांधवांना सापत्न वागणूक देते हे दाखवून दिले. भाषा हा सीमा ठरविण्याचा एकमेव निकष असू शकत नसल्याचे सीमावर्ती मराठी भाषिक भाग महाराष्ट्रात सामील करता येणार नाही. अशी भूमिका केंद्र शासनाने सुप्रीम कोर्टात शपथेवर मांडली आहे.(...अडथळा...) आपण चिंता करु नका, सन २०१० मधील मी घटना सांगत आहे, मी कोणाला दोष देण्यासाठी हे सांगत नाही. जे झाले ते मी सांगतो. आपण कशाला विचारीत आहात, पणती असताना आपली भूमिका काय होती. मी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात होतो. मी १० ते १२ वर्षाचा असल्यापासून

श्री.दिवाकर रावते....

लढणारा कार्यकर्ता आहे. बेळगांव कर्नाटकात राहिले काय व महाराष्ट्रात आलो काय ते भारतात आहे ना अशी भूमिका घेणाऱ्या जनसंघाची तुम्ही नवी आवृत्ती आहात. मला विचारले तर मी याबाबत भरपूर सांगेन. मी थोडक्यात तुमची ओळख करुन दिली. तुमच्याकडे जे नवीन आले त्यांना ओळख करुन द्यायला पाहिजे की, ते कोठे बसले आहेत. असे शपथपत्र देणारे त्यावेळचे केंद्रीय गृहमंत्री होते. कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ हे शिवराज पाटील चाकूरकर होते. ते मला बऱ्याच वर्षानंतर भेटले होते. आम्ही त्यांचा आदर करीत होतो. त्यादृष्टीने ते मोठे आहेत. मी त्यांना सांगितले की, साहेब रामराम आता मी तुम्हाला लांबून पण रामराम करीत नाही कारण हा विषय माझ्या डोक्यात होता.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते..........

केंद्र सरकार महाराष्ट्राबरोबर कसे वागते ? आजही त्याची उजळणी तशीच करता येईल. केंद्र सरकारच्या भुमिकेमुळे अनेक वर्षांपासून कानडीची गळचेपी सहन करणाऱ्या सीमा बांधवांना धक्का बसला. नेहमी काळा दिवस, युवा मेळाव्यात जाऊन विरोध करणाऱ्या राज्यकर्त्यांच्या मनसुब्यास केंद्र सरकारने सुरुंग लावला. कर्नाटकातील भाग मागतिल्याप्रकरणी महाराष्ट्र सरकारला दंड ठोठावला पाहिजे अशी आग्रही भूमिका केंद्र सरकारने घेतली. केंद्र शासन एवढ्यावरच थांबले नाही तर महाराष्ट्र सरकारला दंड ठोठवावा असे शपथपत्र दाखल केले. भावना कशा मांडाव्यात असा प्रश्न पडतो. माननीय शिवसेनाप्रमुख याविषयी अत्यंत कठोर शब्दात बोलले होते. ते जे बोलले होते ते मी सभागृहात मांडू शकत नाही. ते वर्तमानपत्रात छापून आलेले आहे. मी दिनांक ८ जुलै, २०१९ रोजीची गोष्ट सांगत आहे. केंद्र सरकार भाषा हा निकष मानण्यास तयार नसेल तर सर्व राज्ये बरखास्त करण्यात यावीत, असे परखड प्रतिपादन शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी केले. महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्नावरुन केंद्र सरकारने महाराष्ट्र सरकारला दंड ठोठावण्यात यावा असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयात केले. केंद्र सरकारच्या या भूमिकेवर तीव्र प्रतिसाद महाराष्ट्रातून उमटत आहे. विविध राजकीय नेत्यांनी आपल्या प्रतिक्रिया कठोर शब्दात व्यक्त केल्या. कर्नाटक राज्यात राहणाऱ्या मराठी भाषिकांवरील अन्यायासाठी कर्नाटक सरकारपेक्षा केंद्र सरकारच जास्त जबाबदार आहे, अशी टीका ठाकरे यांनी केली. सीमा प्रश्नासाठी केलेल्या संघर्षात ६९ शिवसैनिकांनी हुतात्म्य पत्करले. याच मुद्यावर आपल्याला तीन महिन्यांचा कारावास झाला होता, असे त्यावेळी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी नमूद केले होते. सन २०१० मधील प्रतिज्ञापत्राबाबत हा संताप व्यक्त करण्यात आला होता.

सभापती महोदय, सन २०११ मध्ये जागतिक कानडी सम्मेलन मराठी माणसाच्या छाताडावर नाचण्यासाठी जाणीवपूर्वक बेळगाव येथे आयोजित करण्यात आले. ते ऐकण्यासाठी तयार नव्हते. सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्राची मागणी

श्री.दिवाकर रावते..........

दाखल झाली होती. सर्वोच्च न्यायालयात मागणी करता काय असे दर्डावून सांगत प्रत्येक वर्षी एक एक पाऊल पुढे टाकले जात होते. सन २०११ मध्ये जागतिक कानडी सम्मेलन जाणीवपूर्वक बेळगावात आयोजित करण्यात आले. कर्नाटक सरकारने सम्मेलनासाठी बेळगावची निवड करुन या प्रश्नी सुंभ व पीळ कायम असल्याचे दाखवून दिले. हा त्या दिवशीचा सामना वृत्तपत्राचा अग्रलेख आहे. या सम्मेलनासाठी बेळगावात प्रचंड पोलीस फोर्स उभी करुन मराठी माणसांची दुकाने, टपऱ्या तोडण्यात आल्या, दुकानांवरील मराठी पाट्या उतरविण्यात आल्या. मराठी भाषिकांची जी मुस्कटदाबी सुरु आहे त्यामुळे कानडी भाषेचे दिवे उजळणार नसून या भाषेचा एक प्रकारे अवमान झालेला आहे. कारण हे सम्मेलन कानडी भाषेच्या विकासासाठी नसून केवळ बेळगावातील मराठी बांधवांना डिवचण्यासाठी, चिडविण्यासाठी भरविण्यात आले आहे. येडियुरप्पा सरकारचे १० हजार पोलीस बेळगावात घुसले, ते मराठी माणसांना सतावतात व कर्नाटक सरकारमधील मंत्री श्री.उमेश कट्टी हे मराठी माणसांना धमकावून तुरुंगात डांबण्याची भाषा करतात, असे सन २०११ मध्ये दर्डावून सांगण्यात आले. त्यावेळी मी सभागृहात भाषण केले होते. मी त्या भाषणातील शेवटचा भाग मुद्दाम वाचून दाखवितो. त्यावेळी जे उप मुख्यमंत्री होते तेच आजही उप मुख्यमंत्री आहेत. त्यांच्या स्वभावाची दाद देण्यासाठी मी त्यावेळी असे म्हटले होते की, माननीय उप मुख्यमंत्री आक्रमक आहेत. ते काम करतात याकडे आमचे लक्ष लागलेले असते. त्यांनी बेळगावमध्ये घुसण्याचे जाहीर करावे. आमचे शिवसैनिक कमी पडत नाहीत. तू पुढे जा असे आम्ही कधीच सांगत नाही. ती आमची पद्धत नाही. आम्ही पुढे जाऊन दुसऱ्यांना सुरक्षित करतो. कारण आमच्यावर तसे संस्कार आहेत. आम्ही त्यांच्या खांद्याला खांदा लावून पुढे येण्यास तयार आहोत. उलट त्यांना मागे ठेऊ आणि आम्ही पुढे राहू. महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री म्हणून त्यांच्या अंगावर लाठी पडू देणार नाही. प्रथम आम्ही लाठी झेलू. परंतु बेळगावातील कानडी माणसाला संपविण्यासाठी आपण आक्रमकता दाखविणार आहात किंवा

श्री.दिवाकर रावते..........

नाही, असा प्रश्न मी त्यावेळी उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार साहेबांना विचारला होता. शिवसैनिक पक्ष बघत नाही. तुम्ही पुढे जावे, आम्ही तुमच्या बरोबर येतो, आम्ही लढू, आम्ही सर्व अंगणावर घेऊ, असे मी सांगितले होते.

सभापती महोदय, सन २०१४ मध्ये वर्तमानपत्रात जो लेख छापून आला होता त्याचे शीर्षक खूप मोठे होते. महाराष्ट्रातील मराठी माणसाचे या प्रश्नातील आक्रंदन व्यक्त करणारे ते शीर्षक होते. अत्रे गेले, ठाकरे गेले आता गांडुळ उरले असे ते शीर्षक होते. आपले महानगर वृत्तपत्रात ही बातमी छापून आली होती. त्यावेळी महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील मराठी लोकांना कर्नाटक पोलिसांनी अनानुष मारहाण केली. ही मारहाण मानुसकीला काळीमामा फासणारी आहे. कारण पोलिसांनी मराठी फलकांसाठी आंदोलन करणाऱ्या रस्त्यावरील अनेक मराठी लोकांची काठ्यांनी डोकी फोडली, अनेकांचे हातपाय मोडले तसेच तरुणांबरोबर वृद्धांनाही झोडपून काढले. कानडी पोलिसांचे शौर्य इतक्यावरच थांबले नाही तर त्यांनी मराठी लोकांच्या घराचे दरवाजे फोडले. दरवाजे फोडून घरात शिरले. घरात शिरुन त्यांनी मराठी लोकांना काठ्यांनी बेदम मारहाण केली. त्यातून बायकांचीही सुटका झाली नाही. त्यांना शिविगाळ करीत त्यांची कानशील फोडली. तसेच त्यांना काठ्यांनी बेसुमार मारहाण केली. पोलिसांनी, दंगेखोरांनी मराठी लोकांच्या घरात दगड फेकून काचेची तावदाणे फोडली. घरात शांतपणे बसलेल्या लोकांना बेदम मारहाण केली. सन २०१४ मधील ही बातमी आहे. आपण सन २००४ मध्ये सर्वोच्च गेलो. आम्ही देशाच्या सर्वोच्च न्यायालयात टाहो फोडत आहोत आणि कर्नाटकी पोलीस तेथे लाठ्या काठ्यांनी आमची डोकी फोडत आहेत. परंतु तेथील जज्ज मंडळींच्या पोटातील पाणी सुद्धा हालत नाही की, हे काय चालले आहे ? ते याबात काहीही बोलत नाहीत. एरवी बरोबर लक्ष असते. सुमोटो म्हणजे स्वयंघोषित गुन्हे दाखल करणे, एखाद्या गुन्हाची नोंद करुन घेणे, सुनावणी घेणे, सरकारला नोटीस पाठवून आम्हाला माहिती द्यावी असे न्यायालय सांगते. न्यायालयाला तो अधिकार आहे.

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते..........

घटनेने दिलेल्या अधिकारात थोडे इकडे तिकडे पाऊल पडले तर सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालय गप्प बसत नाही. न्यायाधीश जागरुक असतात, ताबडतोब सुमोटो दखल घेतली जाते. परंतु एवढे सर्व होत असताना मराठी माणसाचा आवाज दिल्लीपर्यंत पोहोचत नाही. सीमा भागातील मराठी लोकांना अमानुष मारहाण झाल्यामुळे महाराष्ट्रातील मराठी नेत्यांनी पेटून उठावयास पाहिजे होते. आम्ही पेटून उठलो तर आमचे ६९ हुतात्मे झाले. त्यावेळी त्यांचे गुंड म्हणून वर्णन करण्यात आले, हे सर्व आम्ही सहन केले. कर्नाटकी पोलीस सातत्याने मराठी लोकांवर अन्याय करीत आहेत. वर्तमानपत्रात छापून आलेली छायाचित्रे बघितल्यानंतर चीड येते. त्यावेळी वर्तमानपत्रात वेगवेगळी छायाचित्रे छापून आली होती. कन्नड पोलिसांचा हैदोस, मराठी भाषिकांची डोकी फोडली, घरात घुसून दगडफेक, लोकांना भांड्यांसह रस्त्यावर फेकले अशा बातम्या त्यावेळी वर्तमानपत्रात छापून आल्या होत्या. सन २०१४ मध्ये मराठी माणसांवर झालेल्या अत्याचाराची भयानक छायाचित्रे वर्तमानपत्रात छापून आलेली आहेत. आम्ही सन २००४ मध्ये सर्वोच्च न्यायालयात गेलो. मी सन २०१७ मध्ये मंत्री होतो. बेळगावात जय महाराष्ट्र म्हटल्यामुळे पोलिसांनी सर्वांना झोडपून काढले होते. पोलीस घराघरात घुसून जय महाराष्ट्र म्हणावयाचे नाही अशी दमबाजी करीत होते. मी ४-५ वेळा तेथे गेलो होतो. त्यावेळी पोलीस कशा प्रकारे माझ्या गाडीचा पाठलाग करीत होते या संदर्भातील बातम्या वर्तमानपत्रात छापून आलेल्या आहेत. माझ्या गाडीचा पाठलाग करणारी पोलिसांची जीप उलटल्यामुळे ७-८ पोलीस जखमी झाले होते. ज्यावेळी मी नाट्संमेलनासाठी गेलो त्यावेळी पोलीस स्टेजच्या मागे उभे होते. मी माझ्या पद्धतीने भाषण केले. आपल्याला आदेश मिळाल्यानंतर आपण थांबायचे नसते. आम्हाला माननीय श्री.उद्धव ठाकरे साहेबांनी आदेश दिल्यानंतर आम्ही तेथे गेलो. आम्ही अटक होईल म्हणून घाबरणारे सैनिक नसल्यामुळे आम्हाला कोणताही प्रश्न पडत नाही. जय

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते..........

महाराष्ट्र म्हणण्यासाठी विरोध ? आम्ही अस्मितेचा झेंडा हाती घेतला. त्यावेळी मला पोलिसांनी रोखल्याच्या बातम्या वर्तमानपत्रात छापून आल्या होत्या. त्यावेळी मी मंत्री होतो. मी तेथून परत आल्यानंतर महत्वाचा निर्णय घेतला.

यानंतर श्री.सांगळे.......

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते......

तेथील महाराष्ट्राच्या बसेसवर महाराष्ट्र परिवहन व त्याखाली जय महाराष्ट्र असे कायमस्वरुपी नमूद केलेले आहे. त्यांच्याशी प्रतिकार करायचा म्हणून आम्ही बसेसवर जय महाराष्ट्र असे छापले आहे. त्यानंतर त्यांनी ती बस अडवली. ती बस संपूर्ण महाराष्ट्रातून जात असताना सांगली, सातारा, कोल्हापूर, सांगली अशा भागांमध्ये त्या बसचे चांगल्या प्रकारे स्वागत झाले. तेथील लोकांनी बसची आरती करुन ती बस रवाना केली. परंतु त्या बसमधील वाहक व चालकांना अटक करण्यात आली. मी त्यानंतर तेथील गृह मंत्र्यांना दुरध्वनीवरुन संपर्क साधला व त्यांना माझ्या भाषेत शुध्द इंग्रजीमध्ये काय सांगायचे ते सांगितले. कारण त्यांना मराठी भाषेत सांगितले व ते त्यांना समजले नाही तर काय करायचे ? तसेच ते असंसदीय असल्यामुळे मी येथे त्याबाबत काही सांगू शकत नाही. परंतु मी त्यांना सर्व अधिकृतपणे सांगितले. रात्री एक वाजता त्यांच्यावरील गुन्हे दाखल करण्यात आले होते. अशा प्रकारे बेळगावच्या संदर्भात ते आपल्याबद्दल आक्रमकता दाखवतात. ही दिनांक २९ ऑगस्ट, २०२१ मधील घटना आहे. तेथे पदवीपर्यंत कन्नड भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. आमच्या येथे मराठी अनिवार्य करतो म्हटल्यानंतर मोठा विरोध केला जातो. तसेच मंत्री महोदयांना स्पष्टपणे लिहावे लागते की, तुमच्या शाळेमध्ये मराठी शिकवले नाही तर आम्ही तुम्हाला दंड करु. परंतु शाळांकडून असे सांगितले जाते की, तुम्ही आमच्याकडून दंड घ्या. परंतु आम्ही शाळेमध्ये मराठी शिकवणार नाही. अशा प्रकारे आम्हाला महाराष्ट्रात मराठीकरिता अरेरावी ऐकावी लागते. मी १९५६ पासून तेथे सुरु असलेल्या अत्याचारासंबंधी सांगत आहे. याबाबत आपण सर्वोच्च न्यायालयात गेलो. तेव्हा पासून झालेले अत्याचार मी आपल्यासमोर मांडलेले आहेत. सभापती महोदय, मला एक बाब विनम्रपणे नमूद करायची आहे. मी या कक्षाचे मनापासून स्वागत करतो. सदर कक्षामध्ये अनेक गोष्टी अपूर्ण असताना देखील त्यांनी याबाबतची कार्यवाही केलेली आहे. महाविकास आघाडी शासन सत्तेवर आल्यानंतर माननीय मुख्यमंत्री यांनी केलेल्या पहिल्या भाषणामध्ये सीमा प्रश्नासंबंधी मत व्यक्त केले आहे. आपल्याकडे याबाबतची नोंद झालेली आहे. आपण मागील वर्षी सर्व सन्माननीय सदस्यांना

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते......

कर्नाटक महाराष्ट्र सीमावाद संघर्ष व संकल्प नावाचे पुस्तक दिलेले आहे. सदर पुस्तकामध्ये शासनाने आजपर्यंत कशा प्रकारे प्रवास केलेला आहे याची माहिती दिलेली आहे. ठाकरे सरकारच्या काळात या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले याचा मला अभिमान वाटतो. या पुस्तकामुळे सर्वांना माहिती मिळत आहे. माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी सदर पुस्तकामध्ये व्यक्त केलेले मत मला अतिशय महत्त्वाचे वाटते. सभापती महोदय, मी आतापर्यंत सदनामध्ये जे काही सांगितले आहे त्यातून या सरकारची बांधिलकी अत्यंत प्रामाणिकपणे व्यक्त होत आहे. सदर पुस्तकामध्ये मत व्यक्त करताना माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे असे म्हणतात की, "सीमा प्रश्न हा माझ्या अंत:करणाच्या अत्यंत जवळचा विषय आहे. सीमा भागातील मराठी भाषिकांची गळचेपी, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधात लढण्याचे बाळकडू मला कुटुंबातूनच मिळाले आहे. प्रबोधनकार ठाकरे यांच्यापासून मला सीमा लढयाचा वारसा मिळाला आहे. हिंदूहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या दृष्टीने सीमा प्रश्न अत्यंत जिव्हाळयाचा होता. आपल्या हयातीत त्यांनी महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न मार्गी लावला नाही. याबाबत त्यांना मोठी खंत होती. सन १९६९ मध्ये झालेल्या तीव्र आंदोलनात अनेक जणांना आपले प्राण गमवावे लागले. आंदोलनामुळे शिवसेना प्रमुखांना तुरुंगवास घडला. सीमा भागातील जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी झालेला तुरुंगवास शिवसेना प्रमुखांनी पुरस्कार मिळाल्याप्रमाणे आपल्या मनात आयुष्यभर जपून ठेवला. एखाद्या आंदोलनासंबंधी एखाद्या नेतृत्त्वाकडून शेवटपर्यंत भावना व्यक्त होत राहणे ही बाब कदाचितच आपल्याला बघावयास मिळेल." अशा प्रकारे माननीय मुख्यमंत्री यांनी पुस्तकात आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. त्या आम्हाला अतिशय आदरणीय आहेत. मला याबाबत मोठा स्वाभिमान वाटत आहे.

सभापती महोदय, माननीय श्री.शरदचंद्र पवार यांनी याच पुस्तकाच्या माध्यमातून असे मत व्यक्त केले आहे की, समितीचे कार्यकर्ते आणि नागरिकांच्या मी अनेकदा भेटी घेतलेल्या आहेत. १९८६ च्या कन्नड सत्तेविरोधातील आंदोलनात मी

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते......

सहभागी झालो आहे. स्वातंत्र्य भारतातील सनदशीरपणे सुरु असलेला हा अतिशय अभूतपूर्व लढा आहे असे मला वाटते. बा.र. सुकथनकर, बळवंतराव साईनाथ, बाबुराव ठाकूर, दाजीबा देसाई, एन.डी. पाटील यांच्या योगदानाचा मी आवर्जून उल्लेख करतो. अशा प्रकारे माननीय श्री.शरदचंद्र पवार यांनी या आंदोलनाचा सन्मान केलेला आहे. शासनाने तसेच शिवसेनेने हा प्रश्न सोडलेला नाही. मला सांगताना अभिमान वाटतो की, डिसेंबर, २०२१ मध्ये माननीय श्री.विनायक राऊत, लोकसभा गटनेते यांनी माननीय पंतप्रधानाकडे यासंबंधी एक निवेदन दिले. त्या अनुषंगाने माननीय पंतप्रधानांनी महाराष्ट्रातील सर्व खासदारांची एक बैठक घेतली व सीमा प्रश्नासंबंधी खासदारांनी आपापले मत मांडावे अशी त्यांनी विनंती केली. खासदारांच्या पत्रामध्येच सदर उल्लेख असल्याचे त्यांनी सांगितले. मी त्याबद्दल माननीय पंतप्रधानांना धन्यवाद देतो. अशा प्रकारे आपले पंतप्रधान असल्यामुळे आपल्याला या संदर्भात केंद्र शासनासमवेत निश्चितपणे आक्रमक स्वरुपात हक्काचे भांडण निर्माण करता येईल. माननीय श्री.विनायक राऊत यांनी माननीय पंतप्रधानांकडे दिलेले निवेदन माझ्याकडे उपलब्ध आहे. सदर निवेदनामध्ये त्यांनी माननीय पंतप्रधानांना आवर्जून सांगितले आहे की, आपल्याला यात लक्ष घालावे लागेल. सदर निवेदनावर त्यांनी खासदारांच्या सह्या घेतल्या. परंतु त्यावर फक्त शिवसेनेच्या खासदारांनी सह्या केल्या, भारतीय जनता पक्षाच्या एकाही खासदाराने त्या निवेदनावर सही केली नाही व त्याकरिता त्यांनी नकार दिला. ही अतिशय दुर्दैवी गोष्ट आहे. या संदर्भात बेळगाव येथे महाराष्ट्र एकीकरण समिती कार्यरत आहे. परंतु भारतीय जनता पक्षाने त्या समितीचा पाडाव करुन बेळगाव महानगरपालिकेमध्ये भारतीय जनता पक्षाचे कमळ फुलवले. आता मराठी माणसांची महानगरपालिका राहिली की नाही ? असे आपल्याला बोलता येणार नाही. अशा प्रकारे तुम्ही राजकारणात पुढे गेला आहात. याबाबत जनतेचा कौल आहे वगैरे ठीक आहे. परंतु बेळगाव हा आमचा भाग आहे असे सांगणाऱ्या व त्याकरिता सातत्याने ६० वर्षे लढणाऱ्या मराठी माणसाच्या मतदानाने आम्ही मातब्बरपणे यावर मात करु. तुम्ही महाराष्ट्र एकीकरण समितीला धुळीस मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. याकरिता तुम्हाला लक लाभ

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते......

होत असताना ३ महिन्यांपूर्वी माननीय पंतप्रधानांनी स्वत:हून खासदारांच्या बैठकीत आपले मत सांगावे असे सांगितले होते. महाराष्ट्राच्या वतीने याबाबत एक निवेदन तयार केल्यानंतर त्यावर तुमच्या पक्षातील एकाही खासदाराने सही करण्यास नकार देणे यावरुन आपली याबाबतची असलेली भूमिका दिसून येत आहे. माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे याबाबत दक्षतेने पाठपुरावा करीत आहेत. प्रबोधनकार ठाकरे, माननीय शिवसेना प्रमुख ते माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची तिसरी पिढी सीमा लढयाच्या संदर्भात सहभागी आहे.

सभापती महोदय, न्यायव्यवस्थेच्या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, मी मघाशी सदनामध्ये न्यायालयामध्ये या संदर्भात ७-८ सुनावण्या झाल्यासंबंधी सांगितले. सन २०१७ मध्ये न्यायालयामध्ये याबाबतची शेवटची सुनावणी झाली होती. आता सन २०२२ सुरु आहे. सन २०१७ नंतर सीमा प्रश्न संपला. त्या नस्तीला गाठ बांधून टाकली. तसेच जेव्हा न्यायाधीशांना कधी आठवण येईल की, हा प्रश्न अद्याप आहे का, तेव्हा ती नस्ती उघडणार आहात का ? आपण त्यांना ती नस्ती उघडण्यास सांगणार आहात की नाही ? मला अतिशय मनापासून आनंद होत आहे की, तेथे श्री. देसाई साहेब आहेत. या कामाच्या संदर्भातील त्यांचे सामर्थ्य मला माहीत आहे. किचकटपणा मोकळा करुन तो कशा प्रकारे मार्गी लावावा याबाबत मी त्यांना ३५ ते ४० वर्षांपासून बघत आहे. मी ॲडव्होकेट जनरल श्री.कुंभकोणी साहेब यांना दुरध्वनी केला होता की, मला या संदर्भात आपली भेट घ्यावयाची आहे. परंतु माझी त्यांच्यासमवेत भेट होऊ शकली नाही. ते कामात व्यस्त असतील. अशा प्रकरणांमध्ये कायदेशीर माहिती घेतल्यास ती बरी असते. परंतु मला त्यांच्याकडून सदर माहिती मिळू शकली नाही. श्री.शिवाजीराव जाधव हे दिल्लीमधील सर्व कामे बघतात. आपण त्यांना "ॲडव्होकेट ऑन रेकॉर्ड" असे म्हणतो. इतर वकिलांच्या गटामध्ये श्री.परमजीत सिंह व इतर ४-५ वकील आहेत.

यानंतर श्री.गागरे....

श्री. दिवाकर रावते .....

संतोष काकडे नावाचे एक वकील असून ते मिस्कील आहेत. ते पुण्यात बिल्डर व्यावसायिक आहेत. उर्वरित वेळेत ते वकिली व्यवसाय करतात. त्यांची नेमणूक कशासाठी केली होती. पुणेकरांना विद्वतेची बारीकसारीक जाण असते या भावनेतून कदाचित केली असेल, मला माहिती नाही. खटला उभारणारे महत्वाचे वकील म्हणजे तज्ज्ञ एक्सपर्ट आपण त्यांना नेमले आहे. कोणत्या भागात किती मराठी माणसे आहेत याचा त्यांनी मागोवा घ्यायचा आहे. भाषेची, शिक्षणाची, आर्थिक परिस्थिती काय आहे याबाबत अहवाल तयार करुन देण्याकरीता ते आहेत. माधवराव चव्हाण ज्येष्ठ विधिज्ञ, राजू रामचंद्रन, हरीष साळवे येऊ शकतील. हरीष साळवे हे उभे राहिले तर हा निर्णय १०० टक्के लागेल याची आपणासही खात्री आहे. आपण मागे एकदा या प्रकरणी त्यांचा उल्लेख केल्याचे मला आठवते. ते आता इंग्लंडमध्ये स्थायीक झाले आहेत, पण त्यांना याकरीता आणले पाहिजे. के परासरन, राजेश द्विवेदी, बिरजा अशा सर्व लोकांनी हे तयार करायचे आहे. मी जास्त खोलात जात नाही. पण यासाठी संतोष काकडे यांची नियुक्ती केली आहे. अहवाल तयार करुन हे करण्याऐवजी पॅनलमध्ये देखील ते घुसले आहेत. दोन्हीकडून बिल कसे मिळेल, आतापर्यंत त्यांनी एक कोटीपर्यंत फी घेतलेली आहे. माझ्याकडे सर्व माहिती आहे पण बाकीचे मी काही बोलत नाही. जीवनमरणाचा प्रश्न येतो तेव्हा कसे लढायचे असते ते महाराष्ट्र व देशाला माननीय श्री.उद्धव ठाकरे यांनी या कोरोनाच्या लढयात दाखवून दिले आहे. मराठी लोकांकरीता आपण सर्वस्व समर्पित केले पाहिजे ते केले जाते काय याचाही शोध घ्यावा लागेल. अशी ही परिस्थिती आहे. या संदर्भात सुरुवातीस दावा दाखल झाला. त्याबाबत खूप वाईट वाटते, आपण अभ्यासक आहोत पण त्यातील तज्ज्ञ नाही. सर्वोच्च न्यायालयात राज्य सरकारला किंवा केंद्र सरकारला जाता येते, वैयक्तीक दावे वेगळे असतात. कोणीतरी टूम काढली की, एकीकरण समिती बेळगावकरांनी दावा करायचा. तो नॉट मेंटेंनेबल होता, म्हणजे तो अदखलपात्र होता. तो अदखलपात्र न होता महाराष्ट्र सरकारचा दावा व्हावा. वाह्यातपणाचे कंगारे मी येथे नमूद करीत आहे. आपणास किती लक्ष द्यावे लागेल. ते झाल्यानंतर मी नमूद केलेल्या बिल्डर वकीलाने साक्षीपुरावे तयार करुन दाखल करायचे आहेत. त्याची तयारी

श्री. दिवाकर रावते .....

आजही झालेली नाही अशी माझी माहिती आहे. झाली असेल तर मला आनंद आहे. एक अहवाल तयार झाला तर तो सहा वेळा बदलण्यात आला. महाजन अहवालात बेळगाव सोडता इतर भाग महाराष्ट्राला देण्यास हरकत नाही असे नमूद केलेले आहे. तेथील लोकांना वाटले की, एकीकरण समितीचा काही संबंध नाही, महाराष्ट्र सरकार लढत आहे. आपण त्याबाबत सर्व पुरावे जमा करायचे आहेत. ते तेथे आयुष्य काढत आहेत, मला त्याबद्दल म्हणायचे नाही, त्यांनी केले पाहिजे. त्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. न्या.लढ्ढा यांनी सांगितले की, नॉन मेंटेनेबल आहे की मेंटेनेबल आहे हे न पाहता आपण साक्षीपुरावे घेऊ व याचा निर्णय घेऊ. आपल्या बाजूने ते बोलतील. तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने नाही सांगितले, अपात्र आहे की पात्र आहे हे अगोदर ठरवा मग बोलू असे सांगितले. अपात्र ठरले तर आपले काय होईल. २००४ मध्ये आपण न्यायालयात गेलो सध्या २०२२ सुरु आहे. अपात्र ठरला तर सर्व मुसळ केरात ही म्हण सिध्द करण्याकरीता आम्ही कटीबध्द आहोत का असा प्रश्न निर्माण होतो. जर उद्या पात्र किंवा मेंटेनेबल ठरला तर साक्षी पुरावे तीन महिन्यात नियम व कायद्याप्रमाणे द्यावे लागतील. आपण त्याची तयारी केली आहे का. तिकडे मराठी माणूस बेळगावी दंडुक्याखाली सातत्याने भरडला जात आहे. २०२१ पर्यत मी सर्व प्रसंगी सांगितले आहेत, वेळ आली आपण सर्व तयारीत राहावे, अशी आमची तयारी हा होत नाही. १२ महिन्यात १२ सचिव बदलणार असाल तर कशी तयारी होणार आहेत. कोणावर तरी जबाबदारी टाकली पाहिजे हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, मी शेवटचे मुद्दे मांडतो. आदरणीय शरद पवार यांनी मध्यस्ती केली होती. तेव्हा नरसिंह राव होते. विरप्पा मोईली तेथील मुख्यमंत्री होते. नरसिंह राव यांनी दोघांना बसविले होते. त्यावेळी बेळगावच्या विभाजनावर खूप छापून आले होते. हे कधी सांगायचे त्याला महत्व आहे. नवीन बेळगाव स्थापन करणे, पण यामध्ये तडजोड होऊ शकली नाही. ते झाले असते तर आज हा विषय राहिला नसता. पण आज तो माझा विषय नाही. मग राज्याने तडजोड करावी असे सर्वोच्च न्यायालयाने एकदा सांगून पाहिले. केंद्र व राज्यात तडजोड व्हावी असेही

असुधारित प्रत

श्री. दिवाकर रावते .....

सांगून पाहिले. संसदेने प्रश्न सोडवावा का असेही सांगून पाहिले. माझी विनंती आहे की, महाराष्ट्रातील १२ आमदार निलंबित झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने ज्या पध्दतीने भूमिका घेतली त्या भूमिकेचे मी स्वागत करतो. कोणी चुकत असेल तर कान पकडायला लागत असेल, तसे कोणी दुर्लक्ष करीत असेल तर त्याचे डोळे उघडण्याकरीता कोणीतरी घटनेच्या चौकटीत काम करावे अशी माझे मत आहे. युतीच्या काळात माननीय श्री.चंद्रकांतदादा पाटील तिकडे जात होते, आम्ही त्यांच्याशी बोलायचो, पण तेथे ते गप्पा मारुन यायचे. आज मंत्री महोदय श्री.सुभाष देसाई या चर्चेला उत्तर देणार आहेत हे पाहून मला अधिक उत्साह आला. इतक्या खोलात गेले तर मला काही प्रश्न दिसणार नाहीत. थोडे दुर्लक्ष झाले आहे, मागील दोन वर्षात हा प्रश्न मार्गी लागेल अशी परिस्थिती नव्हती. माननीय मुख्यमंत्री व शिवसेना पक्ष प्रमुख श्री.उद्धव ठाकरे यांची तळमळ मी व्यक्त करुन दाखवत आहे. प्रबोधनकारांपासून त्यांनी तो लढा पाहिला आहे व स्वत: ते त्यात उतरणारे हे मुख्यमंत्री आहेत. निश्चितच बेळगावातील मराठी माणसांकरीता जाणीव व नेणीव असतील व त्यांना १०० टक्के साथ देणाऱ्या असतील. जेव्हा जेव्हा संघर्ष झाले तेव्हा तेथे जाण्याचे आदेश त्यांनी आम्हाला दिलेले आहेत. त्याचा आम्ही प्रचार केला नाही.

सभापती महोदय, विधिमंडळाचे असे मत आहे, विधिमंडळ सर्वपक्षीय आहे. त्यामुळे तातडीने सर्वोच्च न्यायालयाने निर्णय घ्यावा. आपण तडपेने या संदर्भात बैठक व पत्रकार परिषद घेऊन विधिमंडळाचा व सर्वोच्च न्यायालयाचा अधिकार याबाबत आपण चर्चा केली त्यामुळे आम्हालाही ते बरे वाटले. असे अधिकारी आपणही अभ्यासले पाहिजेत.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

श्री.दिवाकर रावते......

आपण दर महिन्याला या संदर्भातील एक बैठक घ्यावी आणि त्याचा अहवाल सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांकडे पाठवून सतत त्यांच्या दारावर खणखण करावी. म्हणजे विधीमंडळ अधिक सरकार असे एक एकत्र सामर्थ्य यापुढे भविष्याकरिता या प्रश्नाला गती देण्याकरिता उपयुक्त ठरेल. बेळगांवमध्ये तिसरी पिढी आलेली आहे, ते मराठीबरोबर कानडी शिकलेले आहेत. चौथी पिढी आल्यानंतर पूर्ण कानडी होऊन हा प्रश्नच विरुन जाईल का ? अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होईल. पिढयान्‌पिढया महाराष्ट्रामध्ये हा प्रश्न आहे. आज छत्रपती शिवाजी महाराजांच्या तिथीनुसार असलेल्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्या कर्नाटकाला धडा शिकविण्याकरिता आज आपण वचनबद्ध होऊ या. अशा प्रकारचा एक वेगळा निर्णय जाहीर केला गेला किंवा एखादा प्रस्ताव मांडून या विधानपरिषदेचा एक ठराव मांडून त्याला एक-एक मताने मंजूरी घेऊन तो जरी केंद्राकडे पाठविता आला तर बरे होईल. यामुळे राज्य शासनाच्या प्रयत्नांना फार मोठी बळकटी येईल, याची मला खात्री आहे.

सभापती महोदय, एवढं सगळं मांडल्यानंतर कालपर्यंत जे कॉमन मिनिमम प्रोग्रॅम हा जो काही शब्द आहे, तो मला कळलेला नाही. कॉमन म्हणजे....अडथळा.... तो कॉमन प्रोग्रॅम असू शकतो परंतु मिनिमम काय असू शकते ? म्हणजे कमीत कमी आम्ही एकमेकांना सांभाळून घेऊ, असा त्याचा अर्थ गृहित धरायचा का ? म्हणजे किमान-समान कार्यक्रम असा त्याचा अर्थ आहे.

सभापती महोदय, काल सामना वृत्तपत्राने या संदर्भात रोख-ठोक भूमिका मांडल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. सर्व देशभर जर काश्मिर फाईल्स जर चालत असेल तर बेळंगाव फाईल्सचे व्यंगचित्र छापले तर ते आता चालू व्हावी, अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करुन माझे मनोगत येथेच थांबवितो.

सभापती महोदय, या प्रश्नावर माझे विचार मांडण्याकरिता या सभागृहामध्ये मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपले मन:पूर्वक आभार मानतो. जय हिंद, जय महाराष्ट्र, जय शिवराय !

---------------------------

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मांडलेल्या अल्पकालीन चर्चेवर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, सदर चर्चा या ठिकाणी उपस्थित करुन संसदीय प्रणालीमध्ये एक वेगळा विषय सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मांडलेला आहे. कारण सर्वोच्च न्यायालयाला आपण याबाबत एक ठराव करुन पाठवावा, अशी मागणी त्यांनी केलेली आहे. मला वाटते की, भारतातील सर्व राज्यांमध्ये अशा प्रकारचा एक ठराव सर्वोच्च न्यायालयाला देण्याची पहिली वेळ असेल, असे मला मी आतापर्यंत केलेल्या वाचनावरुन वाटत आहे.

सभापती महोदय, मी आपल्याला देखील बेळगावकर, सीमा भागातील जनतेच्या वतीने धन्यवाद देत आहे. असा विषय या ठिकाणी मांडता येतो का, किंवा यावर सर्वोच्च न्यायालयात कळवू, असे म्हणता येते का ? सर्वोच्च न्यायालयामध्ये विधिमंडळ अशा प्रकारचा एक ठराव करुन पाठवू शकते का ? ही देखील एक विचार करण्यासारखी गोष्ट आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी याबाबत आता सभागृहामध्ये जे-जे मुद्दे मांडलेले आहेत, त्या मुद्दयांच्याही मागे जाऊन मी सांगत आहे. १९५७ मध्ये या संदर्भातील समितीचे आमदार निवडून आले. सरकार स्थापन करण्याच्या परिस्थितीत त्यावेळी ते होते. त्यावेळी श्री.उद्धवराव पाटील यांना मुख्यमंत्री करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. बाकीचे काही मी बोलत नाही. पण समितीचे आमदार होते, समितीचे आमदार प्रजा समाजवादी, समाजवादी, जनसंघ, शेकाप या पक्षांचे होते. समितीमध्ये १९६५ साली समिती फुटली. ते म्हणाले की, ते त्यावेळी आम्ही केले. मी वयाच्या सहाव्या वर्षी बेळंगावला गेलो होतो. बेल्हारीच्या तुरुंगामध्ये आमचे काका श्री.दत्ता पाटील यांना अटक करण्यात आली होती. बेल्हारीच्या तुरुंगात ते नऊ महिने अटक होते. गाडीमध्ये बसायचे होते, तेथे जायचे म्हणजे आम्हाला गाडी दिली होती, त्यामध्ये बसून फिरायचे होते. मला आठवते की, अलिबाग तालुक्यातील दहा नेते समितीमध्ये होते.

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील......

ही वेगळीच आंदोलने त्यावेळी होत होती. १९६७ सालापर्यंत या राज्यात समितीच्या नावावरच कॉंग्रेसेतर पक्ष एकत्रितपणे लढत होते. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेला इतिहास बरोबर आहे. सन्माननीय श्री.सुभाष देसाई आपण म्हटले की, बोलू नका, परंतु तरीही दोन-तीन गोष्टींचा मी खुलासा करतो. सन २०१४ सालानंतर एन.डी.पाटील या समितीचे अध्यक्ष नव्हते. सन २०१४ मध्ये युतीचे सरकार आले. त्यावेळी सन्मानननीय श्री. चंद्रकांत पाटील यांना या समितीचे अध्यक्ष केले गेले. सीमा प्रश्नासंदर्भातील समितीचे अध्यक्ष श्री.चंद्रकांत पाटील यांना केले गेले. चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मी सांगत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितली ती खरी गोष्ट आहे. बेळगावमधील जी जनता मुंबई –महाराष्ट्रात राहिले पाहिजे, म्हणून जे आंदोलन झाले, त्यामध्ये तीन हुतात्मे झाले. ते आंदोलन दाजीबा देसाई आणि बॅरीस्टर नाथ-पै यांच्या नेतृत्त्वाखाली झाले होते.

सभापती महोदय, बेळगावबाबत जो कार्यक्रम असतो, आझाद मैदानावर हा कार्यक्रम असतो. मी दोन वेळा तेथे प्रमुख पाहुणे म्हणून गेलो होतो. तेथे पूर्वी हजारो लोक जमत होते. मी गेलो त्यावेळी शंभर लोक होते. आज जवळ जवळ तेथे चौथी पिढी तेथे आह. आता त्या बेळगावकरांना आणि तेथील चौथ्या पिढीला बेळगाव आणि सीमा प्रश्न माहिती नाही. जी प्रतिक्रिया कर्नाटकमध्ये होते, ती महाराष्ट्रात होत नाही. केवळ ते कोल्हापूरकर करतात. मी देखील ते करत नाही, कोणीच करत नाही. मी सहानुभूतीपूर्वक बोलतो परंतु प्रत्यक्ष तसे होत नाही. आपण बोललात ती खरी गोष्ट आहे. शिवसेनेचा १९६६ साली जन्माला आली. १९६९ मध्ये वेगाने शिवसेना सीमाप्रश्नाच्या आंदोलनात सहभागी झाली होती. मुंबई त्यावेळी संपूर्णपणे बंद होती, त्यावेळी मी मुंबईला चुनाभट्टीला माझ्या आत्याकडे होतो. संपूर्ण मुंबई बंद होती, रेल्वे सेवा देखील पंधरा दिवस बंद होती. एकदम तंग वातावरण त्यावेळी मुंबईत होते. आज ते वातावरण मुंबईत आपण करु शकत नाही. मी देखील त्यामध्ये दोषी आहे. आपण सहानुभूतीने बोलतो केवळ परंतु आता आपण ते करु शकत नाही.

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील.......

सभापती महोदय, याबाबत चर्चा झाली पाहिजे. हा प्रश्न गंभीर आहे. हा वेगळा मुद्दा मांडलेला आहे. केवळ ठराव करुन उपयोग नाही. यांनी देखील बोलले पाहिजे. कोण प्रत्यक्ष मनापासून किती बोलत आहे, केवळ उडवाउडवीने कोण बोलत आहे, याची प्रतिक्रिया काय येणार आहे, यावर केवळ बोलले जात आहे, याबाबत सर्वच जण दोषी आहेत. यामध्ये असे नाही की, आपण एकटे आहोत, बाकी कोणी नाही, शिवसेना पक्षाने देखील एकेकाळी केंद्रामध्ये सरकारला पाठिंबा दिला होता. आमची तर ताकद कमी आहे. आम्ही आमच्या परीने सीमाप्रश्न कधीच बाजूला केला नाही आणि सोडलाही नाही. मला वाटते की, या बाबतीत बेळगावकरांवर आपण अन्याय करीत आहोत. बेळंगावचा सीमाप्रश्न किती तालुक्यांचा आहे, तर तो केवळ साडे तीन तालुक्यांचा आहे. मी जर चुकत असेल तर हा प्रश्न केवळ साडे तीन तालुक्यांचा आहे. मला वाटते की, मी जर यात चुकत असेल तर मी माघार घेईल. बेळगांवकर देखील आता ऐकत असतील, आता यावर चर्चा होत आहे. साडे तीन तालुके जरी आपण सोडवू शकत नाही. प्रत्येक सरकारने, केंद्र सरकारने देखील बेळगांवकरांवर अन्याय केलेला आहे. केवळ बेळगांवच नाही तर बिदर, भालकी आपण विसरलातं का ? " बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर, भालकी सह संपूर्ण महाराष्ट्र झाला पाहिजे " अशा मताचे आपण असले पाहिजे. ही गोष्ट आपली आहे. आज याबाबतची ही घोषणा देखील आमच्यासारख्या नवीन पिढीला माहितीच नाही. मी जर चुकत नसेल तर सन्माननीय सदस्य श्री.महादेवराव जानकर यांना देखील हे माहिती नसेल. आमचा जन्मच बेळंगावच्या आणि सीमा प्रश्नाच्या आंदोलनाच्या सुरुवातीला झालेला आहे. म्हणून ज्या पध्दतीची चर्चा सभागृहात मांडलेली आहे, ती ऐतिहासिक चर्चा आहे. ही चर्चा व्यापक झाली पाहिजे. या चर्चेचे पडसाद उमटले पाहिजेत. विधीमंडळ, न्यायालय, निवडणुक आयोग हे तीन टप्पे आहेत. या तीन टप्प्यांना स्वतंत्र अधिकार आहेत.

यानंतर श्री.सोनावणे......

श्री. जयंत प्र. पाटील........

या विषयावर गांभीर्याने चर्चा झाली पाहिजे. सर्वपक्षीय आमदार त्यासाठी पाठींबा देत आहेत. उद्या रस्त्यावर आंदोलनासाठी किती लोक येतील हे बघितले पाहिजे. आपला दबाव आहे. आज आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने राज्य करीत आहोत. त्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाची विटंबना झाल्यामुळे महाराष्ट्र राज्य माझ्यासह सर्व ठप्प झाले होते. गणपतीच्या मूर्तीची विटंबना केली तर समाज पेटून उठतो. केवळ कोल्हापूर जिल्ह्याने निषेध केलेला आहे. महाराष्ट्र राज्याने निषेध केला आहे अशी केवळ कागदोपत्री नोंद केलेली आहे. बेळगावनंतर त्यांची मजल बँगलोरला देखील पोहचलेली आहे. त्यामुळे आपले राज्य ठप्प आहे. बेळगावमधील जनतेला आम्ही हतबल झालेलो आहोत, आता आम्ही काहीच करु शकत नाही, असे एकदा तरी सांगून टाकण्याची आवश्यकता आहे. या प्रकरणी एन.डी. पाटील साहेबांनी बाजू मांडली होती. राज्य शासनाने या प्रकरणी माननीय सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. माननीय सर्वोच्च न्यायालयात आपण हरलो तर हा प्रश्न मिटला, आपल्याच पायावर दगड मारला असे होईल. मी चुकत नसेल तर कर्नाटक राज्यापेक्षा आपल्या राज्यातील खासदारांची संख्या जास्त आहे. उत्तर प्रदेशमधील खासदारांची संख्या जास्त असल्यामुळे त्यांचा पहिला क्रमांक लागत आहे. महाराष्ट्र राज्याला का करता आले नाही, आपला दबाव का नाही. लोकसभेत महाराष्ट्र राज्यातील खासदारांचा तिसरा क्रमांक आहे. राज्य बघत आहे. कर्नाटक राज्यातील लोक या विषयावर आपली मते मांडणार आहेत. ही चर्चा गांभीर्याने झाली पाहिजे आणि त्यामध्ये आपण सर्वजण एक आहोत असे चित्र निर्माण झाले पाहिजे. याविषयी कोणतेही राजकीय मतभेद दाखवायचे नाहीत. सीमा भागाच्या संदर्भात दोन ते तीन प्रस्ताव पाठविलेले आहेत. स्व. अंतुले साहेबांनी "माझ्या नावाची चिरफाड" करणारे पुस्तक इंग्रजीमधून लिहलेले आहे. माझे आणि स्व. अंतुले साहेबांचे कधीच व्यक्तीगत मतभेद नव्हते. राजकीय स्वरुपात आमचे त्यांच्याशी मतभेद होते. महाजन अहवाल कोणी आणला ? या अहवावर देखील चर्चा होण्याची गरज आहे. माझा राजकीय प्रवास हा सीमा लढ्यातून झालेला आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीमध्ये

श्री. जयंत प्र. पाटील........

शेकाप पक्षातील ६ आमदार निवडून येत असे आणि शेवटपर्यंत ३ आमदार होते. त्यावेळी दाजीबा देसाईंचा खूप प्रभाव होता. त्यावेळी त्यांनी सायकल व चालत बेळगावचा प्रश्न सुटावा म्हणून मुंबईपर्यंत मार्चा आणल्याचे आपण सर्वांनी बघितलेले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मी तयार झालेला एक कार्यकर्ता आहे. त्यामुळे त्यामधील जवळीकपणा आणि इतिहास मला माहीत आहे. त्यामुळे या विषयासंदर्भात आपल्याला निर्णयाप्रती यायला लागेल. माझी मागणी आहे की, प्रत्येक अधिवेशनात अशा प्रकारचा ठराव माननीय सर्वोच्च न्यायालयात पाठविण्याची गरज आहे. आज सदनाने सहमती दर्शविल्यानंतर सदरहू ठराव माननीय सर्वोच्च न्यायालयात पुढील कार्यवाहीसाठी पाठविला जाणार आहे. हा सभागृहाचा ठराव आहे. हा ठराव विधानसभेने देखील केला पाहिजे. त्या ठरावावर माननीय अध्यक्ष आणि माननीय सभापती महोदयांची स्वाक्षरी घेऊन माननीय सर्वोच्च न्यायालयात पुढील कार्यवाहीसाठी पाठविला पाहिजे. अशी कार्यवाही दोन ते तीन दिवसांमध्ये करावी लागणार आहे. देशातील संविधान जीवंत आहे हे दाखवून देण्याची गरज आहे. या विषयी इतिहास सांगितला आहे. प्रत्येकांनी आपल्या परीने प्रयत्न केलेले आहेत. बेळगावमधील चार पिढ्यांना महाराष्ट्रातील संस्कृती दाखवून विचलित केलेल्या आहेत. आज मराठी भाषा राहिली नाही तर भविष्यात माझ्या नातवाला इंग्रजी शाळेत शिक्षण घेण्यासाठी पाठवावे लागणार आहे. आज देखील शासनाला इंग्रजी शाळांमध्ये मराठी भाषा विषय अनिवार्य करता आलेला नाही. इंग्रजी भाषेतील शाळा अशा म्हणतात की आम्ही तुमचे काहीच वाकडे करीत नसल्यामुळे तुम्ही आमचे काहीच वाकडे करु शकणार नाहीत. कायदा झालेला आहे पण त्याची अंमलबजावणी होताना दिसून येत नाही. इंग्रजी शाळातील प्रस्तापित संस्थाचालक असे म्हणतात की, आम्ही तुमचे ऐकणार नाही, आम्हाला तुमची गरज नाही, आमची युनिर्व्हसिटी ब्रिटन आणि सिंगापूरची आहे. बिदरचा आमदार आणि भालकीचा आमदार एकीकरण समितीमध्ये सन १९६७ पर्यंत होता. एकीकरण समितीमध्ये ९० टक्के आमदार हे शेकाप पक्षातील होते. त्यावेळी दाजीबा देसाईंचा

श्री. जयंत प्र. पाटील........

प्रभाव होता. शहरामध्ये नाथ भाईंचा प्रभाव होता. तरुण भारतचे जे ठाकूर होते, त्यांचे वडील बाबुराव ठाकूर यांचा प्रभाव होता. आपण केवळ चर्चा करतो. नवीन पिढी बेळगाव प्रश्नी चिडून बोलते. ते मला देखील सहन होत नाही आणि आपण त्यांना उत्तरे देऊ शकत नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जी अल्पकालिन चर्चा उपस्थित केलेली आहे, ती अल्पकालीन चर्चा बेळगावकर नक्की आज संध्याकाळी पाहतील. त्यावेळी वाटले पाहिजे की हा ठराव असा नाही. यामध्ये आपल्या सर्वांची एकी किती होईल हे पाहिले जाईल. माननीय सभापती महोदयांनी सर्व माननीय गट नेत्यांची उद्या त्यांच्या दालनात बैठक आयोजित करण्याची गरज आहे. त्यावेळी किती आमदार मनापासून आहे ते तपासून घेतले पाहिजे. या ठरावामध्ये खूप गांभीर्य आहे. माननीय सभापती महोदयांनी या अल्पकालिन चर्चेला भरपूर वेळ दिल्याबद्दल मी त्यांचा मनापासून आभारी आहे. सीमावासियांच्यावतीने असा ठराव आणण्यासाठी माननीय सभापती महोदयांनी संमती दिलेली आहे आणि वेळेची कोणतीही मर्यादा न पाळल्यामुळे मी माननीय सभापती महोदयांचे मनापासून आभार व्यक्त करीत आहे. काळ्या घोड्यापासून ते जुन्या विधानभवनपर्यंत सन १०६७ ते १९६८ मधील सर्व आमदार चालत आले. त्यावेळी हवेत गोळीबार झाला होता. आम्ही त्याचे साक्षीदार आहोत. सीमा भागातील बांधवांसाठी अनेक आंदोलने महाराष्ट्रात झालेली आहेत. पण प्रश्न सुटला नाही. तो ऊलट संपला, संपला असे म्हणणारी लोक जास्त वाढलेली आहेत. सीमा प्रश्न सुटू शकणार नाही, बेळगाव आपल्याकडून गेलेला आहे, असे काही लोक खाजगीत बोलतात. महाविकास आघाडी सरकारने बेळगाव कसा आपल्या राज्यात सामील होईल या दृष्टीकोनातून प्रभावी वर्तन करावे, अशी माझी आग्रही मागणी आहे. महाविकास आघाडी सरकार असे म्हणत आहे की, आमचे सरकार बेळगावकरांच्या पाठीमागे आहोत. ठराव करतो. महामहिम राज्यपाल महोदयांचे भाषण संपत आले की, सीमा भागाचा प्रश्न उपस्थित झाला की, आपले महामहिम राज्यपाल महोदयांचे भाषण संपत आले असे समजायचे.

यानंतर श्री. बोर्डे....

श्री.जयंत प्र.पाटील.....

मी दोन-तीन वेळा या विषयी मागणी केल्यामुळे सीमा प्रश्नाचा मुद्दा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात पहिल्या क्रमांकावर यावयास लागला. माननीय श्री.दिवाकर रावते साहेब, आपण सुद्धा मला या विषयी पाठिंबा दिला होता. पूर्वी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात सीमा प्रश्नाचा मुद्दा सर्वात शेवटी नमूद करण्यात येत होता, ही बाब रेकॉर्डवर आहे आणि हा मुद्दा पहिल्या क्रमांकावर घेण्याबाबत मी वारंवार केलेली मागणी सुद्धा रेकॉर्डवर आहे. माननीय श्री.दिवाकर रावते साहेब, आपण मंत्रिमंडळात सामील झाल्यानंतर ही सुधारणा केली की नाही, हे मला माहीत नाही. परंतु आता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात सीमा प्रश्नाचा मुद्दा पहिल्या क्रमांकावर येत आहे आणि ते योग्यच आहे.

सभापती महोदय, मला वाटते आपण सर्वांनी या विषयाच्या बाबतीत गांभीर्याने चर्चा केली पाहिजे. माझी विनंती आहे की, या विषयी चर्चा करण्यासाठी उद्या गट नेत्यांची बैठक आयोजित करावी. त्या बैठकीला विधानसभेच्या माननीय उपाध्यक्षांना सुद्धा बोलवावे. त्या बैठकीत चर्चा करुन या विषयी ठोस निर्णय केला पाहिजे. सीमावासीयांना वाटले पाहिजे की, पुन्हा एकदा संपूर्ण महाराष्ट्र आमच्या पाठीमागे उभा आहे. या अनुषंगाने राज्य सरकारने कार्यवाही केली पाहिजे, अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, बेळगाव, कारवार, निपाणी, बिदरसह संपूर्ण महाराष्ट्र झाल्याशिवाय हे विधिमंडळ कोणत्याही परिस्थितीत शांत बसणार नाही. अतिशय तीव्रपणे तसेच प्रतिकात्मक पद्धतीने कृती करण्याची अपेक्षा बेळगावकरांना वाटली पाहिजे. ही अपेक्षा पूर्ण करण्याचे काम आजपासूनच आपण करु या, एवढेच या निमित्ताने सांगतो व माझे भाषण संपवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

-------

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर (विरोधी पक्ष नेते) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाच्या बाबतीत अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे. सदरहू चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न हा कोणत्याही एका पक्षाचा, एका नेत्याचा विषय नाही. सातत्याने महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाच्या बाबतीत या सभागृहाने सर्वानुमते एकमताने ठराव पारित केलेले आहेत. परंतु सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी भारतीय जनता पक्षाच्या सरकारचा याला विरोध आहे या अविर्भावात त्यांनी भाषण केल्याचे मला समजते.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील सीमावासीय मराठी भाषिकांसोबत सर्वांच्या सद्भावना आणि संवेदना आहेत. परंतु हे करीत असताना यापूर्वी या विषयाच्या बाबतीत चुका झालेल्या आहेत. त्यामुळे एकमेकांवर दोषारोप करण्यापेक्षा असलेल्या टप्प्यावरुन हा विषय केंद्र सरकारच्या माध्यमातून पुढे कसा नेता येईल याची खऱ्या अर्थाने काळजी घेण्याची आवश्यकता आहे. एक गोष्ट खरी आहे की, मागच्या कालखंडात शिवसेना नेते माननीय श्री.दिवाकर रावते असतील, माननीय श्री.छगन भुजबळ असतील, आम्ही सर्व मंडळी त्या लढ्यात सहभागी झालो होतो. त्यामुळे निश्चितच आमच्या सीमावासीयांच्या बाबतीत वेगळ्या भावना आहेत. यापूर्वी केंद्रात आणि राज्यात काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार होते. या विषयी गठीत करण्यात आलेल्या आयोगावर महाजन यांची नियुक्ती करताना राज्य सरकारची संमती घेण्यात आली नव्हती असे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक साहेबांनी याच विधिमंडळात सांगितले होते. केंद्र सरकारने आपल्या अखत्यारीत आयोग नियुक्त केला, शिवाय त्या आयोगाची कार्यकक्षा देखील महाराष्ट्राला ठरवू दिली नाही. महाराष्ट्राने या प्रश्नाच्या बाबतीत 'खेडे' हा एक घटक ठरविण्याचा आग्रह धरला होता, परंतु तो सुद्धा महाजन आयोगाने अमान्य केला. १९६७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती मेहर चंद महाजन यांचा एकसदस्यीय अहवाल सुद्धा फेटाळण्यात आला. त्यानंतर सातत्याने केंद्र सरकारला विनंती करण्यात आली. अनेक शिष्टमंडळे केंद्रामध्ये जाऊन आली. परंतु केंद्रातून दाद न मिळाल्यामुळे शेवटी

श्री.प्रवीण दरेकर....

सर्वोच्च न्यायालयात दावा दाखल करावा लागला. गेल्या १६-१७ वर्षांपासून सीमा प्रश्नाचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात सुरु आहे. खेडे हा एक घटक, भौगोलिक सलगता, मराठी किंवा कन्नड भाषिकांची सापेक्ष बहुसंख्या किंवा लोकेच्छा या सुत्रांवर फेररचनेची मागणी करुन कर्नाटकातील ८६५ गावांवर महाराष्ट्राने हक्क सांगितला आहे.

सभापती महोदय, सीमावासीयांच्या बाबतीत आपण कोरडी सहानुभूती दाखवितो. परंतु या प्रश्नाच्या बाबतीत उपाययोजना होऊन त्यातून मार्ग निघावा यासाठी सर्वपक्षीय प्रयत्न हे केवळ ठरावापुरते होतात. परंतु पुढे त्या अनुषंगाने काहीही अंमलबजावणी होत नाही. सीमा भागातील मराठी भाषिकांनी १ नोव्हेंबर हा दिवस 'काळा दिन' म्हणून पाळला. राज्याच्या मंत्रिमंडळाने काळ्या फिती लावून कामकाज करण्याचा निर्णय घेतला, त्याचे मी स्वागत करतो. सीमा भाग महाराष्ट्रात येईपर्यंत आम्ही तुमच्यासोबत आहोत असे एक निवेदन सीमावादासाठी समन्वयक म्हणून नेमलेल्या माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ व माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे साहेबांनी प्रसिद्ध केल्याबद्दल त्याचेही स्वागत करतो. परंतु या भावना व्यक्त करीत असताना मी सांगू इच्छितो की, सीमा भागातील मराठी शाळांसाठी १० कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केलेली असताना त्यातील एक दमडी सुद्धा या शाळांसाठी देण्यात आली नाही. या सरकारने मोठा आव आणून सांगितले की, सीमा भागातील मराठी शाळांसाठी १० कोटी रुपये तरतूद केली आहे. परंतु प्रत्यक्षात एक दमडी सुद्धा या शाळांसाठी दिली नाही. त्यामुळे राज्य सरकारच्या केवळ कोरड्या भावना सीमा भागातील लोकांसाठी कामाच्या नाहीत. जर आपल्याला तेथे कामच करायचे असेल तर तेथे रचनात्मक गोष्टी करुन त्यांना आवश्यक लागणाऱ्या गोष्टींसाठी निधी दिला, आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन दिल्या तर राज्य सरकारच्या भावनांचा त्यांना उपयोग होईल.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर....

सभापती महोदय, राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर तातडीने सुनावणी सुरु होण्यासाठी कोणती पावले उचलली, कोणते प्रयत्न केले आहेत, हे मंत्री महोदयांनी सांगावे. या प्रश्नी उच्चाधिकार समितीची बैठक का आयोजित केली नाही ? उच्चाधिकार समितीची बैठक घेण्यासाठी महाविकास आघाडी सरकारकडे वेळ नाही काय, याचेही उत्तर मंत्री महोदयांनी दिले पाहिजे. या प्रश्नाच्या बाबतीत केवळ भांडवल किंवा राजकारण करुन राज्य सरकारला नामनिराळे होता येणार नाही. जर उच्चाधिकार समितीची बैठक घेतली असती तर या विषयाच्या बाबतीत आढावा सुद्धा घेता आला असता.

सभापती महोदय, आज संपूर्ण महाराष्ट्र राजकारणाच्या पलीकडे जाऊन सीमावासीयांच्या मागे ठामपणे उभा आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या अल्पकालीन चर्चेच्या माध्यमातून सरकारकडे जी मागणी केली आहे तीच आमची सुद्धा मागणी आहे. यापूर्वी या विषयी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार होती, परंतु घटनापीठातील एक न्यायाधीश हे कर्नाटक राज्यातील असल्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात आली. त्यानंतर या विषयी सुनावणी झाली नाही. सर्वोच्च न्यायालयात तातडीने सुनावणी सुरु करण्यासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून ठोस प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे. परंतु दुर्दैवाने असे प्रयत्न होताना दिसत नाहीत. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे नेहमी मराठीच्या बाबतीत आग्रहाने बोलत असतात, भांडत असतात. त्यांच्या भावनेविषयी, प्रामाणिकतेविषयी आम्हाला थोडी सुद्धा शंका नाही. परंतु आज त्यांच्या पक्षाची सत्ता असताना सुद्धा त्यांना महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाच्या बाबतीत अल्पकालीन चर्चा उपस्थित करावी लागत आहे. यावरुन असे दिसून येते की, त्यांच्या भावना या केवळ भावनाच राहतात, त्या भावनांना कृतीत उतरविण्यासाठी त्यांना साथ मिळत नाही. सभापती महोदय, त्यांना साथ मिळत नाही की साथ दिली जात नाही हे कळण्यास मला मार्ग नाही.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर....

सभापती महोदय, माझी मागणी आहे की, सीमा भागातील मराठी शाळांसाठी अर्थसंकल्पात जी तरतूद करण्यात आलेली आहे ती तातडीने वितरित करण्यात यावी. तसेच राज्य सरकारने उच्चाधिकार समितीची बैठक १५ दिवसांत आयोजित करावी. सर्वोच्च न्यायालयात या विषयी तातडीने सुनावणी होण्यासाठी सरकारच्या माध्यमातून युद्ध पातळीवर कालबद्ध कार्यक्रम आखण्याची आवश्यकता आहे. या प्रकरणी विधिज्ञांवर कितीही पैसा खर्च करावा लागला तरी तो केला पाहिजे. कारण शेवटी सीमा भागातील मराठी बंधू-भगिनींच्या मागे संपूर्ण महाराष्ट्र उभा आहे, हे चित्र उभे राहिले पाहिजे. हा कोणत्या पक्षाचा किंवा नेत्याचा विषय नाही. सीमा भागातील लोक अडचणीत आहेत. त्यांना महाराष्ट्र राज्यात यायचे आहे. आपल्या सर्वांच्या भावना या विषयाशी निगडित आहेत. या विषयात राजकारण न करता मी दोन चार गोष्टींची मागणी केली आहे.

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित

श्री. प्रवीण दरेकर ....

**त्या गोष्टींनाच पुश दिला पाहिजे. आम्ही रस्त्यावर भूमिका मांडणार, भाषणांमध्ये बोलणार, येथे अल्पकालीन चर्चेच्या माध्यमातून बोलणार आणि त्यावर गाडीच पुढे ढकलली गेली नाही तर ही भाषणापुरती भाषणे राहतील, ठरावापुरते ठराव राहतील. मी ३-४ गोष्टी येथे सांगितल्या आहेत, त्यावर शासनाने तातडीने व गतीने काम करावे अशी अपेक्षा व्यक्त करतो. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी पुन्हा एकदा या विषयाला उजाळा दिल्याबद्दल त्यांचेही मनापासून धन्यवाद व्यक्त करतो आणि आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपल्या विषयी कृतज्ञता व्यक्त करुन मी येथेच थांबतो. धन्यवाद !**

----

असुधारित

**श्री. अरुण लाड (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, नियम ९७ अन्वये उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.**

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी एका महत्त्वाच्या प्रश्नावर चर्चा घडवून आणली आहे त्याबाबत मी त्यांचे धन्यवाद मानतो. गेले ६०-६५ वर्षे सीमा प्रश्न सुरु आहे. आपल्याकडून देखील त्यासाठी मोठी लढत दिली गेली आहे आणि खूप यशही मिळाले आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सांगितले की, समितीच्या ३०-३५ एमएलएंनी राजीनामे दिले होते, त्यामध्ये माझे वडील श्री. जे.डी.लाड सुध्दा होते. आपणाला हळुहळू यश मिळत गेले आणि हा प्रश्न आपल्याकडून थंड होत गेला. कर्नाटकच्या बाजूने हा प्रश्न थंड झालेला नाही. आज सुध्दा आपल्या शाळा, मराठी जनतेवर अन्याय चालला आहे. शाळांची मोडतोड चालली आहे. भरपूर मोडतोड चालली आहे.अगदी बेळगाव हा सीमावादाचा मुख्य मुद्दा असतानाही बेळगावी नाव केले. त्यांनी सर्व केले आहे. आपल्यावर अन्याय केला आहे. एसटी फोडल्या आहेत. एसटीच्या काचा फोडल्या आहेत. सर्व केले आहे, पण आपण काही केले नाही.

सभापती महोदय, सीमा भागात औंढा-नागनाथ ठिकाण आहे. मी लक्ष्मणच्या पुण्यतिथीला गेलो होतो, तो एक स्वातंत्र्यसैनिक होता. त्याने एका पीएसआयचा खून केला होता. पोलिसांसमोर खून केला होता. मी अशा वेळी तेथे गेलो होतो. त्यावेळी एकाही मुलाला मराठी भाषा येत नव्हती. गल्लीत चालताना महिला, माणसे असू द्या, मराठी कोणालाही येत नव्हते. कन्नड येत होते. असे का ? कारण त्यांच्याकडे कोणतीही मराठी शाळा नाही. सर्व शाळा कन्नड आहेत. व्यवहार कन्नडमध्ये चालतो. आपल्याकडे तसे काही चालत नाही. आपल्या मुलांना मराठी येत नाही. शाळेत देखील मराठी चालत नाही. आपल्या लोकांनी अशा अवस्थेत तेथे मराठी शाळा मागितल्या आहेत. जत तालुक्यातील कन्नड विभागातील लोकांनी मराठी शाळा मागितल्या आहेत. ६० वर्षांपासून शाळा मागुनही आजतागायत कुणीही तिकडे लक्ष दिलेले नाही. आपण नुसते बोलत आहोत. पण त्या बाजुने काही घडविले गेले नाही. आपल्याकडून अशा अवस्थेत हे घडले पाहिजे.

असुधारित प्रत

श्री. अरुण लाड ....

सभापती महोदय, सीमा भागात आपल्या शाळा आहेत. मराठी शाळांची मागणी केली आहे. आपण त्यांना मान्यता दिली पाहिजे आणि त्या शिवाय आपण बोलत आहोत, त्याला महत्त्व येणार नाही. नुसतेच बोलत आहोत. प्रत्यक्षात काहीच नाही. आपल्याकडून त्या शाळांना मान्यता मिळाली पाहिजे. मराठी माध्यमाच्या शाळा वाढल्या पाहिजेत आणि असे झाले तर आपण काही ना काही केले असे होईल आणि हा प्रश्न जीवंत ठेवला असे होईल. माझी ही विनंती आहे, ती आपण मानावी. धन्यवाद !

----

असुधारित प्रत

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या चर्चेतून एक जाणवले की, त्यांना महाराष्ट्राच्या दोन्ही सदनांचा ठराव पाहिजे आणि तो ठराव माननीय सर्वोच्च न्यायालयाकडे पाठवावा अशी त्यांची भावना आहे. काही उल्लेख झाले की, सर्वोच्च न्यायालयाने विधानसभेच्या अपात्र ठरलेल्या आमदारांच्या बाबतीत काही निर्णय दिले, ते आपण मान्य केले. आपल्या सर्वांना हे माहीत आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी त्यांचा उल्लेख केला. ज्युडिशिअरी सेपरेशन ऑफ पॉवर्स म्हणतात. सेपरेशन ऑफ पॉवर्स म्हटले जाते की, एक्झिक्युटिव्ह, लेजिस्लेचर व ज्युडिशिअरी अशा तीन ठिकाणी वेगवेगळी क्षेत्रे लोकशाहीला अभिप्रेत आहेत. या तीन क्षेत्रांचा एकमेकांशी कुठेही संघर्ष होऊ नये, एकमेकांच्या कार्यक्षेत्रात कोणी जावू नये. संसदेने कायदा करावा, विधानसभेने कायदा करावा, विधानपरिषदेने तो मान्य करावा, कायदा करीत असताना गव्हर्नमेंट म्हणजे एक्झिक्युटिव्हने तो मांडावा. तो कायदा घटनाबाह्य आहे की नाही हे बघण्यासाठी कोर्ट सिस्टिम झालेली आहे. मध्यंतरीच्या निर्णयात वादविवाद झाले.

मी माझ्या भावना प्रेस कॉन्फरन्समध्ये स्पष्ट सांगितल्या आहेत आणि या स्पष्ट आहेत. मला जे सेपरेशन ऑफ पॉवर्स कळते, त्यात हा निर्णय बसतो की नाही हा वेगळा विषय आहे. परंतु फारसे तांत्रिक न पाहता, सर्वोच्च न्यायालयाने आपल्या पॉवर्स काय आहेत हे मान्य केलेले आहे, आपले अधिकार मान्य केलेले आहेत. तसेही त्यांना ते मान्य की अमान्य करता येतात का हा मोठा विषय तयार होतो. मी प्रेस कॉन्फरन्स घेतली. मी पार्लमेंटचे स्पीकर यांना पत्र लिहिलेले आहे की, तुम्ही आम्हाला यामध्ये एकदा काय ते नीट समजावून सांगावे. मी चीफ जस्टीस ऑफ इंडिया यांना देखील पत्र लिहिलेले आहे की, एकदा हे काय आहे, आमचे क्षेत्र किती आहेत, आमचे कार्यक्षेत्र किती आहेत, आमचे अधिकार किती आहेत हे आम्हाला समजावून सांगावे. क्लॅरिफिकेशन इंग्रजीमध्ये म्हणतात, त्या पध्दतीने द्यावे असे मी म्हणतो. मला एवढे सगळे सांगायचे आहे. माननीय मंत्र्यांना देखील अल्पकालीन चर्चेचे उत्तर द्यायचे आहे. पण मी यामध्ये थोडासा आलो. कारण असे आहे की, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी माझ्यावर जबाबदारी टाकली आहे. मला

असुधारित प्रत

**सभापती ....**

या जबाबदारीचा स्वीकार करायला निश्चित आनंद होईल. सभापती या नात्याने आनंद होईल. कायद्याचा अभ्यासक म्हणून आनंद होईल. हा विषय कायमचा सामोपचाराने संपावा अशी माझी वैयक्तिक इच्छा आहे. परंतु त्यासाठी मला विधानसभेचे माननीय उपाध्यक्ष यांच्याशी बोलावे लागेल, माननीय उप सभापती यांच्याशी बोलावे लागेल, माननीय मुख्यमंत्र्यांशी बोलावे लागेल की, आपल्याला अशा प्रकारचा ठराव तर करता येईल, ते आपले अधिकार आहेत. प्रश्न एवढाच राहतो की, आपण हा ठराव सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांकडे पाठवायचा की नाही, हा त्यातील खरा कळीचा मुद्दा आहे. अजून ४ दिवस आहेत. आपण याबाबतीत योग्य तो निर्णय घेऊ. हा निर्णय राजकारणविरहित राहणार आहे. माझी इच्छा आहे, ठराव जर दोन्ही सदनात होणार असतील तर कोणत्या राज्यात कोणत्या पक्षाचे सरकार आहे याकडे न पाहता महाराष्ट्रातील तिकडे राहिलेल्या, कर्नाटकात गेलेल्या जनतेच्या भावना लक्षात घेऊन एकमताने व्हावा हा माझा आग्रह आणि विनंती राहील.

आता मी औपचारिकरित्या या चर्चेचा भाग म्हणून माननीय मंत्री श्री. सुभाष देसाई यांना विनंती करतो की, त्यांनी शासनातर्फे उत्तर द्यावे.

----

असुधारित

श्री. सुभाष देसाई (मराठी भाषा मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे. खरे तर हा विषय अल्पकालीन चर्चेचा नसून फार विस्तृत चर्चेचा आहे आणि आपण योग्य वेळी अशी चर्चा देखील येथे घडवून आणाल याची मला खात्री आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी ज्या तळमळीने हा विषय आज विस्तृतपणे मांडला आहे, त्याबाबत खरोखर त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. कारण हा विषय केवळ आपल्या बाजाचा किंवा चर्चेचा नसून आपल्या महाराष्ट्राच्या अस्मितेचा विषय आहे आणि त्याला किती तरी दीर्घ काळाची परंपरा आहे. सन १९५६ मध्ये सुरु झालेले आंदोलन सन १९६० मध्ये महाराष्ट्राची स्थापना करुनच थांबले. परंतु तरीही प्रश्न पूर्णपणे सुटला नाही. पुढे देखील हे आंदोलन करावे लागले. महाराष्ट्राच्या नशिबातच असे आहे की, त्याला संघर्ष केल्याशिवाय काही मिळत नाही. न्याय गोष्टींसाठी देखील संघर्ष करावा लागतो. सन १९६९ मध्ये शिवसेनाप्रमुख माननीय बाळासाहेबांनी तीव्र, उग्र असे आंदोलन केले, त्यावेळी पुन्हा एकदा समोर आले आणि त्यावेळी शिवसेनेने ६९ जीव गमाविले. ते सर्वजण हुतात्मे झाले. बाळासाहेबांना १०० दिवसांचा तुरुंगवास झाला. अशारितीने हे आंदोलन, ही चळवळ पुढे सुरुच आहे आणि अजुनही सीमा प्रदेशातील लोक आंदोलन चालू ठेवत आहेत, हा अत्याचार सहन करीत आहेत. महाराष्ट्रात तीव्र भावना हीच आहे की, सर्वोच्च न्यायालयामध्ये हा वाद प्रलंबित असताना कर्नाटक मात्र त्यांचा महाराष्ट्राचा द्वेष सोडत नाही आणि त्या दृष्टीने त्या राज्यातून किंवा त्या राज्यकर्त्यांकडून महाराष्ट्राची आणि सीमा प्रदेशातील मराठी बांधवांची सतत अवहेलना व छळ सुरु आहे, ही सगळ्यात धक्कादायक गोष्ट आहे. त्यामुळे याचा जितका कडक निषेध करावयाचा तेवढा आपण येथून करीत असतो. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी त्यावेळी उल्लेख केला की, माननीय पंतप्रधानांना पत्र लिहायचे आहे, त्यावर महाराष्ट्रातील लोकसभा व राज्यसभा यांच्या सर्व ४८ खासदारांनी सह्या कराव्यात

श्री. सुभाष देसाई ....

अशी महाराष्ट्राची अपेक्षा आहे. आपण बोलताना नक्कीच बोलतो की, आपण याबाबतीत सर्वजण एक आहोत. परंतु अनेक खासदारांनी त्यावर सह्या केल्या नाहीत ही धक्कादायक गोष्ट आहे.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.सुभाष देसाई...

सभापती महोदय, विरोधी पक्ष नेत्यांना या प्रश्नावर जी तळमळ व्यक्त केली त्याबाबत मी त्यांना विनंती करतो की, आपल्या खासदार महोदयांना त्यांनी विनंती करावी की, जे निवेदन पंतप्रधान महोदयांना द्यायचे आहे,त्यावर त्यांनी सही करावी. या विषयावार आपण सर्व एक आहोत, महाराष्ट्र एक आहे, हे त्यातून दिसून येईल. राज्य शासन याबाबत प्रयत्नशील आहे. जेव्हा वाईट गोष्टी घडल्या त्यावेळी जो निषेध करायचा तो केलेला आहे. याबाबत दोन्ही सभागृहांनी एकमताने ठराव केले आहेत. येरुळचा प्रश्न असेल, दीपक दळवी यांच्यावर झालेली शाईफेक असेल याबाबत दोन्ही सभागृहात निषेध व्यक्त केला आहे. अलिकडील काळात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची विटंबना झाली त्याबाबत आपल्या सर्वांच्या तीव्र भावना प्रकट झाल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयातील प्रकरण लवकरात लवकर निकाली निघावे ही आपली सर्वांची आग्रहाची भावना आहे. कोरोनामुळे दोन वर्षे अनेक सुनावण्या झाल्या नाहीत. सर्वोच्च न्यायालयाचे जेवढे काम व्हायला पाहिजे होते तेवढे झाले नाही. आता कोरोनाचा प्रभाव कमी झालेला असल्यामुळे हा दावा लवकरात लवकर सुनावणीला घेण्याबाबत पाठपुरावा आपण करीत आहोत. याबाबत आपणाला वेगाने पुढे गेले पाहिजे. असा ठराव येथे करायचा काय याबाबत सभापती महोदय योग्य निर्णय घेतील. त्यादृष्टीने आपणाला गांभीर्याने विचार करायचा आहे. हे सर्व होत असताना सीमा भागातील बांधवांना निरनिराळ्या प्रकारे मदत करीत आहोत. तेथील संस्थांना अनुदान देणे असेल, तेथील ग्रंथालयांना मदत करण्यात येत आहे. आता तेथील मराठी शाळांची दुरुस्ती करण्याची जबाबदारी आपण घेतली आहे. त्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. या सर्व बाबी होतील परंतु अधिक परिणामकारक काय होणार याकडे महाराष्ट्र लक्ष ठेऊन आहे. त्यादृष्टीने सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सूचना केली. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी भावना व्यक्त केल्या आहेत. सभागृहाने सर्वोच्च न्यायालयात प्रस्ताव पाठवावा अशी सूचना नव्याने व पहिल्यांदा आलेली आहे. त्याबाबत सभापती महोदय योग्य तो निर्णय लवकर घेतील.

असुधारित प्रत

**सभापती** : माननीय मंत्री महोदय, ही सर्व चर्चा औपचारिकरित्या मुख्यमंत्री महोदयांकडे जाईल. आपण मंत्रिमंडळातील ज्येष्ठ सदस्य आहात. या सदनाच्या भावना मुख्यमंत्री महोदयांना कळवाव्यात.तांत्रिक दृष्ट्या हे करणे योग्य आहे किंवा नाही. येथे एकदा चर्चा झाल्यावर गट नेत्यांची चर्चा करण्यास काही हरकत नाही. प्रश्न असा आहे की, सभापती व उपाध्यक्ष यांच्या सहीने सर्वोच्य न्यायालयाकडे पत्र पाठवायचे किंवा कसे त्यामुळे यापुरता हा विषय मर्यादित आहे. यावर सर्वांचे एकमत होणार आहे. कसे करावे, काय करावे व हा डेलिगेट बॅलन्स कसा थांबवावा एवढे आपण बघूया.

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, शासन याबाबत प्रयत्नशील आहे. उच्चाधिकार समितीची बैठक घेण्याची सूचना आहे त्याप्रमाणे बैठक घेण्यात येईल. वकिलांमार्फत पाठपुरावा करायचा आहे. वकिलांशी चर्चा करायची आहे. याबाबी तातडीने केल्या जातील. समन्वयासाठी मंत्री महोदय श्री.छगन भुजबळ व मंत्री महोदय श्री.एकनाथ शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्यामार्फत या विविध घटकांशी चर्चा सतत सुरु असते. त्याबाबतची माहिती सभागृहाला द्यावी अशी मी सूचना करणार आहे. या चर्चेच्या पार्श्वभूमीवर माननीय मुख्यमंत्री यांना अवगत करुन एक बैठक आयोजित करण्याची विनंती करणार आहे. या प्रश्नावर सभागृहाच्या भावनांची दखल घेतल्यानंतर वेगाने पुढे जावे लागेल असे मी नमूद करतो. ज्या सन्माननीय सदस्यांनी विचार व्यक्त केले त्यांना धन्यवाद देतो व मी थांबतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मी आपले आभार व्यक्त करतो. याबाबत सर्वांचे सहमत आहे हे सांगण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे आपल्या सभागृहाचा ठरावा करावा लागेल.

**सभापती** : या संदर्भातील ठराव दोन्ही सभागृहात घेण्यात येतील. कशा पध्दतीने तो पाठवावा याचा विचार करावा लागेल.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, आमचा यास पाठिंबा आहे, १० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. अद्याप त्यांना पैसे दिलेले नाही. त्याबाबत व्यवस्था करण्यात यावी. उच्चाधिकार समितीची बैठका नियमित घेऊन त्यास गती द्यावी याची दखल घ्यावी इतकी विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे, आता ही चर्चा संपलेली आहे. त्यासंदर्भातील ठराव उद्या आपल्या सदनात मंजूर करण्यात येईल त्याचा मसूदा शासनातर्फे करण्यात यावा. तो मसूदा माझ्याकडे पाठवावा त्यामध्ये काही दुरुस्त्या करायच्या असतील तर त्या करण्यात येतील.

-----------

सहकार मंत्री महोदयांनी विधानसभेत नियम ४७ अन्वये केलेल्या निवेदनाबाबत माननीय विरोधी पक्ष नेत्यांना करावयाच्या स्पष्टीकरणाबाबत

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मला एक विनंती केली आहे. त्यांच्या बाबतीत सहकार मंत्री महोदयांनी विधानसभेत नियम ४७ अन्वये निवेदन केले आहे. त्याबाबत त्यांना या सदनात स्पष्टीकरण करायचे आहे. त्यांना मी निवेदन करण्यास मुभा देत आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण दरेकर यांना मी माझे मत सांगतो की, सभापती म्हणून नाही तर वैयक्तीक श्री.रामराजे नाईक निंबाळकर म्हणून मी सांगत आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ असेल तर आपण न बोललेले बरे असे मला स्वत: वाटते.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, होय.

**सभापती** : आता आपण नियम २६० च्या प्रस्तावावर चर्चा सुरु करु या. जेवढे संपेल तेवढे संपवू व चर्चा ऑनलेग ठेऊ. सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे हे ऑनलेग होते, त्यांनी भाषणाला सुरुवात करावी.

**(सभापती स्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी.** : महाविकास आघाडी सरकारने राबविलेल्या कल्याणकारी योजना

**मु.शी.** महाविकास आघाडी सरकारने राबविलेल्या कल्याणकारी योजना या विषयावर सर्वश्री शशिकांत शिंदे, दिवाकर रावते, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री विक्रम काळे, रविंद्र फाटक, अमरनाथ राजूरकर, सतीश चव्हाण, नरेंद्र दराडे, डॉ.वजाहत मिर्झा, सर्वश्री विप्लव बाजोरिया, मोहनराव कदम,अनिकेत तटकरे, विलास पोतनीस, राजेश राठोड, अमोल मिटकरी, डॉ.मनिषा कायंदे,सर्वश्री अभिजित वंजारी, संजय दौंड,अंबादास दानवे, जयंत आसगावकर, दुष्यंत चतुर्वेदी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुनिल शिंदे, वि.प.स..यांचा प्रस्ताव

(प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.)

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, सरकारच्या वतीने कोरोना काळात चांगला निर्णय घेण्यात आला आहे. केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून अनेक रस्त्यांची कामे सुरु झाली आहेत. केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी यांचे मी आभार व्यक्त करतो. महाराष्ट्रातील रस्त्यांचाविकास करीत असताना राष्ट्रीय महामार्गांना अधीक निधी देऊन रस्ते चांगले करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. हे करीत असताना सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे मी मागणी करणार आहे. टोल संदर्भातील मुद्या त्यांनी उपस्थित केला होता. राज्याचा टोल कमी करायचा असेल तर केंद्राचा टोल कमी करण्याची भूमिका घेणे योग्य होईल. शहरातील विकास होत असताना ग्रामीण भागात जिल्हा परिषदेचे रस्ते असतात त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निधी मिळतो. स्टेट हायवेसाठी निधी मिळतो. जिल्हा परिषदेअंतर्गत असलेल्या रस्त्यांना निधी मिळत नाही. २५१५, ३०५४ व डीपीडीसीतून निधी देण्याचा निर्णय घ्यावा लागतो. केंद्र सरकारमध्ये

श्री.शशिकांत शिंदे....

माननीय मंत्री श्री.नितीन गडकरी यांचे नाव घेतले जाते. तसेच राज्यात आता मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांचे नाव घेतले जात आहे. साडेतीन हजार किलोमीटरचे रस्ते करण्याचा निर्णय आपण घेतला आहे.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे.........

पहिल्या टप्प्यात ७५०० कोटी रुपये किंमतीच्या कामांचे नियोजन करण्याबाबत निर्णय घेण्यात आला.....

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, सभागृहात मंत्री उपस्थित नाहीत. आपण कृपया एवढ्या सहजतेने घेऊ नये. सभागृहात मंत्री, राज्यमंत्री उपस्थित असले पाहिजेत यासाठी आपण आग्रही असता. सभागृहात मंत्री, राज्यमंत्री उपस्थित नाहीत, हे बरोबर नाही. सभागृहाला अशा प्रकारे गृहीत धरणे बरोबर नाही. सभागृहात मंत्री, राज्यमंत्री उपस्थित नाहीत. मग सन्माननीय सदस्यांनी कशासाठी भाषण करायचे, कशासाठी प्रस्ताव मांडावयाचा ? आपण ५ मिनिटांसाठी सभागृहाचे कामकाज स्थगित करावे, अश माझी विनंती आहे.

**उप सभापती :** मी सभागृहाचे कामकाज ५ मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी ४.४१ ते ४.४६ पर्यंत स्थगित झाली.)

--------

असुधारित प्रत

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, माननीय मंत्री, राज्यमंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे सभागृहाचे कामकाज अर्ध्या तासासाठी स्थगित करावे, अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती :** मी सभागृहाचे कामकाज १५ मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी ४.४६ ते ५.०१ पर्यंत स्थगित झाली.)

--------

यानंतर श्री.सांगळे........

असुधारित प्रत

**(स्थगिती नंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदया, सदनामध्ये नियम २६० अन्वये सादर केलेल्या प्रस्तावांमधील महत्त्वाच्या विषयांवर चर्चा सुरु आहे. सदर प्रस्तावामध्ये क्रीडा, पशुवैद्यकीय तसेच महिला व बालकल्याण अशा विभागांचा समावेश आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, आपण संबंधित खात्यांचे मंत्री किंवा राज्यमंत्री यांना सदनामध्ये उपस्थित राहण्याबाबत सांगावे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, सदनामध्ये मंत्री उपस्थित नसल्यामुळे आपण दोन वेळेस सदनाचे कामकाज स्थगित केले व त्यानंतर मंत्री महोदय सदनामध्ये आले. मी याबाबत आपले आभार मानतो. सदनामध्ये फक्त तीन मंत्री महोदय आलेले आहेत. सभापती महोदया, सदनाची एक गरिमा व प्रतिष्ठा आहे. आम्ही सदनामध्ये विषय मांडत असतो. तसेच सन्माननीय सदस्य मंत्री महोदयांसमोर बोलत असताना त्यात काही उणीवा किंवा सूचना असल्यास त्याबाबत माहिती देत असतात. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संदर्भात रस्त्यांचा विषय मांडल्यास संबंधित खात्याचे मंत्री किंवा राज्यमंत्री सदनामध्ये उपस्थित नाहीत. पशुसंवर्धन दूग्ध विकास विभागासंबंधी सन्माननीय सदस्यांनी विषय उपस्थित केल्यास संबंधित खात्याचे मंत्री किंवा राज्यमंत्री सदनामध्ये उपस्थित नाहीत. या संदर्भात संबंधित विभागातील एखादा अधिकारी उपस्थित असल्यास काही हरकत नाही. अशा परिस्थितीत सदनामध्ये तीन मंत्री महोदयांनी उपस्थित राहण्याची गरज नाही. एखादे मंत्री महोदय सदनात उपस्थित राहिले तरी ते पुरेसे आहे. प्रस्तावामध्ये नमूद असलेल्या सर्व खात्यांचे मंत्री किंवा राज्यमंत्री सदनात उपस्थित नाहीत. आपण त्यांना सदनामध्ये येण्याकरिता सूचना द्याव्यात. मी सदनाचे कामकाज थांबविण्याबाबत आपल्याला सांगत आहे, असे नाही.

असुधारित प्रत

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदया, त्याच विषयासंबंधी विधानसभा सदनामध्ये विभागाच्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा सुरु आहे. संबंधित खात्यांचे मंत्री महोदय, तेथे उपस्थित आहेत. त्यामुळे संबंधित खात्यांच्या राज्य मंत्र्यांना सदनामध्ये ताबडतोब बोलाविण्याची व्यवस्था केली जाईल.

**उप सभापती** : मी माननीय विरोधी पक्षनेते आणि सदनाला अवगत करु इच्छिते की, माननीय महसूल मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांनी सदनामध्ये उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची आम्ही नोंद घेतो असे सांगितले आहे. प्रस्तावामध्ये असलेल्या सर्व विभागांच्या संदर्भात आपल्याला सर्व संबंधित खात्यांच्या मंत्री महोदयांकडून उत्तरे पाहिजे आहे का ? तसे असल्यास आपण तशीही नोंद करु. तसेच सदर प्रस्तावावर एक किंवा दोन मंत्री महोदयांकडून उत्तर घेण्याऐवजी प्रस्तावानुसार सर्व मंत्री महोदयांकडून उत्तरे घेण्याचा आपण प्रयत्न करु या. आता सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी आपल्या उर्वरित भाषणाला सुरुवात करावी.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, ठीक आहे.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदया, करोना काळात ग्रामविकास विभागाकडून चांगले निर्णय घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. केंद्र शासनामध्ये रस्त्यांच्या संदर्भात माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी साहेबांचे नाव घेतले जाते. त्याप्रमाणे राज्यामध्ये माननीय ग्रामविकास मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांचे नाव घेतले जाईल. अशा प्रकारे माननीय ग्रामविकास मंत्री यांनी निर्णय घेतला आहे. याकरिता ग्रामविकास विभागामार्फत सन २०२१-२२ मध्ये ३ हजार कि.मी. लांबीचे रस्ते करणे त्याकरिता साडेसात हजार कोटी रुपये लागणार आहेत. २०२२-२३ मध्ये ३ हजार कोटी रुपयांच्या निधीची गरज पडणार आहे. याकरिता त्यांनी नियोजन केलेले आहे. तसेच ही कामे करीत असताना कधीही निधी कमी पडणार नाही याबाबत त्यांनी खात्री दिली आहे. मला विश्वास आहे की, सदर कामे करीत असताना निधी कमी पडल्यास ते नाबार्डकडून कर्ज काढतील. राज्यातील ग्रामविकास विभागाच्या अंतर्गत असलेले रस्ते, तसेच स्टेट व नॅशनल रस्ते असो, जिल्हा परिषदांच्या अंतर्गत असलेले रस्ते करीत असताना ते २५१५, ३०५४ किंवा डीपीडीसी व्यतिरिक्त करण्यासाठी

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे ....

शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्याकरिता ग्रामविकास विभाग कोठेही कमी पडणार नाही याची मला पूर्ण खात्री आहे.

सभापती महोदया, दिनांक ६ जून, १६७४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचा रायगडावर राज्याभिषेक झाला होता. या महापुरुषाचा लोक कल्याणकारी स्वराज्यातील महत्त्वाचा दिवस म्हणजे राज्याभिषेक दिन होय. अशा या भूमीपुत्राच्या स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व अधिक दृढ होण्यासाठी ६ जून रोजी महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायतींच्या कार्यालयांमध्ये शिवराज्याभिषेकोत्सव दिन साजरा करण्याचा शासनाने निर्णय घेतला. आज तिथीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आहे. त्या पार्श्वभूमीवर मंत्री महोदयांनी राज्यात ६ जून रोजी महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायतींच्या कार्यालयांमध्ये शिवराज्याभिषेकोत्सव दिन साजरा करण्याचा उपक्रम सुरु केल्यामुळे मी मंत्री महोदयांचे मनापासून अभिनंदन करतो, आभार व्यक्त करतो.

सभापती महोदया, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेला महत्त्व देत असताना त्या माध्यमातून गावांमधील प्रमुख रस्ते किंवा दोन गावांना जोडणाऱ्या रस्त्यांचा नियोजन आराखडा तयार करुन त्यासंबंधी शासनाने निर्णय घेतला. मध्यंतरीच्या काळात पंतप्रधान ग्रामसडक योजना बंद पडली होती. मंत्री महोदयांनी केंद्र शासनाकडे ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून साधारणत: ६५५० कि.मी. च्या रस्त्यांचा प्रस्ताव पाठविला आहे. त्याकरिता २०,१७७ कोटी रुपये खर्च येणार आहे. याबाबत मंत्री महोदय केंद्र शासनाकडे पाठपुरावा करीत आहेत. एका बाजूला पंतप्रधान ग्रामसडक योजना, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आणि दुसऱ्या बाजूला जिल्हा ग्रामीण विकासाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन राज्यातील बहुतेक रस्ते निश्चितपणे चांगल्या प्रकारे करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मी याबाबत मुद्दाम उल्लेख करु इच्छितो.

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे ....

सभापती महोदया, आपण स्वर्गीय आर.आर. पाटील यांचा नेहमी उल्लेख करीत असतो. त्यांनी महाराष्ट्राला वेगळया प्रकारचे चांगले नेतृत्व दिल्याचे आपण सर्वांनी पाहिले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विविध प्रकारच्या संकल्पना राबविण्यात आल्या. त्यांनी गृह किंवा ग्रामविकास विभाग असो अतिशय चांगल्या प्रकारे कामे केलेली आहेत. तत्कालीन ग्रामविकास मंत्री असताना त्यांनी ग्रामस्वच्छता अभियानाची स्पर्धा सुरु केली. अशा प्रकारे लोकांमध्ये स्पर्धा निर्माण करुन लोकांना स्पर्धेमध्ये सहभागी करुन एकजुटीच्या माध्यमातून अनेक गावे एकत्र आली. तसेच गावांनी एकत्र येऊन आपल्या गावाला बक्षीस मिळण्यापेक्षा आपल्या गावाचे नाव देश किंवा राज्य स्तरावर पोहोचत असल्यामुळे चांगल्या प्रकारची कामे केली आहेत. अशा विविध संकल्पना मांडून त्यावर शासनाचा किती निधी खर्च होतो या बाबतीत विचार न करता नवीन योजना निर्माण केल्या होत्या. त्यात त्यांनी राज्यात तंटामुक्त गाव यासारखी योजना सुरु केली होती. अशा प्रकारे स्वर्गीय आर.आर. पाटील यांनी महाराष्ट्रात सुरु केलेल्या योजनांचा केंद्र शासनाने आदर्श घेऊन त्यांचा अभ्यास करुन त्या योजना केंद्र स्तरावर सुरु करण्याचा निर्णय घेतला. राज्यातील स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून स्वर्गीय आर.आर. पाटील यांचे नाव घेतले जाते. तसेच स्मार्ट ग्राम योजनेच्या माध्यमातून स्वर्गीय आर.आर. पाटील यांच्या संकल्पनेतील सुंदर गाव पुरस्कार योजना करण्याबाबत शासनाकडून प्रयत्न करण्यात आला. ही कार्यवाही करीत असताना करोना काळात सर्व गावांना एकत्र करण्यात आले. करोनाच्या संघर्षामध्ये विविध गावांमधील अनेक लोकांनी त्यात योगदान दिले. करोना काळात पहिल्या लाटेच्या वेळी गावांमध्ये इतर कोणालाही प्रवेश दिला जात नव्हता. परंतु आता तीच गावे एकत्र येऊन करोनाला हद्दपार करण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशा प्रकारे करोनाच्या लढयामध्ये ज्या गावांनी पुढाकार घेऊन कामे केली होती अशा गावांना करोनामुक्त गाव पुरस्कार योजना जाहीर करण्याचा शासनाने प्रयत्न केला. अशा प्रकारे  गावांनी सर्व निकषांचे पालन करुन स्पर्धेमध्ये सहभागी झाली व चांगल्या प्रकारे करोना लढाईमध्ये सहभाग घेतला.

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे ....

सभापती महोदया, राज्य शासनाने ग्रामपंचायतींच्या माध्यमातून विविध अधिकार दिलेले आहेत. तसेच चौदावा व पंधरावा वित्त आयोगाचा निधी थेट ग्रामपंचायतींना देण्यासंबंधी ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून निर्णय घेण्यात आला. लोकांना ग्रामविकास विभागाकडून मोठी अपेक्षा आहे. त्यानुसार लोकांकडून विविध प्रकारच्या मागण्या येत असतात.

यानंतर श्री.गागरे...

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे .....

छोटया गावांचा व्याप पाहिल्यावर लक्षात येते की, लहान लहान राज्ये करण्याचा निर्णय केंद्र सरकार करीत आहे. परंतु गावांचा मोठा व्याप पाहता जी गावे १००० लोकसंख्येच्या आत असतील अशा गावाकरीता स्वतंत्र ग्रामपंचायत करण्याच्या बाबतीत प्रस्ताव राज्याकडे येतात त्याबाबत या सरकारने निर्णय घ्यावा अशी मागणी येत आहे. ग्रामीण भागाचा कणा असलेली ग्रामपंचायत सक्षम करीत असताना ग्रामपंचायतीच्या सरपंचापासून अनेक लोकांना अधिकार देण्यास सरकार पुढाकार घेत आहे. घरकुलाबाबत मला एक स्पष्टीकरण पाहिजे, घरकुल योजनेमध्ये केंद्र सरकारच्या योजनेतून राज्याला किती कोटा येतो, निकष काय आहेत, जिल्हयाला किती जातो. जिल्हयातून तालुक्याला किती येतो याचे स्पष्टीकरण होणे गरजेचे आहे. कारण मागणी प्रचंड आहे. गरीबांकडून घरांबाबत प्रचंड अपेक्षा आहेत. प्रथम गरीबाला घर दिले जाईल ही हाक केंद्र सरकारच्या योजनेतून दिली जाते, महाराष्ट्रातून प्रचंड मागणी असतानासुध्दा दुर्दैवाने तेवढया प्रमाणात केंद्र सरकारकडून मंजूरी होत नाही हे देखील सत्य आहे. तसे असेल तर काय बदल करता येतील. दोन दोन वर्षापूर्वी ज्यांनी घराची मागणी केलेली आहे, त्यांना घराची पुर्तता, कागदपत्रे, निकष व नियमात बसत असतानासुध्दा त्यांना घरे मिळत नसतील तर त्याबाबतचा निर्णयही घेणे गरजेचे आहे. ४ लाख २५ हजार घरकुले पूर्ण करण्याबाबतचा निर्णय केलेला आहे पण ते कसे करणार हे या चर्चेच्या उत्तरामध्ये सांगावे अशी विनंती आहे.

सभापती महोदय, महिला समृध्दीबाबत आपण शक्ती कायद्यासारखे कायदे करीत आहोत, याकरीता महाराष्ट्र ओळखला जातो. महासमृध्दी महिला सक्षमीकरण अभियान, महिला स्वयंसेवी गटाची यशस्वी वाटचाल, वीरभद्र ताराराणी स्वयंसिध्द योजना अशा विविध योजनांचा या राज्याने अवलंब केलेला आहे. आपल्याकडे बचत गटापासून महिला अभियान राबविले गेले, स्वयंसिध्दता गटाला फक्त कर्ज देण्यापुरते मर्यादीत ठेवले जाते का, याचा कधीतरी विचार करणे गरजेचे आहे. या महिलांना सक्षमतेने उभे करायचे असेल तर बचत गटाला व्यवसाय, लघुउद्योग मिळविण्याकरीता काहीतरी धोरणात्मक निर्णय होणे गरजेचे आहे. आज

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे .....

ॲमेझॉनपासून विविध मॉलमध्येसुध्दा ही उत्पादने ऑनलाईन तरी गेली पाहिजेत. सरकार अशा मोठया कंपन्यांशी बैठका करुन महिला स्वयंरोजगारासाठी काही तरी नियम करुन जोडधंदा किंवा उद्योग करण्यासाठी मदत करणार आहे का. महिला बचत गटांना कर्ज दिले तर तो गट कार्यरत राहतो. अशा विषयात बदल करावेत. ग्रामविकास विभागाबाबत मी उदाहरण देतो. जिल्हा परिषदेत वेगवेगळया प्रकारची कामे टेंडरने निघतात. ती कामे खाजगी लोकांना दिली जातात. महिला बचत गटांना ही कामे टेंडरने देता आली तर मोठा निर्णय होऊ शकतो. माननीय श्री.विजयसिंह मोहिते पाटील ग्रामविकास मंत्री होते. तेव्हा त्यांनी प्रत्येक पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या प्रमुख जागेवर दुकाने उभारण्याचा निर्णय घेतला होता. त्यात नियम होता की, दरवर्षी ते रिन्यू करायचे. ही दुकाने मालाला विक्रीसाठी उभारण्याचा निर्णय घेतला होता. याला फार अल्प प्रतिसाद का मिळाला कारण एक वर्ष किंवा सहा महिन्यातून ते रिन्यू करायचे होते. त्यांना भाडे देण्यासाठी मुदतवाढ मिळावी म्हणून पाच वर्षाचा करार करण्याची मागणी होती. दुदैवाने त्यावर निर्णय झाला नाही. काही दिवसानी मोक्याच्या ठिकाणच्या जागा दुदैवाने बंद पडल्या. आज तसा निर्णय घेतला तर हक्काची बाजारपेठ आपण तेथे उभी करु शकतो, हा चांगला निर्णय होऊ शकेल. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेच्या माध्यमातून पाणंद रस्त्याकरीता चांगला निधी देण्याचा सरकारने प्रयत्न केला आहे. आजपर्यत पाणंद रस्ते दुर्लक्षित होते, ते वाहतुकीसाठी आता महत्वाचे वाटत आहेत. काही लोकांनी ते रस्ते अडवले होते, त्यामुळे वाद होत होता. तत्काळ निर्णय घेण्याबाबत तहसिलदार व प्रांत यांना सांगितल्यामुळे त्यांवर कारवाई व निर्णय होत आहे. वर्षानुवर्षाचे पाणंद रस्ते आता मोकळे झालेले आहेत. याकरीता आपण चांगला निधीही दिलेला आहे पण तो मागणीप्रमाणे मिळावा अशी विनंती आहे. मनरेगामध्ये हर हर मोदी, घर घर मोदी हा नारा आहे. आमच्या सरकारने हर घर गोठे, घर घर गोठे करण्याचा निर्णय घेतला आहे. जनावरांचे गोठे प्रत्येक ठिकाणी मंजूर करण्यासाठी मनरेगामधून तरतूद करण्यात आलेली आहे. निधी कोठूनही येऊन दे, आम्ही अंमलबजावणी करीत आहोत.

श्री.शशिकांत शिंदे .....

आम्ही वळूही देत आहोत. त्यांनी जी संकल्पना राबविली आहे, मी यावर पुढे बोलणार आहे. सभापती महोदय, ग्रामीण भागातील ३०० चौरसमीटर भूखंडावरील बांधकामांना परवानगीची आवश्यकता नाही. मोठया ग्रामपंचायतींना नागरी सुविधांचे विशेष अनुदान द्यावे, कोरोना विषाणूशी लढणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता असे अनेक निर्णय ग्रामविकास मंत्री महोदयांनी घेतलेले आहेत त्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, शासन गाई म्हशीच्या कृत्रीम रेतन कार्यक्रमासाठी लिंग विनिश्चित वीर्य मात्रा, पुणे येथे नवीन बीएसएल २ व बीएसएल ३ प्रयोगशाळेची निर्मिती, गीर या जातीचे वळू, वीर्य मात्रा भ्रूण इत्यादी ब्राझीलमधून आयात करणार आहे. मराठवाडयातून १० हजार लिटर दूध येते असे सन्माननीय सदस्य म्हणाले आहेत. पश्चिम महाराष्ट्राबरोबर दूध उत्पादन तेथे होण्याचा प्रयत्न आहे. या खात्याचे मंत्री विदर्भातील असल्यामुळे त्यांनी जास्तीत जास्त लक्ष विदर्भावर देण्याचे निश्चित केलेले आहे. याचा निश्चितपणे फायदा होईल. शेळी मेंढी यांच्या खरेदी किंमतीसह योजनेत सुधारणा करणे, पशुपालक शेतकऱ्यांना दारापर्यत आरोग्य सेवा, फिरते पशु चिकित्सालय ही योजना आहे. ही योजना प्रथमत: मंत्री महोदय श्री.सुनील केदार यांनी आणलेली आहे. जेथे पशुवैद्यकीय दवाखाना उपलब्ध करता येत नसेल तेथे जनावरे असतील तेथे फिरते हे चिकित्सालय करण्याच्या निर्णय घेतल्याबद्दल अभिनंदन करतो.

सभापती महोदय, श्रेय कोणीही घेऊ द्या पण मी त्याचा साक्षीदार आहे. मंत्रालयीन दालनात बैठक न होता, मंत्रालयाच्या खुल्या प्रांगणात पहिली बैठक मंत्री महोदय श्री.सुनील केदार यांनी बैलगाडया शर्यतीबद्दल घेतली. मी त्यांच्याकडे शिष्टमंडळ घेऊन गेलो तेव्हा अधिकाऱ्यांना एका बाजूला व मागणी करणारी सर्व पक्षीय मंडळी एका बाजूला बसवली. समोर बैलगाडा शर्यतीचे मालक शेतकरी उपस्थित होते, पहिल्या बैठकीत निर्णय झाला म्हणून त्यांनी दुर्लक्ष केले नाही.

यानंतर श्रीमती नाफडे .....

श्री.शशिकांत शिंदे.....

माननीय मंत्रीमहोदयांनी लगेच तेथून उठून वेळ घेतली. त्यानंतर सरकारी वकिलांचे जे प्रमुख होते, त्यांच्या दालनात आम्ही चर्चा केली. मंत्रीमहोदयांनी स्वत: दिल्लीला जाऊन याबाबत चर्चा केली. परंतु त्या ठिकाणी सर्वोच्च न्यायालयाच्या माध्यमातून याबाबत पहिल्यांदा निर्णय झाला. त्यानंतर बैलगाडयांची शर्यत सुरु झाली. महाराष्ट्रात एक वेगळया प्रकारचा उत्साह निर्माण झाला. लोकांची अपेक्षा पूर्ण केल्याबद्दल मी मंत्रीमहोदयांचे अभिनंदन करेल.

सभापती महोदय, मांस निर्यातीकरिता राज्यातील अधिकृत कत्तलखान्यांच्या नोंदणीकृत असलेल्या खाजगी पशुवैद्यकांना संबंधित संबंधित कत्तलखान्यांकरिता महाराष्ट्र प्राणी रक्षण कायद्यात अंतर्भूत प्राण्यांच्या कत्तलीसंदर्भात कत्तलपूर्व तपासणी करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले तर मांस निर्यातीस चालना मिळेल. मी याबाबत मंत्रीमहोदयांना एकच सांगणार आहे. गो-हत्या बंदी आहे, त्याला कोणाचाही विरोध नाही. परंतु ज्या ठिकाणी इतर प्राण्यांच्या बाबतीमध्ये निर्णय नसताना काही लोक जाणीपूर्वक गाडया अडविण्याचा प्रयत्न करतात. काही वेळा पोलिसांवर दबाव देखील टाकण्याचा प्रयत्न केला जातो. काही ठिकाणी तर गाडया जप्त केल्या जातात त्यानंतर त्या गाडया कोंडवाडयात नेल्या जातात. ज्या वेळी न्यायालयातून येऊन संबंधित लोक जनावरे घ्यायला जातात, त्यावेळी ती जनावरे तेथे नसतात, ही सत्य परिस्थिती आहे. कराडमध्ये अशा घटना घडलेल्या आहेत.

सभापती महोदय, ज्याला बंदी घातलेली आहे, त्याच्याबद्दल कोणाचेही दुमत नाही, परंतु ज्या मांसाची विक्री करावी म्हणून जी मुभा दिलेली आहे, त्या मुभा असलेल्या ठिकाणी देखील एक रॅकेट आहे. मी उघडपणे सांगत आहे याबाबत एक रॅकेट आहे. यासंदर्भात प्राणी संरक्षण करणारी एक संस्था आहे. ती लोक याबाबत तक्रार करतात. संबंधित पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली की, पोलीस ती गाडी जप्त करतात. त्या गाडीमध्ये गाय नसेल किंवा शासनाने बंदी घातलेले जनावर नसले तरीही ती गाडी जप्त केली जाते. ती गाडी जप्त का केली जाते, याची देखील कारणे दाखविली जातात. तुम्हाला किती जनावरे नेण्याची परवानगी होती, त्याच्यापेक्षा

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे.....

जास्त जनावरे आहेत, मग या मुक्या जनावरांची छळवणूक केली म्हणून गाडया जप्त करायच्या, त्या गाडयांबाबत कुठेतरी तडजोड केली जाते. ती जनावरे कोंडवाडयातून परस्पर विकली जातात, हे दुर्दैवाने सत्य आहे. याबाबतीत देखील काही लोकांची त्यावर उपजीविका आहे. काही शेतकऱ्यांना या व्यवसायाकरिता भाकड जनावरे देण्याचा निर्णय घेतला गेला. ती जनावरे त्यांना सांभाळता येत नाही, त्या संदर्भातील निर्णय झाला. याबाबत जे काही चुकीचे चालू आहे, त्या संदर्भातील कारवाई करण्याबाबत शासनाने निर्णय घेणे गरजेचे आहे. एका बाजूला आपण बघत आहोत की, अमुल किंवा वसुंधरा, गुजराथचे दुध महाराष्ट्रात हळूहळू वाढत आहे. मंत्रीमहोदय आपल्या राज्याकरिता हे एक मोठे आव्हान आहे. हे दुध कोणत्या राज्यातून येत आहे, त्यापेक्षाही मार्केट कोणत्या राज्यामध्ये आहे, त्याला फार महत्त्व आहे. एक काळ असा होता की, आपल्या या महाराष्ट्रातून आरे डेअरीमधून दुध फार मोठया प्रमाणात निर्यात होत होते. आरेमधून होल आणि टोन्ड दूध मिळत होते. मुंबईसारख्या शहरामध्ये १२ ते २५ लाख लिटर दुध रोज लागते. एवढे दुध लागत असताना याकडे व्यवसाय किंवा बाजारपेठ म्हणून गुजराथ राज्य जर लक्ष देत असेल तर महाराष्ट्रच या व्यवसायाकडे लक्ष का देत नाही ? हे मार्केट आपल्या हातामध्ये असताना त्याप्रमाणे योग्य निर्णय का घेतला जात नाही ? ही खर म्हटल तर विचार करण्यासारखी गोष्ट आहे. माझी मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, आपण यावर फार बारकाईने लक्ष द्यावे. पूर्वी सहकारी दुध संघ होते, त्या माध्यमातून दुध महानंदा डेअरीमध्ये येत होते, तेथून ते दुध विक्री केले जात होते. हळूहळू खाजगीकरणातून यामध्ये स्पर्धा वाढली. लोक मिळेल त्या ठिकाणी दुध वितरित करण्याचा प्रयत्न करीत होते. आमच्या मनात शासकीय दुग्ध शाळेच्या माध्यमातून दुध विक्री व्यवसायाला चालना देण्याची मानसिकता राहिली की नाही, याचा देखील शोध घेणे गरजेचे आहे. काही ठिकाणी जर शेतकऱ्यांना विश्वासात घेतले तर राज्य शासनाकडून त्या शेतकऱ्यांना दुध उत्पादनाकरिता मदत केली तर ते दुध कलेक्शन करुन करुन महाराष्ट्रातील बाजारपेठ शासनाने स्वत:च जर मिळविली तर मला वाटते की, शेतकऱ्याच्या जोड-धंद्याला चालना मिळेल. जे वसुंधरा किंवा महानंदा बरोबर

असुधारित प्रत

श्री.शशिकांत शिंदे.....

स्पर्धेमध्ये गुजराथ डेअरी ज्या पध्दतीने राज्यात वाढत चालली आहे, त्याच पध्दतीने महाराष्ट्र का उभा राहू शकत नाही, याचा कधीतरी विचार शासन करणार आहे की नाही? माती आपली, राज्य आपले आणि विक्री होण्याकरिता दुसऱ्या राज्यातून दूध येत असेल तर आपणच यामध्ये कुठेतरी कमी पडत आहोत, असे मला वाटत आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस आपण महानंदा येथे होता, त्या मानाने जर बघितले तर कधीतरी आम्ही ऐकतो. आता वरळीची आरे डेअरी बंद होणार आहे. ती जागा आता विकासाकरिता देण्यात येणार आहे. माझे म्हणणे असे आहे की, जर आपण त्या बाबतीत फार गांभीर्याने विचार करावा, याबाबत शासनाने चांगल्या प्रकारचा निर्णय घ्यावा, अशा प्रकारची माझी आपल्याकडून निश्चितपणाने अपेक्षा आहेत. आदिवासी विकास विभाग, समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून जनावरे देता येतात. या संदर्भात संबंधित तीनही खात्याच्या माध्यमातून योग्य निर्णय घेणे गरजेचे आहे महिला बचत गटांना याबाबत जर एकत्रित करण्याचा प्रयत्न केला तर चांगल्या प्रकारची योजना सन्माननीय मंत्रीमहोदय श्री.सुनील केदार यांनी जसा बैलगाडया शर्यतीबाबतचा निर्णय घेतला म्हणून सर्व त्यांचे आभार मानत आहेत. याच पार्श्वभूमीववर महिला बचत गटांबाबत देखील अशाच प्रकारचा चांगला निर्णय जर घेतला तर चांगल्या प्रकारचे उत्पादन महिला भगिनींना चांगले उत्पादन मिळू शकते.

सभापती महोदय, आज आपण पाहिले की, ऑलम्पिकचे एक पदक मिळाले तर त्या संदर्भात संपूर्ण देशात कौतुक होते. महाराष्ट्र असो किंवा देशातील इतर कोणतेही राज्य असो, देशप्रेमासाठी या मातीतील कोणताही माणूस कुठेही तो कमी पडत नसतो. देशाकरिता खेळण्यामध्ये देखील त्याला अभिमान वाटत असतो. आपल्याकडे महाराष्ट्रात देखील चांगले खेळाडू उभे राहू शकतात. चांगले खेळाडू आपल्या राज्यात देखील खूप आहेत. मंत्रीमहोदंयानी आता सात लाखांचे अनुदान बारा लाखांवर आणलेले आहे. बारा लाखांचे अनुदान देखील वाढविण्याचा निर्णय घेतलेला आहे, त्याबाबत मी मंत्रीमहोदयांचे अभिनंदन करतो. कुस्ती हा आपल्या मातीतील खेळ आहे. परंतु कुस्ती या खेळाकरिता ऑलम्पिकमध्ये महाराष्ट्रातील

श्री.शशिकांत शिंदे.....

खेळाडू का जाऊ शकत नाही. याकरिता आपण कुठे कमी पडत आहोत ? पुणे येथे बालेवाडी व इतर अनेक ठिकाणी क्रीडा संकुल उभारले जात आहे. आमच्याकडे अनेक लोक येतात. गरीब कुटुंबातील मुलगा वडिलांना घेऊन येतो. तो मुलगा आम्हाला म्हणतो की, मला परदेशात अमुक अमुक स्पर्धेकरिता जायचे आहे. त्याकरिता लागणारा प्रवास खर्च मला परवडण्यासारखा नाही. याकरिता मला अनुदानाकरिता मदत करावी. या संदर्भातील त्याचे प्रमाणपत्र पाहिल्यानंतर लक्षात येते की, तो राष्ट्रीय पातळीवर खेळलेला असतो. परिस्थिती बिकट असल्यामुळे त्याला जर परदेशात खेळण्याकरिता जाता येत नसेल तर याबाबत मी मंत्रीमहोदयांना भेटलो होतो. त्याबाबत मंत्रीमहोदयांनी सांगितले होते की, जिल्हास्तरीय क्रीडा खात्यातून तशा प्रकारचे अनुदान दिले जात आहे. जिल्हा क्रीडा खाते आणि शालेय शिक्षण या दोन खात्यांच्या माध्यमातून जी मुले विविध प्रकारच्या खेळांमध्ये मोठया प्रमाणात यशस्वी होऊ शकतात. जी मुले राष्ट्रीय स्तरावर खेळत आहेत. त्यांच्याकरिता जिल्हास्तरीय क्रीडा संकुल उभारुन तेथून त्यांना या खेळांकरिता पुढे आणता येते. तेथल्या तेथे त्यांना अनुदान देऊन तेथेच प्रशिक्षण व शिक्षण देण्याच्या बाबतचा निर्णय झाला तर ते अधिक बरे होईल.

सभापती महोदय, पुण्यामध्ये कुस्तीगीर आता उपाध्यक्ष आहेत. त्यांनी आता स्वत:ची शाळा आणि कॉलेज काढलेले आहे. त्या शाळा आणि कॉलेजमध्ये महाराष्ट्रातून कुस्ती शिकण्याकरिता अनेक विद्यार्थी येतात. त्या शाळांमध्ये शिक्षणही दिले जाते आणि कुस्तीगीर देखील तेथे प्रशिक्षणाच्या माध्यमातून तयार केले जातात. सदर पुणे येथील उपाध्यक्षांचे नाव श्री.बोऱ्हाटे असे आहे. मी एवढयासाठी हे उदाहरण दिलेले आहे की, आपल्या प्रत्येक जिल्हयात क्रीडा अधिकारी आहेत. जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांच्या माध्यमातून प्रत्येक तालुका, गाव, जिल्हयातून जे चांगले खेळाडू आहेत, त्यांना सिलेक्ट करुन सर्वप्रथम जिल्हा स्तरावरच त्यांना प्रशिक्षण द्यावे. त्यानंतरच त्यांच्याकरिता राज्य पातळीवर, विभागीय पातळीवर प्रशिक्षणाकरिता सोय उपलब्ध करावी, अशा प्रकारची माझी सूचना आहे, मला वाटते की, ती सूचना ग्राहय धरावी.

यानंतर श्री.सोनावणे.......

श्री. शशिकांत शिंदे........

छात्र सेना एनसीसीबद्दल मी अभिमानाने सांगणार आहे. दिनांक २६ जानेवारी या प्रजासत्ताकदिनी राज्यात एनसीसीमध्ये प्रथम क्रमांक मिळविणारी आणि त्याचे नेतृत्व करणारी मुलगी ही सातारा जिल्ह्यातील होती.

सभापती महोदया, एनसीसीच्या माध्यमातून क्रीडा संकुलाचा विकास करण्याची गरज आहे. तालुकावाईज जी क्रीडा संकुले अपूर्ण असतील अशा संकुलांची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी अनुदान वाढवून दिलेले आहे. ज्या ठिकाणी क्रीडा संकुले झाली नसतील किंवा वादात असतील तर अशी क्रीडा संकुले उभारण्याच्या दृष्टीकोनातून निर्णय घ्यावा अशी माझी आग्रही विनंती आहे. महाराष्ट्राच्या स्तरावर देशातील खेळ घडविण्यासाठी माननीय मंत्री महोदयांनी पुढाकार घ्यावा आणि महाराष्ट्र राज्याला यजमानपद देऊन महाराष्ट्र राज्य हे खेळात कसे पुढे आहे हे दाखविण्याचा प्रयत्न करावा, एवढी विनंती करतो. माननीय सभापती महोदयांनी मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त करतो आणि माझे भाषण या ठिकाणी थांबवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

--------

असुधारित प्रत

**उप सभापती** : मी पुढील सन्माननीय सदस्य बोलण्यापूर्वी नावे वाचून दाखवित आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, सदाभाऊ खोत, महादेव जानकर, ॲड. निरंजन डावखरे, विनायक मेटे, सुरेश धस, निलय नाईक, डॉ. सुधीर तांबे, अभिजीत वंजारी राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे सन्माननीय सदस्य सर्वश्री अमोल मिटकरी, संजय दौंड, अरुण लाड, सतीश चव्हाण, किरण सरनाईक इत्यादी वक्ते असून, सर्वांना १० मिनिटे बोलण्याची संधी दिली जाणार आहे. ज्यांचा प्रस्ताव असतो अशा सन्माननीय सदस्यांना अधिकचा वेळ दिला जातो. असे असले तरी विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना देखील अधिकचा वेळ दिला जाणार आहे. १० मिनिटांमध्ये सन्माननीय सदस्यांनी भाषण केले नाही आणि उप सभापती किंवा माननीय पीठासीन अधिकाऱ्यांशी वाद घातला तर शेवटी सदनाचा वेळ वाया जाणार आहे. आज सभागृहाचे कामकाज किती वाजेपर्यंत चालवायचे याबाबतचा निर्णय सर्वांनी करावा अशी माझी विनंती आहे.

आता सन्माननीय सदस्य श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रस्तावासंबंधी भाषणास सुरुवात करावी, अशी मी विनंती करीत आहे.

------

असुधारित प्रत

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (नागपूर स्था.प्रा.संस्था ) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांनी सत्ताधारी पक्षातर्फे म.वि.प. नियम २६० अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावासंबंधी मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांनी सदरहू प्रस्तावात केंद्र सरकारच्या सर्व योजनांचा पाढा वाचलेला आहे. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, सुक्ष्म अन्न प्रक्रिया, प्रधानमंत्री आवास योजना, स्वच्छ भारत मिशनमध्ये केंद्र सरकारने बांधलेल्या शौचालयाचा, प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेमध्ये किती गॅसचे वाटप केले, सौभाग्य योजनेत किती घरांना विज दिली, कोरोना संक्रमणाच्या काळात केंद्र शासनाने एपीएल योजनेच्या माध्यमातून गरीबांना ५ किलो धान्य दिले, इत्यादी केंद्र शासनाने केलेल्या योजनांचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांनी म.वि.प. नियम २६० अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावात केलेला आहे. राज्यात केंद्र शासनाच्या ९० टक्के योजना सुरु आहेत. केद्र शासनाच्या योजनांचा उल्लेख असलेला प्रस्ताव आज सभागृहात चर्चेसाठी आलेला आहे.

सभापती महोदया, कोरोना महामारीच्या काळात माननीय पंतप्रधान महोदयांनी १६० कोटी व्हॅक्सिनेशन या देशातील १३० कोटी लोकांना दिलेल्या आहेत. म्हणून तर आपण विनामास्क संपूर्ण देशभरात फिरत आहोत. जे काम चांगले झाले त्याचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. कोरोना महामारीवर आपण नियंत्रण मिळविल्यामुळे देशाचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचे मी आभार व्यक्त करतो. राज्याच्या माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी व्हॅक्सिनेसाठी राज्यात आम्ही देखील खर्च करु असे सांगितले होते. पण माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी राज्यात व्हॅक्सिनेशन करण्यासाठी पैसा खर्च करु दिला नाही. संपूर्ण व्हॅक्सिनेशन केंद्र शासनाने केलेले आहे. अशा प्रकारे कोरोना महामारीच्या काळात केंद्र शासनाने मदत केलेली आहे. कोरोना महामारीच्या काळात जी कुटुंबे उद्ध्वस्त झालेली आहेत आणि जी लोक मृत्यूमुखी पडलेली आहेत, अशा लोकांच्या कुटुंबीयांना २ लक्ष रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे किंवा कसे त्याचे माननीय मंत्री महोदयांनी

असुधारित प्रत

श्री. चंद्रशेखर बावनकुळे.....

त्यांच्या उत्तराच्या भाषणातून आम्हाला उत्तर देण्याची गरज आहे. कोरोना महामारीच्या नंतर सर्वांना मदत देण्याची भूमिका राज्य शासनाने बजावली पाहिजे अशी माझी मागणी आहे. जी लोक मृत्यूमुखी पडलेली आहेत, अशा लोकांच्या मुलांचे उदनिर्वाह, शिक्षणा संदर्भात शासनाने कोणती जबाबदारी घेतलेली आहे याचा उल्लेख सदरहू प्रस्तावात करावा अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी सदरहू प्रस्तावात ग्रामविकास विभागाचा उल्लेख केलेला आहे. ग्रामविकास आणि ऊर्जा विभागाने एकत्रितपणे असा निर्णय घेतला की, रस्त्यावरील दिवाबत्तीचे विज बिल ग्रामपंचायातीने भरले नाही तर अशा वेळी संबंधित सरपंचांना अपात्र केले जाणार आहे. या निर्णयाचा उल्लेख आजच्या प्रस्तावात करायला पाहिजे होता. रस्त्यावरील दिवाबत्तीचे विज बिल भरण्याची जबाबदारी ही राज्य शासनाची आहे. परंतु, ग्रामविकास विभागाने बजेट केले नाही. ग्रामविकास विभागाने ऊर्जा विभागाला बजेट दिले नाही. आपली पदे वाचवायची असतील तर केंद्र शासनाच्या पंधराव्या वित्त आयोगाचे पैसे देऊन विज बिल भरण्याची आवश्यकता आहे. अन्यथा तुमची पदे जातील अशी धमकी सरपंचांना देण्याचे चांगले काम ग्रामविकास विभाग आणि राज्य शासनाने केलेले आहे. मी काही विजेचा प्रस्ताव मांडणार नाही. मला सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांच्याकडून अशी अपेक्षा होती की, ऊर्जा विभागाचा उल्लेख सदरहू प्रस्तावात व्हायला हवा होता. पुढील सहा महिन्यात मंत्री महोदयांना रस्त्यावर फिरण्याचे त्रासदायक होणार आहे. म्हणून प्रस्तावात ऊर्जा विभागाचा उल्लेख केलेला नाही. ऊर्जा विभागाचा सदरहू प्रस्तावात उल्लेख व्हायला हवा होता अशी माझी सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांच्याकडून अपेक्षा होती.

सभापती महोदया, राज्य उत्पादन शुल्क विभागाचा सदरहू प्रस्तावात उल्लेख करायला हवा होता. त्यामुळे सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांचे अभिनंदन करण्याची संधी आम्हाला मिळाली असती. आता राज्य शासन किराना दुकानातून

असुधारित प्रत

श्री. चंद्रशेखर बावनकुळे.....

लोकांना वाईन देणार आहे. त्यामुळे आम्हाला राज्य शासनाचे अभिनंदन करण्याची संधी मिळाली असती. राज्य उत्पादन शुल्क विभागाचा सदरहू प्रस्तावात उल्लेख केला असता तर चांगले झाले असते.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.....

सभापती महोदया, चंद्रपूर जिल्ह्यातील हजारो, लाखो महिलांनी दारुबंदीसाठी मोर्चा काढला होता. त्या मोर्चाची दखल घेऊन तत्कालीन सरकारने चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी केली होती. परंतु या राज्य सरकारने ऐन कोरोना संक्रमनाच्या काळात चंद्रपूर जिल्ह्यातील दारुबंदी उठविली. परंतु या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांना या प्रस्तावाच्या माध्यमातून सरकारचे अभिनंदन करता आले नाही. वास्तविक पाहता किराणा दुकानात वाईन विक्री करण्यास परवानगी देणे आणि चंद्रपूर जिल्ह्यातील दारुबंदी उठविणे, हे दोन्ही निर्णय आत्मघातकी आहेत. ज्यावेळी लहान मुले किराणा दुकानात चॉकलेट किंवा बिस्कीट घेण्यासाठी जातील तेव्हा त्यांना तेथे वाईनच्या बाटल्या दिसतील. सभापती महोदया, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात हे काय घडत आहे ? सत्ताधारी बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावामध्ये सरकारच्या उपरोक्त दोन्ही आत्मघातकी निर्णयाचा उल्लेख केला असता तर बरे झाले असते, असे मला वाटते.

सभापती महोदया, संपूर्ण महाराष्ट्राला वेठीस धरण्याचे काम या महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून होत आहे. माननीय श्री.दिवाकर रावते साहेब आपण आणि आम्ही विकासात्मक बाबींसाठी अनेकदा भांडलो. ग्राम विकास विभाग किंवा अन्य विभागाच्या योजना करण्यासाठी बजेट उपलब्ध करुन देण्यात येते. परंतु या योजना तयार करणारे वैधानिक विकास मंडळे बरखास्त करण्याचा निर्णय या सरकारने घेतला आहे. अशा प्रकारचा मोठा आत्मघातकी निर्णय या सरकारने केलेला आहे. विदर्भ वैधानिक विकास मंडळ हे बंद करण्यात आले आहे. स्व.विलासरावजी देशमुख यांच्यापासून ते माननीय श्री.अशोकजी चव्हाण, माननीय श्री.देवेंद्रजी फडणवीस हे मुख्यमंत्री असताना किंवा पूर्वीच्या कोणत्याही मुख्यमंत्र्यांनी वैधानिक विकास मंडळे बरखास्त करण्याचा आत्मघातकी निर्णय कधीच घेतला नाही. जर वैधानिक विकास मंडळे जीवंतच नसतील तर मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचा अनुशेष कसा दूर करता येईल ? एवढेच नव्हे तर क्रीडा विभाग किंवा अन्य विभागांच्या ज्या योजना प्रस्तावित होणार आहेत त्या योजना कशा पूर्ण होतील ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.....

विभागाच्या लोकसंख्येनुसार, भौगोलिक परिस्थितीनुसार त्या त्या भागांतील अनुशेष कसा दूर करणार, हा खरा प्रश्न आहे. या सरकारकडून सांगण्यात येते की, आम्ही सर्वांना समान प्रमाणात निधीचे वाटप करु. परंतु केवळ घोषणा करुन कही उपयोग नाही. प्रत्यक्षात निधी सप्रमाणात वितरित झाला पाहिजे. या सरकारने काही तरी घोषणा करुन महाराष्ट्रातील जनतेची दिशाभूल करणे योग्य नाही. मला वाटते विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, उर्वरित महाराष्ट्रातील मंत्र्यांनी निदान आता तरी जागरुक झाले पाहिजे. सभापती महोदया, अधिवेशन संपण्यापूर्वी वैधानिक विकास मंडळे जीवंत करण्याची घोषणा सरकारने केली पाहिजे. नाही तर महाराष्ट्रातील जनतेला या अर्थसंकल्पीय अधिवेशनातून काहीच मिळाले नाही, असा त्याचा अर्थ होईल.

सभापती महोदया, मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी चांगली भूमिका मांडली असून त्या बद्दल आमचे काही दुमत नाही. माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीनजी गडकरी यांनी संपूर्ण महाराष्ट्रात आणि देशात चांगले काम केले आहे. माननीय ग्राम विकास मंत्री श्री.हसन मुश्रीफ सुद्धा या अनुषंगाने काम करीत आहेत. परंतु महाराष्ट्रात मागील सहा महिन्यांपासून कंत्राटदारांची देयके अदा न केल्यामुळे मुख्यमंत्री ग्राम सडक योजना बंद पडलेली आहे. आज राज्यातील कोणत्याही जिल्ह्यात ही योजना सुरु नाही. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी संपूर्ण महाराष्ट्रात ३ हजार कोटी रुपयांची गरज आहे. ६५० कोटी रुपये एकट्या पूर्व विदर्भात पाहिजे आहेत. माननीय मंत्री श्री.सुनील केदार यांनी परवा या योजनेच्या बाबतीत आढावा घेतला आहे. सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी सांगितल्यानुसार माननीय ग्राम विकास मंत्री चांगले काम करीत असतील तर त्यांना पुरेसा निधी दिला पाहिजे. जर ते खरोखरच चांगले काम करीत असतील तर आम्ही सुद्धा त्यांचे अभिनंदन करु. परंतु जर त्यांना निधीच नसेल तर ते काम करु शकणार नाहीत. तसेच दुसरी बाब अशी की, निधी उभारण्यासाठी राज्य सरकार कर्ज काढूच शकत नाही. शिवाय राज्य सरकारने सांगितले आहे की, सरकारला कर्ज

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.....

काढायचे नाही. राज्य सरकारकडे केवळ १ टक्का कर्ज काढण्याची मर्यादा आहे. मी विचारु इच्छितो की, सरकारला १ टक्का कर्ज काढण्यास कोणी मनाई केली आहे ? १ टक्का कर्ज काढण्यास या सभागृहाची संमती आहे. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचा पहिला आणि दुसरा टप्पा पूर्ण करण्यासाठी १० हजार कोटी रुपये नव्हे तर २० हजार कोटी रुपये लागत असले तरी त्याकरिता पुरवणी मागणी सादर करण्यासाठी सभागृहाची मान्यता आहे. आपण या कामासाठी पुरवणी मागणी सादर करावी. या राज्यातील रस्त्यांची कामे झाली पाहिजेत या भूमिकेचे आम्ही सुद्धा आहोत. परंतु आज निधी नसल्यामुळे मुख्यमंत्री ग्राम सडक योजना बंद पडल्याचे आपल्याला दिसून येईल.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे आपण भाषणाचा समारोप करावा.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, विरोधी पक्षाच्या वतीने या प्रस्तावावर सर्वप्रथम सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे हे बोलत आहेत. मी या प्रस्तावावर बोलणार नाही. त्यामुळे माझा पाऊस तास वाचला आहे. माझी विनंती आहे की, त्यांना अजून थोडा वेळ बोलण्यास अनुमती द्यावी. आमच्या पक्षाच्या एक-दोन सन्माननीय सदस्यांची नावे कमी केली तरी चालतील.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.अमरनाथ राजूरकर)**

सभापती महोदय, आमच्या सरकारच्या काळात आम्ही ७ लाख ५६ हजार शेतकऱ्यांना वीज कनेक्शन देण्याचे काम केले. या प्रस्तावात शेती हा विषय आला आहे. आज राज्यातील २ लाख ६० हजार शेतकऱ्यांनी वीज कनेक्शनसाठी अडीच वर्षांपासून डीमांड अमाऊंट भरलेली आहे. परंतु मागील दोन-अडीच वर्षात एकही वीज कनेक्शन देण्याचे काम या सरकारने केलेले नाही. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांमध्ये या सरकारप्रती मोठी अनास्था आहे.

अशुद्धित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.....

सभापती महोदय, आपण आणि माननीय राज्यमंत्री श्री.अब्दुल सत्तार हे मराठवाड्यातून येतात. या प्रस्तावात जलसंपदा विभागाचा उल्लेख आहे. परंतु या महाविकास आघाडी सरकारने मराठवाड्याच्या वॉटर ग्रीडचा प्रस्ताव रद्द केला आहे. सत्ताधारी बाजूचे सन्माननीय सदस्य खाली बसून सांगत आहेत की, सदरहू वॉटर ग्रीडचा प्रस्ताव रद्द केला नसून त्यावर अभ्यास सुरु आहे. मराठवाड्याच्या वॉटर ग्रीडचे टेंडर किती दिवसांत काढून या कामाची सुरुवात केली जाणार आहे, याचे उत्तर मंत्री महोदयांनी दिले पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी सांगितले की, घरकुलांची कामे झाली पाहिजेत. आम्हाला सुद्धा ही बाब मान्य आहे. मला वाटते हा विषय मार्गी लावण्यासाठी माननीय मंत्री श्री.सुनील केदार साहेबांकडे या बाबतची जबाबदारी द्यावी. माननीय श्री.सुनील केदार साहेब हे सर्वोच्च न्यायालयात चांगले भांडतात. मला त्या बाबतची अनेक उदाहरणे माहीत आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील ९६ हजार हेक्टर जमीन झुडपी जंगलात दाखविण्यात आली आहे. राज्य सरकारने या अनुषंगाने संपूर्ण काम केले आहे. आता केवळ या ९६ हजार हेक्टरच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाची एनओसी मिळणे बाकी आहे. ज्या ग्रामपंचायतींच्या बाजूला झुडपी जंगलाची जागा आहे त्यावर घरे झालेली आहेत. जवळपास २७ लाख घरांना जमिनीचे पट्टे नसल्यामुळे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत किंवा राज्य सरकारच्या योजनेंतर्गत तेथे घरे बांधता येत नाहीत. जोपर्यंत ९६ हजार हेक्टर जमिनीच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाची एनओसी मिळत नाही तो पर्यंत २७ लाख कुटुंब त्या ठिकाणी घरे बांधू शकणार नाहीत. या कामी पहिला पुढाकार माननीय श्री.मुकुल वासनिक यांनी, नंतर माननीय मंत्री श्री.नितीनजी गडकरी यांनी आणि त्यानंतर माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांनी घेतला होता. आता या विषयीचे काम अंतिम टप्प्यात आहे. बैलगाडा शर्यतीचा विषय सर्वोच्च न्यायालयात जसा प्रलंबित होता तसाच ९६ हजार हेक्टर झुडपी जंगलाच्या एनओसीचा विषय सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. जर या जमिनीची एनओसी मिळाली तर २७ लाख

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.....

कुटुंबांना घरकुलांसाठी जमिनीचे पट्टे वाटप करता येतील आणि 'सर्वांसाठी घरे' या योजनेतून सर्व लोकांना घरे देता येतील. मला वाटते माननीय श्री.सुनीलजी केदार साहेब आपण ही जबाबदारी स्वीकारली पाहिजे. आपण केवळ क्रीडा विभागावर थांबून चालणार नाही. आपण विदर्भातील मंत्री असल्यामुळे आपल्याकडे अतिरिक्त चार विभाग असावयास पाहिजेत, असे आम्हाला वाटते. राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात चांगला वकील नेमून ९६ हजार झुडपी जंगलाच्या बाबतीत एनओसी मिळवावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, राज्यात ७ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. मघाशी तारांकित प्रश्नाला उत्तर देताना मंत्री महोदयांकडून सांगण्यात आले की, ३ लाख ४१ हजार शेतकऱ्यांनी कर्जमाफीसाठी अर्ज केले. परंतु त्यांचे अर्ज ऑनलाईन प्रक्रियेत कुठे गेले माहीत नाही. मंत्री महोदयांनी या विषयी बैठक आयोजित करण्याचे मान्य केले आहे. राज्यातील ३ लाख ४१ हजार शेतकरी कर्जमाफी योजनेत पात्र असताना सुद्धा त्यांना अद्यापपर्यंत कर्जमाफी योजनेचा लाभ मिळालेला नाही.

नंतर श्री.कांबळे......

असुधारित प्रत

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

मी मघाशी माननीय मंत्र्यांना विनंती केली की, किमान ३ महिन्यांकरिता ती योजना खुली करावी. तसे केले तर किमान त्या लोकांना अर्ज करता येतील. दुसरे महत्त्वाचे म्हणजे तुम्ही अर्थसंकल्पात काही बाबी छापलेल्या आहेत. मागच्या अर्थसंकल्पाची किती अंमलबजावणी झाली, या अर्थसंकल्पाची किती अंमलबजावणी होईल या संदर्भात आम्हाला फार शंका घ्यायची नाही. २० लाख परिवारांना ५० हजार रुपये प्रोत्साहन अनुदान देणार आहात हे अर्थसंकल्पात छापले आहे, ते लवकरात लवकर दिले पाहिजे.

सभापती महोदय, कोरोना संक्रमणामध्ये सौभाग्य योजनेबरोबर शंभर युनिट वीज माफ करु असे सांगितले आहे. सौभाग्य योजनेचा प्रस्ताव आहे. त्याच योजनेतील हे लोक आहेत. १०० युनिट माफ करणार आहात. माननीय ऊर्जामंत्र्यांनी म्हटले होते की, ० ते १०० युनिट वीज वापरणाऱ्या ग्राहकांना आम्ही वीज मोफत देऊ. त्याचे काय झाले ? नस्ती तयार झाली. ती नस्ती माननीय वित्तमंत्र्यांकडे गेली. माननीय वित्तमंत्र्यांनी त्या नस्तीवर काहीही निर्णय घेतला नाही. वित्त मंत्रालयाला विचारले, वित्त मंत्रालय म्हणाले की, तुम्ही मुख्यमंत्री कार्यालयात विचारावे. मुख्यमंत्री कार्यालयात विचारले, तेव्हा मुख्यमंत्री कार्यालयाने म्हटले की, शंभर युनिट वीज बील माफीची घोषणा कोणालाच विचारुन केली नाही. त्यामुळे तुम्ही ज्या माननीय मंत्र्यांनी घोषणा केली, त्या माननीय मंत्र्यांना विचारावे. शेवटी सामुहिक जबाबदारी सरकार म्हणून होती. ती जबाबदारी कोणीही पार पाडली नाही. महाराष्ट्राच्या जनतेला फसविण्याचे काम महाविकास आघाडी सरकारने केले आहे. शंभर युनिट वीज बील माफ करणार होते. ते पाच वर्षांसाठी माफ करण्याची घोषणा केली. ....(अडथळा)....

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाचे ४० टक्के पैसे कापले गेले, आदिवासी विकास विभागाचे ४० टक्के पैसे कापले गेले. कट लावण्यात आला. आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय विभाग यांना ४० टक्क्यांचा कट लागत असेल तर या वर्गाला न्याय कोण देणार आहे ? त्यामुळे किमान यावर्षी

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

सामाजिक व आदिवासी क्षेत्राला न्याय मिळाला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांनी मुद्दे मांडले आहेत की, आदिवासी विकास विभागाला न्याय मिळाला पाहिजे, सामाजिक न्याय विभागाला न्याय मिळाला पाहिजे. पण नक्षलग्रस्त भागाकरिताच्या योजनांना देखील ४० टक्के कट लागला आहे. ठीक आहे. कोरोना संक्रमण होते. पण यावर्षीचा अर्थसंकल्प आहे. सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांनी ४ योजना सांगितल्या आहेत, त्याबाबत निर्णय झाला पाहिजे. माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पशुसंवर्धन खात्याला तरतूद किती आहे हे मला माहीत नाही. माननीय मंत्र्यांनी त्याचा उल्लेख केला पाहिजे. पशुसंवर्धन खात्याला किती पैसा येणार आहेत ? सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत यांनी सांगितले की, क्रीडा क्षेत्रामध्ये अमुक करावे, पशुसंवर्धनमध्ये अमुक करावे. मात्र माननीय मंत्र्यांची परिस्थिती इतकी वाईट आहे की, त्यांना शेवटी त्यांच्या जिल्ह्यात त्यांची इज्जत वाचविण्याकरिता मायनिंग फाऊंडेशनमधून ३० कोटी रुपये काढून गायी वाटाव्या लागल्या. राज्य सरकारने तरतूद दिली नाही. तुम्हाला वाटते की, राज्यामध्ये दूध वाढले पाहिजे, राज्यात गुजरातचे दूध बंद झाले पाहिजे. ....(अडथळा).... महाराष्ट्राचे दूध विकले गेले पाहिजे असे आपण म्हणत आहात. आपण तसे म्हणू या. माझी विनंती आहे की, आता पुरवणी मागण्या येतील तेव्हा शासनाने पशुसंवर्धन खात्याला ५ हजार कोटी रुपये दिले पाहिजेत. सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांनी साहीवाल गायींचा उल्लेख केला आहे. मी सांगतो की, तुम्ही ५ हजार कोटी रुपये द्यावेत. संपूण राज्यात घरोघरी साहीवाल गायी पोहोचविण्याचे काम एका मिनिटात माननीय मंत्री श्री. सुनील केदार करु शकतात ही आमची धारणा आहे. आम्हाला हे माहीत आहे. पण तुम्ही ५ हजार कोटी रुपये दिले पाहिजेत. गायी घ्या असे म्हटले आहे. नागपूरात त्यांची परिस्थिती वाईट झाली. ३० कोटी रुपये इकडून-तिकडून काढून लोकांचे काम करावे लागले. ते माननीय पशुसंवर्धन मंत्री आहेत. एक गाय तरी द्यावी, एक कोंबडी तरी द्यावी, काही तरी करावे.

असुधारित प्रत

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

सभापती महोदय, गोष्ट अशी आहे की, त्यांना देताना पहिल्यांदा काँग्रेस सांभाळायला लागली. इमबॅलन्स तयार झाला. मी परवा म्हटले की, मायनिंग फाऊंडेशनमधील पुन्हा ३० कोटी रुपये काढावेत. तुम्ही ३० कोटी रुपयांमध्ये जिल्ह्यातच भौगोलिक असमतोल निर्माण केला, अमुक तालुक्यात जास्त तर तमुक तालुक्यात कमी असे केले. मी परवा देखील मागणी केली की, तुमच्याकडे बजेट नसेल तर मायनिंग फाऊंडेशनमधून अजून ३० कोटी रुपये काढावेत. नागपूर जिल्हा होईल. प्रस्तावात आमची मागणी आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांनी प्रस्तावात जेवढ्या सूचना केल्या आहेत, त्या तशाच स्वीकारण्याकरिता मानीय मंत्री श्री. सुनील केदार यांना ५ हजार कोटी रुपये लागतील, त्याची व्यवस्था उभी झाली पाहिजे. आज ती घोषणा केली पाहिजे. राष्ट्रवादी काँग्रेस तुमच्याकडे आहे. माननीय वित्तमंत्री श्री. अजितदादा पवार तुमचे म्हणणे एका मिनिटात ऐकतात. सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांनी सांगितले आणि त्यांनी ऐकले नाही असे होत नाही. ५ हजार कोटी रुपये दिले पाहिजेत. तुमचा प्रस्ताव आहे. तुम्ही भाषण दिले आहे.

सभापती महोदय, क्रीडा क्षेत्रात राज्याला प्रचंड मोठा स्कोप आहे. आपल्या सर्वांना हे माहीत आहे. क्रीडा क्षेत्राला बजेट कमी असेल तर त्याला सुध्दा १-२ हजार कोटी रुपये वाढवून दिले पाहिजेत. पैसे दिले तर कामे होतात. सर्व सोंग करता येते. पण पैशाचे सोंग करता येत नाही. ग्रामविकास विभागाला देखील ३ हजार कोटी रुपये नसल्यामुळे ६ महिन्यांपासून कामे बंद आहेत. माननीय ग्रामविकास मंत्री काय करतील ? कारण कामांसाठी बजेट पाहिजे. माननीय महिला व बालकल्याण मंत्री काय करतील ? त्यांना बजेट पाहिजे. माननीय पशुसंवर्धन मंत्री काय करतील ? त्यांना बजेट पाहिजे. त्यांनी बैलगाडा शर्यत आणली हे ठीक आहे. पण पुढे काय ? आपल्याला त्यांना ५ हजार कोटी रुपये द्यावे लागतील. क्रीडा क्षेत्राला २ हजार कोटी रुपये द्यावे लागतील. माझी विनंती आहे. एका अटीवर सत्तारुढ पक्षाच्या प्रस्तावाला

असुधारित प्रत

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

आम्ही सर्वानुमते मंजुरी देऊ की, ५ हजार कोटी रुपये पशुसंवर्धन विभागाला, २ हजार कोटी रुपये क्रीडा विभागाला, ३ हजार कोटी रुपये ग्रामविकास विभागाला देण्यात येतील.

सभापती महोदय, कोरोना संक्रमणामध्ये मृत्युमूखी पडले, त्या प्रत्येकाच्या परिवाराला २ लाख रुपये असे सर्व मुद्दे मांडण्यात आले. सत्तारुढ पक्षाकडून उत्कृष्ट भाषण झाले. मात्र यासाठी पैसा लागेल. नुसते भाषण देऊन चालणार नाही. विरोधकांचा प्रस्ताव मान्य केला की नाही हे सोडावे. मात्र तुमचा प्रस्ताव मान्य झाला पाहिजे.

सभापती महोदय, माझी माननीय ग्रामविकास खात्याकडे मागणी आहे की, त्यांनी सरपंचांना दिलेले पत्र परत घ्यावे. माननीय ग्रामविकास मंत्र्यांनी आजच घोषणा करावी की, आम्ही तुमचे सरपंच पद काढणार नाही. रस्त्यावरील लाईटचे बिल सरकारच भरेल. सरसकारची जबाबदारी पहिल्यापासून आहे. ग्रामविकास खात्याने पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करावी आणि सरपंचांना अभय द्यावे. सर्वच पक्षाच्या सरपंचांना पदावरुन काढण्याची नोटीस दिली आहे. माझी विनंती मान्य करावी.

सभापती महोदय, शिक्षण विभागाचा मुद्दा आहे. १८३ विशेष शिक्षकांची यादी आहे. शिक्षकांचा पगार मोठ्या प्रमाणात थांबला आहे, त्याबाबत निर्णय केला पाहिजे. राज्यातील स्वधार योजनेचा लाभ वंचित विद्यार्थ्यांना तातडीने दिला पाहिजे. सभागृह संपण्यापूर्वी सांगावे. आम्ही आमच्या प्रस्तावावर नंतर बोलू. राज्य मागासवर्ग आयोगाचा विषय आहे. ओबीसी संदर्भातील माननीय मंत्र्यांकडे हा विषय नव्हता. आम्ही ओबीसी म्हणून विषय मांडणार होतो. ग्रामविकास खात्याचा विषय होता. ग्रामविकास खात्याने २ वर्षे सर्वोच्च न्यायालयाची केस योग्य पध्दतीने हाताळली नाही म्हणून ओबीसींचे आरक्षण गेले हा माझा स्पष्ट आरोप आहे. ती केस हाताळण्याची जबाबदारी ओबीसी संदर्भातील माननीय मंत्र्यांची नव्हती. ती

जबाबदारी ग्रामविकास विभागाची होती. कारण संपूर्ण केसच्या संदर्भात ग्रामविकास विभागाला अधिकार होता. योग्य पध्दतीने न हाताळण्याचा परिणाम आहे की, आज

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

ओबीसी आरक्षण गेले. मला आवर्जून उल्लेख करायचा आहे. मी राज्याच्या प्रधानमंत्री आवास योजनेचा घरकुलाबाबत सांगतो. घरकुलासंदर्भात अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात केंद्र सरकारला एनओसी पाठविली नाही.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे....

मंत्री महोदय जाधव नावाचा अधिकारी आहे त्याची चौकशी करावी. अमुक इतक्या घरांची कामे पूर्ण झाली अशी युसी न दिल्यामुळे निधी मिळाला नाही. आपल्या राज्यासाठी केंद्र सरकारने दीड हजार कोटी रुपये रिलीज करुन ठेवले आहेत. परंतु एका अधिकाऱ्याच्या चुकीमुळे राज्यातील पंतप्रधान आवास योजनेतील घरांचा दुसरा हप्ता मिळाला नाही. सर्व राज्यांनी युसी दिलेली आहे. मी स्वत: केंद्र शासनाकडे जाऊन आलो त्यांच्याकडे निधी पडून आहे. परंतु आपल्या हेकेखोर अधिकाऱ्याने केंद्र शासनाकडे युसी न पाठविल्यामुळे हा निधी अद्याप मिळाला नाही. त्यांनी असे सांगितले की, युसी घेऊन या व १५ मिनिटात निधी घेऊन जा. ग्रामविकास मंत्री महोदयांना व मंत्री महोदय श्री.सुनील केदार यांना विनंती आहे की, ही बाब आपण तपासा व युसी पाठविली तर जो निधी शिल्लक आहे तो केंद्र शासन देण्यास तयार आहे. गरज पडली तर माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी यांची मदत घेता येईल. राज्यातील पंतप्रधान आवास योजनेतील घरांची कामे पूर्ण झाली पाहिजेत.त्या करिता आपण सर्वांनी पुढाकार घेतला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे व मी ज्या मागण्या केल्या त्यासाठी लागणारा निधी मंत्री महोदयांनी घोषित करावा. इतके बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------

असुधारित प्रत

श्री.अभिजीत वंजारी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी नियम २६० अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावाच्या माध्यमातून वेगवेगळया मंत्री महोदयांनी त्यांच्या खात्यात केलेल्या विशेष कामगिरीचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात केला आहे. हे सरकार आल्यानंतर कोरोना काळ आपण सर्वांनी अनुभवला आहे. या काळात मंत्रिमंडळातील सर्व मंत्री महोदयांनी चांगली कामगिरी केली आहे. विपरीत परिस्थितीत आपले राज्य प्रगतीपथावर कसे जाईल याचा आलेख मंत्री महोदयांनी मांडलेला आहे. मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री महोदय तसेच महसूल मंत्री यांनी वेगवेगळया खात्याचा आलेख देताना राज्यातील सर्व सामान्य माणसांना दिलासा कसा देता येईल व वेगवेगळ्या पध्दतीने राज्यात इन्फ्रास्ट्रक्चर कसे उभे करता येईल याचा प्रयत्न त्या आलेखातून दिसतो. सन्माननीय सदस्यांनी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनांचा उल्लेख येथे केला आहे. या योजनेतून ७३० किलोमीटर लांबीची नवीन जोडणी व ३० हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची दर्जोन्नती करण्याचा मानस त्यांनी बोलून दाखविला आहे. गडचिरोली या दुर्गम भागात मोठ्या प्रमाणात नक्षलवादी आहेत, त्या भागात जवळपास १७९५ किलोमीटरचे ३२५ रस्ते आणि १२८ पूल व १५७३ किलोमीटर लांबीचे पूल २७८ रस्ते व १६ पूल असे वेगवेगळ्या योजनेच्या माध्यमातून दुर्गम व ग्रामीण भागात रस्ते पोहचले पाहिजे. त्यातून सर्व सामान्य, गरीब व आदिवासी व्यक्ती राष्ट्रीय प्रवाहात जोडला गेला पाहिजे या उद्देशाने राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून आखण्यात आले आहे. त्यासाठी मी सरकारचे अभिनंदन करतो. ग्रामीण विकास मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार मोठ्या प्रमाणात राज्यात अनुदान जाहीर केले आहे. १३८२८ कोटी रुपयांचा निधी येत्या पाच वर्षात या खात्याच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. त्यासाठी १००० कोटी रुपयांची व्यवस्था या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. त्यामुळे राज्यात रस्त्यांचे जाळे मोठ्या प्रमाणात निर्माण होणार आहे. मंत्री महोदय श्री.हसन मुश्रीफ यांच्या खात्याच्या माध्यमातून चांगल्या योजना यावर्षी देण्यात आल्या आहेत. राज्यात पंचायत राज संस्थांमधून शासकीय व्यवस्थापन आणि

श्री.अभिजीत वंजारी...

विकास कार्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांच्यामध्ये यशवंत पंचायत राज अभियान सन २००५ पासून सुरु करण्यात आले. त्याचा एक भाग म्हणून सन २०११-१२ मध्ये पंचायत सबलीकरण आणि उत्तरदायित्व प्रोत्साहन योजना सुरु केली. त्या माध्यमातून या राज्यात चांगली कामे करणाऱ्या पंचायत समित्या, जिल्हा परिषदा यांना समोर आणण्याचे काम शासन करीत आहे.

सभापती महोदय, अनेक महाआवास योजनांचा उल्लेख करण्यात आला आहे. प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, बार्टी आवास योजना आहे. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर जिल्हात मोठ्या प्रमाणात आवास योजनेचा दुसरा टप्प्याचा निधी मिळालेला नाही. विशेषत: रमाई आवास योजनेमध्ये १२.५० कोटी रुपये अनुदान नागपूर जिल्ह्याचे यायचे आहे. महिला पंचायत शक्ती अभियानांतर्गत,पंचायत समितीमध्ये महिला प्रतिनिधींचा संघ तयार करुन तीन स्तरावरील एका महिला प्रतिनिधीची निवड करण्यात येते. ३३ जिल्ह्यातून प्रत्येकी तीन अशा ९९ सदस्यांचा संघ तयार करण्यात येतो ही अतिशय चांगली योजना आहे. त्याबाबत मी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, पशुसंर्धन मंत्री माननीय श्री.सुनील केदार उपस्थित आहेत. त्यांच्या खात्याने दोन वर्षात अतिशय चांगली कामगिरी केली आहे. मुख्यमंत्री पुश स्वास्थ योजना, गिर जातीच्या वळूची आयात, आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ, सर्व जिल्ह्यात खेलो इंडिया सेंटरच्या माध्यमातून सर्व होतकरु युवकांना खेळाचे प्रोत्साहन देण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी ऑलिम्पिकचा उल्लेख केला आहे. चीन,जपान व इतर देशात खेळासाठी प्रोत्साहन देण्यात येते. त्यांना राष्ट्रीय दर्जाच्या सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात. त्याप्रमाणे आपल्या राज्यात खेळाचे प्रोत्साहन देण्यासाठी बजेटमध्ये तरतूद करण्यात आली आहे. त्यासाठी मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. पशुधन ही राष्ट्रीय संपत्ती आहे. उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी वेगवेगळ्या पध्दतीच्या योजना आणलेल्या आहेत.

असुधारित प्रत

श्री.अभिजीत वंजारी.....

उच्च वंशवाळीची निर्मिती असेल, मुख्यमंत्री पशुस्वाथ्य योजना असेल. या सर्व योजनांच्या माध्यमातून चांगली कामे त्यांनी केली आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशनात स्त्री रुग्णालयाची घोषणा वित्त मंत्री महोदयांनी केली आहे. भंडारा व वर्धा येथे १०० खाटांचे महिला रुग्णालय सुरु केले. कर्करोगाचे निदान करण्यासाठी ८ मोबाईल व्हॅन प्रत्येक विभागात देण्याचे ठरविले आहे. सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी मांडलेल्या प्रस्तावाला मी पाठिंबा देता सरकारचे अभिनंदन करतो. उर्वरित योजनांच्या माध्यमातून जास्तीत जास्त दिलासा सामान्य जनतेला कसा देता येईल तो प्रयत्न करावा अशी अपेक्षा व्यक्त करतो व माझे भाषण थांबवितो.

--------

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी नियम २६० अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर मी बोलण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी केलेले भाषण मी बारकाईने ऐकले आहे. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे जे बोलेले त्यांचे भाषण मी गांभीर्यपूर्वक ऐकले आहे. पशुसंवर्धन मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांच्या भाषणात असे सांगितले की, राज्यात ९० टक्के योजना केंद्र शासनाच्या राबविण्यात येतात. कोरोनाच्या संक्रमणानंतर राज्याची नेमकी भूमिका काय आहे ? किराणा दुकानातील वाईनचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. महामंडळाबाबत त्यांनी विषय उपस्थित केला. नियम २६० चा प्रस्ताव काळजीपूर्वक वाचला तर महाराष्ट्रातील ग्रामीण भाग केंद्रस्थानी ठेऊन महाविकास आघाडी शासनाने कोरोना काळात अर्थव्यवस्था डबघाईस आलेली असताना चांगल्या पध्दतीने कामे केली. मी मान्य करतो की, काही ठिकाणी निधीची कमतरता पडली असेल. ग्रामविकास विभाग, पशुसंवर्धन विभाग, जलसंपदा विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग या काळात महाराष्ट्रात अस्मानी व सुलतानी संकटे आली.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित

श्री.अमोल मिटकरी..........

ही स्पर्धा कशासाठी आहे ? बैलगाडा शर्यतीचा निर्णय कशासाठी घेण्यात आला ? ग्रामीण भागात बैलगाडा शर्यत जिव्हाळ्याचा विषय असून त्याला चालना मिळावी यासाठी बैलगाडा शर्यतीचा निर्णय घेण्यात आला. स्पर्धेतून लोक पुढे येतात. म्हणून महाराष्ट्र शासनाने गाव पातळीवर जास्तीत जास्त काळजी घेऊन गावाची कोरोना मुक्तीकडे वाटचाल व्हावी असा प्रस्ताव राज्यासमोर मांडलेला आहे.

सभापती महोदय, कोरोना काळात राज्यात कोविड-१९ जागतिक महामारीच्या कालावधीत घरातील कर्ता पुरुष मृत्युमुखी पडल्यामुळे विधवा झालेल्या महिलांना ग्रामविकास विभागामार्फत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत उत्पन्नाचे साधन उपलब्ध करुन देऊन त्यांना सन्मानजनक उपजीविका उपलब्ध व्हावी यासाठी वीर भद्रकाली ताराराणी स्वयंसिद्ध योजना दिनांक २ नोव्हेंबर, २०२१ रोजी कार्यान्वित करण्यात आली आहे. शासनाच्या विविध योजनांच्या माध्मातून ही योजना राज्य पातळीवर राबविण्यात येत आहे. आपल्याला असे अनेक मुद्दे मांडता येतील. सभापती महोदय, आपण मला प्रस्तावावर बोलण्यासाठी १० मिनिटांचा वेळ दिलेला आहे. नियम २६० अन्वये प्रस्तावावर सन्माननीय सदस्य सर्वश्री शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी यांनी आपले म्हणणे मांडले. मी ती आकडेवारी सांगून सभागृहाचा वेळ घेणार नाही. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेमध्ये असे म्हटले आहे की, "गाव हा विश्वाचा नकाशा, अन् गावावरुन देशाची परीक्षा, गावच भंगता अवदशा येईल देशा माझी." स्व.आर.आर.पाटील साहेबांनी गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छता स्पर्धा राबविल्या होत्या. महाराष्ट्र शासनाने त्या योजना पुरुज्जीवित करण्याचा चांगला उपक्रम हाती घेतलेला आहे. मी आपल्या मताशी शंभर टक्के सहमत आहे. ग्रामविकास विभाग कितीही महत्वाचा असला तरी निधी अभावी योजना राबविता येणार नाहीत. ग्रामीण भागात पाणंद रस्त्यांचा विषय महत्वाचा असतो. आम्ही सभागृहाच्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती करतो

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी..........

की, विधानसभेच्या आमदारांना त्यांच्या मतदारसंघातील विकास कामांसाठी निधी मागण्याचा अधिकार आहे. परंतु ज्यावेळी विधान परिषदेचे सदस्य मंत्री महोदयांकडे २५१५ किंवा इतर विकास कामासाठी निधीची मागणी करतात त्यावेळी असे सांगितले जाते की, तुम्ही विधान परिषदेचे आमदार आहात, तुम्हाला फारसा अधिकार नाही. आम्हाला सुद्धा लोकप्रतिनिधी म्हणून लोकांना उत्तरे द्यावी लागतात. पाणंद रस्ते झाले पाहिजेत अशी लोकांची मागणी असते. सरकारने मातोश्री पाणंद रस्ते योजना लागू केलेली आहे. माननीय रोजगार हमी योजना मंत्री श्री.संदिपानराव भुमरे साहेबांना आम्ही विकास कामांबाबत पत्रे दिल्यानंतर त्यांनी ती कामे मंजूर करण्याबाबत विश्वास दिला. आमच्या भागातील विकास कामे झाली पाहिजेत असे आम्हाला वाटते. परंतु मी सांगू इच्छितो की, विधान सभेच्या आमदारांना जेवढे महत्व आहे तेवढेच महत्व विधान परिषदेच्या आमदारांना देखील आहे. त्यामुळे विधान परिषदेच्या आमदारांना विधान सभेच्या आमदारांच्या बरोबरीने विकास कामांसाठी निधी मिळावा. जेणे करुन आम्हाला जनतेची कामे, विकास कामे करता येतील, अशी माझी विनंती आहे. प्रत्येक सन्माननीय सदस्य मंत्री महोदयांकडे विकास कामांसाठी पत्र देतो. मी माननीय पशुसंवर्धन मंत्री श्री.सुनील केदार साहेबांकडे जाऊन त्यांना पत्र देईल की, माझ्या भागात पशु वैद्यकीय चिकित्सालय सुरु करण्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा. परवा सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मल्लखांब संदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. मी त्यावेळी देखील हा मुद्दा उपस्थित केला होता की, क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यासाठी स्थानिक आमदार विकास निधी देता येतो. आमदार चषक, कबड्डी स्पर्धा देखील आयोजित करता येतात. गाव पातळीवर अनेक कर्तबगार कलावंत व मुले आहेत. त्यांना स्कोप मिळाला पाहिजे. परंतु त्यांच्याकडे आर्थिक चणचण असते. आमदारांनी अशा प्रकारचे खेळ आयोजित करण्यासाठी स्थानिक विकास निधी द्यावा आणि त्यातून त्यांची राज्य स्तरावर निवड होऊन त्यांना नोकरीमध्ये प्राधान्यक्रम मिळावा असे करता आले तर ते महत्वाचे होईल.

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी..........

सभापती महोदय, शासनाने दूध भुकटी संदर्भात महत्वपूर्ण निर्णय घेतलेला आहे. शासकीय दूध योजनेंतर्गत अतिरिक्त होणाऱ्या एकूण १३७.९३ लक्ष लिटर दुधाचे भुक्टीत रुपांतर करण्यात येऊन उत्पादित दूध भुकटी व देशी कुकींग बटरची ई-पोर्टलद्वारे विक्री करुन एकूण २०७.१४ कोटी रुपये महसूल प्राप्त झालेला आहे. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळालेला आहे. माननीय पशुसंवर्धन मंत्री विदर्भातील आहेत. नागपूर शहरात विमानतळ व इतर सुविधा आहेत. यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. कारण या जिल्ह्यात शेतीसाठी जोड व्यवसाय नाही. सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस साहेब, पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर दूध संघ आहेत. अमरावती, अकोला भागात खारपाणपट्टा आहे. आमच्या भागात शेतीसाठी जोड व्यवसाय नाही. जानेवारी, फेब्रुवरी महिन्यात कपाशीचे पीक निघाल्यानंतर जून महिन्यापर्यंत म्हणजे पाऊस पडत नाही तोपर्यंत शेतकऱ्यांकडे कोणतेही काम नसते. कारण शेतकऱ्यांकडे जोडधंदा नाही. शेत मालाला योग्य भाव असेल तर शेतकऱ्याला दोन पैसे मिळतात. आपल्या भागात धान उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणावर आहेत. आता सुर्यफुल, करडई, हरभरा पीक निघालेले आहे. कापूस उत्पादक शेतकरी निसर्गाच्या भरवशावर अवलंबून आहे. गाव पातळीवर टेक्स्टाईल सारखे छोटे उद्योग राबविता आले तर त्यातून लोकांना रोजगार मिळेल. गिरण्या, सूत गिरण्या भरपूर झालेल्या आहेत. बोरगांव मंजू टेक्स्टाईल पार्क निर्माण झालेला आहे. मघाशी महिला बचत गटांचा विषय मांडण्यात आला. महिला बचत गटाच्या महिलांकडे विविध पदार्थ तयार करण्याची कला आहे. ॲमॅझॉनवरुन ऑनलाईन पिज्झा मागविता येतो. त्या प्रमाणे शेतकऱ्यांच्या झुनका भाकरीला सुद्धा प्राधान्य मिळाले पाहिजे. महिला बचत गट त्यासाठी काम करण्यास तयार आहेत. परंतु त्यांना पाहिजे तसे पाठबळ मिळत नाही. महिला बचत गटाकडे आर्थिक चणचण असते. महिला बचत गटांना प्राध्यक्रम कसे देता येईल यासाठी प्रयत्न केला पाहिजे. शेतीला जोडधंदा असला पाहिजे. घरातील गृहिणी जोड व्यवसाय करु लागली तर सरकारने त्याबाबत सुद्धा विचार केला पाहिजे.

श्री.अमोल मिटकरी..........

सभापती महोदय, मघाशी महामंडळाचा मुद्दा मांडण्यात आला. विदर्भ वैधानिक विकास महामंडळ हे महत्वाचे महामंडळ आहे. अद्याप महामंडळांचे वाटप का झाले नाही हा वेगळा विषय असू शकतो. परंतु महामंडळाबाबत विचार करण्यात यावा. महामंडळे पुन्हा गठीत करण्यात यावीत. विदर्भातील ग्रामीण भागातील अनेक मुद्दे आहेत. (...अडथळा...) शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करता आले तर मला त्याचा आनंदच आहे. विधान परिषदेच्या आमदारांना डीपीसीच्या माध्यमातून विकास कामांसाठी निधी मिळाला पाहिजे. शासनाकडून विकास कामांसाठी निधी मिळाला नाही तर डीपीसीच्या माध्यमातून तरी आम्हाला विकास कामांसाठी हक्काचा निधी मिळाला पाहिजे. शासनाने पालकमंत्री महोदयांना तसे आदेश दिले पाहिजेत. विधानसभा व विधान परिषदेच्या आमदारांना विकास कामासाठी निधी उपलब्ध करुन देताना तफावत आढळून येते, ही वस्तुस्थिती आहे. मी सरकारच्या विरोधात बोलतो असे नाही. परंतु आपण प्रॅक्टिकल विचार केला पाहिजे. राज्यात महाविकास आघाडी सरकार चांगल्या प्रकारे काम करीत आहे. परंतु मला असे वाटते की, त्या कामांना आणखी थोडी चालना देणे क्रमप्राप्त ठरते. निधीची चणचण आहे हे मी मान्य करतो. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे साहेबांनी अनेक मुद्दे मांडून शासनाकडून काही अपेक्षा व्यक्त केलेल्या आहेत. जनतेसाठी या अधिवेशनातून काय मिळाले असा प्रश्न आम्हाला विचारण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. २५१५, ३०५४, ग्रामीण भागातील विकास कामांशी निगडीत जे हेड्स आहेत त्यासाठी निधी उपलब्ध झाला तर विकासाला गती मिळेल. मी सांगू इच्छितो की, केंद्र शासनाकडून राज्याला ४० हजार कोटी रुपये जीएसटी परतावा मिळणे बाकी आहे. केंद्र शासनाकडून ती थकबाकी राज्याला मिळवून देण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे, माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर साहेबांनी प्रयत्न केले पाहिजेत. सन्माननीय सदस्य डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके यांचे माननीय श्री.नितीन कडकरी साहेबांबरोबर जवळचे संबंध आहेत. ते रोडशोमध्ये एकमेकांना चॉकलेट देत होते. आता केंद्राचे अधिवेशन सुरु आहे. आपण सर्वांनी

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी..........

एकत्र येऊन माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी साहेबांची भेट घेऊन राज्याच्या हक्काचा जीएसटीचा ४० हजार कोटी रुपयांचा परतावा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावा. आपण विविध कामांसाठी १० हजार कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. केंद्र शासनाकडून जीएसटीचा परतावा मिळाला तर ऊर्जा, ग्रामविकास, आरोग्य, पशुसंवर्धनाचे प्रश्न मार्गी लागतील. सरकारच्या वतीने मी ती जबाबदारी घेतो. मात्र आपण जीएसटीचा परतावा मिळवून द्यावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या वतीने सरकारला कितीही दोष दिला किंवा नियम २६० अन्वये प्रस्तावात राज्याच्या विकासाचा अजेंडा दिसत नसल्याचे सांगितले तरी आम्ही हार मानणार नाही. माजी पंतप्रधान स्व.अटल बिहारी वाजपेयी असे म्हणतात की,

"क्या हार में, क्या जीत में,

किंचित नहीं भयभीत मैं,

कर्तव्य पथ पर जो भी मिला,

यह भी सही वह भी सही,

वरदार नहीं मांगूंगा,

हो कुछ पर हार नहीं मानुंगा."

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे दोन शब्द संपवितो.

--------

यानंतर श्री.सांगळे.......

श्री.किरण सरनाईक (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी नियम २६० अन्वये मांडलेल्या केलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय क्रीडा मंत्री श्री.सुनील केदार सदनामध्ये उपस्थित आहेत. मी काही गोष्टी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणू इच्छितो. महाराष्ट्रातून विशेषत: ग्रामीण विभागातून चांगले खेळाडू, महिला खेळाडू तयार होण्यासाठी क्रीडा मंत्री म्हणून आपण अतिशय चांगल्या प्रकारे काम करीत आहात. खेळाडूंचा विकास होण्यासाठी आपण अनेक प्रकारच्या क्रीडा विषयक भौतीक सुविधा निर्माण करीत आहात. परंतु महाविद्यालये, विद्यापीठे असो, अनेक चांगले खेळाडू तेथे प्रवेश मिळण्यापासून वंचित राहत आहेत. याचे मुख्य कारण असे आहे की, खेळाडू ज्या खेळांमध्ये कौशल्य दाखवित असतात त्यांचे कौशल्य सदर ठिकाणी प्रवेश देत असताना विचारात घेतले जात नाही. परिणामी ते विद्यार्थी महाविद्यालये तसेच विद्यापीठांमध्ये प्रवेश घेण्यापासून वंचित राहतात. महाविद्यालयांमध्ये पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाकरिता प्रवेश घेतेवेळी विद्यार्थी खेळाडूंकरिता ५ टक्के आरक्षणाची सुविधा शासनाने उपलब्ध करुन द्यावी असे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते. सदर आरक्षण फक्त विद्यापीठांतर्फे आयोजित होणाऱ्या क्रीडा प्रकारांना अनुसरुन असले पाहिजे. तसेच शालेय किंवा खुल्या क्रीडा स्पर्धांमध्ये १४ वर्षे वयोगटाती मुली खेळत असतात. त्यात प्राविण्य प्राप्त करणाऱ्या मुलींना देखील महाविद्यालयांमध्ये प्रवेश देतेवेळी आरक्षण द्यावे. महाविद्यालये, विद्यापीठे असो, तेथे क्रीडा प्राध्यापक किंवा प्राध्यापिका कार्यरत असतात. परंतु त्या ठिकाणी खेळांचा सराव करुन घेण्यासाठी विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी नसतात. ग्रामीण विभागातील विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे क्रीडा नैपूण्य असते. परंतु ते महाविद्यालयांच्या प्रवेशापासून वंचित राहतात. अशा विद्यार्थ्यांना आरक्षण दिल्यास क्रीडा व कौशल्य विभागाच्या माध्यमातून देशाचे नावलौकिक करणारा एखादा विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी निर्माण होऊ शकेल.

श्री.किरण सरनाईक ...

सभापती महोदय, क्रीडासाठी खेळाडूंना प्रोत्साहन देणे हे आपले कर्तव्य आहे. परंतु खेळाडूंना क्रीडा कौशल्य दाखविण्यासाठी संधी मिळाली पाहिजे. त्या दृष्टीने विद्यापीठांतर्फे विविध क्रीडा प्रकारांमधून विभागीय किंवा अखिल भारतीय आंतर विद्यापीठांच्या स्पर्धांमध्ये फक्त सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरीकरिता आरक्षण नाही. उच्च शिक्षणासोबत विविध खेळांमध्ये सहभागी झालेले खेळाडू हे देशासाठी चांगल्या प्रकारचे सशक्त खेळाडू म्हणून तयार होऊ शकतात. म्हणून माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, विद्यापीठांतर्फे विविध क्रीडा प्रकार तसेच विभागीय किंवा अखिल भारतीय आंतर विद्यापीठांच्या स्पर्धांमध्ये सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरीमध्ये थेट आरक्षण देणे शक्य नसल्यास कमीत कमी महाराष्ट्र शासनातर्फे आयोजित होणाऱ्या नोकऱ्यांच्या संदर्भात विविध स्पर्धा परीक्षांकरिता शासनाने मान्यता द्यावी. जेणेकरुन उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी खेळाडूंना प्रेरणा मिळू शकेल. त्यामुळे महाराष्ट्र व देशामध्ये चांगली सशक्त खेळाडूंची पिढी निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, विविध विद्यापीठांमध्ये वेगळया गोष्टी लागू करण्यात आलेल्या आहेत. क्रीडा, सांस्कृतिक, रक्तदान, एनसीसी, एनएसएसमध्ये अशा विविध ठिकाणी भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठामध्ये दोन्ही सत्रांमध्ये सवलत देऊन प्रती सत्राकरिता फक्त ५ गुण दिले जातात. अशा प्रकारे दोन्ही सत्रामध्ये त्यांचे फक्त १० गुण होतात. माझी मंत्री महोदयांना अशी विनंती आहे की, , विद्यापीठांतर्फे विविध क्रीडा प्रकार तसेच विभागीय किंवा अखिल भारतीय आंतर विद्यापीठांच्या स्पर्धांमध्ये सहभाग घेणाऱ्या विद्यार्थी खेळाडूंना क्रीडा सहभागाच्या प्रति सत्राकरिता १० गूण दिल्यास त्यांचे एकूण २० गूण होतील. ही बाब विद्यार्थ्यांच्या दृष्टीने भविष्यात प्रेरणादायी ठरू शकेल. अशा प्रकारे शासनाने कार्यवाही केल्यास विद्यार्थी खेळांकडे आकर्षित होतील. जेणेकरुन महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये चांगले खेळाडू निर्माण होतील. अशा प्रकारे शासनाने खेळाडू विद्यार्थ्यांसाठी काही योजना राबविल्यास येणारी नवीन तरुण पिढी आपल्याला निश्चितपणे धन्यवाद देईन. मी केलेल्या

असुधारित प्रत

श्री.किरण सरनाईक ...

विनंतीला मंत्री महोदयांनी आदराने मान द्यावा अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. सन्माननीय सदस्य श्री.अमोल मिटकरी यांनी सांगितल्याप्रमाणे विविध कामांसाठी विविध प्रकारचे निधी आवश्यक असतात. परंतु विद्यार्थी किंवा विद्यार्थिनींना खेळाडू होण्यासाठी जी प्रेरणा लागते ती आपण सदनाच्या माध्यमातून त्यांना द्यावी अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो व याच ठिकाणी थांबतो, धन्यवाद.

------------

असुधारित प्रत

श्री.सुरेश धस (उस्मानाबाद-बीड-लातूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी नियम २६० अन्वये मांडलेल्या केलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा – १ च्या धर्तीवर टप्पा – २ सुरु करण्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी उल्लेख केला आहे. तत्कालीन पंतप्रधान अटबिहारी वाजपेयी यांच्यानंतर श्री.मनमोहन सिंह तत्कालीन पंतप्रधान होते. तत्कालीन पंतप्रधान अटबिहारी वाजपेयी यांच्या काळात देशात प्रधानमंत्री ग्रामसडक योजना सुरु झाली होती. त्यानंतर तत्कालीन पंतप्रधान श्री.मनमोहन सिंह यांनी ती योजना पुढे सुरु ठेवली होती. परंतु युपीए-२ च्या काळात सदर योजना बंद पडली. आता माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या काळात सदरहू योजना सुरु झाली. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या काळात राज्यात प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर मुख्यमंत्री ग्रामसडक योजना सुरु करण्यासंबंधी निर्णय घेण्यात आला. त्या माध्यमातून राज्यामध्ये जवळपास २५ हजार कि.मी. रस्ते झाले पाहिजेत याकरिता तत्कालीन ग्रामविकास मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी त्यावेळी जिल्हा परिषदेच्या अखत्यारित न ठेवता स्वतंत्रपणे सीएमजेएसवायची कार्यालये सुरु केली होती. त्यामुळे सदर कामांना जास्त प्रमाणात गती मिळाली. मी या निमित्ताने शासनाला विनंती करणार आहे की, शासनाने नाबार्ड किंवा जागतिक बँकेच्या माध्यमातून या पुढील कामे करावीत. परंतु जुनी कामे सुरु करण्यासंबंधी शासनाने निर्णय घेतला पाहिजे. त्यात काही कामे निविदा स्तरावर प्रलंबित असतील, काही कामे वर्कऑर्डर झाल्यानंतर सुरु होऊ शकली नसतील, अशा प्रकारची कामे शासनाने सुरु करणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य चंद्रशेखर बावनकुळे यांच्याप्रमाणे माझे देखील असे मत आहे की, घरकुलांच्या बाबतीत प्रधानमंत्री आवास योजना आहे. त्यात ४ लाख २५ हजार घरकुले पूर्ण झाल्याची आकडेवारी दिलेली आहे. आता मागल वर्षांपासून प्रपत्र-ड मधील घरकुलांची कामे घेण्यासंबंधी शासनाने निर्णय घेतला आहे. माझी माननीय ग्रामविकास मंत्र्यांना अशी विनंती आहे की, केंद्र

श्री.सुरेश धस ....

शासनाने सदर योजनेमध्ये काही दुरुस्ती करुन निकष बदलल्यानंतर पूर्वी झालेल्या ऑनलाईन घरकुलांमधील कुटुंब संख्या आता कमी होऊ लागली आहे. ही संख्या कमी होत असताना ऑनलाईनमधून घरकूल डिलिट झाल्यानंतर त्या गरिबाचे घरकुलाचे स्वप्न चिरडले जाते. अशा प्रकारे कुटुंब संख्या कमी होत असताना त्यावर काही तरी बंधन टाकून त्यात जिल्हा परिषदेचे अध्यक्ष किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यापर्यंत ती कार्यवाही झाली पाहिजे. परंतु डीआरडीएचे खाते आणि ऑनलाईन प्रक्रिया करणारा ग्रामपंचायतीमधील कर्मचारी, तो अधिकृत कर्मचारी नसतो. अशा कर्मचाऱ्याने ऑनलाईनमधून सदर घरकूल डिलिट केल्यास त्या गरिबांचे घरकूल डिलिट होत असल्याच्या अनेक तक्रारी येत आहेत.

सभापती महोदय, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार ग्रामीण हमी योजनेच्या माध्यमातून मनुष्यबळ निर्मितीबाबत सांगायचे झाल्यास ५ लाख ३९ हजार, स्वच्छ भारत मिशनच्या माध्यमातून ८ लाख ७८ हजार तसेच प्रधानमंत्री उज्ज्वला सौभाग्य योजनेच्या माध्यमातून ५ लाख ७८ हजार मनुष्यबळ निर्मिती होणार आहे.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

श्री.सुरेश धस .....

माझे एकच म्हणणे आहे की, सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी प्रस्ताव चांगला मांडला आहे, आकडेवारी केंद्र सरकारची दिली आहे, पण त्यात देशाच्या पंतप्रधानांचे मी अभिनंदन करतो अशी एक ओळ लिहियला हवी होती, असे माझे मत आहे. केंद्र सरकारच्या पाणी मिशनमध्ये अर्धा निधी केंद्र सरकारचा व अर्धा निधी राज्य सरकारचा आहे. त्याची अंमलबजावणी मोठया प्रमाणावर जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सुरु आहे. राज्य सरकारने त्याबाबत चांगले निर्णय घेतले आहेत. खाली कामे सुरु होत आहेत. यामध्ये एक अट आहे की, कार्यारंभ आदेश दिल्यानंतर एकच वर्षात काम पूर्ण करायचे आहे, एक वर्षात पूर्ण झाले नाही तर पूर्णत्व प्रमाणपत्र द्यायचे व ते काम संपले असे ग्राहय धरायचे अशी अट आहे. नळ योजना कार्यारंभ आदेश, पाईपलाईनची कामे फक्त उन्हाळयात चालू करु शकतो. पाऊस पडल्यावर कोणता शेतकरी पाईपलाईन करु देणार आहे, अडवाअडवी होणार आहे. म्हणून त्याला कालावधी ठरविला पाहिजे की, ३० एप्रिलपर्यंत आम्ही कार्यारंभ आदेश देऊ. तेथपासून थांबवू. आहे त्या योजना पूर्ण करु व पुढील निविदा काढू असे काही धोरण यामध्ये पाणीपुरवठा विभागाने घेण्याची आवश्यकता आहे. ग्रामविकास विभागाकडून काही निर्णय होणे आवश्यक आहे असे मी ग्रामविकास राज्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो.

सभापती महोदय, मागील सरकारच्या काळात मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय होऊन राजपत्रात जाहीर झाले की, ज्या ग्रामपंचायती, नगरपंचायती, नगरपालिका झाल्या आहेत त्यांच्या हद्दीतील ज्या मालमत्ता जिल्हा परिषदेच्या आहेत त्या सर्व नगरपंचायती व नगरपालिकेला हस्तांतरीत करण्यात याव्यात असा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मग त्या कोणत्याही पक्षाच्या असोत. परंतु एक ओळ अशी टाकली की, १९९९ च्या शासन निर्णयाप्रमाणे याची अंमलबजावणी व्हावी. १९९९ चा शासन निर्णय मी स्वत: माहितीच्या अधिकारात सरकारला मागितला. तरी सरकार म्हणते की, हा निर्णयच सापडत नाही. तो कोठेच सापडत नाही. एकाने सांगितले की, तो सातारा जिल्हा परिषदेमध्ये आहे, तेव्हा सातारा जिल्हा परिषदेतही जाऊन

असुधारित

श्री.सुरेश धस .....

विचारले. ते म्हणाले की, आमच्याकडेही नाही. ज्या मालमत्ता जिल्हा परिषदेच्या नावावर आहेत, नगरपंचायतीच्या हद्दीत आहेत, प्राईम लोकेशनवर आहेत, त्यावर चुकीच्या लोकांचा डोळा पडला तर या मालमत्ता जिल्हा परिषद वाचवू शकणार नाही. त्याऐवजी नगरपंचायतीला हस्तांतरीत केल्या तर त्यांच्या डीपी प्लॅनप्रमाणे काम करुन सार्वजनिक प्रयोजनासाठी वापरात राहतील. शिक्षण विभाग, जनावरांच्या दवाखाने अशा मालमत्ता आहेत. जिल्हा परिषदेची चालू शाळा बंद करा किंवा हस्तांतरीत करा असे मी म्हणणार नाही. ज्या मालमत्तेचा सार्वजनिक हितासाठी उपयोग होऊ शकतो तेवढया वर्ग कराव्यात.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजेश राठोड, श्री.गोपिचंद पडळकर, ॲड.निलय नाईक इत्यादी तांडा व वाडीबाबत सातत्याने मागणी करीत असतात. लहान तांडे व वाडयांना लोकसंख्येचा निकष लावू नये. यांच्याकडे फक्त निवडणुकीच्या वेळी उपयोगी म्हणून पाहिले जाते, नंतर मात्र त्यांच्याकडे पाहात नाही. स्वतंत्र ग्रामपंचायती करण्याबाबत विचार व्हावा. स्टँडींग कमिटीमध्ये ठराव घ्यावा, पुन्हा जिल्हा परिषदेकडून आयुक्तांकडे पाठवले जाते, हे न करता राज्य सरकारच्या पातळीवर निर्णय घ्यावा. महसूल विभागाने स्वतंत्र सजाबाबत असा निर्णय घेतला आहे, तसा निर्णय आपण घ्यावा.

सभापती महोदय, शेततळ्याचा व पाणंद रस्त्याबाबत निर्णय चांगला आहे, या योजनेस तुम्ही मातोश्रींचे नाव दिलेले आहे. परंतु त्याची अंमलबजावणी होईल असे मला वाटत नाही. कारण आमदारांची पत्रे घेतली आहेत, ज्या आमदारांच्या ताब्यात पंचायत समिती नाही तेथील बीडीओ व सभापती त्या कामास प्रशासकीय मान्यता देईल की नाही असा प्रश्न निर्माण होणार आहे. या कामास केंद्र शासनाचा ७५ टक्के निधी आहे, २५ टक्के निधी आपला आहे. त्यातील कुशल पार्टचे पैसे राज्य शासनाच्या वतीने देण्यात येणार आहेत. परंतु दोन किलोमीटरपर्यंतचा निर्णय चांगला आहे. गाय गोठयाबाबतचा आपण उल्लेख केलेला आहे. शरद पवार साहेबांचे नाव द्यायचे होते तर दुसऱ्या योजनेला द्यायचे, गाय गोठे अशा योजनांना कसे त्यांचे नाव

असुधारित प्रत

श्री.सुरेश धस .....

देता. याबाबत काही कळत नाही.

सभापती महोदय, जात पडताळणीबाबत क्षेत्रीय बंधन १९७६ ला उठवले. मराठवाडयातील आठ जिल्हयातील तसेच नांदेड येथील मन्नेरवारलू, महादेव कोळी हे सर्व अडचणीत आहेत. विदर्भातील लोकही त्यामुळे अडचणीत आहेत. जात पडताळणी समितीबाबत कोठेतरी विचार झाला पाहिजे. माननीय संसदीय कार्य मंत्री ॲडअनिल परब व अन्य सदसयही याविषयी पूर्वी मोठमोठयाने बोलत होते. पण याबाबत व बोगस प्रमाणपत्राबाबत कोठेतरी विचार झाला पाहिजे. हा विषय या प्रस्तावात असल्याने मी बोलत आहे.

सभापती महोदय, आमच्याकडे अतिष तोडकर नावाचा मुलगा आहे. हा मुलगा ५७ किलो गटामध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणार आहे. तो आंतरराज्य व आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील खेळला आहे. राहूल आवारे हा डीवायएसपी पदावर नियुक्त झाला असून आमच्याकडील मुलगा आहे. अशा होतकरु मुलांना नोकरी मिळाली नाही तर ज्या कालावधीत ते प्रशिक्षण घेत आहेत त्या कालावधीत त्याची घरची परिस्थिती खराब असेल तर अशा मुलांना काही तरी मिळावे. त्याचे प्रमाणपत्र पाहिले जाते, तो जिंकल्यावर नोकरीस घेतले जाते त्याऐवजी त्याची प्रगती चांगली चांगली असेल तर याकरीता चांगला निर्णय क्रीडा मंत्री महोदयांनी घ्यावा, अशी विनंती आहे.

सभापती महोदय, जीएसटी परताव्याबाबत सांगतो. जीएसटीचा परतावासुध्दा ग्राहय पकडून बजेट तयार केले जाते. मला वाटते की, राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री हे केंद्र सरकारकडून पैसा येतो असे येथे बोलतात, ते पैसे आपोआप येतच राहतात. निधी वाटपामध्ये मराठवाडा, विदर्भाचा हक्क व अधिकार होता, जे डावलून तुम्हाला काही देता येत होते परंतु वैधानिक विकास मंडळे सध्या नाहीत. सध्या सत्ताधारी पक्षाचे आमदार २५:१५ च्या निधीवरच खुश होतात.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

श्री.सुरेश धस.......

विदर्भामध्ये मोठमोठया वॉटर ग्रीडसारख्या योजना आहेत. विदर्भामध्ये आपण म्हणता की, आत्महत्या होत आहेत. परंतु विदर्भातील ज्या पाच – सहा जिल्हयांमध्ये आत्महत्त्या होत आहेत, त्याच पॉकेटमध्ये माझ्या मते गाई-वाटपाचा कार्यक्रम जास्त राबविला पाहिजे. कृष्णा मराठवाडा सिंचन योजनेकरिता ८५० कोटी रुपये दाखविले जातात, प्रत्यक्षात मात्र शेवटपर्यंत २०० कोटी रुपये देखील खर्च होत नाहीत. या योजनेमध्ये उस्मानाबाद आणि बीड जिल्हा आहे, असे असताना या योजनेचा निधी हा जास्तीत जास्त खर्च होणे आवश्यक आहे. मराठवाडा आणि विदर्भाला अतिरिक्त निधी मिळाला पाहिजे. नांदेड, वाशिम या जिल्हयांना देखील अधिकचा पैसा मिळाला पाहिजे. कोराना कालावधीतील पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्री महोदयांच्या कामाबद्दल त्यांचे मी अभिनंदन करणार आहे. त्यावेळी सहकारच्या दुधाचे कन्व्हर्जन करणे फार आवश्यक होते. अन्यथा या क्षेत्रातील सहकारी संस्था संपल्या असत्या. खाजगी वगैरे कोणाचे काहीही न घेता मंत्रीमहोदय त्यांच्या भुमिकेवर फर्म आणि स्टॅण्ड राहिले. आता जो २०७ कोटी रुपयांचा कन्व्हर्जनचा आकडा सांगितला, ते त्यावेळी करुन घेतले, त्याच्याबद्दल माननीय दुग्धविकास मंत्री यांचे मी अभिनंदन करतो. पशुसंवर्धन विभागातील रिक्त जागा भरणे आवश्यक आहे. काही काही तालुक्यात एकही डॉक्टर नाही, अशी अवस्था त्या ठिकाणी आहे. महानंदच्या बाबतीत भविष्यात ३६ आणि ३१ लोकांचे संचालक मंडळ जे आहे, ते योग्य नाही. आता एवढे मोठे संचालक मंडळ परवडण्यासारखी ती संस्था राहिलेली नाही. मी एके काळी त्या संस्थेचा चेअरमन राहिलेलो आहे. मी सव्वा वर्षांमध्ये २,४५,००० हजाराहून ६,३५,००० लाख हजारावर विक्री नेऊन सोडलेला चेअरमन आहे. यामुळे मी याबाबत हे अत्यंत जबाबदारीने बोलत आहे. एवढया मोठया संचालक मंडळाची आता त्याची मुदत संपत आलेली आहे. पूर्वी श्री.आनंदराव देवकाते साहेब हे याचे चेअरमन होते. माझे मत असे आहे की, राज्याचे दुग्धविकास मंत्री हे या संस्थेचे चेअरमन असावे, व्हाईस चेअरमन राज्यमंत्री महोदय यांना नेमावे. आटोपशीर संचालक मंडळ ठेवले तरच ही संस्था वाचेल. सरकार देखील याच्यामध्ये मदत करेल, म्हणून पुढील काळात मुदत संपल्यानंतर शासनाने याबाबत योग्य तो

श्री.सुरेश धस......

निर्णय करावा, अशा प्रकारची माझी विनंती आहे. मुक्त गाय-गोठेच्या बाबतीत इन्फ्रास्ट्रक्चरकरिता काही मदत देता येईल का, याचा देखील शासनाने विचार करावा. केवळ गाई-वाटपच नव्हे तर इन्फ्रास्ट्रक्चरची देखील आवश्यकता आहे. मुक्त जनावरे ठेवण्याच्या बाबत इन्फ्रास्ट्रक्चरकरिता मदत करता येईल का, याचा देखील विचार करणे आवश्यक आहे. होलस्टीन फ्रिजीयन तर आपल्याकडे मोठया प्रमाणावर आहेच. साहिवाल आणि गीरच्या बाबत शासनाने जो निर्णय घेतलेला आहे, तो अधिक गतीने राबविण्यात यावा, अशी मी विनंती करीत आहे. एम्ब्रियो ट्रान्सप्लांटच्या बाबत अजून पाहिजे तेवढी जागृती खालच्या स्तरातील लोकांपर्यंत झालेली नाही. याकरिता केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे. परंतु राज्य शासनाची एम्ब्रियो ट्रान्सप्लांटच्या समितीमध्ये माननीय सीएस आणि माननीय सचिव, दुग्धविकास हे सदस्य आहेत. ही संकल्पना जास्तीत जास्त लोकांपर्यंत गेली पाहिजे. एम्ब्रियो ट्रान्सप्लांट जर करायचे असेल तर, ते बाहेरच्या देशातून आणायचे असेल तर त्या त्या सहकारी संस्था, संघापर्यंत सुलभ जाण्याच्या बाबत काय करता येईल, याचा देखील शासनाने विचार केला पाहिजे, याबाबत योग्य तो निर्णय शासनाने घेणे आवश्यक आहे.

श्री.अमोल मिटकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस यांनी पूर्वी त्यांच्या भाषणात विविध योजना ज्या सरकार राबविते. त्याच्यामध्ये पाणंद रस्त्यांची योजना जी आहे, ती "मातोश्री पाणंद योजना" या नावाने आहे. गाय-गोठयांच्या संदर्भातील योजनेला माननीय श्री.शरदचंद्रजी पवार यांचे नाव का दिले, असा उल्लेख त्यांनी सहज केला होता.

श्री.सुरेश धस (खाली बसून): सभापती महोदय, मी उलटपक्षी असे म्हटले की, माननीय श्री.शरदचंद्रजी पवार यांचे नाव अन्य योजनेला न देता गाय-गोठे या योजनेला का दिले ?

श्री.अमोल मिटकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस हे ज्यावेळी आमच्या पक्षात होते, त्यावेळी त्यांना कल्पना असेल की, माननीय श्री.शरदचंद्रजी पवार साहेबांचा आवडता विषय हा कृषी व संलग्न बाबी हाच आहे.

श्री.अमोल मिटकरी.....

अटलजींचे नाव देखील पेन्शन योजनेला दिलेले आहे. याच्यावरुन काही ठरत नाही. पण....अडथळा....

श्री.विनायक मेटे ( खाली बसून ) : सभापती महोदय, आमचे म्हणणे असे होते की, यापेक्षा दुसऱ्या कोणत्या योजनेला माननीय श्री.शरदचंद्रजी पवार यांचे नाव द्यायला पाहिजे होते.

**तालिका सभापती ( श्री.अमरनाथ राजुरकर ):** ठीक आहे.

---------------

असुधारित प्रत

श्री.अरुण लाड ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, नियम २६० अन्वये माननीय श्री.शशिकांत शिंदे यांनी अतिशय चांगल्या विषयावर चर्चा उपस्थित करुन त्यामध्ये सहभागी होऊन आपले विचार मांडण्याची संधी आपल्या सर्वांना दिलेली आहे. या नियम २६० अन्वये उपस्थित केलेल्या चर्चेमध्ये सहभागी होण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, आज देशात व राज्यात पंतप्रधान सडक योजना, मुख्यमंत्री सडक योजना मोठया प्रमाणात राबविली जात आहे. या योजनेचे काम संदर्भित महामंडळाकडून गतीने चालू आहे. हे काम चालू असताना यामध्ये अनेक अडचणी यायला लागलेल्या आहेत. मोठमोठे रस्ते या योजनेच्या माध्यमातून होत आहेत. जेथे पाणी नाही, अशा ठिकाणी त्यांनी बाय-पास रोड काढून दिलेले आहेत. जेथे पाणी आहे,तेथे वहिवाट रोड आहे. सातारा-सांगली जिल्हयातून जो रोड जातो, तेथे शेतकरी एक इंचदेखील याकरिता जागा देत नाही. यामुळे रस्त्यांची उंची वाढलेली आहे. जमिनीपासून, शेतापासून, मोकळ्या जागेपासून रस्त्यांची उंची दहा-दहा फुट वाढलेली आहे. यामुळे शेतकऱ्यांना या रस्त्यांवरुन बैलगाडी, खते, गाई-म्हशी कशा न्यायच्या, हा प्रश्न आता गंभीर होत आहे. आता याकरिता एक योजना काढली पाहिजे. शेतकऱ्यांना शेतात जाण्याकरिता योग्य ती व्यवस्था निर्माण केली पाहिजे. अन्यथा शेती उत्पादन कमी होईल. माल शेतातून आणता येणार नाही. शेतात खते नेता येणार नाही. याकरिता ही बाब अडचणीत राहून चालणार नाही. म्हणून यासाठी एक नवीन योजना आणली पाहिजे. पाणंद रस्त्यांची आवश्यकता खूप मोठी आहे. कारण आज शेतातून कारखान्याकडे जाणारा जो रस्ता विकास निधीतून होत होता, तो शासनाने बंद केलेला आहे. पाणंद रस्त्याकरिता हा वेगळा निधी काढून तो त्या कामाकरिता वापरला गेला पाहिजे. पाणंद रस्ते पावसाळयात धुऊन जातात, नवीन पाणंद रस्ते चांगले केले पाहिजे. रस्त्यांचे खडीकरण, डांबरीकरण केले तरच हे रस्ते टिकतील, याकरिता योग्य तो निर्णय घेणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांचा शेतात जाण्याचा पाणंद रस्ता हा महत्त्वाचा मार्ग आहे, तो मोकळा केला पाहिजे.

असुधारित प्रत

श्री.अरुण लाड .....

सभापती महोदय, आज दुग्धविकास हा महत्त्वाचा विषय असून त्यावर चर्चा सभागृहात झालेली आहे. हा जोड-धंदा आमच्या खेडयातील आहे. खेडोपाडी आपण पाहतो की, सकाळी महिला-भगिनी, मुले किटली घेऊन सेंटरवर दुध पोहोचविण्याकरिता आलेले असतात. गाय-गोठयांचा धंदा हा केवळ एक धंदा नसून आमच्या खेडयातील स्वत:चा वैयक्तिक महिलांचा जोड व्यवसाय आहे. महिला ऊस-बागायतीचे पैसे येण्याची वाट पाहत नाही. दुधाच्या धसवडयाचे पेमेंट हातात कधी येईल, याचा विचार करतात. या धसवडयाचे पेमेंट हे महिलेच्या हातात येते. या पेमेंटवर महिलेचा कौटुंबिक खर्च चालत असतो. या योजनेला गती द्यावी. प्रत्येक कुटुंबाला एक गाय किंवा एक म्हैस द्यावी. गोठे व्हावे परंतु गोठे होत असताना हा कौटुंबिक जोड-धंदा कुटुंबाच्याच हातात असावा,याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. हा जोड-धंदा वाढावा, दुग्धउत्पादन वाढावा, आपल्या राज्यातील दुध आपल्या राज्यातच कसे जास्त खपेल,हे पाहावे. दुध पावडर होत असताना त्याकरिता आवश्यक तेवढे मार्केटिंग देखील आपल्याकडे होणे आवश्यक आहे. परंतु तशी मार्केटिंग दुध पावडरची आपल्याकडे होत नाही. जगाच्या बाजारपेठेत ज्यावेळी दुध पावडर कमी किमतीत विकली जाते, त्यावेळी आपल्या देशात त्याकरिता अनुदान दिले जात होते, यापूर्वी एकदा याकरिता अनुदान दिले होते, त्यावेळी त्याचा चांगला उपयोग झाला होता. परंतु आता अनुदानाशिवाय दुध पावडर धंदा चालू शकत नाही. जास्त दुध उत्पादन झाल्यानंतर त्याची दुध पावडर झाली पाहिजे. त्याकरिता जगाच्या बाजारपेठेत देखील दुध पावडरकरिता अनुदान दिले गेले पाहिजे.

सभापती महोदय, आता सभागृहात क्रीडा विषयावर देखील चर्चा झालेली आहे. क्रीडा, ऑलम्पिक, खेळाडू यांचा देखील विषय चर्चिला गेलेला आहे. खेळाडू तळातून आला पाहिजे. प्राथमिक शाळेतून खेळाडू आला पाहिजे, असे म्हटले जाते. परंतु प्राथमिक आणि माध्यमिक शाळेत शासनाने क्रीडा शिक्षकच काढून घेतलेला आहे. क्रीडा प्रशिक्षणच प्राथमिक व माध्यमिक शाळेत दिले जात नाही. आमच्या खेडयातील मुलांना क्रीडा शिक्षक हा महत्त्वाचा आहे. खेडयातील मुले या क्रीडा

असुधारित

श्री.अरुण लाड .....

स्पर्धेत टिकू शकत नाही. खेडयातील मुले क्रीडा स्पर्धेत टिकण्याकरिता त्यांना योग्य प्रशिक्षण मिळाले पाहिजे. निदान क्रीडा प्रशिक्षणातून खेडयातील मुले शरीर सौष्ठव कमावू शकतात. निदान त्या योगे तो पोलीस, सैन्यात भरती तरी होऊ शकतील. याकरिता खेडयातील मुलांना शरीर सौष्ठव कमाविणे महत्त्वाचे आहे. या सर्वांकरिता क्रीडा विषय, क्रीडा शिक्षक महत्त्वाचा आहे. शासनाने खेडयातील शाळांमध्ये क्रीडा शिक्षक देणे महत्त्वाचे आहे.

सभापती महोदय, पंतप्रधान सडक योजनेतून बांधण्यात येत आलेल्या रस्त्याची उंची कमी झाली पाहिजे. त्या रस्त्याच्या बाजूला कशा पध्दतीने द्यावे, याकरिता शासनाने एक कमिटी नेमणे आवश्यक आहे. लोकांना शेतात जाता येणे महत्त्वाचे आहे. लोकांना या रस्त्यांवरुन बैल, बैलगाडी, खते नेता यावी, याकरिता याबाबत योग्य तो विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, लहान मुलींना शासन एक रुपया अनुदान देत आहे. मागासवर्गीय मुलींना एक रुपया अनुदान दिले जात आहे. एक रुपयात काहीच येत नाही. एक रुपयाचे ते चलन देखील बंद होण्याच्या मार्गावर आहे. आज इलेक्ट्रीक वजन काटयावर देखील एक ऐवजी दोन ते पाच रुपये इतका चार्ज वाढविलेला आहे. असे असताना त्या मागासवर्गीय लहान मुलींना केवळ एक रुपयाचे अनुदान हे शासन का देत आहे ?

यानंतर श्री.सोनावणे......

अमुद्रित प्रत

श्री. अरुण लाड........

त्या गरीब मुलीला शाळेत शिक्षण घेता यावे म्हणून तिला १० रुपयांचे अनुदान द्यावे अशी मी मागणी करीत आहे. पालकांनी आपल्या मुला-मुलींना शाळेत शिक्षणासाठी आवर्जून पाठवावे अशी व्यवस्था निर्माण करण्यासाठी शासनाने प्रयत्न करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, माननीय दुग्धविकास मंत्री महोदयांनी बैल गाडीच्या शर्यतीमुळे शासनावर टीका होत होत असल्याचे सांगितले होते. माननीय न्यायालयात बैलांच्या शर्यतीवरील स्टे उठविल्यानंतर १० हजार रुपयांच्या बैलाची किंमत ही १ लाखाच्या पुढे गेली. कारण हा व्यवसाय महत्वाचा आहे. बैलगाडीच्या शर्यतीशिवाय त्या व्यवसायाला, बैलाला आणि पैदासीला चालना मिळण्यास मदत होणार आहे. अशा प्रकारचे चांगले निर्णय शासनाने घ्यावेत अशी विनंती करीत आहे. सामान्य शेतीकडे आवर्जून लक्ष देण्याची गरज आहे आणि त्याकडे माननीय मंत्री महोदय लक्ष देत आहेत.

सभापती महोदय, आज राज्यात मोठे रस्ते किंवा हायवे आहेत. पण पांदन रस्ते दिसून येत नाही, ते दिसून येतील या दृष्टीकोनातून शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

धन्यवाद.

---------

असुधारित प्रत

श्री. सदाभाऊ खोत ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांनी सत्ताधारी पक्षातर्फे म.वि.प. नियम २६० अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावासंबंधी मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, शेतकरी आणि त्यांचे प्रश्न सदरहू प्रस्तावात यायला हवे होते. परंतु, महाविकास आघाडी सरकारला त्याचा विसर पडला की काय, असे एकंदरित या प्रस्तावात दिसून येत आहे. गेल्या वर्षी अर्थसंकल्पात ज्या घोषणा करण्यात आल्या आणि पुनश्च या वर्षीच्या अर्थसंकल्पात नव्याने घोषणा झाल्या पण त्याची अंमलबजावणी केली किंवा कसे, ज्या घोषणा केल्या होत्या, त्या पूर्णत्वाला नेल्या काय, हे खऱ्या अर्थाने महत्वाचे आहे. गेल्या वर्षी अर्थसंकल्पात राज्यात कर्करोगाच्या निदानासाठी दीडशे रुग्णालयात सुविधा देणार अशी घोषणा केली होती. आतापर्यंत किती रुग्णालयात त्या सुविधा दिलेल्या आहेत, की दिल्याच नाहीत याबाबत कोणतीही स्पष्टता दिसून येत नाही. कर्करोगावरील उपचार हा सामान्य माणसाच्या आवाक्याच्या बाहेर आहे. परंतु, त्यांना उपचार किंवा सुविधा मिळणे गरजेचे आहे. गेल्या वर्षी अर्थसंकल्पात ज्या घोषणा करण्यात आल्या त्याची यावर्षी कोणत्याही प्रकारे अंमलबजावणी झालेली दिसून येत नाही. असे असताना पुन्हा नव्याने घोषणा केल्याचे दिसून येत आहे. मोबाईलवरुन कर्करोगाचे निदान केले जाईल अशी घोषणा केलेली आहे. पहिली घोषणा पूर्ण न करताच दुसरी घोषणा केल्याचे दिसून येत आहे. प्रत्येक जिल्ह्यातील रुग्णालयात व वैद्यकीय महाविद्यालयात कोविड पश्चात समुपदेशन व उपचार केंद्रे यावर्षी किती सुरु झालेली आहेत असा माझा प्रश्न आहे. या वर्षीच्या अर्थसंकल्पात नांदेड, अमरावती, जालना, भंडारा, अहमदनगर, सातारा या जिल्ह्यात ५० खाटांचे प्रथम दर्जाचे ट्रामा केअर युनिट उभा करण्याची घोषणा केली होती. तालुक्यातील किंवा जिल्ह्यातील जे पूर्वीचे दवाखाने आहेत, त्या ठिकाणी पुरेसे डॉक्टर आणि औषधांची कोणतीही व्यवस्था किंवा आवश्यक ती यंत्रसामुग्री नाही. याकडे शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. महाविकास आघाडी सरकार हे केवळ लोकपयोगी घोषणा करीत आहे. २०० खाटांच्या सर्व रुग्णालयांमध्ये येत्या तीन वर्षात लिथोट्रीप्सी उपचार पध्दती, मोतीबिंदूवर आधुनिक

श्री. सदाभाऊ खोत....

पध्दतीने उपचार पध्दती सुरु करणार असे सांगितले आहे. हिंगोली, यवतमाळ, बुलडाणा, सातारा, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, वर्धा, भंडारा, जळगाव, अहमदनगर, धुळे, सोलापूर, रत्नागिरी, औरंगाबाद आणि रायगड येथे १०० खाटांचे स्त्री रुग्णालय उभे करण्याची घोषणा केलेली आहे. जिल्ह्याच्या पातळीवर जी शासकीय रुग्णालये आहेत त्या ठिकाणी स्त्री रोग डॉक्टर आहेत काय ? तोही स्टाफ आपल्याकडे नाही. एका बाजूला ही चांगली घोषणा केलेली असून, ती अंमलात आणली जाऊ शकते किंवा कसे हे सर्वात महत्वाचे आहे. जालना येथे ३६५ खाटांचे नवीन प्रादेशिक मनोरुग्णालय स्थापन करणार अशी घोषणा केलेली आहे. जालना जिल्ह्याचे मंत्री असल्यामुळे त्या ठिकाणी मनोरुग्णालय स्थापन केले जाईल. यासंदर्भात मला माननीय आरोग्य मंत्री महोदयांचे अभिनंदन करावेसे वाटते. माननीय आरोग्य मंत्री महोदयांच्या असे लक्षात आले की, या राज्यात आपल्या काळात मनोरुग्णांची संख्या वाढू लागली आहे. काय हरकत नाही. त्यासाठी त्यांनी निधी दिलेला आहे. सदरहू प्रस्तावात सन्माननीय सदस्य श्री. चंद्रशेखर बावनकुळे असे म्हणाले की, दिवा बत्तीचे विज बिल ग्रामपंचायतीने भरले नाही तर संबंधितांचे सरपंच पद जाणार आणि दुसऱ्या बाजूला कोरोना मुक्तीच्या कामाला ज्या ग्रामपंचायतींनी चांगली कामे केलेली आहेत, अशा ग्रामपंचायतींना १५, २०, २५ आणि ५० लाख रुपयांचे बक्षीस दिलेले आहे. पण तुझे सरपंच पद घालविणार असे म्हटले आहे. राज्याच्या इतिहासात दिवा बत्तीचे विज बिल कधीच ग्रामपंचायतीने भरले नाही. नवीन वस्ती वाढल्यामुळे स्ट्रीट लाईट उभी करावयाची असेल तर जिल्हापरिषद दाखला किंवा मान्यता देत नाही. त्यामुळे नवीन वस्ती वाढल्यामुळे स्ट्रीट लाईट घेता येत नाही. पहिली थकबाकी भरल्यानंतरच नवीन वस्तीमध्ये स्ट्रीट लाईटसाठी पोल टाकून दिले जातील आणि त्यानंतर घरांना विद्युत मिळणार आहे. आज अनेक घरे ही अंधारात आहेत. यासंदर्भात शासनाची भूमिका काय आहे हे सुध्दा या ठिकाणी समजून येत नाही. दुसऱ्या बाजूला राज्यात ५ लाख ४२ हजार ९९४ महिलांचे स्वयंसहाय्यता गट कार्यरत असून, शासनाने त्यांना ५५ लाख ३५ हजार रुपयांचे अनुदान दिलेले आहेत. आज महिला बचत गटांची परिस्थिती कशी आहे ? राज्यातील अनेक महिला बचत गट या कर्जबाजारी झालेल्या

असुधारित प्रत

श्री. सदाभाऊ खोत....

आहेत. राज्यातील अनेक महिला बचत गटांनी फायनान्स कंपनीकडून कर्ज घेऊन महिलांना कर्जवाटप केलेले आहे. आज महिला बचत गट अडचणीत आलेले आहेत. अशा महिला बचत गटांना मदत करण्याचे धोरण शासनाकडे असायला हवे होते. पण तसे धोरण मला कोठेही दिसून आले नाही. दुसऱ्या बाजूला प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया योजना ही केंद्र शासनाची आहे. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना ही केंद्र शासनाची आहे. पण दुसऱ्या बाजूला केंद्र शासनाने ही योजना राबविली असून, ती चांगली गोष्ट आहे. पण मुख्यमंत्री अन्न प्रक्रिया योजना ही राज्य शासनाची होती. ती शासनाने किती राबविली हा खरा प्रश्न आहे. यासंदर्भात किती प्रोजेक्ट किंवा प्रकल्प सादर केले आहेत हे सुध्दा कोठेही दिसून येत नाही.

सभापती महोदय, माननीय क्रीडा मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी अनेक धाडसी निर्णय घेतलेले आहेत. मी त्यांना काही सूचना करणार आहे. संकरित गिरी जातीच्या वाणाचा प्रसार करावा लागणार आहे. डॉक्टरांची उणिव भरुन काढावी लागणार आहे. अनेक अपूर्ण दवाखान्यांची कामे हाती घ्यावी लागतील. आज जास्त तापमान वाढल्यामुळे गिरी जात टिकत नाही. विशेष: विदर्भात तिला खूप अडचणी येत आहेत. संकरित गिरी जातीच्या वाणाला उत्तेजन दिले तर विदर्भ आणि मराठवाड्यात दूध व्यवसाय वाढण्यास मदत होणार आहे आणि शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारे कामे मिळू शकतील. क्रीडा विभागाच्या संदर्भात रक्कम वाढविली आहे. रनींग ट्रॅक किंवा जॉगिंग ट्रॅक हा १० किंवा १५ लाख रुपयांमध्ये होत नाही. त्या कामासाठी दीड ते दोन कोटी रुपयांचा खर्च येतो. रनींग ट्रॅक करण्यासाठी अडीच कोटी रुपयांचा खर्च येतो. तालुका आणि जिल्ह्यातील क्रीडा संकुलाच्या कामासाठी किती निधी मिळतो याचा देखील विचार करण्याची आवश्यकता आहे. नियोजन आयोगातून ग्रामपंचायतीला निधी दिला जातो. आमदारला ५ लाख रुपयांपर्यंत मर्यादा आहे. राज्यात चांगले खेळाडू निर्माण करावयाचे असतील तर ते आपल्याला मुळापासून निर्माण करावे लागतील.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

## अर्धा-तास चर्चेच्या सूचनांबाबत

**तालिका सभापती :** आजच्या कामकाजपत्रिकेत दर्शविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चा पुढे ढकलण्यात येत आहेत.

--------

**तालिका सभापती :** सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या मंगळवार, दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी......

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, आपण अशाप्रकारे अचानक सभागृहाची बैठक स्थगित करणे उचित होणार नाही. आपण सभागृहापुढील कामकाजाच्या बाबतीत सभागृहाचा कानोसा घेणे अपेक्षित आहे. या प्रस्तावावरील चर्चा सुरु ठेवण्यास मंत्री महोदय तयार आहेत. अनेक सन्माननीय सदस्य या प्रस्तावावर बोलण्यासाठी थांबलेले आहेत. त्यामुळे माझी विनंती आहे की, आमचा मेसेज माननीय सभापतींना कळवावा. तसेच......

**तालिका सभापती :** सभागृहाची बैठक स्थगित करण्यापूर्वी मी निदर्शनास आणून देतो की, सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत या प्रस्तावावर ऑनलेग राहतील.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या मंगळवार, दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता पुन्हा भरेल. सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक होईल. उक्त बैठकीत आजच्या कामकाजातील सत्ताधारी पक्षाचा नियम २६० चा प्रस्ताव चर्चेला घेण्यात येईल. त्यानंतर दुपारी १२.०० वाजता सभागृहाची नियमित बैठक पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी ७ वाजून ०१ मिनिटांनी, मंगळवार, दिनांक २२ मार्च, २०२२ च्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------------